

# modern

1973

*With Best Compliments from :*



# SANGHVI METAL CORPORATION

**Manufacturers of :**

Industrial Quality Copper, Brass and

Aluminium Sheets, Strips and Circles and

**Re-roller of Stainless Steel Sheets**

★

**Office & Works :**

159/2, Akurdi, Bombay-Poona Road,
CHINCHWAD, Poona-19.
Phone : 8449

★

**Sole Selling Agents :**

M/s. Sanghvi Matal & Alloys Co.,
28, 1st Bhoiwada, Bhuleswar Road,
BOMBAY-2.
Phone : 334979

वर्ष तिसरे : अंक तिसरा
( १९७२–७३ )

# मैत्री



प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे साहित्य, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय

संपादक :
डॉ. भीमराव कुलकर्णी

संपादन समिती : प्राचार्य मो. भा. लिमये, ( अध्यक्ष ), डॉ. भीमराव कुलकर्णी,
प्रा. सी. रा. रायकर, प्रा. सु. ग. दातार, डॉ. अ. के. पांडे, प्रा. श्री. दा. संगोराम

## श्रे य ना मा व ली

कु. अंबू वाडेकर तृवसा ९, ५५ * न. ग. देशपांडे द्विवसा ११ * आर. एम्. पाटील तृवशा १५, ५२ * आनंद देशपांडे, प्रयोगशिक्षक १६, २७ * सतीश शहा तृवसा १७ * सुरेश शिंदे प्रवसा १७ * राजीव कुलकर्णी प्रवसा १८ * विक्रमादित्य शिंदे द्विवसा २०, ३४ * सतीश शहा तृवसा २२ * एम. एफ. मोमीन पपूसा २२ * बबन खांडगे द्विवसा २३ * जयंत कुलकर्णी तृवसा २४, ६२ * मुरलीधर एरंडे द्विवसा २५, ५२ * प्रा. चंद्रकांत कुलकर्णी २८ * कु. मंगला यादव द्विवसा ३१, ३९, ५९ * श्यामकान्त सुतार द्विवसा ३१, ३४, * सुरेशचंद्र पाध्ये द्विवसा ३२, ५३, ५४ * प्रदीप सिद्धये द्विवसा ३५, ६२ * पुणेकर ३६ * कु. मृणाल पाठक तृवसा ४० * कु. आशा ओझर्डे तृवसा ४२ * कु. मंगल मधवे तृवसा ४४ * कु. सिंधु भागवत तृवसा ४५ * कु. छाया जोशी तृवसा ४६ * कु. सुरेखा आफळे तृवसा ४७ * ज्ञानदेव एरंडे प्रवसा ४८ * शंकर शेलार द्विवसा ५० * जे. व्ही. सुरवसे पपूसा ५३ * आनंद ओगले द्विवसा ५३, ५४ * रा. का. आडकर प्रवशा ५४ * कु. शोभा सावंत द्विवसा ५५ * नंदकुमार साने द्विवसा ५६ * शरदकुमार पोंक्षे द्विवसा, सौ. हेमा लेले द्विवसा ५७ * कु. ज्योत्स्ना विंझे द्विवसा ६० * कु. सुलभा वोपर्डीकर द्विवसा ६० * मुकुंद कडुसकर तृवसा ६२ * पंढरीनाथ सिंगाळकर प्रवसा ७० * डी. एन्. एरंडे प्रवसा ७१ * सतीशचंद्र कुलकर्णी प्रवसा ७१ * प्रा. द वि. पुंडे ७३ * आनंद काळभोर पपूसा ७६ * दादासाहेब निसाळ प्रवसा ७८ * कु. पद्मा वोडके द्विवसा ७९ * कु. संध्या पाठक पपूसा ८१ * कु. सुमन जोशी पपूसा ८३ * कु. प्रतिभा कान्हेरे द्विवसा ८५ * प्रा. अश्विनीकुमार फडके ८९ * आर. व्ही. गंधे प्रयोगशिक्षक ९० * प्रमोद खडिकर प्रवसा ९३ * एम्. के. कनोजिया तृवशा ९६ * विवेक मराठे द्विवसा ९७ * एन. डी. दुधाळे प्रयोगशिक्षक ९९ *

संक्षेप खुलासा * पपू पदवीपूर्व * प्रव प्रथमवर्ष * द्विव द्वितीय वर्ष
तृव तृतीय वर्ष * सा साहित्य * शा शास्त्र * वा वाणिज्य

मुखपृष्ठ : मुकुंद कडुसकर * सजावट : मुकुंद कडुसकर, जयंत कुलकर्णी
साहायक : दिलीप संकपाळ, कु. मीना कोलंबकर



मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, 'शिवपार्वती', टिळक रस्ता, पुणे ३०
प्रकाशक : प्राचार्य मो. मा. लिमये, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५

# सन्माननीयांचे मनोगत

## 'I Congratulate'

The visit brought back to my mind my association with the late S. R. Kanitkar with whom I worked as Colleague in the Fergusson College. He was the first Supdt. of the Modern High School out of which, I may say, this College has naturally evolved.

I was happy to note that even under three years of existance, the strength of the College has doubled itself.

The reports of the Principal and his students gave an impressive record of achievements of students in the field of sports and games as in academic.

I congratulate the Principal and his staff on the imaginative move of awarding Prizes in the form of National Savings Certificates.

**Dr. G. S. Mahajani**
Vice – Chancellor, University of Poona

## 'संस्थापकांचा अर्धपुतळा हवा!'

वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी मुख्य पाहुणा म्हणून दि. २१ जानेवारी १९७३ च्या प्रसन्न सायंकाळी मॉडर्न महाविद्यालयास भेट देण्याचा सुयोग जुळून आला.

महाविद्यालयातील वातावरण फार चांगले वाटले. विद्यार्थी, अध्यापकवर्ग व सेवक यांचेमधील परस्पर सामंजस्य उल्लेखनीय वाटले. महाविद्यालयाने फार थोड्या कालावधीत पुण्यातील नावाजलेल्या महाविद्यालयांत गणना करून घेतली आहे.

विद्यमानवर्षी भीषण दुष्काळ पडलेला आहे, याची जाणीव ठेवून विद्यार्थी, अध्यापकवर्ग यांनी सहकार्याने दुष्काळग्रस्तांना सहाय्य करण्यासाठी माझे आवाहनानुसार आर्थिक साहाय्य केले आहे हे नमूद करून ठेवीत आहे. विद्यार्थी व अध्यापकांच्या सहवासातील अल्पकाळ फार सुखावह वाटला.

के. शंकरराव कानिटकर या मॉडर्न प्रशालेच्या संस्थापकांचा अर्धपुतळा या परिसरात असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने या पुतळ्यासाठी मी रु. ५०० वैयक्तिक देणगी दिली आहे. त्याबाबत त्वरित कार्यवाही व्हावी अशी सूचना करावीशी वाटते.

**नीलकंठ लिमये**
महापौर, पुणे.

## 'संस्थेचे भविष्य उज्ज्वल आहे!'

१। संस्थेच्या (फर्ग्युसन महाविद्यालय) शेजारीच नव्याने निघालेले हे महाविद्यालय पाहाण्याचा योग आज आला. नवे वातावरण, नवा उत्साह, नवी इमारत, नवा प्राध्यापकवर्ग असे सारे नवे येथे आहे व ते अतिशय उत्साहवर्धक आहे. या संस्थेचे भविष्य उज्ज्वल आहे यात संशय नाही.

**डॉ. वि. रा. करंदीकर**
मराठीचे प्रमुख प्राध्यापक, फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

# प्राचार्य लिमये यांचे तृतीय पारितोषिक वितरण प्रसंगीचे स्वागतपर व महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा आढावा घेणारे भाषण

आपल्या या तृतीय वर्षीसमारंभाचे प्रमुख पाहुणे माननीय महापौर श्री. निळूभाऊ लिमये, आजच्या समारंभाचे अध्यक्ष, आपले कुलगुरु डॉ. महाजनी. सौ. महाजनी, निमंत्रित आदरणीय स्त्रीपुरुष, सहकारी प्राध्यापक व माझ्या प्रिय विद्यार्थीमित्रांनो.

आजच्या या शुभप्रसंगी आपल्या सर्वांचे हार्दिक स्वागत करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आमच्या निमंत्रणाला मान देऊन आपण सर्वजण आज येथे आलात, यात आपला आमच्यावरील व महाविद्यालयावरील लोभ व्यक्त होतो. त्या लोभाला पात्र ठरण्याचा आम्ही कसोशीने प्रयत्न करीत राहू.

आजच्या आपल्या समारंभाचे प्रमुख पाहुणे आपल्या या शहराचे महापौर श्री. नीळकंठ वामन लिमये हे निळूभाऊ या नावानेच अधिक ओळखले जातात. खरे पाहता ते पाहुणे नसून आपल्या घरचेच आहेत. आपल्या संस्थेच्या मॉडर्न हायस्कूलचे अगदी सुरुवातीचे ते विद्यार्थी.

लोकसेवा, समाजसेवा हे निळूभाऊंच्या घराण्यातील बाळकडूच होय. आपल्या वडिलांच्या कडून घेतलेला हा वारसा निळूभाऊंनी आपल्या विद्यार्थीदशेपासून आजतागायत चालविला आहे. मतभेद ओलांडून सर्वांशी मैत्री हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

१९४२ च्या स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेऊन, तुरुंगात व तुरुंग फोडून तुरुंगाच्या बाहेर भूमिगत राहून त्यांनी सतत कार्य केले आहे.

चळवळीच्या समाप्तीनंतर चळवळीतीलच काही सहकाऱ्यांना बरोबर घेऊन निळूभाऊंनी हॉटेल-व्यवसाय सुरु केला. निळूभाऊंचे 'पूनम' हे फक्त हॉटेलच न राहता एक सामाजिक संस्था बनले आहे. सर्व थरांतील कार्यकर्त्यांना व गरजूंना 'पूनम' व निळूभाऊ हे आश्रयस्थान वाटते. जेथे अन्याय आहे तेथे आवाज उठविण्यासाठी, जेथे गरज आहे, दुःख आहे तेथे मदतीसाठी निळूभाऊ नेहमीच तत्परतेने पुढे सरसावतात.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सर्वांत आधी निळूभाऊ विद्यार्थ्यांना मदतकर्ज मिळवून देण्यासाठी पुढे सरसावले. ८०० विद्यार्थ्यांना दरमहा ६५ रु. कर्ज देण्याची योजना त्यांनी कार्यान्वित केली आहे. आपल्या महाविद्यालयातील ३६ गरजू विद्यार्थ्यांना या योजनेखाली कर्ज मिळण्याची व्यवस्था केली आहे. दुष्काळग्रस्तांसाठी इतर आघाड्यांवरही त्यांचे प्रयत्न चालू आहेत. निळूभाऊ हे मितभाषी व बोलावे थोडे पण करावे खूप अशा मनोवृत्तीचे आहेत. त्यांचे सहा महिन्यांचे कारकीर्दीत त्यांनी महापौरपदावरून लोकसेवा कशी करावी याचा आदर्श घालून दिला आहे. असे प्रमुख पाहुणे आज आपल्याला लाभले याबद्दल आनंद वाटतो.

आपल्या या समारंभाला आपले कुलगुरु डॉ. महाजनी हे अध्यक्ष लाभले आहेत ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. आपल्या सांस्कृतिक वारशांतील, पूर्वीच्या परंपरेतील, ऋषितुल्य

मॉडर्न '७३
चार

वर्तनाची व आचरणाची जी काही थोर गुरुजन मंडळी आज पुण्यामध्ये व महाराष्ट्रात आहेत त्यांत डॉ. महाजनींची अग्रभागी गणना होते.

एम्. ए. व पीएच. डी. ची पदवी मिळविल्यानंतर १९२९ सालापासून १९४६ सालापर्यंत प्राध्यापक व प्राचार्य म्हणून फर्ग्युसन महाविद्यालयात त्यांनी काम केले. त्यानंतर राजपुताना, उदेपूर, दिल्ली विद्यापीठांचे कुलगुरु व Union Public Service Commission चे सभासद म्हणून अत्यंत मोलाची कामगिरी त्यांनी बजावली आहे. ४ मे १९७२ रोजी पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदाची धुरा अत्यंत बिकट काळात त्यांनी आपल्या शिरावर घेतली व अत्यंत तडफेने, न्यायबुद्धीने व कार्यक्षमतेने ती ते पार पाडीत आहेत.

त्यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाची ओळख होण्यास एक उदाहरण पुरेसे आहे. एका महाविद्यालयात मोठा समारंभ होता. मोठी मोठी मंडळी व्यासपीठावर होती. आमारप्रदर्शनाचे काम चालू होते, फक्त डॉ. महाजनींचे आभार मानताना त्या प्राचार्यांनी पुष्पहार गुच्छ समर्पणानंतर खाली वाकून डॉ. महाजनींना नमस्कार केला.

आपल्या या नवीनच निघालेल्या घटक महाविद्यालयाचे कोडकौतुक करण्यासाठी व आम्हांला आशीर्वाद देण्यासाठी प्रकृती बरी नसताना महत्त्वाची कामे बाजूला ठेवून आपले कुलगुरू अध्यक्ष म्हणून येथे आले त्याबद्दल मी व हे महाविद्यालय त्यांचे ऋणी आहोत.

सौ. इंदुताई महाजनींनी येथे येऊन पारितोषिक वितरण करण्याचे मान्य केले त्याबद्दल त्यांचेही आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

आज आपल्या देशात व विशेषतः महाराष्ट्रात दुष्काळाचे दाट सावट पडले आहे. अत्यंत बिकट काळातून आपण जात आहोत व यापेक्षाही बिकट प्रसंगातून आपल्याला जावे लागणार आहे. कठीण प्रसंगातून जाताना हातपाय गाळून स्वस्थ बसण्याऐवजी आपले नित्य-नैमित्तिक कार्यक्रम निष्ठेने व आत्मीयतेने पार पाडण्यात व त्यातूनच संकटावर मात करण्याचा, त्याची आच कमी करण्याचा प्रयत्न करण्यात पुरुषार्थ आहे. प्रत्यक्ष संकटापेक्षा संकटाच्या विचाराने माणूस कृतिशून्य होण्याचा व त्यातून त्याचे मनोधैर्य खचण्याचा धोका संभवतो व त्या दृष्टीने प्रसंगाचे गांभीर्य ओळखून सापेक्षपणाने व गरीब व दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांस ज्यातून मदत होईल, अशा तऱ्हेचा कार्यक्रम आखण्याचे व त्याप्रमाणे स्नेहसंमेलन पार पाडण्याचे आम्ही ठरविले. आमच्या या सर्व कार्यक्रमातील मुख्य सूर मनोरंजनाबरोबरच मदत व बचत, प्रदर्शनातून शैक्षणिक बोध व त्याबरोबरच गरीब विद्यार्थ्यांसाठी द्रव्यसाहाय्य हा आहे. आज दिली जाणारी महाविद्यालयातील निरनिराळ्या संघटनांची पारितोषिके देखील राष्ट्रीय बचत-पत्रांच्या माध्यमातून दिली जाणार आहेत.

त्याबरोबरच स्नेहसंमेलनातील अल्पोपहारास फाटा देऊन केलेली बचत व प्राध्यापकवर्ग व कर्मचारीवर्ग यांनी दिलेली आपल्या एक दिवसाच्या पगारांची रक्कम यांतून दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी आम्ही अध्यक्षांचे हस्ते रु. २००१ महापौर व आजचे प्रमुख पाहुणे श्री. निळूभाऊ लिमये यांस देत आहोत. आपल्या महापौरांनी बँक ऑफ महाराष्ट्राचे मदतीने दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांना मिळवून दिलेल्या कर्जाबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत. आमची अल्पस्वल्प रक्कम त्यांनी स्वीकारावी अशी मी त्यांना विनंती करणार आहे. मला मुद्दाम सांगितले पाहिजे की या रकमेमध्ये श्री. पाध्ये (एस्. वाय्. बी. कॉम्.) व श्री. सहस्रबुद्धे (टी. वाय्. बी. कॉम्.) या आमच्या दोन विद्यार्थ्यांनी दिवाळीच्या सुटीत फटाके विकून मिळविलेल्या रु. १०१ चा समावेश आहे. तसेच श्री. देसेकर (पी. डी. आर्टस्.) यांनी जादूचे प्रयोग करून मिळविलेले रु. १०२ ही यात जमा केले आहेत.

आपले महाविद्यालय काळा (Time) बदलच्या घट असलेल्या सध्याच्या कल्पनांप्रमाणे

फक्त तीन वर्षांचे आहे. परंतु शैक्षणिक संस्थांचे बाबतीत चारत पावसाळे पाहिले म्हणजेच दर्जा प्राप्त होतो असे नाही. दर्जा हा संस्थाचालकांचा उदार दृष्टिकोण, आर्थिक भक्कमपणा, प्राध्यापकांचा दर्जा, अनुभव, त्यांचा शैक्षणिक कार्यातील रस व विद्यार्थीवर्गाची ज्ञानार्जनातील भूक तहान व क्षेप यांवर अवलंबून असतो.

त्या दृष्टिकोणातून या महाविद्यालयाचे वय हे रसरसलेल्या जवान बेडर व शिस्तबद्ध तरुणाचे आहे आणि तो तरुण जसा सदैव नवनवीनतेच्या शोधात असतो त्या प्रमाणेच आपले हे महाविद्यालय कोणत्याही परंपरा रूढी यांच्या त्याच त्याच साच्यात अडकून न राहता नवीन परंपरा, नवीन क्षेत्रे यांच्या शोधात मोठ्या उमेदीने व उत्साहाने वाटचाल करीत आहे.

आपल्या महाविद्यालयाने चालू वर्षी अनेक क्षेत्रात विक्रम व नवीन उपक्रम केले आहेत व त्याबद्दल विद्यार्थी व प्राध्यापक यांचे अभिनंदन करणे जरूर आहे.

त्या दृष्टीने मी प्रामुख्याने काही ठळक गोष्टी आपल्यापुढे मांडतो.

(१) यंदाचे वर्षी महाविद्यालयातील विद्यार्थिसंख्या १४२१ असून साहित्य विभागाकडे २८८, शास्त्र विभागाकडे ४२४ व वाणिज्य विभागाकडे ७०९ अशी त्यांची वर्गवारी आहे. तीनही विभागांत पदवीपर्यंत शिक्षण देणारे हे महाविद्यालय आहे. विद्यापीठ अनुदान मंडळाची मान्यता व द्रव्यसाहाय्य या महाविद्यालयाला गेल्या वर्षापासून मिळत आहे व त्यातून विद्यार्थी विश्रामिका व उपहारगृह यांचे बांधकाम सध्या चालू आहे.

(२) साहित्य विभागाकडे मराठी व अर्थशास्त्र हे विशेष विषय शिकविण्याची यंदा सोय करण्यात आली आहे. पुढील वर्षी तृतीय वर्षासाठी राज्यशास्त्र व मानसशास्त्र व द्वितीय वर्षासाठी भूगोल व इतिहास हे विषय शिकविण्याची व्यवस्था केली जाणार आहे.

शास्त्र विभागाकडे यंदा रसायनशास्त्र हा प्रमुख विषय शिकवला जातो. पुढील वर्षी पदार्थविज्ञान या विषयाची सोय केली जाईल.

वाणिज्य विभागाकडे Advanced Accounting & Auditing व Cost Accounting या बरोबरच Statistics हा विषय पुढील वर्षी शिकविला जाईल.

(३) विद्यापीठीय परीक्षांतही आमच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. पदवीपूर्व वाणिज्य परीक्षेत कुमारी पद्मिनी जोगळेकर ही ७२ टक्के गुण मिळवून विद्यापीठात ८ वी आली आहे. निरनिराळ्या परीक्षांमध्ये ३८ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली आहे.

उल्लेखनीय टक्केवारी खालीलप्रमाणे आहे.

पदवीपूर्व वाणिज्य ७८ टक्के, प्रथम वर्ष वाणिज्य ७६ टक्के, तृतीय वर्ष वाणिज्य ८२ टक्के प्रथम वर्ष कला ७८ टक्के, द्वितीय वर्ष विज्ञान ८१ टक्के.

(४) यंदापासूनच सुरू झालेल्या राष्ट्रीय सेवा योजनेत आमच्या ७५ विद्यार्थी विद्यार्थिनींनी भाग घेतला असून १ दिवसाची ४ शिबीरे, ३ दिवसांचे १ शिबिर, रक्तदान, वृक्षारोपण, रिमांडहोममध्ये रंग लावणे इत्यादी कामे त्यांनी पार पाडली. आमची ११ विद्यार्थ्यांची एक तुकडी रिमांड होममधील मुलांना अभ्यास व खेळ शिकविण्यासाठी नियमित जाणार असून ३६ जानेवारी पासून या कार्यास सुरुवात होईल. राष्ट्रीय सेवा योजनेत विद्यार्थी नेते श्री. पावशे, शिंदे, कोल्हटकर, संगोराम व कु. पद्मा घोडके यांनी उत्तम कामगिरी बजावली आहे. अभिनंदन.

मॉडर्न '७३
सप्ता

(५) यंदा क्रीडाक्षेत्रात आमच्या महाविद्यालयाने फुटबॉल, व्हॉलीबॉल, बॉल बॅडमिंटन, खोखो, क्रॉस कन्ट्री, पोहणे व मैदानी शर्यतीत विशेष प्रावीण्य मिळविले आहे.

खोखो, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, पोहणे, वजन उचलणे, फुटबॉल, बॉस्केटबॉल, बॉल बॅडमिंटन व मैदानी शर्यतीसाठी आमच्या खेळाडूंची पुणे विभागातर्फे निवड झाली आहे. अभय

प्रधान (बॅस्केट बॉल), श्रीरंग इनामदार (खोखो) राष्ट्रीय पातळीवरील खेळाडू, मंगला चापेकर मैदानी शर्यती, भारती शहा व संजीवनी साने (बॉल बॅडमिंटन), आम्ना (गिर्यारोहण) या आमच्या क्रिडापटूंची पुणे विद्यापीठाच्या संघासाठी निवड झाली आहे. श्री. डवीर (पोहणे) श्री. गोडबोले (वजन उचलणे व शरीरसौष्ठव), श्री. नरवडे (क्रॉस कन्ट्री) प्रथम क्रमांक व १०००० मीटर्स दुसरा क्रमांक, मंगला चापेकर लांब उडी व १०० मीटर्स अडथळ्यांची शर्यत व लता जावक उंच उडी व १०० मीटर्स धावणे, या आमच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी आंतर महाविद्यालयीन सामन्यांत महाविद्यालयाला त्यांचे त्यांचे विभागात गुण मिळवून दिले आहेत. या आमच्या क्रीडा-स्पर्धकांचे मी खास अभिनंदन करतो.

शारीरिक शिक्षण विभागात देखील कवायती बरोबर स्पर्धात्मक खेळावर यंदा भर देण्यात आला व प्रावीण्य मिळविलेल्या क्रीडा स्पर्धकांची प्रात्यक्षिके आयोजितची करण्यात आली.

(६) राष्ट्रीय छात्र सेनेत आमचे भूगोल विषयाचे प्राध्यापक आपटे यांची अधिकारी म्हणून निवड झाली असून लष्करी शिक्षणानंतर त्यांनी त्या विभागाचे काम सुरू केले आहे. अंडर ऑफिसर शिंदे Advanced Leadership Course साठी, कॅडेट कदम २६ जानेवारीच्या Republic Day परेडसाठी व कु. सीमा वाघळ ही Leaderships Course साठी निवडले गेले आहेत.

(७) विद्यार्थी समेमार्फत निरनिराळ्या स्पर्धांसाठी विद्यार्थी पाठविले होते त्यांमध्ये खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुरुषोत्तम करंडक एकांकिकास्पर्धा कु. हेमलता अभ्यंकर, अभिनय प्रशस्तिपत्रक, श्री. सहस्रबुद्धे (टी. वाय्. बी. कॉम्.) कथाकथन (प्रेमराज सारडा कॉलेज, अहमदनगर)

हस्तलिखित नियतकालिक मॉम याचे संपादन कार्यामध्ये (१) श्री. चिटणीस (टी. वाय्. बी. कॉम्) (२) श्री. कदुसकर (टी. वाय्. बी. कॉम) (३) जयवंत कुलकर्णी (टी. वाय्. बी. कॉम) (४) श्री. सिद्धये (एस्. वाय्. बी. कॉम्.) (५) श्री. संकपाळ (पी. डी. सायन्स) यांनी विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे. याबद्दलचे प्रशंसोद्गार वेळोवेळी जाणकारांनी व वृत्तपत्रांनी काढलेले आहेत. विनोद विशेषांक व केवळ विद्यार्थीनींनी संपादित केलेला महिला विशेषांक ही मॉमची यंदाची वैशिष्टये आहेत.

यंदापासून साहित्य, शास्त्र व वाणिज्य विभागातील पदवीस्तरावरील विद्यार्थ्यांची तीन मंडळे स्थापन करण्यात आली व त्यामार्फत त्या त्या विभागात उपयुक्त अशी व्याख्याने, चर्चा, निबंधवाचन, औद्योगिक-प्रकल्पास भेट, शैक्षणिक चित्रपट, सर्व्हे पाहाणी इत्यादी कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या मंडळातर्फे आयोजित केलेले "२५ वर्षांतील भारताचे बदलते स्वरूप" हे प्रदर्शन प्रेक्षणीय व उद्बोधक झाले आहे.

प्रत्येक विद्यार्थ्याला सहभागाचा आनंद मिळावा, त्याच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, त्याच्या कलेला उजाळा मिळावा, त्याला आपल्या आवडीच्या विभागात प्रावीण्य मिळविण्याची उमेद व ईर्ष्या निर्माण व्हावी, म्हणून महाविद्यालयातील निरनिराळ्या विभागांतर्फे आम्ही निरनिराळे उपक्रम, कार्यक्रम आयोजित करतो. त्यापैकी विद्यार्थी सभा, क्रीडाविभाग वगैरेचा उल्लेख मी केलाच आहे, त्याशिवाय विद्यार्थी वाचनालय, वादविवाद व वक्तृत्वस्पर्धा, हस्तलिखित 'मॉम', काव्यगायन, वाचन, चर्चा, विविध गुणदर्शन, निबंधस्पर्धा, नाट्यगुणदर्शन, सुगम, शास्त्रीय, नाट्य व सिने संगीत हे कार्यक्रम क्रीडाविभागात खेळांचे शिक्षणाबरोबरच मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले जाते. अभ्यासविषयक साहित्य, शास्त्र व वाणिज्य व नियोजन मंडळातून चर्चा, व्याख्याने, भेटी, पाहाणी अभ्यासविषयक पुस्तकांची भर वगैरे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्याशिवाय शारीरिक शिक्षण विभाग, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, रक्तदान मोहीम,

मार्गदर्शन केन्द्र, पुस्तकपेढी व पुस्तकमदत, हुशार विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती, गरीब पण होतकरू विद्यार्थ्यांस फीमध्ये सवलत, दुष्काळग्रस्तास मदत, उत्तम तऱ्हेची स्वाध्याय योजना व अभ्यासात बादा मार्गदर्शनाची सोय, विद्यार्थी वस्तुभांडार, अभ्यासविषयक महत्त्वाच्या नियतकालिकांतील उपयुक्त लेखांची सूची, सुसज्ज ग्रंथालय व ७० नियतकालिके, इत्यादी सोई व उपक्रम चालू आहेत. तरी देखील आमच्या विद्यार्थ्यांची भूक भागली नाही. त्यांना अजून खूप काही पाहिजे आहे. त्यांना नवनवीन चांगल्या गोष्टी पाहिजे आहेत आणि याचा मला आनंद आहे. चांगल्याची मागणी करणारी ही युवाशक्ती आमची कार्यक्षमता निश्चितच वाढवील असा मला विश्वास आहे आणि विद्यार्थ्यांच्या उन्नतीसाठी, त्यांच्या भल्यासाठी कार्यक्षम राहण्यात, कार्यरत राहण्यात आम्हा शिक्षकांना खरोखरच आनंद वाटतो.

प्राध्यापक चर्चामंडळात दरमहा एका नवीन विषयावर निबंधवाचन व चर्चा असते. विशिष्ट विषयावरील चर्चेशिवाय यंदाचे वर्षी सद्यःपरिस्थितीत प्राध्यापकांचे कार्य व भूमिका, आपले अभ्यासक्रम व Students Unrest (विद्यार्थी चळवळी) यावर साधकबाधक चर्चा घडवून आणल्या आहेत. या चर्चेचे निमित्ताने त्या त्या विषयांतील तज्ज्ञ मंडळी येथे येतात. २-३ तास चर्चेत भाग घेतात, बहुमोल मार्गदर्शन करतात, व महाविद्यालयावर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटत असताना महाविद्यालयाच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन महाविद्यालयाच्या हितचिंतकांच्या संख्येत भर घालतात. अशा निरनिराळ्या प्रसंगी यंदाच्या वर्षी खालील २७ व्यक्तींची नावे आम्ही हितचिंतकांच्या यादीत समाविष्ट करू शकलो आहोत.

(१) डॉ. एम्. व्ही. ऊर्फ बसंतराव पटवर्धन, (२) प्रा. पी. एल्. ऊर्फ बाळ गाडगीळ (३) डॉ. एस्. एस्. मुतालिकदेसाई, (४) श्री. ए. आर्. शर्मा, (५) डॉ. प्र. चिं. शेजवलकर, (६) प्राध्यापक एम्. एन्. भट, (७) प्रा. एम्. एन्. कामत, (८) डॉ. ए. आर्. कुलकर्णी, (९) प्राचार्य न. गो. सुरू, (१०) डॉ. आनंद प्रकाश दीक्षित, (११) श्री. एन्. एस्. देवस्थळे, (१२) डॉ. दादासाहेब गुजर, (१३) श्री. अण्णासाहेब मगर, (१४) श्री. व्ही. एन. भिडे, (१५) डॉ. दिवाकर, (१६) डॉ. वि. रा. करंदीकर, (१७) प्रा. प्रभुदास भुपटकर, (१८) डॉ. बोगळेकर, (१९) डॉ. प्र. ल. गावडे, (२०) खाँ साहेब महमद हुसेन, (२१) प्रा. रा. म. बापट, (२२) डॉ. व्ही. एस्. हुजरबझार, (२३) डॉ. ताकवले, (२४) प्रा. सौ. कुमुद पोरे, (२५) प्रा. सिरसीकर, (२६) श्री. शिरुभाऊ लिमये, (२७) डॉ. अंबाप्रसाद सुमन, (२८) प्रा. रा. म. गोखले.

संस्थेच्या संस्थापकांनी व नियामक मंडळाने येथे जमवलेली आम्ही प्राध्यापक मंडळी वयाने, उमेदीने, उत्साहाने तरुण आहोत. आमची आमच्या कार्यावर दृढ निष्ठा आहे. येणारी आव्हाने स्वीकारून शैक्षणिक क्षेत्रात उपयुक्त काम करण्याची आमची जिद्द आहे. इच्छा आहे.

१९७०-७१ या पहिल्या वर्षी आमची परस्परात व विद्यार्थ्यांशी ओळख झाली दुसऱ्या वर्षी परिचय झाला व यंदा त्याचे परस्पर स्नेहात रूपांतर झाले आहे.

या स्नेहभावनेचा परस्पर सहकार्याचा उपयोग आमच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी होईल असा मला दृढ विश्वास आहे. आमचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर या दोन्ही क्षेत्रांत उज्ज्वल नैपुण्य संपादन करून या वास्तूची उंची व महाविद्यालयाचे वैभव वाढवतील अशी माझी खात्री आहे.

## वार्षिक पारितोषिक वितरण ( अध्यक्ष व पाहुण्यांसह व्यवस्थापन समिती )



बसलेले : कु. जाचक, प्रा. आपटे, प्रा. पाथरे, प्रा. दातार, प्रा. चिरपुटकर, उपप्राचार्य डॉ. गाडगी ३, कुलगुरू डॉ. महाजनी, सौ. महाजनी, महापौर निळूभाऊ लिमये, प्राचार्य लिमये, प्रा. गंभीर. डॉ. परांजपे, प्रा. रायकर, प्रा. महाजन, मनोहर कलापुरे.

उभे : अडके, आयना, सिसोदिया, नाईक, कोकिळ, कु. पारखी, कु. जोशी, घोगरे, निंबाळकर, पाध्ये, सहस्रबुद्धे, कडुसकर, जाधव, करडे, जगताप, चव्हाण, पाठील, शहा, शिंदे, भागवत, कातुरे, प्रसादे, बरिदे, संकपाळ, ब्रह्मे. सर्वांत मागे : गुंड, दरेकर, शहा, थिटे, शेंडे, शेल्डेकर. मागे शिपाई

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ
(क्षणचित्रे)

१.डॉ. रँ. महाजनी, २. महापौर निळूभाऊ लिमये, व ३. प्राचार्य लिमये भाषण करीत असता. व्यासपीठावर महापौर, कुलगुरु व सौ. महाजनी.

पुढच्या रांगेतील काही सन्माननीय व्यक्ती : सौ. दंडवते, प्राचार्य मुरु, डॉ. काळे, श्री. ताटके, श्री. गोखले इत्यादी.

कुलगुरु दुष्काळ-सहाय्यनिधी महापौरांस अर्पण करीत आहेत. शेजारी प्राचार्य

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ

मनोहर कलापुरे हे सौ. महाजनी यांच्या शुभहस्ते
सर्वसाधारण विजेतेपदाची ढाल स्वीकारीत असता

मोहन आयना हे सौ. महाजनी यांच्या शुभहस्ते वैयक्तिक
अजिंक्यपदाची ढाल स्वीकारीत असता

## राष्ट्रीय सेवा योजना



महमदवाडी येथे भरलेल्या शिबिरार्थी विद्यार्थ्यांसमोर प्राचार्य बोलत असता

विद्यार्थी सार्वजनिक विहीरीकडे जाणारा दगडी रस्ता तयार करीत असता

कुमारी अंजू वाडेकर

# महात्मा फुले

महात्मा ज्योतिबा फुले म्हणजे अस्सल इंग्रजीच्या काळातले प्रखर व्यक्तिमत्त्व. सूर्यालाही गवसणी घालू पाहणारे! ज्या काळात समाजसुधारणा हा केवळ विचार होता, त्या काळात फुल्यांनी तो विचार प्रत्यक्ष कृतीत आणला! त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजास नुकतीच शंभर वर्षे पुरी झाली. त्या निमित्ताने हे एक मंथन.

काही व्यक्ती या जगाच्या सीमारेषा ओलांडून केव्हाच दूर गेल्या असल्या तरी असंख्य हृदयांच्या सीमारेषेवर त्याच व्यक्ती स्मृतिरूपाने सदैव वावरत असतात. महात्मा जोतिबा फुले ही त्यांतीलच एक विभूती आहे.

सामाजिक क्रांतिकारक नेत्याच्या नशिबी टीका, उपेक्षा नेहमीच असते. उपेक्षा, अवहेलना, अपमान या गोष्टी तर त्यांच्या भाळी कायम रेखलेल्या असतात. परंतु विशाल दृष्टिकोण, वैचारिक नि तात्त्विक भक्कम बैठक, अविचल निष्ठा आणि ध्येयाची पूर्ती करण्याची मनोवृत्ती या गुणांच्या मांडवलावर सर्व विरोधांवर मात करून म. फुले काळालाही पुरून उरले.

पुण्यातील नव्या मंडईला कुणा दिवंगत देशभक्ताचे, स्वातंत्र्य सैनिकाचे नाव द्यावे असा त्यांचा आग्रह होता. तो रास्तच होता. पण अन्य सभासदांनी लॉर्ड रे साहेबांचे नाव देण्याचे ठरविले. आज त्याच मंडईला फुले मार्केट म्हणून नामाभिमान व्हावे हा एक विलक्षण योगायोग आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात समाजपरिवर्तनाची दिशा दाखविणारा पहिला क्रांतिकारक, समाजसुधारक म्हणून म. फुल्यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

२७ नोव्हेंबर १९७२ रोजी त्यांची ८२ वी पुण्यतिथी साजरी झाली. परंतु या पुण्यतिथीला या वर्षी विशेष महत्त्व आहे, कारण त्यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाला आता १०० वर्षे पूर्ण झाली. म. फुल्यांसारखा द्रष्टा महापुरुष शतकातून एखादाच होतो. १०० वर्षांपूर्वी सत्यशोधक चळवळीचे त्यांचे जे उद्दिष्ट ठेवले होते तेच उद्दिष्ट स्वातंत्र्यानंतर भारतीय घटनेनेही मान्य करून त्यांच्या द्रष्टेपणावर शिक्कामोर्तब केले.

तत्कालीन परिस्थितीचा फुल्यांनी फार बारकाईने अभ्यास केला. शतकानुशतके समाजात खोलवर रुजलेली धार्मिक अंधश्रद्धा, चुकीच्या रूढी, घोर अज्ञान, चातुर्वर्ण्य या चौकटीत समाज बांधला गेला होता. चार भिंतींत अडकलेल्या समाजाला मोकळा मार्ग हवा होता. हे कुंपण तोडायला हवे होते. दलितांवरील, पीडित शोषितांवरील 'सहानुभूतीचा जिवंत झरा' जोतिबांच्या हृदयातून खळाळत असायचा. याच व्यापक, डोळस सहानुभूतीतून व अज्ञानाच्या तिरस्कारातून त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ज्ञानदानाची ज्योत पेटविली. समाज बांधणीचा एक विधायक विचार हा सत्यशोधक समाजाच्या मुळाशी होता. समता आणि शिक्षण

यांचा पुरस्कार व अंधश्रद्धांचा धिक्कार हीच मुख्य तत्वे सत्यशोधकांनी प्रमाण मानली होती. ही तत्वे समोर ठेवून समाजपरिवर्तन घडवून आणण्याची निष्ठा म. फुल्यांची होती. या करिता लोकांची मने वळविणे महत्त्वाचे कर्तव्य होते. परंतु तेच अवघड होते, कारण राजकीय पारतंत्र्याविरुद्ध लढणाऱ्या व्यक्तीच्या पाठीशी लोकांची सहानुभूती फार लवकर उभी राहते पण आपल्याच समाजाशी, स्वजनांशी द्वंद्व करणाऱ्या क्रांतिकारकाला, समाजसुधारकाला कायमचा लोकनिंदेच्या वणव्यात होरपळावे लागते. सामाजिक छळाची तप्त मुद्रा त्यांच्या ललाटी कोरलेली असते. परंतु फुल्यांनी जणू समाजाला नवी नवी आव्हाने दिली. कोणत्याही निराशेने ते खचून गेले नाहीत. परिस्थितीवर मात करीतच त्यांनी आपल्या कार्याची उभारणी केली.

स्त्री शिक्षणाचा अभाव आणि स्पृश्यास्पृश्य भेद म्हणजे त्याकाळी समाजाला लागलेली कीड. समाजपरिवर्तन करावयाचे असेल तर ही कीड समूळ नष्ट करणे अत्यावश्यक होते. नुसता मातीचा गोळा म्हणजे मातीचा घट होत नाही. कुंभाराचा हात त्याला लागायला लागतो. गोळ्यावर संस्कार व्हावे लागतात. स्त्रिया आणि हरिजन हे त्या काळात मातीच्या गोळ्याप्रमाणे होते. उत्कृष्ट समाज निर्मितीसाठी याही गोळ्यांवर संस्कार होणे आवश्यक होते. ते कार्य महात्मा फुल्यांनी केले. मुलींनी शिकायचे नाही असा दंडक त्या काळात होता. परंतु ज्ञानदानासारखे दुसरे पुण्य नाही हे जाणूनच त्यांनी मुलींसाठी शाळा सुरू केली. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई स्वतः मुलींना शिकवत. जोतिबा आणि सावित्रीबाई म्हणजे ज्ञानदानाची दीपमाळ होती.

जातीय आणि वर्गीय हुकूमशाहीला छेद देऊन समतेच्या समतोलाचा मानबिंदू फुल्यांना गाठायचा होता. त्यासाठी समता आणि बुद्धिवाद यांचा प्रभाव वाढविणे आवश्यक होते. या गोष्टींचा प्रादुर्भाव होणे जरूर होते. उच्च-नीच, स्पृश्यास्पृश्य म्हणजे तत्कालीन समाजपटावर पडलेल्या उलट्या सोगट्या. त्या समाजपटावर योग्य स्थानी बिंबविल्या तरच सामाजिक वास्तूची रम्य पहाट लागणार होती, हे फुल्यांनी मनोमन ओळखले. हे साध्य साधण्यासाठी सत्यशोधक समाजाचा मध्यबिंदू त्यांनी मानला. शतकानुशतके वर्णीय अन्यायाखाली दडपल्या गेलेल्या सामान्य जनतेने त्या अन्यायाविरुद्ध प्रथमच सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून किंकाळी फोडली. ज्ञानोबा-तुकोबा जेथे थांबले तेथूनच ज्योतिबांनी आत्मविश्वासाने पुढे वाटचाल केली. कारण त्यांना सत्य शोधायचे होते.

सामाजिक समतेबरोबरच आर्थिक समता झाली तरच सामाजिक समतेवर आधारलेली समाजक्रांती यशस्वी होणार हे फुल्यांनी पुरेपूर जाणले होते. या समतेचा जो कणा शेतकरी व कामगार वर्ग सज्ञान करून त्याची वैचारिक बैठक भक्कम करण्याच्या मार्गाला ते लागले. कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या सभा होत. त्यांना लेख वाचून दाखवत आणि त्यांना रुचेल, पटेल अशा शब्दात तो लेख प्रसिद्ध करीत. अशाच लेखांचे एकत्रीकरण करून "शेतकऱ्यांचा असूड" हे पुस्तक त्यांनी प्रसिद्ध केले. फुल्यांनी जन्मसिद्ध उच्च-नीचतेच्या भावनेचे मूळ मोडून दलितांच्या मनातील न्यूनगंड दूर करण्याचा प्रयत्न केला. माणसाचा वर्ण, जातपात लक्षात न घेता माणूस माणूस म्हणून ओळखला जावा, ही त्यांची धडपड. माणूस आणि त्याची माणुसकी हेच त्यांच्या तत्त्वज्ञानाचे मध्यवर्ती सूत्र, हाच त्यांचा विचार, तोच त्यांचा आचार.

सत्यशोधक चळवळीच्या माध्यमाच्या द्वारे समता, बुद्धिवाद, सामाजिक, आर्थिक सुधारणा, यांच्या अधिष्ठानावर बसलेल्या नवसमाजाचे, महाराष्ट्रोद्धाराचे स्वप्न फुल्यांनी पाहिले होते. लोकशाही क्रांतीचा अग्रदूत, शेतकरी कामकरी राज्याचे स्वप्न पाहणारा विचारवंत, जातिव्यवस्थेवर कठोर प्रहार करणारा बंडखोर समाजसुधारक म्हणून फुल्यांना संबोधिले जाते. महात्मा फुले आले गेले. पण त्यांच्या स्वप्नाचे काय झाले ? प्रश्न चिन्ह ? नुसतीच प्रश्नचिन्हे. उत्तर मात्र मिळत नाही.आपणच त्यांच्या स्वप्नाच्या पूर्ततेचा अर्थ लावला पाहिजे. फक्त तीन टक्के शेतकरी सधन झाले. तेच दारिद्र्य, तोच कर्जबाजारीपणा, तीच सामाजिक आणि आर्थिक विषमता आजही आहे. महात्मे येतात आणि जातात आणि आम्ही क्षुद्रात्मे केवळ त्यांचे पुतळे उभारून जयजयकार करतो आणि आमचीच वंचना करतो. काही जीवनमूल्ये, श्रद्धा जपून ठेवावयाच्या असतात. सामाजिक मूल्ये आणि श्रद्धा यांचाच वेध घेत त्यांनी आपले आयुष्य वेचले त्यांचे नुसते पुतळे उभारून जयजयकार करण्यापेक्षा त्यांनी घालून दिलेल्या शिकवणीच्या मार्गाने जाणेच श्रेयस्कर ठरेल. सत्यशोधक समाज म्हणजे जणू त्यांनी दिलेली मंतरलेली मशाल आहे. या मशालीने सर्वांची मने पेटून निघाली पाहिजेत.

समता प्रस्थापित व्हावी म्हणून १०० वर्षांपूर्वी म. फुल्यांनी भगीरथ प्रयत्न केले. त्यानंतर सुमारे शंभर-पाऊणशे वर्षांच्या दीर्घ लढ्याने स्वातंत्र्य मिळाले. त्यालाही पंचवीस वर्षे लोटली परंतु अजूनही ही समता काही दृष्टिपथात येत नाही. तिची कारणे शोधण्याचा हा एक प्रयत्न. या प्रयत्नातून आजच्या विद्यार्थ्यांच्या मनातील कटुता दिसून येते आहे असे वाटेल, कदाचित या प्रश्नाची दुसरी बाजूही लक्षात घ्यावीशी वाटेल ! पण... .....




**स्वातंत्र्याच्या रौप्य-महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थि-संघटनेने आयोजित केलेल्या निबंध-स्पर्धेत पहिल्या क्रमांकाच्या पारितोषिकास पात्र ठरलेला निबंध**

## नरहरी गणेश देशपांडे

स्वातंत्र्य आणि समता यांचे एकमेकाशी अंगभूत नाते आहे. स्वातंत्र्याशिवाय समता येऊ शकत नाही व समतेशिवाय स्वातंत्र्य निरर्थकच होय. समता हे साध्य आहे तर स्वातंत्र्य हे ते मिळविण्याचे एक साधन. सर्वसाधारणपणे बोलायचे तर साधन मिळाले परंतु साध्य कोठे आहे ? असा हा प्रश्न आहे.

साध्य सिद्ध करावयाचे तर त्यासाठी आवश्यक ती साधने मिळवून त्यांचा योग्य असा उपयोग करणे अत्यावश्यक आहे. समता मिळवायची तर स्वातंत्र्य मिळवून त्याचा योग्य उपयोग करावयास हवा. एखाद्या राष्ट्राने स्वातंत्र्याचा कितपत उपयोग करून घेतला अगर घेऊ शकेल हे ठरविताना तेथील सर्वसाधारण लोकस्थिती लक्षात घेणे अगत्याचे ठरते. लोकस्थिती या अर्थाने की तेथील लोकांत ज्ञानप्रसार कितपत झाला आहे, चांगले अगर वाईट ठरविण्यात त्यांची पात्रता, इतरांशी बंधुत्वाची भावना वगैरे. म्हणून समतेसाठी स्वातंत्र्याबरोबरच तेथील सुलोकस्थिती अभिप्रेत आहे.

येथे एक लक्षात घेणे आवश्यक आहे की, स्वातंत्र्य अगर समता पूर्णार्थाने अभिप्रेत नाही. कारण पूर्णार्थाने स्वातंत्र्य व समता कोणीच इच्छित नाही. ते मिळते हे देखील असंतोष उत्पन्न होण्यास कारणीभूत होय.

भारताच्या बाबतीत स्वातंत्र्य मिळण्याच्यावेळी वर अभिप्रेत अशी सुलोकस्थिती नव्हती. बहुतांश लोक पारंपरिक

अंधश्रद्धा, अल्पसंतोषी वृत्ती, अज्ञान व दारिद्र्य यांत खितपत पडले होते. पारतंत्र्यामुळे भोगावे लागणारे जुलूम आपल्या नशिबामुळे भोगावे लागतात अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे पारतंत्र्याची 'झळ' पाहिजे त्या प्रमाणात त्यांना पोचली नाही. जी काही पोचली ती दैवाच्या खात्यात जमा केली गेली.

व्यक्ती काय किंवा राष्ट्र काय स्वातंत्र्य मिळविण्याच्या मागे तेव्हाच लागते जेव्हा त्यास पारतंत्र्याची 'झळ' पोचते. तोपर्यंत त्यास पारतंत्र्याचे विशेष असे काही वाटत नाही. ती 'झळ' लागून जेव्हा स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले जातात तेव्हाच स्वातंत्र्याचा योग्य उपयोग केला जातो.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वकीय सरकारवर मुस्कटी निर्माण करणे व स्वातंत्र्यामुळे निर्माण झालेले प्रश्न सोडविणे अशी दुहेरी कामे समतेच्या दृष्टीने करावी लागणार होती. परंतु आज पंचवीस वर्षांनंतर असे दिसून येते की सरकारला यातील काही पेलले नाही व जे काही उपाय योजले गेले ते प्रश्नांच्या गुंतागुंतीमुळे फारसा परिणाम करू शकले नाहीत. आज तर सर्वच क्षेत्रांत विलक्षण अशी विषमता उफाळून आलेली दिसते.

विषमतेच्या उतरत्या क्रमाने मांडणी करावयाची झाल्यास सामाजिक विषमतेचा अग्रक्रम लागतो. पारंपरिक रूढी व समजुती, जाती, धर्म यांवर भारतीय समाज अधिष्ठित आहे. गेल्या पंचवीस वर्षांत त्यात राजकीय विचारांची भर पडली आहे. फार पूर्वीपासून जातिसंस्था हे भारतीय समाजाचे वैशिष्ट्य आहे. परंतु आजच्या जातिवादामुळे समाजरचनेवर अनिष्ट परिणाम घडत आहेत. एकमेकांशी व्यवहार करताना वरील गोष्टींचा विचार केला जातो, व त्यामुळे निर्माण झालेल्या मनःस्थितीतूनच ते आजुनिकतेला सामोरे जातात. अशा या समाजरचनेत काही मूलभूत फरक स्वातंत्र्यानंतर घडले. पूर्वी मोठ्या प्रमाणात राजकीय क्षेत्रात वरचष्मा असलेला ब्राह्मणसमाज आज सत्तास्पर्धेत फारच थोड्या ठिकाणी पुढे आहे व बहुतांशी सत्ता बहुजन-समाजाकडे गेली आहे. ते वर्षानुवर्षे त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचा, त्यांना अंधारात ठेवण्याच्या प्रयत्नांचा वचपा काढण्याच्या विचारात असतात. या दोन गटांतच वैषम्य आहे अशातला भाग नव्हे तर जातीजातींत, पोटजातींत आपापसांतील तेढी आहेत. यामुळे प्रत्येकाची दृष्टी इतकी संकुचित व कडू झालेली आहे की इतरांचा विचार करण्यास त्यास फुरसतच नाही. शिक्षण घेतलेले देखील याच मनोवृत्तीचे दिसतात. समाजातील कमी शक्तीच्या नागरिकांवर शक्य त्या मार्गाने अन्याय केले जातात व त्यांच्यात दहशत निर्माण केली जाते. अशा प्रकारे मोठी उलाढाल होऊन चित्र होते तसेच राहिले किंबहुना अधिक दारुण झाले. फक्त अन्याय करणारे व तो सोसणारे वेगळे आहेत.

भारतीय समाज स्थूल मानाने दोन गटांत विभागले जातात. (१) खेड्यातील समाज (२) शहरातील समाज.

खेड्यांत भारताची ऐंशी टक्के जनता राहते व ती जवळजवळ वर वर्णन केल्याप्रमाणेच असते. गावात जो जास्त श्रीमंत असतो त्याचा तो गाव असतो तोच तेथला सरपंच असतो व कोठल्यातरी राजकीय पक्षाचा समासद व त्या गावापुरता नेता असतो. इतर काही या श्रीमंतांशी न पटणारी श्रीमंत मंडळी असतील तर ते इतर पक्षांचे समासद होतात. हे सारे गावातील वरिष्ठ मंडळीत मोडतात व त्यांच्या संख्येनुसार गावकऱ्यांचेही गट पडतात. येथे खरा गावजीवनाला रंग भरतो. पक्षापक्षांतील भांडणे, उत्सव, जत्रेतून मानापमानाच्या प्रभावून होणारे दंगे व शेवटी खुनापर्यंत मजल, हे खेड्यातील सर्वसाधारण प्रसंग. जो जास्त वरिष्ठ त्याचा व त्याच्या गटाचा, ते ज्या पक्षाचे असतील, तो पक्ष सत्तारूढ असेल तर चंगळ असते. कर्जे मिळविणे, तगाई, बी-बियाणे वगैरे बाबतीत त्यांची रेलचेल असते. परंतु याचवरोबर विरोधी पक्षाच्या लोकांची कुचंबणा होते व त्यांना हलाखीचे दिवस काढावे लागतात. त्यांचे उभे पीक कापून नेले जाते. घरात कोंडून जाळणे, वगैरे प्रकार वारंवार घडतात. आदिवासी लोकांना तर गुलामासारखे राबवून घेतले जाते व वेतनही चार-आठ आण्यांवर नसते. याचे विदारक चित्र या वर्षी साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेल्या गोदावरी परुळेकर यांच्या 'जेव्हा माणूस जागा होतो' या पुस्तकात पाहावयास मिळते. या पक्षापक्षांच्या भांडणात गरीब जनतेची मात्र भरड होते.

शहरात सर्व धर्मांचे, जातींचे, पंथांचे लोक असतात. बहुतेक सर्व कामधंदा, व्यापार, शिक्षण या हेतूने आलेले असतात. येथील लोक खेडुतांपेक्षा जास्त सुशिक्षित व समंजस असतात. खेड्यांपेक्षा शहरांत अधिक सुरक्षितता असते. त्यामुळे खेड्यांत अन्याय झालेले गट शहरात स्थायिक होतात. अर्थात येथे विषमता नाही अशातला हा भाग नाही. येथील विषमतेचे स्वरूप खेड्यांपेक्षा भिन्न असते

व व्याप्तीही मोठी असते. नोकऱ्या देण्याबाबत, भाड्याने जागा देण्याबाबत जातीयता, धर्म वगैरेचा विचार होतो. निरनिराळ्या जातीच्या, धर्माच्या संस्था अस्तित्वात आलेल्या आहेत.

खेड्यात असो अगर शहरात असो. आर्थिक दृष्टीने धनवानाला अधिक 'सुख' असते. पोलिस खाते, इतर सरकारी खाती त्याच्या आहेत असतात व हे सर्व व्यवहार पैशावर चालतात. चोरटा व्यापार, काळा बाजार वगैरेतून ते सहीसलामत सुटतात. इतर जनतेला मात्र सरकारी कामे करून घेण्यासाठी एखाद्या वजनदार व्यक्तीला वश करावे लागते.

मंत्री, आमदार खासदार निवडून आल्यावर आपली तुंबडी भरून घेतात, काहीजण आपल्या भागाचा (पुढील निवडणुकीच्या दृष्टीने) विकास साधतात. इतर प्रदेशाचा विकास साधला जात नाही. त्यामुळेच ऐंशी-टक्के खेड्यांत अजून पिण्याच्या पाण्याची तसेच सांडपाण्याची व्यवस्था नाही. याउलट काही खेड्यांत विमानतळापर्यंत प्रगती झाली आहे. अशा प्रकारे, जातीयता, अज्ञान, भ्रष्टाचार यांच्या आहारी गेलेला समाज समतेच्या दृष्टीने प्रयत्न करण्यास असमर्थ आहे.

धार्मिक विषमता :— भारत जरी निधर्मी राष्ट्र म्हणून जगजाहीर असला तरी 'अंदरकी बात' वेगळीच आहे. हिंदू धर्म सर्वांत मोठा, त्यालालोखाल शीख, मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन वगैरे अल्पसंख्याक धर्म आहेत. काही धर्मांचे वर्चस्व काही भागापुरते आहे. उदा० पंजाबात शीख, नागालँडमध्ये ख्रिश्चन इ. सर्व धर्मांत थोड्याफार प्रमाणात तेढी असतात. त्यातल्यात्यात हिंदू व मुस्लीम यांत ऐतिहासिक पार्श्वभूमीमुळे ती जास्त आहे. याचा परिणाम म्हणूनच हिंदूंना कायदे वेगळेच तसेच मुसलमानांचे कायदे वेगळे. मुस्लीमांना द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू नाही. त्यामुळे कुटुंबनियोजन मोहिमेतून त्यांना मुभा मिळते.

आपला धर्म जागृत ठेवण्यासाठी त्यांना वेगळ्या विद्यापीठाची जरूरी भासते. अलिगढ विद्यापीठ मुस्लीमांनी याच हेतूने स्थापले होते. ही विद्यापीठे काल्परवापर्यंत धर्माधिष्ठित होती. कटुता वाढीस लागलेली आहे. पाकिस्तानच्या निर्मितीमुळे जातीय दंगे होणार नाहीत हा आशावाद फोल ठरला व नंतरही ते होतच राहिले. या दंगली पूर्वनियोजित असतात व मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर घडते. राजकीय पक्ष त्यांचे भांडवल करून घेतात. अधूनमधून अशी शंका व्यक्त करण्यात येते की तेच या दंगलींना प्रोत्साहन देतात.

हिंदुधर्मातील जाचास कंटाळून अस्पृश्यांनी बौद्ध, ख्रिस्ती इ. धर्म स्वीकारले परंतु तरी देखील त्यांच्यावर होणारे अन्याय कोणत्याही प्रकाराने कमी झालेले नाहीत. धर्माधर्मांत एकोपा नसल्याने आंतरधर्मीय विवाहास अजूनही विरोध होतो. अशाप्रकारे धर्माधर्मांतील भिन्नता भारतात ठळी प्रकट आहे.

राजकीय विषमता : भारतीय घटनेनुसार २१ वर्षांवरील प्रत्येक नागरिकाला निवडणुकीस उभे राहण्याची तसेच मत देण्याची परवानगी दिलेली आहे. परंतु निवडणूक लढविण्याचा खर्च इतका अफाट असतो की भरपूर पैसा असलेले आणि काही संघिसाधू तेवढ्यानांच ते शक्य होते. बाकीच्यांना फक्त मताचा अधिकार तेवढाच राहतो. परिणामी येथील सत्ता मूठभर धनवानांच्या हाती केंद्रित झालेली आहे.

भारतीय घटना ही लोकशाही स्वरूपाची आहे. तेव्हा सत्तारूढ पक्षास योग्य मार्गाने जाब्यास मार्ग पाडणारा तितकाच बलिष्ठ असा विरोधी पक्ष असणे अवश्यक आहे. परंतु आज पंचवीस वर्षे एकाच पक्षाच्या हाती सत्ता अबाधित आहे. दुसऱ्या बाजूला असंख्य छोटे विरोधी पक्ष आहेत. ते सर्व काही प्रांतापुरतेच अगर एखाद्या प्रांतापुरतेच मर्यादित आहेत. ते कमकुवत तर आहेतच, शिवाय त्या सर्वांत एकोपा नाही. त्यामुळे विरोध परिणामकारक नसल्याने सत्तारूढ पक्ष पुरेपूर सत्ता उपभोगीत आहे. या सत्तारूढ पक्षाला लोकांच्या अज्ञानाचा फायदा कसा घ्यायचा, त्यांना आश्वासने देऊन भुलवीत कसे ठेवायचे याचे तंत्र पक्के ठाऊक आहे. खरोखर हा पक्ष देशांतील संघिसाधू राजकारणींचे झालेले केंद्रीयकरण आहे. या पक्षास सरकारी यंत्रणा आपल्या हितप्रमाणे चालविणे शक्य होते. निवडणुकीच्या वेळी सरकारी वाहनांचा उपयोग ते करून घेतात. या पक्षांस बडेबडे कारखानदार श्रीमंत यांचे पाठबळ असते. गावागावातील वजनदार व्यक्तींना या पक्षाने मर्जीत घेतलेले असते व त्यांच्या साहाय्याने लोकांत दहशत उत्पन्न करून मते मिळविली जातात. जेथे जेथे विरोधी पक्ष आघाडीवर दिसतो.—उदा० तामिळनाडूत डि. एम. के.—त्यांनी देखील याच तंत्राचा वापर केलेला असतो. अशा प्रकारे भारतीय राजकारण या अशा वजनदार व्यक्ती अगर 'आहेरे'च्या मदतीवर अवलंबून आहे. भारतात संसदीय

लोकशाहीचे हे अंगभूत असे दोष आटळतात. त्याचबरोबर येथील लोकस्थितीमुळे ती अधिकच दूषित झालेली आहे.

भाषावार प्रांतरचनेमुळे अनेक तोटे आज सोसावे लागतात. त्यामुळे प्रांताप्रांतातील लोकांच्या वेगळेपणाच्या भावनेस अधिकच उबल मिळते. नोकरी–व्यापाराच्या दृष्टीने इतर प्रांतांत जाऱ्या लागणाऱ्या नागरिकांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. निरनिराळे स्थानिक पक्ष केवळ आपले अस्तित्व टिकविण्यासाठी लोकांच्या भाषिक भावनेस हात घालतात व त्यातूनच भाषिक दंगली उद्भवतात. या दंगलीत परप्रांतियांची घरे, दुकाने, हॉटेल्स यांची लूटमार होते. राज्याराज्यातील सीमावादामुळे तर त्यांस आगखीनच निमित्त सापडते. सीमावादासारखे प्रश्न राज्यकर्ते सोडवीत नाहीत, कारण तो सोडविला तर कोणत्या तरी राज्यास माग गमवावा लागणार व त्याचा परिणाम त्या राज्यात त्या पक्षास मते मिळणार नाहीत. त्यामुळे ते प्रश्न तसेच भिजत ठेवले जातात.

आणखीन एक चमत्कार राजकीय क्षेत्रात दिसतो. निरनिराळ्या पक्षांचे नेते आपापसांत आपापले हित साधून घेतात. वरवर विरोध दाखविले जातात परंतु ते सर्व सत्तेच्या राजकारणासाठी असतात. कामगार नेते म्हणविणारे सत्तारूढ पक्षांत जाऊन मंत्रिपद मिळवितात. परंतु कामगार मात्र मोर्चे–घेराओ यांतच अडकून राहतो. स्वार्थी नेते जनतेची दिशाभूल करीत असतात व आपला स्वार्थ मात्र साधून घेतात.

**आर्थिक विषमता :** सरकारने देशातील आर्थिक विषमता नष्टकरण्याच्या दृष्टीने काही व उपाय योजले. त्यांनी जमीनदारी व मॅनेजिंग एजन्सीची पद्धत नष्ट करण्यासाठी कायदे केले व हे दोन प्रकार नष्ट होण्याचे बहुतांशी साध्य झाले. परंतु आर्थिक केंद्रीकरण न होऊ देण्याचा हेतू मात्र असफल राहिला. आर्थिक केंद्रीकरणाचे काही मार्ग बंद झाले परंतु केंद्रीकरणाची शक्यता मुळासकट उखडून टाकली नाही. आता कारखानदार, बडे बडे व्यापारी, सिनेनट, मंत्री इत्यादी गबर झालेले आहेत. अशा प्रकारे मूठभर लोकांच्या हाती सर्व देशाचे अर्थकरण एकवटले आहे.

एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या अर्धे उत्पन्न शेतीचे आहे. त्यावर कर नाही. उरलेल्या पैकी २२% उत्पन्न आयकर भरणाऱ्यांचे हाती आहे. या कर भरणाऱ्यांपैकी १ लाखावर उत्पन्न असणाऱ्या १% लोकांच्या हाती १०% उत्पन्न एकवटले आहे परंतु या उलट ग्रामीण भागातील ४०% व शहरातील ५०% लोक दरमहा १५ रुपयेही खर्च करू शकत नाहीत.

सरकारने पंचवार्षिक योजनांतून (१) उत्पादनवाढ व (२) लोकांचे राहणीमान वाढविण्याचे धोरण अवलंबिले. त्यामुळे बेकारीचा प्रश्न आपोआप सुटेल असा त्यांचा आशावाद होता. तो आशावाद तर फोल ठरलाच. शिवाय ज्या सामान्य माणसांसाठी या योजना आखल्या गेल्या होत्या त्यांच्यापर्यंत या योजनेचा लाभ पोचलाच नाही. त्यावर जो भरमसाट खर्च करण्यात आला. तो मंत्री, पुढारी, अधिकारी यांनाच सर्वस्वी लाभदायक ठरला. त्यामुळे गरिबांसाठी मदतीचा हात सरकारला देता आला नाही व त्यांची आर्थिक स्थिती आणखीनच कमजोर बनली आहे.

भारतातील सत्ताधीश काय किंवा धनवान काय, एकच नाण्याच्या दोन बाजू. त्यांचे एकमेकांशी आतून आर्थिक हितसंबंध गुंतलेले असतात. त्यामुळे भावबाद, काळाबाजार, भेसळ, साठेबाजी ही आमच्या पाचवीलाच पुजलेली आहे.

गेल्या पंचवीस वर्षांत औद्योगिक प्रगती होऊन उत्पादनात निश्चितपणे वाढ झालेली आहे. परंतु यात गरजेच्या वस्तूंचे उत्पादन फारच थोडे होते. उत्पादक कमी वेळात जास्त उत्पन्न देणाऱ्या वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करतात व आपला हेतू सफल करतात व लोकही त्या वस्तू वापरतात. त्यामुळे त्यांचे राहणीमान वाढण्याऐवजी खालावते. व्यापारी, कारखानदार वगैरे गुंतवणूक एकतर उपभोग्य वस्तूंवर करतात किंवा मग [ Finished Products ] तयार वस्तूवर करतात. म्हणजेच साठेबाजी, काळाबाजार, भेसळ वगैरे प्रकार करतात व आपले उत्पन्न वाढवितात. त्यामुळे प्रगती मंदावते. बचत करून तिची विकासाकरता पुनर्गुंतवणूक जेवढी जास्त तेवढी प्रगती लवकर होते. आपल्या देशात बचतीचे प्रमाण एकूण उत्पन्नाच्या १०% आहे.

कोणत्याही देशाच्या विकासाचे एक लक्षण म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा हिस्सा कमी होत जाणे व उद्योगधंद्याचा हिस्सा वाढत जाणे. भारतात मात्र १९४८–४९ चे चित्र कायम आहे. शेतीचा हिस्सा ५०% व उद्योगधंद्याचा १७%

अशा प्रकारे भारतास (१) बेकारीचे उच्चाटन, (२) भाववाढ रोखणे (३) गरजेच्या वस्तूंची निर्मिती या क्षेत्रांत अपयश आलेले आहे. यांचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष परिणाम

गरीब जनतेवरच होतो व ते इतर मार्गाने पैसे मिळविण्याच्या मागे लागतात. खिसेकापू चोऱ्या, मटका, अफरातफर, लाचलुचपत वगैरे व्यवसाय सध्या जोरात सुरू असलेले दिसतात. आर्थिक विषमतेमुळे देशातील आरोग्य, आहार वगैरे मूलभूत गरजांवर वाईट परिणाम घडलेले आहेत.

स्त्रीविषयक विषमता : केवळ देशाच्या पंतप्रधानपदी एक स्त्री आहे म्हणून स्त्रियांच्या बाबतीत समता आहे असे कोणी म्हणेल तर त्यात तथ्य नाही. कारण इतिहासातही झाशीची राणी, कित्तूर चन्नम्मा वगैरे काही सत्कालीन प्रतिष्ठित घराण्यातील स्त्रियांना त्यांच्या कर्तृत्वास वाव मिळालेला आहे. प्रश्न आहे तो इतर सामान्य स्त्रियांचा. स्त्रीशिक्षणासारख्या सुधारणा पारतंत्र्यापासूनच सुरू आहेत. त्याप्रमाणे त्याचा विकास स्वातंत्र्यातही झाला. त्याचबरोबर फार मोठ्या प्रमाणावर स्त्रियांनीही त्यास योग्य प्रतिसाद दिला. आता स्त्रीसुधारणेच्या कामी त्याही आटोकाट प्रयत्न करीत आहेत. परंतु त्याचा फारसा परिणाम नाही.

त्यांच्या शैक्षणिक प्रगतीमुळे श्रीमंत स्त्रिया संघटित होतात व महिला-मंडळे स्थापितात. परंतु तेथेही पतीस मिळणाऱ्या प्राप्तीनुसार त्यांना महत्त्व दिले जाते. या स्त्रियांना निरनिराळ्या व्यापक प्रश्नावर चर्चा करण्याची संधी असते. त्याचबरोबर त्याना संरक्षणही असते.

शिक्षण घेणाऱ्या गरीब, मध्यम वर्गीय स्त्रियांना नोकरी करावी लागते. त्यांना नोकरी मिळणे फारसे त्रासाचे नसते. परंतु ती मिळाल्यावर त्यांच्यावर येणारी जबाबदारीही मोठी असते. त्यांना घराबाहेर कोणत्याही प्रकारचे संरक्षण नसते. अशा प्रकारे शिक्षिका, परिचारिका वगैरेंना होणारे त्रास सर्रास कानावर येतात.

शिक्षण न घेणारा स्त्रीवर्ग ( विशेषतः खेड्यांत ) फार मोठ्या प्रमाणावर आहे. त्या पारंपरिक रूढी व समजुती त्याखाली दबल्या जातात. त्यांना घरकाम, मुलांचे संगोपन या गोष्टी कराव्या लागतात. काहींना प्रपंच सांभाळण्यासाठी मोलमजुरी करावी लागते. त्यांवर कामाचा ओझे सांभाळण्याची जबाबदारी आहे. त्यांना विचारस्वातंत्र्य वगैरे फारसे नसते. ह्या सर्वांवर उपाय काय, असा प्रश्न जर कोणी विचारला तर त्याचे उत्तर देणे कठीण आहे.

भगवंताने गीतेत दिलेल्या अभिवचनाप्रमाणे कोणी तरी महापुरुष जन्माला येईल आणि तोच ह्या सर्वांवर काही कठोर प्रहार करून सामाजिक विषमता दूर करील.

त्याची वाट पाहणे एवढेच आपले काम.

**नवीन म्हणी :**

( १ ) " प्रेमाच्या बाजारात प्रोफेसरला ' वर 'दान, अतिथी होवून विद्यार्थी खाई पान "
( २ ) " कलीयुगात ' मिनी 'ला आला ऊत, कॉलेजची पोरं करतात हुपहुप. "
( ३ ) " तंग पॅन्टन् घातला घोळ, पाहाणाऱ्याला आली भोवळ. "
( ४ ) " करू नका कुणाचा मामा, कॉलेजच्या पोरी मागतील पनामा. "

**फरक**

एकजण : पत्नी आणि बायको यांतील फरक काय ?

दुसरा : थोडा खाजवून ( बाजवून नव्हे ), ' पत्नी म्हणजे पाचजणात असते ती, आणि बायको म्हणजे एकाच बरोबर असते ती.'

**आर. एम् पाटील**

आनंद देशपांडे

# गूढ अंतराळातिल उष्णतेच्या पिंपाचे

प्रकाशकिरण सप्तरंगाचे बनलेले असतात हे आपणास माहीत आहे. पण या खेरीज त्यामध्ये अल्ट्राव्हायोलेट व इन्फारेड हे किरण असतात, परंतु ते आपल्या डोळ्यास दिसत नाहीत. साधी काच ही जरी सप्तरंगांना पारदर्शक असली तरी त्यामधून वर उल्लेखलेले किरण मात्र फारसे पलीकडे जाऊ शकत नाहीत.

आता आपण अशी कल्पना करूया की एक काचेचे घर आपण उन्हात बांधले आहे. उन्हातील हा सप्तरंगी वर्णपटाचा जो भाग आहे तो या काचेतून सहज आत जाऊ शकेल आणि त्या घरात ज्या काही वस्तु आहेत त्यावर पडून त्या वस्तु तापतील. परंतु शास्त्रीय तत्त्व असे आहे की कोणत्याही वस्तूचे तपमान वातावरणापेक्षा जास्त वाढले की ती वस्तु उष्णता बाहेर टाकू लागते. याला आपण उष्णतेचे उत्सर्जन असे म्हणतो. ही उत्सर्जित उष्णता इन्फारेड किरणांच्या स्वरूपात असते. वर उल्लेखल्याप्रमाणे ते काचेतून फारसे पलीकडे जाऊ शकत नाहीत व या घराच्या पिंजऱ्यात अडकून पडतात. म्हणून घराबाहेरील वातावरणापेक्षा या पिंजऱ्यातील तपमान चांगलेच वाढते. याच कारणामुळे अशा घरात झाडे उत्तम प्रकारे वाढविली जाऊ शकतात. आणि बाहेर जरी अगदी गोठण्याइतकी थंडी असली तरी आतील उबदार तपमानात ती जगू शकतात. अशा हिरव्यागार दिसणाऱ्या घरांना हरितगृह म्हणतात आणि काचेच्या गुणधर्मामुळे निर्माण झालेल्या या परिणामाला 'हरितगृह परिणाम' ( Green house effect ) असे म्हणतात.

आपले वातावरण मुख्यत्वेकरून प्राणवायू, नायट्रोजन आणि अरगॉन वायूंपासून बनलेले आहे. हे सर्व वायू सूर्यप्रकाशातील सर्व रंगांना तसेच सर्व प्रकारच्या इन्फारेड किरणांना पृथ्वीवर जाण्यास अजिबात अडथळा आणत नाहीत. परंतु वातावरणात ०३ टक्के इतका कार्बनडाय ऑक्साईड असतो. हा मात्र इन्फारेड किरणांना 'पारदर्शक' नसल्यामुळे तो अंतराळात आपल्या हरितगृहाच्या काचेसारखा परिणाम करतो.

आता पृथ्वीचा पृष्ठभाग जेव्हा सूर्यप्रकाशामुळे तापतो तेव्हा तो इन्फारेड किरणांचे उत्सर्जन करतो. अर्थात आपल्या वातावरणात कार्बनडाय ऑक्साईड कमी असल्यामुळे या किरणांना वातावरणाबाहेर जाण्यास फारसा अडथळा होत नाही. एवढे मात्र खरे की जर हा वायू वातावरणात अजिबात नसता तर पृथ्वीचा पृष्ठभाग जास्त तापला असता,

आणि समजा त्याचे प्रमाण दुप्पट झाले तर 'हरितगृह परिणाम' एवढा वाढेल की त्यामुळे पृथ्वीचे तपमान सध्याच्या पेक्षा २° से. ने वाढेल. हे वाढलेले तपमान पृथ्वीच्या ध्रुवांवरील बर्फाचे हळूहळू विलयन करण्यास पुरेसे आहे!

अंतराळात प्रचंड प्रमाणात 'हरितगृह' परिणाम पाहावयाचा असेल तर तो शुक्रावर सापडेल. शुक्रावरील दाट वातावरण बहुधा बरेचसे कार्बन-डाय-ऑक्साईडने बनलेले आहे हे पूर्वीच्या शास्त्रज्ञांना माहीत नव्हते परंतु तरीही पृथ्वीपेक्षा शुक्र जास्त उष्ण आहे याचे कारण खगोल शास्त्रज्ञांच्याकडे एकच होते आणि ते म्हणजे तो सूर्याच्या जवळ आहे. गणिताने त्यांनी शुक्रावरील तपमान किती असावे ते काढले. परंतु हे तपमान व आताच्या नव्या अंतराळ संशोधकांनी ठरलेले तपमान यात खूपच तफावत आढळली. म्हणजे शुक्रावरील तपमान अंदाजापेक्षा शेकडो अंशाने जास्त आहे. याला कारण कार्बन-डाय-ऑक्साइडमुळे होणारा 'हरितगृह परिणाम' होय.

**कंडक्टर गपगार**

एक स्त्री आपल्या सहा मुलांना घेऊन बसमध्ये चढत होती. तिची त्रासलेली मुद्रा, आणि गडबड पाहून कंडक्टरने सल्ला दिला, 'बाईसाहेब, अर्ध्या मुलांना घरी ठेवून निघाला असतात तर एवढा त्रास करावा लागला नसता. परंतु त्या स्त्रीने ताडकन उत्तर दिले, "तुम्हाला सल्ला द्यायची जरुरी नाही. अर्ध्या मुलांना घरीच ठेवून आले आहे."

सतीश शहा

**India At A Glance**

| | |
|---|---|
| (1) Total Area | 32680 sq. kms |
| (2) Total Population | 340 million |
| (3) Annual Increase in Population | 13 million |
| (4) Coast line | 3535 miles |
| (5) Land Frontier | 9425 miles |
| (6) Railways | 34736 miles |
| (7) Road ( Nationel High ways) | 12900 miles |
| (8) Density of Population | 121 Per. km. |
| (9) The Most Populous State | Uttar Prdesh |
| (10) The largest State | Madhya Pradesh |
| (11) Broadcasting Stations | 26 Principal Stations; 27 Auxiliary Stations, 28 Vividh Bharati Centres. |

Suresh Shinde

लोक पिक्चरची गोष्ट सांगतात. अगदी रंगात येऊन सांगतात. हा त्याने चक्रावून गेला आणि त्याचीच त्याने गोष्ट तयार केली.




राजीव कुलकर्णी

परवाची गोष्ट ! मी बस-स्टॉपवर उभा होतो. शेजारचा एक माणूस, खाकी पॅन्ट, तांबडा भडक शर्ट, हातात ॲल्युमिनिअमचा डबा—माझ्याकडे एकदम रोखून पाहायला लागला. हातातला डबा पुढच्या फळीवर आपटून हातातली सिगारेट पायाखाली चिरडून—डोळे वटारून एकदम ओरडला,—

' अबे ओ सेठ की औलाद !! कितनेमें बेचेगा अपनी माँ को ?' माझी थरथराहट !

' मैने पूछा, कितनेमें बिकेगी तेरी माँ ?'—तो इसम ! मी आपला घाबरून इकडे तिकडे पाहायला लागलो, म्हटलं हा आपल्यावर असा एकदम का उसळला ! मी आपला भोमट्यासारखा ' खिक ' करून गप्प बसलो. मग मात्र तो एकदम आवाज खाली आणून म्हणाला,

' काय राव तुम्ही ! साला, पुढचा डायलॉग सुद्धा येईना तुम्हांला ? '

' डायलॉग ? ' मी पुरता चक्रावलो.

पण मग मात्र त्या माणसानी माझ्या अफाट अज्ञानाची कीव केली. आणि तो सुरू झाला...,

'अजून 'दो यार' नाही टाकला ? अरे काय पिक्चरेऽऽ! शत्रुघन सिन्हा म्हणजे नुसता खंगरी आहे राव ! काय साला स्टाईल आहे. शाल पांघरून...! '

असं म्हणून त्याने तो मघाचाच ' डॉयलाक ' परत एकदा सुनवला. ( तेवढ्या वेळात मी, पिक्चर 'टाकतात ' म्हणजे काय; आणि ' खंगरी ' म्हणजे काय—या दोन मूलभूत प्रश्नांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करून घेतला. )

तेवढ्यात बस आली. माझ्या मागोमाग तो 'लाल-शर्टचा सिन्हा ' सुद्धा आला आणि माझ्या शेजारीच बसला. त्या-वेळेपासून त्याने मला ' दो यार ' ची गोष्ट सांगायला सुरवात केली. अगदी ' टायटल 'पासून ते द एन्ड 'पर्यंत. मधेच कंडक्टर आला, तेव्हा त्याला ' दो स्वारगेट ' म्हणायच्या ऐवजी मी चक्क ' दो यार ' म्हणालो...पण मी एवढं त्याचं तिकीट काढलं तरी त्या ' लाल शर्टाला ' काही नाही...त्याचं ते ' सिन्हा अन् खन्ना ' काही संपेना. अखेर मी चार स्टॉप अगोदरच बसमधून खाली उतरलो, आणि त्या मघाच्या 'डॉयलॉक'ची रिहर्सल करीत दुसऱ्या बसची वाट पाहात थांबलो. माझी खात्री आहे, की त्या दैवी पुरुषाने आपली 'इन्टरव्हल'च्या पुढची स्टोरी नक्की शेजारी येऊन बसलेल्या दुसऱ्या माणसाला सुनवली असणार !

मला, आता तर पिक्चरची संपूर्ण स्टोरी सांगणाऱ्या लोकांचं कौतुक वाटतं. मी पिक्चरला जातो, पण 'द एन्ड' झाल्यावर चित्रपटगृहातून बाहेर पडताना मी अक्षरशः 'मन–गण–मन' गुणगुणत बाहेर पडतो. एकही गाणं माझ्या लक्षात राहिलेलं नसतं—स्टोरी तर दूरच राहिली!

हे पिक्चरची स्टोरी सांगणारे लोकच मोठे अजब! माझा एक मित्र आहे तो सुद्धा असाच नेहमी येऊन मला 'पिळत' बसतो. त्याची गोष्ट म्हणजे नुसतीच भाग्य नसते, तर मोठी 'प्रेक्षणीय' सुद्धा असते. चित्रपटातली प्रत्येक ॲक्शन तो आपल्या बहारदार अभिनयाने माझ्यापुढे जशीच्या तशी उभी करतो. या मित्राची आणखी एक गम्मत म्हणजे, तो तीन तास चालणाऱ्या पिक्चरची स्टोरी मला सतत साडेपाच ते सहा तास ऐकवतो. अगदी सहज! नॉन् स्टॉप!

याच्या उलट, मला एक माणूस भेटला होता. मीच आपणहून त्याला विचारलं 'का हो, त्या—पिक्चरची स्टोरी काय आहे!' (संकट खूप आली म्हणजे माणसाला त्यांचा 'नशा' चढतो म्हणतात!) तर त्याने अक्षरशः तीन मिनिटांत मला पिक्चरची स्टोरी सांगितली.

"काही नाही हो...(हे..'काही नाही' सगळ्या गोष्टींच्या सुरवातीला येत असते—॥ ॐ॥ सारखे!...) हिरोनला पाहिजे असते 'जायदाद' आणि हिरॉईन; आणि हिरोला मात्र फक्त हिरॉईनच! (अल्पसंतुष्ट बिचारा...!) मग दोघांची 'धुंवाधार ढिशुम—ढिशुम' आणि गोड शेवट!—बस!!"

एवढ्या थोडक्यात आपली कथा आटोपून आणि मला 'धूंवाधार ढिशूंम-ढिशूंम' या एका नव्याच शब्दकोड्यात टाकून तो चालता झाला. त्याच्याबद्दलचा आदर मात्र एकदम खाली घसरला.

एका माणसाने तर फारच धम्माल केली. तो 'पावटा' होता कुठल्याशा खेड-मंचर,धुळे-पाचोरं असल्या गावचा. पण त्यानं मला 'राजा-राणी'ची स्टोरी सांगितली.

'मंग त्यो घरमेंदर आस्तो ना...(यातला 'ध' धम्मक लाडू मधला 'ध' सारखा!)...त्यो म्हन्ला की...तुमने म्येरा दिल चुराया हे! भी पैसे वापस करो आन् मंग ते... नव्हे त्ये... गानं न्हाई का...ये–भी–झी–डी! हां! पण त्यो खलनायक ले वंगाळ आस्तो रे...तो यात्ला म्हन्तो..., ××× ! ××× ×× ! तुज्याकडं बगतो...!'

असं म्हणून त्या पावट्याने तीन अक्षरी आणि पाच अक्षरी अशा काही भयानक शिव्या हासडल्या आणि 'सदऱ्याच्या अस्तन्या' सावरून माझ्या मुखकमलावर अशी एक सणाणून 'ढिशुंम' लगावली...की नंतर १५ दिवस मी तोंडाला मफलर बांधून फिरत होतो.

या प्रसंगानंतर मी नेहमी गोष्ट सांगणाऱ्या 'कथेकऱ्या'-पासून चार फूट दूर बसतो. एका कथेकऱ्यानं तर मला इतका वैताग आणला होता! दोनचार प्रसंग झाल्यावर तो मलाच विचारायचा, 'मग काय झालं!' मी आपला आवासून 'पुढे खरंच काय बरं झालं असतं' असा विचार करीत बसायचा. परत दोन चार प्रसंग झाले की तो चीम चावून म्हणायचा, 'अर्रर! त्याच्या आधीचं सांगायचं राहिलं हां एक! तो...आमला हा असतो...ना, तो त्या हिला म्हणालेला असतो रे, की–तू काळजी करू नकोस. त्या ह्याचा इन्तकाम मी घेईन; पण मेरा दर खुला है तुम्हारे लिये — कळलं ना! आता तुझी 'लिंक' लागली ना!'

माझी 'लिंक' कधीही आणि कुठूनही लागते, कारण त्याची हा–ही–हे ची "वारटक्की भाषा" मला कधीच समजत नाही. पण सगळ्यात गम्मत येते, जेव्हा कोणी महाभाग मला इंग्रजी—त्यातल्या त्यात—वेस्टर्न किंवा जेम्सबॉंडच्या चित्रपटांची स्टोरी सांगतात—तेव्हा! तो काय बडबडत असतो ते त्यालाही कळत नसतं आणि मला तर अजिबातच उमजत नसतं! पण दर पंधरा मिनिटांनंतर एकदम 'खिशुम ढिशुम' असे पिस्तुलांचे आवाज ऐकू येतात, मग एक कर्ण कर्कश म्युझिक (अर्थात तोंडानेच वाजवलेले) ऐकू येते आणि मध्येच एक डोळा बारीक करून 'धम्माल' सीन सांगितला जातो. बस—बाकी काही पत्ता लागत नाही. एकदा एकाने दोन तास इंग्लिश चित्रपटकथा सांगून झाल्यावर उद्गार काढले होते—'असा होता ट्रेलर—! म्हायतेय!'—मी थंडगार पडलो!

पण आता मात्र मी पुरता 'बनलोय.' कुठल्याही चित्रपटाची गोष्ट 'संगीत—अभिनय—संवाद—खिशुम ढिशुंम' सकट मी सांगू शकतो. सामाजिक चित्रपट हा तर माझा हातखंडा विषय. आता मी भोतेच शोधत असतो.

आणि...अखेरीस त्याच बसस्टॉपवर, मला तोच लाल शर्टवाला दिसला. आनंदानं बेभान झालो मी! इतकं मस्त गिऱ्हाईक पाहून मी लांबूनच ओरडलो,

'अबे ओ सेठ की औलाद...कितने में बेचेगा...!!'



विक्रमादित्य शिंदे

# दुष्काळ आणि विद्यार्थी

दुष्काळाने ग्रामीण विद्यार्थ्यांच्या डोक्यात अक्षरशः गिरमिटे फिरू लागली. त्याच्या चटक-दारीची त्याला झालेली ही एक मौलिक जाणीव.

दरवर्षीप्रमाणे गणपतिबाप्पा आले आणि विघ्नहर्त्या नावाप्रमाणेच संकल्प करून आले. ज्ञानोबा-तुकोबारायांच्या पालख्यांबरोबर रुसून गेलेल्या वरुणराजाचे मन वळविण्यात ते यशस्वी झाले. त्यासाठी कित्येकांनी देवापुढे उपोषणे केली. रुद्रावतार धारण केले; त्यांना दुधा-पाण्याच्या गामाऱ्यामध्ये कोंडून ठेवले. देवतांची खणानारळांनी ओटी भरली; इतकेच नव्हे तर पंजाबातील दोन तरुणांनी त्यासाठी आत्मबलिदानही केले. आमच्या महाराष्ट्राचे एक मंत्रीही गुपचूप पंढरीला जाऊन आले. पण सर्व प्रयत्न अपयशी ठरले. अखेरीस गणपतिबाप्पापुढे वरुण नमला, त्यांना पावला आणि मग पाऊस पाडू लागला. आणि थोड्या फार पावसानेही जनता संतुष्ट झाली.

पण म्हणून काही देशाचा दुष्काळ हटला नाही. गणपती विसर्जनानंतरच वरुणराजाही विसर्जन पावले. असा हा दुष्काळ आमच्या देशामध्ये दिवसेंदिवस उग्र रूप धारण करतो आहे. गेली सात-आठ वर्षे अपेक्षेप्रमाणे पाऊसपाणी होत नाही. पानशेतच्या पुरानंतर पुन्हा पानशेत होऊ न देण्याचे त्याने व्रत घेतले की काय न कळे! पाणी-पुरवठ्याच्या कित्येक योजना आखूनही नगर शहराला दोन-चार दिवस पाण्याविना राहण्याची पाळी येऊ लागते आहे. पुण्यात अगोदरच पाणी कमात असताना दर बुधवारी सक्तीची कमातही होऊ लागली.

आणि ग्रामीण भागात तर याहूनही भयंकर परिस्थिती निर्माण झाली. अगोदरच आठ महिने पाण्याविना राहूनही राहिलेल्या चार महिन्यांपुरतीसुद्धा तिची तहान भागण्याचे चिन्ह दिसत नाही. आणि तिच्या भूमिपुत्रांच्या डोळ्याचे पाणीसुद्धा तिला पुरे पडण्यासारखे नाही. जूनमध्ये पावसाच्या एका सरीवर केलेल्या पेरण्या पंधरा दिवसांतच करपू लागल्या. खुरपणीची गरजच भासली नाही त्यांना. काही थोडी फार वाढू लागली ती पण निस्तेजपणे कडक उन्हाला कसे तरी तोंड देत! काय करणार बिचारी. विहिरीचे पाणी द्यावे तर त्यांनाच पाणी नाही-आडात नाही तर पोहोऱ्यात कुठून! जेथे इरिगेशनची सोय आहे त्या नदीला पाणीच नाही. एवढ्यातूनही त्यांनी तग धरली पण कोठपर्यंत! पावसाच्या आशा खुंटल्या आणि त्या पिकांची सहनशीलता संपली. आणि त्यांनी धाडकन अंग दिले टाकून जमिनीवर. दोन दिवसांतच त्यांचा भूरभूर उडणारा पालापाचोळा झाला...आणि मग सर्वच आशा खुंटल्या,...

पाऊसपाणी नसल्यामुळे हिरवागार पाला अगर गवतही

कुठे दिसेना. मागील वर्षीच्या साठ्यातील वैरण, कडबा याची केव्हाच वाट लागली. आता जनावरांपुढे काय टाकावे याचा प्रश्न पडलेला आहे. हुमती बनावरे ठेवून राहिलेली मोकाट सोडून देऊन अगर खाटकाला विकून टाकणे शक्य आहे. पण शेतकऱ्याला ते शक्य नाही. ते आपल्या घासातला घास देऊन त्यांना जगविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

ज्यांच्या घरी रोज पाच-दहा गडी मजुरी करीत होते, त्यांना आज रस्त्यावरच्या दुष्काळी कामावर हजर व्हावे लागते आहे. दोन महिन्याच्या बाळंतिणीला पाठीशी मूल बांधून डोक्यावर मातीचे बड घमेले घ्यावे लागते आहे. दहा वर्षांचे शाळेत जाणारे मूल शाळा बुडवून आपल्या आईला घमेले उचलू लागत आहे आणि त्याचा बाप अंग-प्रत्यंगावर घामाच्या धारा ओघळत असूनही फावडे आणि माती यांच्याशीच टक्कर घेतो आहे. नऊवेळ जाणाऱ्या गर्दी-सारखी ही गर्दी दुष्काळी कामांवर हजर होते आहे. पण एवढे करूनही हातात काय पडते तर फक्त १ रुपया अगर १२ आणे! किती ही मनुष्यत्वाची क्रूर चेष्टा! ज्या रुपया-मध्ये कधी एकवेळचे जेवण पुरे होऊ शकत नाही. त्या रुपयामध्ये त्या माणसाने त्याचा संसार कसा चालवावा! त्याने खाण्यासाठी ज्वारी आणावी! की बायकोला चोळीचा बोळा की बाळाला औषधाचं लाल पाणी! आणि डोक्या-वरच्या कर्जाचं काय! सावकार आहेच खनपटीला बसून!

अशाच कित्येक घरातील तरुण होतकरू हुशार पोरं आज तालुक्याच्या, जिल्ह्याच्या गावाला शिकायला पाठविलेली आहेत. पुढच्या भविष्यासाठी स्वतःच्या वर्तमानाचा विचार न करता. जे काही मिळेल त्यातून उपाशीपोटी राहून कष्ट करूनही आईबाप आज मात्र उदासीन झालेले आहेत. वर्ष-दोन वर्षं शिक्षणासाठी केलेला खर्च वाया जाऊन पोराच्या आयुष्याची नासाडी होते की काय! असा त्यांच्यापुढे प्रश्न पडला आहे. थोडाफार पैसा मिळविण्यासाठी आज त्यांना कोठेही जावे लागते, मग ते अंतर कितीही असो, वेळ कोणतीही असो, कामही कोणतेही असो. कशाचाच विचार न करता स्वतःची स्वतःच्या पोराबाळांची पोटाची टीचभर खळगी भरण्याकरिता जावे लागते.

आपल्या मुलांच्या भविष्याची भव्य स्वप्ने पाहणाऱ्या आईबापांना आज काळजीने व्यापलेले आहे. त्याला आज कोणत्याही प्रकारची मदत करू शकत नाहीत. सावकारी व्याज म्हटले तरी पैशास पैसा म्हणजे अगदी अंगाच्या कातड्यासारखेच. त्याशिवाय गत्यंतर नाही. पण मग अखेर तो सावकारी गळफास. त्यापेक्षा "नको ते कर्ज आणि नको ते शिक्षण." नरे घेतलेल्या कर्जाची फेड करण्याच्या मुदती-बद्दल आत्मविश्वास नाही. नोकरी मिळेल तेव्हा ठीक पण हजारो बेकार असताना यांना तरी नोकऱ्या कोण देणार!

ग्रामीण विद्यार्थी शहरात येतात तो थोडाफार विचार करूनच; बुद्धीचा बोर त्यांना त्यावेळी पैशाच्या बोरापेक्षा जास्त वाटतो. तरीही परिस्थितीचा विचार करूनच ते शहरात वावरत असतात. कोणाचे नियंत्रण नसताना स्वतःच स्वतःवर नियंत्रण घालून ते आपल्या ध्येयापाठीमागे लागतात. त्यांचे विचार कधीच आवाक्याबाहेरचे नसतात. करायचे ते केल्याशिवाय थांबणार नाहीत. तो उगीच टगेगिरी करीत बसणार नाही. कॉलेज बुडवून सिनेमा सहसा पाहणार नाही. मुलींच्या चेष्टा करण्यात अगर त्यांच्यामागे गोंडा घोळण्यात तो अग्रगण्य दिसणार नाही. अर्थात परीक्षेमध्ये निदान पहिला नाही तरी पासापुरते मार्क्स तो मिळवीत असतो. खरं म्हणजे तुलनात्मक दृष्ट्या हा ग्रामीण विद्यार्थी बिघडलेला नाही. कोणी म्हणत, "ग्रामीण मुलं म्हणजे खेडवळच, पैशाच्या बाबतीतही कंजूष आणि इतर बाबतींत घाबरट," होय खरं आहे. आम्ही ग्रामीण विद्यार्थी खेडवळ असू, पैशाच्या उधळपट्टीत कंजूष असू आणि वाईट कामे करायला घाबरट असू पण स्वाभिमानी आहोत.

आज दुष्काळग्रस्तांची परिस्थिती भयंकर झालेली आहे. दुष्काळी कामासाठी सकाळीच लवकर मातापिता गेल्याने जेवणाच्या डब्याची व्यवस्था होऊ शकत नाही. दिवसरात्र काम केल्यामुळे पहाटे उठून डब्याचे जेवण तयार करणे काहीवेळेला अशक्यप्राय होते. वरं खिशात पैसा खुळ-खुळत नसल्याने आयत्यावेळी हॉटेलात जाऊन तावही मारता येत नाही. मेसचे ६५ रुपये भरणे अशक्य होत आहे. दोस्ताने कधी नव्हे तो चहा मागितला तर त्याच्या-बरोबर आपल्याला प्यावा लागून दोन चहा जाऊन दोन दिवसाचा चहा बंद करावा लागतो आहे. पिरीयडला उशीर झाला म्हणून लवकर जाण्यासाठी बस पकडून २५-३० पैसे घालविण्यापेक्षा पायी जाऊन पिरीयडला दांडी मारल्याचे भाग्य मिळू लागले. ७ रु. च्या स्लीपरचा पट्टा तुटल्याने नवीन चप्पल घेण्यापेक्षा १। रु. चा पट्टा १ रु. मिळण्यासाठी तो धावाधाव करू लागला. मागीलवर्षी हौसेने शिवलेल्या शर्ट-पँटला शिवून बचून एवढे वर्ष घालविण्याचा

तो विचार करू लागला. चाळीस-पन्नास रु. ची पुस्तके घेण्यापेक्षा लायब्ररीतल्या तुटपुंज्या आणि तात्पुरत्या पुस्तकावरच त्याला अभ्यास करणे प्राप्त झाले.

आणि अशा परिस्थितीत त्याची मानसिक अवस्था विषण्ण लागते. तो एकलकोंडा बनू लागतो. व्यायामाला दांडी पडते. आधीच अन्नाची टंचाई. त्यात खाण्याकडे लक्ष नाही. डोळ्यापुढे सतत, रात्रंदिवस दुष्काळ. आपले घर, आई-वडील आणि वहीण भावंडं, दुष्काळी कामावरची जत्रा, काळी भोर शेतं आणि दावणीला बांधलेली हाडकं बाहेर पडलेली ती जनावरं...आणि मग असं असताना अभ्यासावर तरी लक्ष कसे लागणार आणि अपेक्षित यश तरी कसे मिळणार ? काही तरी वाचायचे म्हणून डोळ्यापुढे वही धरायची...बस्स...!

या सर्व परिस्थितीवर मात करण्याचे काम सरकार मोठ्या शर्थीने करते आहे. त्यांनी दुष्काळनिवारण योजनांचा पसारा जिकडे तिकडे पसरला आहे. कामकऱ्यांना थोडाफार पैसा मिळतो. पण महागाई मुद्दा तोंड वर काढू देत नाही. महानगरपालिका व इतर संस्थाही यात्रावतीत पुढे येत आहेत. विद्यार्थ्यांची फॉर्म फी, वसतिगृह फी, जेवण फी वगैरे भरण्याच्या त्या विचार करीत आहेत. बँकाही दुष्काळी विद्यार्थ्यांना सवलतीने कर्ज देण्याची शक्यता दिसत आहे. पण हे सगळे उपाय तात्पुरते आहेत. यावर कायमचे उपाय योजणे आवश्यक आहे.

आपल्या देशातील पाऊसपाणी, आपली शेती यांचा प्रत्येक विद्यार्थ्याने गंभीरपणे विचार करून नोकरी न करता माझ्या प्रयत्नाने, माझ्या जिद्दीने मी 'भूमिदास' बनून या भूमीला फुलवीन, निसर्गाचा कोप झाला तरी दीर्घकालीन योजनांच्या पाठबळाने आजच्या दुष्काळासारख्या परिस्थितीवर मी मात करीन ही त्याची जिद्द हवी. शिक्षणाने ही जिद्द निर्माण झाली पाहिजे.

फऽफ

इंग्लंडमध्ये लिव्हरपूल शहरात आलेल्या एक स्कॉटिश एकदा फिरावयास निघाला. त्याने एका दुकानावरील पाटी वाचली, "येथे प्रत्येक वस्तू वाजवी मापून मिळेल.

मजा करण्याचे दृष्टीने तो दुकानात शिरला आणि त्याने मागणी केली, "मला एक बार व्हिस्की द्या."

दुकानदाराने थोडा वेळ त्याला निरखून पाहिले आणि प्रसंगावधान राखून काऊंटरपाशी उभा राहिला. नंतर व्हिस्कीच्या बाटलीत बोट बुडवून काऊंटरवर व्हिस्कीची एक बार लांब रेघ मारली आणि विचारले, 'बोला अजून पाहिजे ?'

त्यावर स्कॉटिश म्हणाला, "बस, एवढे पुरे झाले. त्याला जरा बांधून द्या म्हणजे मी बरोबर घेऊन जाईन."

सतीश शहा

आता

श्यामराव : रामभाऊ, अहो ही गरिबी हटाओ योजना केव्हा पूर्ण होणार ?

रामभाऊ : अहो श्यामराव, गरिबी हटाओ ही योजना केव्हाच पूर्ण झाली ! आता फक्त दुष्काळ हटावो ही योजना सरकारच्या हाती आहे.

एम. एफ. मोमीन



नेहमी 'बंडू' म्हणून हाक मारणारी आई आज 'बंडोबा' का म्हणते ? हा 'बा' कुठनं आला ?



पवन लांडगे

माझं नाव बंडू. हं, बंडू म्हणजे खरं नाव नव्हे. पण हे माझं फेमस नाव. तर खरं नाव दुसरंच. राहातो शनिवारात आणि शिकतो कॉलेजात.. फायनलला नाही. आहे पी. डी. लाच. काय फक्त दोनदाच 'बन्स मोर' मिळालाय. आता मात्र घासून (फार नव्हे) अभ्यास करतो. न करता तर काय करता ! आईची सारखीच कटकट पाठीमागे. घरी आलो की आईची चक्की चालू झालीच. "बंड्या हे कर आणि ते कर, अभ्यासाला बस." पण मी म्हणतो अभ्यासाला बसायलाच पाहिजे असं कोणी सांगितले. उभे राहूनसुद्धा वाचन करता येते की. आमचे 'टकले सर' नेहमीच सांगतात की बसून कंटाळा आला तर उभे राहावे, फिरता फिरता वाचावे. पण माझी मुशाफिरी आईपुढे चालत नाही. "हे बघ बंडू मला वाटत अकल शिकवू नकोस. तुझी अकल मला चांगली माहीत आहे" आई माझी बकता बकता अकल काढते.

आई म्हणते 'बंड्या तू फारच विसराळू. तुला स्मरणशक्ती फारच कमी, जवळ जवळ नाहीच.

'पण आई ! असं म्हणून कसं चालेल ? मला अजून मागचं सगळं आठवतंय. सगळा इतिहास (११ वी पर्यंतचा) आठवतोय. शिवाजी महाराज. त्यांची कारकीर्द. त्यांनी केलेला पराक्रम. लुटलेला सुरतेचा खजिना, या खजिन्यात काय 'चिकन' बाई लुटली होती मराठ्यांनी ! फारच सुंदर असेल बुवा ! पण शिवाजी महाराज कसले ? खुशाल परत करून टाकली ! दुसरा बाजीराव आणि त्याची ती मस्तानी ! ते जाऊ द्या. पण मला हे सगळं आठवतंय तरी आई म्हणते तुला स्मरणशक्ती नाही. :अहो ! काही अकल असल्याशिवाय हे सारे ध्यानात राहाते का ?

मी तिसरीत होतो. आमच्या खोपडे गुरुजींनी विचारले, "साही सकून किती ?"

मी उत्तरलो 'बेचाळीस'

मास्तर म्हणाले,

"तू अगदी बेअकल आहेस."

"म्हणजे इतरांपेक्षा दुप्पट काही गुरुजी ?" पण वाक्य पुरे होताक्षणीच हे बेलाडू मिळाले. तेव्हा पासून मला लाडू खायची सवयच झाली आहे आणि पदव्यांचाही वर्षाव होत गेला. जशी एखाद्याला पहिली पदवी म्हणजे 'पद्मश्री' आणि शेवटची 'भारतरत्न' तशीच माझी पहिली पदवी म्हणजे बेअकल, आणि शेवटची पटतमूर्ख.

मध्यंतरी खुळचट, मामा, गोपाळ (पोरींच्या भाषेत) अशा आहेतच. अहो या काय थोड्या झाल्या ! एखाद्या मिनिस्टरलासुद्धा येवढ्या मिळत नाहीत.

मला वडील फार बोलत नसत. म्हणजे टाकून. माझ्याशी ते बऱ्यापैकी म्हणजे घरातील इतरांपेक्षा बरे वागत. पण त्यांनी सुद्धा एकदा मला 'बावळट' ही पदवी बहाल केलीच. काय करणार बिचारे ! तेच राहिले होते. थँक्स फादर !

" अरे बंडू मी कधीपासून पाहाते तू अजून त्याच पानावर आहेस, पुढचं पान उघडलंच नाही. ' इति आई !

' अगं आई, मी अर्थशास्त्राचा सिद्धांत पाठ करतोय ! ' पण मी म्हणतो शोध त्या रॉबीन्सने लावलाय अन् आमच्या डोक्याला काय ताप म्हणून ! ती तिसऱ्या बाकावर बसते ती पोरगी काय स्मार्ट आहे साला ! अगदी ए बन् ! म्हणे रॉबिन्स !

अभ्यासाला बसलं की सारखी ती डोळ्यापुढे नाचते. तिचे काळेभोर डोळे, लांब लांब केस, भरदार छाती, वा ! फारच सुंदर !!

अरे बंडू आता काय करतोस ? " मध्येच आई...

" चुना चाटून दोन्ही हाताने कुटतोय "

'काय !' आईचा करडा आवाज उठला. " न...न... नाही म्हणजे मी...मी...भूगोल वाचतोय "

मी तंद्रीतून खाडकन् जागा झालो.

" आई आता फार डोकं दुखतंय " इति मी.

" औषध आणू का मग ? " आई.

" नको मला झोपायचं वाटतंय. "

" हं झोपा बंडोबा ! आता झोपा."

मी बंडू आहे पण आई मला बंडोबा का बरं म्हणते ? हा ' बा ' कुठला आला ? आईच्या मनात दुसरा कसला विचार आहे. बंडोबा तुझ्या तोंडात साखर पडो.

# शेजेचा पाचवीर

एक गौरकाय तरुणी माझ्या शेजारी बसच्या लायनीत येऊन उभी राहिली. मी इतरांसारखा पाघळलो नाही. पण ती मात्र सारखी माझ्याकडे वळून वळून पाहू लागली. मला घामच फुटला...आपल्याला या अशा गोष्टीची सवय नाही, अनुभव नाही. पण ती तरुणी सारखी पुनःपुन्हा वळून पाहातच होती. पण तिच्या डोळ्यावर गॉगल असल्यामुळे ती नक्की कुठे पहातीय हे कळेना. पण एवढ्यात बस आली, आणि थांबलीसुद्धा. मी सुटकेचा निःश्वास टाकला. पण बसमध्ये मी चढणार एवढ्यात ती माझ्यापुढे आली आणि माझ्याआधी ती बसमध्ये चढली. अर्थातच तिची पाठ माझ्याकडे आली. पाठीवर काळ्याभोर केसांची वेणी रुळत होती. लांबलचक, मऊ केस. केसांना शकुंतला तेलाचा वास येत होता. वास शकुंतला तेलाचाच होता असं नाही. पण केस लांब होते, त्याअर्थी ती शकुंतला तेल वापरत असली पाहिजे असा माझा आपला एक तर्क. कंडक्टर माझ्याजवळ आला, मी तिकिटासाठी पैसे पुढे केले. " तुम्हारा टिकट मेमसाबने निकाला है "- तो हसत म्हणाला. मी हबकलो, पुन्हा घाम फुटला हो ! मी तिच्याकडे पाहिलं. ती हसली...मग काय मीही हसलो...बिचारा करणार काय !

स्टॉप जवळ आला म्हणून ती दारापाशी जाऊन उभी राहिली, मीही तिच्या पाठीमागे जाऊन उभा राहिलो. अंतर अजिबात नव्हतं. तिनं मागे पाहिलं. मी हसलो, तिही लाजून हसली...इतक्यात स्टॉप आला...ती उतरली... मीही उतरलो. आम्ही रस्त्याला लागलो...तिनं एकदम गॉगल काढला, हात वर केला...टाटा केलं...मी हबकलोच, अहो, . तिचा एक डोळा कानपूरला तर दुसरा डोळा नागपूरला होता. मला एकदम एक शेर आठवला,

पता नहीं, तुम किधर देख रही हो रानी
क्योंकी तुम ही आँखोसे कानी...

— पण शेर ऐकायला ती थांबलीच कुठे ! समोरच्या इमारतीत ती शिरली...कपाळाला मी हात लावला आणि मागे वळलो.

जयंत कुलकर्णी

## पदवीपूर्व वर्ग : मानकरी

कु. पद्मिनी जोगळेकर



किरण शिंदे

सौ. प्रभावती कुटे

कु. पद्मिनी जोगळेकर, पदवीपूर्व वाणिज्य प्रथमश्रेणी, विद्यापीठात आठवी व महाविद्यालयात पहिली.
किरण शिंदे, पदवीपूर्वशास्त्र प्रथमश्रेणी व महाविद्यालयात पहिला.
सौ. प्रभावती कुटे, पदवीपूर्व साहित्य, महाविद्यालयात पहिली.

## पदवीपूर्व शास्त्र प्रथमश्रेणी

दिलीप अधिकारी

रामकृष्ण आडकर

मोहन कीणीकर

कु. शैला गांधी

प्रमोद लाळे

कु. गुणबाला मेहता



मोहन साखळकर

संजय साठे

याखेरीज श्री. सुधीर मुकुंद ओक हे पदवीपूर्व शास्त्र वर्गात प्रथमश्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

## प्रथमवर्ष वर्ग : मानकरी

कु. अरुणा करडे



शाम वाघ

हेमा अभ्यंकर ( सौ. लेले )

कु. प्रतिभा कान्हेरे

१. अरुणा करडे, प्रथमवर्ष शास्त्र : प्रथमश्रेणी व महाविद्यालयात पहिली.
२. शाम वाघ, प्रथमवर्ष वाणिज्य : प्रथमश्रेणी व महाविद्यालयात प्रथम.
३. सौ. हेमा लेले, प्रथमवर्ष साहित्य : महाविद्यालयात प्रथम.
४. कु. प्रतिभा कान्हेरे, प्रथमवर्ष वाणिज्य : प्रथमश्रेणी.

## प्रथमवर्ष शास्त्र : प्रथमश्रेणी

विवेक निवर्गी

अशोक सावंत

पी. कृष्णकुमार

मुरलीधर पवार

श्रीकांत मेहेंदळे

अमरसिंग देसाई

अभिमन्यु सिंगळे



दत्तात्रय न्यायाधीश

## प्रथमवर्ष शास्त्र : प्रथमश्रेणी

कु. अरुणा काळुसकर

कु. हेमलता वैद्य

रवींद्र कानिटकर

पांडुरंग भातोडे

अरुण शिंदे

शिरीष देशपांडे

रवींद्र लऊळकर

शिरीष पंडित

दुष्यंत फासे

विलास सातारकर

मुकुंद रानडे

कु. नलिनी मल्ल्यनमठ
तृतीय वर्ष वाणिज्य :
महाविद्यालयात पहिली

## पदवीपूर्व वाणिज्य : प्रथमश्रेणी

प्रमोद खांडेकर

सतीशचंद्र कुलकर्णी

सुभाष भाटिया

अशोक गुजर

कु. माणिक जोशी

दत्तात्रय गोसावी

## प्राध्यापकांचे विशेष कार्य

प्रा. व. गो. नांदेडकर

प्रा. पद्माकर आपटे

( मॉडर्न वार्ता पृ. १०१ पाहा )

प्रा. म. आ. कुलकर्णी

# दुष्काळाचे सावट दूर कसे करता येईल ?

मुरलीधर एरंडे

आजचा विद्यार्थी दुष्काळाचा गंभीरपणे विचार करतो आहे, आणि तो दूर करण्याचा मार्गही सुचवितो आहे... ... ... ...

कै. धनंजयराव गाडगीळ यांनी १९५२ साली स्थापना केलेल्या दुष्काळ निवारण समितीने नुकतीच नगर, सोलापूर, पुणे सांगली, सातारा व औरंगाबाद या जिल्ह्यांत हिंडून दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली. एकट्या नगर जिल्ह्यामध्ये २ लाख लोक दुष्काळी कामावर आहेत. हा आकडा आणखी वाढणार आहे. समितीला असे आढळून आले की सर्वांनाच काम मिळते असे होत नाही. सरकारी वेतन २ रुपये मिळते. काही ठिकाणी १ रु. तर काही ठिकाणी ६४ पैसे दिले जातात. अपहारसुद्धा भयंकर चालते. दुष्काळी कामावरील व्यवस्थापकांना चहा-पाणी, मटणपार्टी दिल्याच्या वार्ताही कानावर येतात. भरमसाठ कागदोपत्री आणि प्रत्यक्ष कामावर लोक निम्मेच. हेही प्रकार आहेत.

कच्याच भागात खरीप व रब्बी पिकांची पेरही झालेली नाही. जिथे थोडीफार पेर झाली ती पिके वाळून गेली. सरकारने दरमहा ८ ते १० किलो धान्य माणशी देण्याचे ठरविले, परंतु प्रत्यक्षात सहा किलोच जेमतेम मिळते. खुल्या बाजारातील धान्य घेणे लोकांना मुळीच परवडत नाही. पिण्याच्या पाण्याअभावी कित्येक खेडी ओस पडली आहेत. जनावरांना चारा नसल्याने ती कशी वाचवावी या संकटात लोक आहेत. मिळेल ती किंमत घेऊन लोक जनावरे विकत आहेत. महाराष्ट्रावर पडलेल्या दुष्काळी संकटाशी केवळ शासनाने मुकाबला करू म्हटले तर होणार नाही. त्यात कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी स्थापन केल्या तशा समित्या सर्व जिल्ह्यांतून व मुंबई पुणे अशा मोठ्या शहरांतून तातडीने स्थापन होणे जरूर आहे. मुंबई, पुण्यासारख्या शहरांत बरीचशी नोकरदार मंडळी व बरच्या समाजातील लोक राहतात. त्यांना अद्यापी दुष्काळाची झळ लागलेली नाही. या मंडळींनी व ग्रामीण भागातील श्रीमंतांची बहुसंख्य दुष्काळग्रस्तांना दिलासा देऊन प्रत्यक्ष मदत मोठ्या प्रमाणावर देण्याची नितांत आवश्यकता आहे. दुष्काळ का पडला ? महागाईस सरकारी धोरण कितपत कारणीभूत आहे इत्यादी गोष्टींची चर्चा न करता आलेल्या परिस्थितीत वाट कशी काढावयाची हा खरा प्रश्न आहे.

युद्धकाळात ज्याप्रमाणे सर्व पक्षांतील मंडळी, व्यापारी, समाजातील प्रतिष्ठित लोक, लोकनेते यांनी एकत्र येऊन सरकारला सहकार्य दिले व आपण युद्ध जिंकले. त्याच प्रकारचे प्रयत्न याहीबाबत व्हावयास हवेत. पण तसे होत नाही.

दिवसेंदिवस आवश्यक वस्तूंचे भाव वाढत आहेत. त्यामुळे धान्याचा साठा व व्यापार सरकार ताब्यात घेण्याच्या विचारात आहे. वस्तुतः सरकार किती गोष्टींचा व्यापार हाती घेणार? अन्नधान्ये, डाळी, रॉकेल, वनस्पती, खाद्यतेले इ. सर्वच गोष्टी शासनाला हाताळणे व त्यांचे वाटप सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचवणे शक्य होणार नाही. म्हणून व्यापाऱ्यांनीच आचारसंहिता पाळणे जरूर आहे. खाद्यतेलात मोठ्या प्रमाणावर भेसळ उघडकीस आली आहे. या कृत्याला समाजद्रोही म्हणून कडक शासन झाले पाहिजे.

**शहरांकडे धाव :–** दुष्काळामुळे शेतात काहीच पिकलेले नाही. अशा परिस्थितीत सरकारी धान्य स्वस्त दिले तरी ते विकत घेण्यास पैसा तर हवा. म्हणून कित्येक दुष्काळग्रस्त कामाच्या शोधात मुलाबाळांसह पुण्यामुंबईकडे मोठ्या प्रमाणात धाव घेत आहेत. ही लाट वेळीच थांबविली पाहिजे. नाहीतर शहरांतून नवीनच प्रश्न निर्माण होतील. या मंडळींना जागा कोठे देणार? काम काय देणार? इ. अडचणी आहेत. तेव्हा गावे सोडून पाणी असेल तेथे जाणे युक्त ठरणार नाही. शहरातील मंडळींनी मोठ्या प्रमाणावर निधी जमविला पाहिजे. त्यातून धान्य विकत घेऊन ते मोफत देण्याची योजना आखली पाहिजे. गावागावांतून सर्व गावांसाठी मिळून मोठे भोजनगृह चालविले जावे. त्यात निदान एकवेळेला तरी मोफत जेवण दुष्काळग्रस्तांना मिळाले पाहिजे. ही सुरुवात काही भागांतून काही संस्थामार्फत झाली आहे. तथापि ती मोठ्या प्रमाणावर व्हावी. त्यासाठी मोठमोठ्या संस्थांनी भूकंपाच्या वेळी ज्याप्रमाणे गावे दत्तक घेतली, देणग्या दिल्या त्याच धर्तीवर आताही मदत देणे अगत्याचे ठरेल. आपण खातो त्यातील काही भाग दुष्काळग्रस्तांसाठी जरूर दिला पाहिजे.

**राष्ट्रीयीकृत धँका :–** राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये ठेवींची वाढ ८००० कोटी रु. झाली आहे. पैशाचा तेथे पूर आला आहे. पैसे कोठे गुंतवावेत हा प्रश्न त्यांना पडला आहे. तथापि दुष्काळग्रस्तांसाठी या बँका जे काही करीत आहेत ते फारसे समाधानकारक नाही. या बँकांनी आपल्या नफ्यातून काही टक्के रक्कम काढून दुष्काळासाठी दिली पाहिजे. सहकारी बँका व राष्ट्रीयीकृत बँका यांनी सहकार्य करून दोन्हींची शक्ती एकवटून या कठीण प्रसंगी लोकांना मदत दिली पाहिजे. त्याचप्रमाणे विहिरी खणणे, बंदिंग, पाझर तलाव, ऑईल इंजिने इत्यादी कामासाठी मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा धोका पत्करून केला पाहिजे. सहकारी साखर कारखान्यांनाही मोठ्या प्रमाणावर दुष्काळग्रस्तांसाठी मदत करता येईल. सर्व साखर कारखान्यांना मिळून मोठा निधी जमविता येईल. त्याचप्रमाणे कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील दुष्काळी गावांना दिलासा देता येईल. साखर कारखान्यात येणाऱ्या उसाची वाढ जनावरांना देता येईल. त्याचप्रमाणे ऊस गाळल्यावर उरणारी चिपाडे, मळी इ. खाद्यही जनावरांना देण्याचा विचार करण्यासारखा आहे.

**काही पथ्ये :—** दुष्काळात महागाई रोखण्यासाठी अधिकाधिक वस्तूंची विक्री रास्त भावाने खास धान्य दुकानांतून व्हावी, त्याचबरोबर अनावश्यक असलेल्या अनुत्पादित खर्चास बंदी करावयास हवी. गेल्या दोन महिन्यांत इतके "सेमिनार" व परिसंवाद झाले की ते बंद होतील तर बरे असे वाटू लागले. त्यांवर खर्च करून काही साधते का, याचा शोध घेतला पाहिजे. खरे पाहिले असता या परिसंवादांनी काही साधत नाही हेच उत्तर द्यावे लागते. याचा अर्थ चर्चा होऊच नये असा नाही. त्याचे प्रमाण व त्यावर खर्च यांवर निर्बंध हवा. दुष्काळी परिस्थितीत ही संमेलने योग्य ठरत नाहीत. येळीवाचा पाऊसदेखील येण्यास पाच महिने अवकाश आहे. नवीन पिके हाती येण्यास पुरे बारा महिने आहेत.

महाराष्ट्र, गुजरात, आंध्र यांखेरीज इतकी भयावह परिस्थिती नाही. दुष्काळ असला तरी १० कोटी टन धान्य उत्पादन होईल असे सांगण्यात येते. तसे झाले तर उत्तमच. गव्हाचा एक कोटी टनाचा साठा निम्मा संपला, पण आहे ते धान्य सर्वत्र समान वाटले पाहिजे. साठेबाजी होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. महाराष्ट्रात शासनाने पुन्हा निर्बंध लादताच ज्वारीचे भाव १५ ते २० रु. नी वाढले. ज्वारी बाजारात दिसेनाशी झाली. बाजरी यंदा १-२ आणेही आली नाही. सर्वांत नेहमी कमी किंमतीने विकला जाणारा हुरडा १२५ रु. वर गेला. हरबरा महागल्याने घोड्यांचा खाना बंद पडला. घोड्यांना जगवायचे कसे अशी चिंता टांगेवाल्यांना पडली आहे. दुष्काळाची झळ अशी सर्वांना पोहचत आहे, अशा परिस्थितीत मोर्चे सत्याग्रह करून हा प्रश्न सुटणार नाही. सरकारी प्रयत्नात स्वयंस्फूर्त अशा प्रयत्नांची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. तेव्हा प्रत्येकाने हे दुष्काळाचे सावट दूर करण्यासाठी कंबर कसली पाहिजे.

# धूमकेतूचे रहस्य

आनंद देशपांडे

धूमकेतू का दिसतो व त्याला शेपटी का असते ?

धूमकेतू या प्रकरणाबद्दल पूर्वीपासून मानवाच्या मनात एकप्रकारचे विलक्षण भयचकित असे गूढ आहे आणि यासंबंधी जगातील सर्व वातीवमातींत अनेक दंतकथा आहेत. याला कारणेही आहेत. हा आकाशात कोणतेही कारण नसताना ठराविक काळानंतर दिसतो. आणि दुसरे असे की इतर ग्रहांप्रमाणे किंवा ताऱ्यांप्रमाणे याचा आकार नाही. तो वारक्या वारक्या विरळ कणांनी बनल्यासारखा वाटतो व त्याला त्याचप्रकारची काहीशी अंधुक अशी शेपटी असते म्हणूनच पूर्वीच्या काही कवींना ही अस्ताव्यस्त असलेली शेपटी पाहून एखाद्या शोकग्रस्त स्त्रीच्या इतस्ततः विस्कटलेल्या केसांची आठवण झाली ( इंग्रजीमध्ये धूमकेतूला 'कॉमेट' म्हणतात. हा शब्द ग्रीक असून त्याचा अर्थ केस असा आहे. )

आता हा 'आकाशाईचा फेरा' का येतो व तिने आपले केस असे मोकळे का सोडले आहेत याचे शास्त्रीय रहस्य आपण पाहू.

अठराव्या शतकाच्या शेवटी धूमकेतू हा सूर्याभोवती ठराविक कक्षेतून फिरतो हे सिद्ध करण्यात आले. परंतु ही कक्षा वर्तुळाकार नसून अति मोठी अशी लंबवर्तुळाकार आहे. या कक्षेच्या लांबच्या कडेला जेव्हा तो असतो तेव्हा तो दिसत नाही आणि जवळच्या कडेच्या आसपास मात्र तो दिसतो, परंतु असा जवळ ( अर्थात जवळ म्हणजे सुद्धा लाखो मैल ! ) तो कित्येक वर्षांनी येतो व तो आपणास दिसतो.

१९५० साली डच खगोलशास्त्रज्ञ जॅन हेंड्रीक ओर्ट यांनी असे विचार मांडले की सूर्याभोवती एक कोट्यावधी लघुग्रहगोलकांचा बनलेला प्रचंड ढग फिरतो आहे. त्याचे सूर्यापासूनचे अंतर सुमारे १ प्रकाशवर्ष एवढे आहे.

( एक प्रकाशवर्ष = १,८६,००० × ६०×६०× २४× ३६५ मैल ! )

हे अंतर: सूर्यमालेतला सर्वांत लांबचा ग्रह जो प्लुटो त्यापेक्षा हजारो पटीने जास्त आहे. म्हणूनच हा ढग दिसू शकत नाही. परंतु कधीकधी जवळच्या ताऱ्यांच्या गुरुत्वाकर्षणाने त्या ढगातल्या गोलांची गती कमी होते व एखादा सूर्यमालेत अगदी आतपर्यंत प्रवेश करतो, व सूर्याजवळून फिरू लागतो. यालाच आपण धूमकेतू म्हणतो.

याच सुमारास अमेरिकन शास्त्रज्ञ फ्रेड लॉरेन्स व्हिपल याने असे सुचविले की धूमकेतू हा अमोनिया किंवा मिथेन अशासारख्या कमी उत्कलनबिंदू असलेल्या पदार्थांचा बनलेला असावा आणि त्याबरोबर त्यात खडकासारख्या पदार्थांचे कण असतात. हा धूमकेतू ज्यावेळी सूर्यापासून लांब असतो त्यावेळी मिथेन, अमोनियासारखे पदार्थ गोठतात आणि बर्फासारखी घट्ट अशी त्याची स्थिती होते. पण तो जो जो सूर्याजवळ येऊ लागतो तो तो त्याच्या बाहेरील भागातील गोठलेल्या पदार्थांचे उष्णतेमुळे वाफेत रूपांतर होते आणि ते मोकळे होतात. त्यामुळे धूमकेतूचा गाभा ( Core ) खडकासारख्या पदार्थांचे कण ( आपण त्याला धूलिकण म्हणू ) आणि बाष्प यांनी वेढलेला असतो.

सूर्यापासून परमाणूंचा ( Subatomic ) बनलेला असा सौरपवन ( Solar Wind ) निघत असून तो बाहेरच्या दिशेने वाहात असतो. या वाऱ्याचा जोर हा सूर्य व धूमकेतू यांच्यामधील असलेल्या आकर्षणापेक्षा जास्त असल्यामुळे धूमकेतूमधली ही बाष्प व धूलिकण बाहेर ढकलली जातात आणि जो जो हा सूर्याजवळ जातो तो तो सौरपवनाचा वेग वाढत असल्यामुळे ढकलली जाणारी बाष्प आणि धूलिकण जास्तच विरळ होऊन बाहेर वाहू लागतात आणि हेच आपणास त्याच्या विरळ शेपटी सारखे वाटतात.

सूर्याभोवती प्रदक्षिणा मारतामारता या वाऱ्यामुळे हळूहळू धुमकेतूतल्या या विरळ व हलक्या द्रव्याचा नाश होऊन लहानसा बर्फासारखा गाभा शिल्लक राहतो. पुढे त्याचेही तुकडे होतात—याच उल्का होत. या उल्का सूर्याभोवती फिरतात पण फिरताना कधी त्यांचा पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश झाला तर त्या पृथ्वीवर प्रचंड वेगाने आदळतात. यालाच आपण उल्कापात म्हणतो.

मृत धूमकेतूचे अवशेष म्हणजे उल्का होत.

'बाईऽ बाईऽऽ बाई ! मी म्हणते हा कसला खेळ ? तहानभूक विसरून अगदी ब्रह्मानंदी टाळी लागल्येय !'

लेखक म्हणतो, गणिताची चटक लागली म्हणजेच ह्या बाईचे म्हणणे कळेल. शुद्ध गणिताचे ( Pure Mathematics ) एक दर्शन.

# हा खेळ कल्पनांचा

चंद्रकांत गुरुप्रसाद कुलकर्णी

"पण मी म्हणते, आधी जेवून घेतले नि मग खेळत बसले तर काय हरकत आहे ? अस्सा राग येतो ! वाटते, ते हत्ती घोडे घ्यावेत आणि ठेवावेत गॅसवर..."

पण ह्या उद्गारांच्या 'ह्यां'च्या कर्णपटलावर काहीही परिणाम होत नाही. अहो होणार कसा ! 'ह्यां'ची अगदी 'ब्रह्मानंदी' टाळी लागलेली असते. आता पुढची खेळी कशी खेळायची, एवढा आणि फक्त एवढाच प्रश्न 'त्यां'च्या पुढे असतो. बाकीच्या जगाचं अस्तित्व ते केव्हाच विसरून गेलेले असतात. भूकसुद्धा विसरलेली असते, तिथं हे वरचे उद्गार काय करणार ? गृहमंत्र्यांची 'ती' घोषणा वाऱ्यावर येते आणि वाऱ्यावरच जाते.

एवढं काय असतं त्या बुद्धिबळाच्या डावात, की ज्यात माणसानं आपली तहानभूक विसरावी, कधी कधी सुपारी म्हणून हत्ती कातरून खावा, महत्त्वाची कामंसुद्धा कित्येकदा दूर ढकलावीत ? एवढा का, तो खेळ माणसाला खेळवतो, खिळवून ठेवतो, रमवतो, तल्लीन करतो ? कशामुळे ?

काय असतं त्या खेळात ? एक ८x८ अशी ६४ घरे असलेला पट; राजा, वजीर, हत्ती, उंट अशी भारदस्त नावे दिलेल्या सोंगट्या, की ज्यांची किंमत 'ह्यां'च्या 'सौं'ना गॅसवर ठेवण्याइतकी वाटते; आणि ह्या सोंगट्यांना लावलेले नियम. बस्स ! एवढे नियम पाळायचे, त्यांचे उल्लंघन करायचे नाही नि मग खेळत बसायचे. इतर कशाची जरूरी

नाही. फक्त तो १२" × १२" मापाचा पट, त्यावर दृष्टी खिळवायची, आपल्या सर्व साधारण प्रज्ञेला साद घालायची, तर्कशक्तीला आव्हान द्यायचं; मस्तक चालू होते आणि मती गुंग होते, देहाच्या अस्तित्वाची जाणीव देखील होत नाही !

ती प्यादी, तो राजा, वजीर, हत्ती, उंट, तसे एरवी निरर्थकच नाहीत काय ! घोड्याने म्हणे अडीच घरंच गेलं पाहिजे, उंटाने सरळ तिरकेच जायचे तर हत्तीने फक्त उभा किंवा आडवाच हैदोस घालायचा. अहो व्यवहारात कोणता शहाणा घोडा एका बेरेल्या फक्त अडीच घरं चालतो ! कोणताच नाही. मग ह्या बुद्धिबळांतल्या घोड्याला, 'घोडा' का म्हणायचं ! आणि ह्या नियमांच्या चौकटीची बंधने आपल्या कल्पनाशक्तीला का घालायची ! असे प्रश्न तुम्ही कुणा बुद्धिबळाच्या चाहत्याला विचारले तर तो एवढेच म्हणेल, 'xxx ला गुळाची चव काय !' आणि त्याचं तरी काय खोटं आहे ! तो खेळाहू विचारांच्या साम्राज्यात खेळताना देहभान विसरून जातो. त्या समाधीचा, त्या तल्लीनतेचं आनंदा ज्यानं उपभोगला नाही त्याला कसा कळणार !

बुद्धिबळाचा एकपट, त्यावरच्या सोंगट्या, नव्हे ती अर्थपूर्ण चिन्हे, त्यांचे नियम, ही एक स्वयंपूर्ण चौकट, त्यावर खेळला जाणारा हा डाव म्हणजे एक कल्पनांचा खेळ. ज्याला common sense आहे, अशा कुणीही त्यांत रममाण व्हावं. अशा असंख्य स्वयंपूर्ण चौकटींचा संग्रह अशा अनंत कल्पनांच्या डावांचा संच म्हणजे "शुद्ध गणित." तो एक कल्पनांचा खेळ आहे. खेळताना देहभना विसरावं इतका तो मनोरंजक आहे. नैसर्गिक देहधर्माचीही जाणीव होऊ नये इतकी त्यांत रंजन शक्ती आहे. माणसाच्या प्रगल्भ बुद्धिमत्तेतून निर्माण झालेल्या सुरम्य कल्पनांची ती एक अमर्याद भराटी आहे.

ह्या गणिताची सुरवात झाली ती संख्यांच्या निर्मितीमुळे वस्तु मोजण्यासाठी चिन्हे निर्माण झाली. एक, दोन, तीन, चार... ही नावे त्यांना दिली गेली. मोजण्याच्या संख्या तयार झाल्या. त्यांच्या जन्माबरोबरच त्यांना अर्थ प्राप्त झाला अर्थाविना संख्या म्हणजे नुसती चिन्हेच; अद्वैशिवाय दगडी देवाला केलेल्या नमस्काराइतकीच त्यांची किंमत. वस्तु एकत्र करणे, जवळ असलेल्या वस्तूंतून काही वस्तु काढून घेणे ह्या क्रियांना संख्यांच्या स्वरूपात अर्थ देण्यात आला. त्या अर्थांना बेरीज, वजाबाकी ही नावे मिळाली. निसर्गतः निर्माण झालेल्या ह्या स्वाभाविक संख्या आपल्याला कित्येकदा आपल्या पंढरीच्या पांडुरंगा इतक्या स्वयंभू वाटतात. स्वाभाविक संख्या मधील बेरीज, वजाबाकी, गुणाकार, ह्या क्रिया निर्माण झाल्या. पुढे निर्मिती झाली अपूर्णांकांची. –१, –२, –३,... हे ऋण पूर्णांक आले. ह्या सगळ्यांना 'परिमेय संख्या' म्हटल गेले. त्यांना सरळ रेषेवर मानबिंदूच्या साह्याने दाखविले गेले. आणखी संख्या अस्तित्वात येतच होत्या $\sqrt{२}$ सारख्या संख्याना 'अपरिमेय संख्या' असे म्हणू लागले. परिमेय आणि अपरिमेय संख्या, ह्या सगळ्या 'वास्तव संख्या' किंवा खऱ्या संख्या, सत्संख्या होत. सत्संख्यांच्या पट तयार झाला. संख्या त्यातल्या सोंगट्या. बेरीज, वजाबाकी गुणाकार आणि भागाकार ह्या त्यांच्यातील क्रिया. नियम ठरले गेले. खेळ तयार झाला. गणिताला अस्तित्व येत होते. त्याचा इतिहास घडत होता. संख्या वाढत होत्या. खेळी खेळल्या गेल्या. खेळणारे मतिगुंग होऊन खेळत होते, खेळत आहेत आणि खेळत राहतील. खऱ्या संख्यावर तयार झालेली ही 'रचना' अपूर्ण पडायला लागली आणि संख्यांचे 'क्षेत्र' विस्तारलं गेलं. शुद्ध गणिताचे हे सर्वात मूळचे स्वरूप.

बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार ह्या क्रियांनी संख्यांचे जे गणित तयार झाले ते संख्यांचे बीजगणित. पण ते देखील व्यवहारात अपुरे पडायला लागले. यूक्लीडच्या भूमितीने आपला प्रवेश असाच वाजूने केला. ही 'भूमिती' तर खरंच. खूपच सुंदर, मनोहारी खेळ. बिंदू, सरळरेषा आणि त्यांनी तयार झालेल्या आकृत्या. ह्या आकृत्यांच्या वाखतीत काही गृहीते धरली गेली जी प्रत्यक्ष अनुभवावर आधारलेली आहेत. "दोन समांतर रेषांना एका रेषेने छेदले असता होणारे व्युत्क्रम कोन समान असतात अशी ही गृहीते आहेत, त्यांना Axioms असे म्हणू लागले. त्यांच्या साह्याने निरनिराळे डाव टाकण्यात आले. ह्या सागरमंथनातून मिळाले सुंदर सिद्धांत, ज्यांना प्रमेये म्हणतात. एक नवा पट तयार झाला, नवे नियम, नवीन रचना, "भूमिती" हे त्या पटाचं नाव.

खऱ्या संख्यांवर आधारलेल्या ह्या दोन प्रमुख रचना. एक बीजगणित आणि दुसरी भूमिती. बीजगणित व्यवहाराच्या जरेच जवळ आहे तर भूमिती त्यामानाने थोडी दूर. खऱ्या संख्यावर तिसरी जी रचना तयार झाली ती मात्र कांहीशी

अमूर्त आहे. ह्या रचनेचे नाव कलनशास्त्र 'Calculus' असे आहे. हे 'कलनशास्त्र' जेव्हा निर्माण झाले तेव्हा त्याच्या प्रत्येक जाणत्याला प्रश्न पडला होता की त्या कलनशास्त्राचा व्यवहारात काही उपयोग आहे का? न्युटनलाही प्रश्न विचारला गेला, "Of what use is calculus? उत्तर आलं "Of what use is baby? Wait and see!" उत्तराचं हसू येतं आपल्याला.पण लहानपणी निरागस वाटणारं 'बाळ' मोठेपणी केऽऽवढा घुमाकूळ घालतं हे काय सांगायला हवं? जे 'Calculus' त्याच्या जन्माच्या वेळी असं 'निरागस', 'निरुपयोगी' वाटत होते ते आज शास्त्रांना, उपशास्त्रांना ठायीठायी लागू लागले आहे. त्यांना त्याची जरूरी पडू लागली आहे. शास्त्रीय जगात त्याने केवढा मोठा प्रचंड घुमाकूळ घातलाय!

बीजगणित, भूमिती आणि कलनशास्त्र ह्या खऱ्यासंख्यावर आधारलेल्या तीन रचना, हा शुद्ध गणिताचा मूलभूत आधार. ह्या तीन रचनांची दैनंदिन जीवनाच्या गरजांतूनच निर्मिती झाली, पण त्यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. इतके स्वतंत्र की Calculus चा अभ्यास करताना असे वाटते की हे शास्त्र व्यवहारातून निर्माण झाले की स्वयंभू आहे. त्याचा काही व्यवहारात उपयोग आहे का?

मूलतः व्यवहारातूनच निर्माण झालेल्या पण व्यवहारापासून दूर असलेल्या ह्या गणितांच्या स्वयंपूर्ण अशा शाखांचा एक उपविभाग तयार झाला, हेच ते शुद्ध गणित Pure Mathematics. त्याचा इतिहास हा असा आहे. त्याच्या इतिहासाचे हे थोडते समालोचन. पूर्ण इतिहास लिहायचा म्हटला तर गणितालाच त्याचा इतिहास लिहायला बसावे लागेल. ही जबाबदारी 'कुण्या' गणित्याकडे सोपवण्याचे 'धाडस' 'कुण्या' शासनाने करू नये.

पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, तंत्रशास्त्र यांसारखी शास्त्रे; अर्थशास्त्र, मानसशास्त्र यांसारखी समाजशास्त्रे यांचा शुद्ध गणिताशी दुवा जोडला जातो तो प्रयुक्त गणितामुळे, Applied Mathematics मुळे तो दुवा कसा जोडला जातो? ह्या शास्त्रांच्याकडून शुद्ध गणिताच्याकडे कसे येता येते? शुद्ध गणिताकडून ह्या शास्त्रांच्याकडे काय व्यवहार होतो? इत्यादी अनेक प्रश्न पुढे उभे राहतात. पण ह्यातील प्रत्येक प्रश्न विवेचनाचा स्वतंत्र विषय निर्माण करील म्हणून पुन्हा शुद्ध गणिताच्या स्वरूपाच्या चर्चेकडेच वळणे इष्ट ठरेल.

पुन्हा आपण पूर्णांकांच्याकडे वळू. यात पूर्णांक आणि त्यांची बेरीज मिळून एक स्वतंत्र रचना तयार झाली आहे. या रचनेला स्वतःचे असे गुणधर्म आहेत.

उदाहरणार्थ

(१) कोणत्याही दोन पूर्णांकांची बेरीज पूर्णांकच असते.

(२) अ, ब हे कोणतेही दोन पूर्णांक असतील तर—

$अ + ब = ब + अ$

(३) अ, ब आणि क हे कोणतेही तीन पूर्णांक असतील तर—

$(अ + ब) + क = अ + (ब + क)$

(४) $अ + ० = अ$

(५) $अ + (-अ) = ०$

अशी ही रचना आहे. ह्या रचनेचे वर दिलेले पाच नियम आहेत. मग अशा प्रकारच्या दुसऱ्या रचना तयार केल्यावर काय होईल? त्यातूनही काही नवे सिद्धांत आपल्याला मिळतील. ह्या जाणिवेतून शुद्ध गणितात निरनिराळ्या रचना तयार झाल्या. आणि अमूर्त गणित किंवा नवीन गणित म्हणतात ते हेच. ह्यापूर्वीपर्यंत खऱ्या संख्यावरील रचनावरच गणिताचा पूर्ण भर होता.

पण ह्यानंतर मात्र नवीन वस्तुसमूह घेण्यात आले, जे अमूर्त संच होते. त्यांत नवीन रचना तयार करण्यात आल्या. ह्या पद्धतीत प्रथम एक संच घेतला जातो. त्यातील वस्तुवर नियम लादले जातात. काही क्रियांची व्याख्या केली जाते आणि मग ह्या तयार झालेल्या चौकटीच्या कक्षा संभाळून तर्कसुसंगत खेळ खेळला जातो. शुद्ध गणिताच्या सर्व शाखा ह्या अशा स्वरूपाच्या आहेत, आणि म्हणूनच त्या अमूर्त आहेत. बुद्धिबळाचे उदाहरण मी सुरुवातीला दिले ते ह्यासाठीच. कारण बुद्धिबळाच्या खेळातही आपण तेच करतो. एक पट घेतो, अर्थविहीन सोंगट्या घेतो, त्यांच्या हालचालींवर नियम जोडतो आणि खेळ खेळतो. तसंच शुद्ध गणिताचं आहे. David Hilbert म्हणतो :

Mathematics is nothing more than a game. Played according to certain rules with meaningless marks on Paper.

ह्या खेळात तयार होणारे सिद्धांत हे ठराविक गृहीतांवर आधारित असतात. ही गृहीते जर खरी असतील तरच ते सिद्धांतही खरे असतात. थोडक्यात काय तर शुद्ध गणिताच्या प्रमेयात जर-तरची भाषा असते. निखळ सत्य

हे त्यात कधीही सांगितलेले नसते. परंतु गणितातले सिद्धांत ही त्रिकालाबाधित सत्ये असतात. उदाहरणार्थ "त्रिकोणातील कोणत्याही दोन बाजूंची बेरीज ही तिसऱ्या बाजूपेक्षा मोठी असते" हा युक्लीडच्या भूमितीतील सिद्धांत युक्लीडच्या भूमितीच्या चौकटीत कायमचा सत्य म्हणूनच राहणार आहे.

शुद्ध गणितांतील रचनांचे प्रामुख्याने तीन विभाग करता येतील. १) Algebraic २) Topological ३) Order त्यांच्या मिश्ररचनाही तयार झाल्या आहेत, होत आहेत. या सगळ्या रचना स्वयंपूर्ण असतात. एखाद्या अमूर्त रचनेचे उदाहरण येथे देणे तसे अवघडीचे होणार नाही, पण हा विस्तार येथेच आवरता घ्यावयाला हवा.

असे हे मनोरंजक गणित बहुसंख्यांना अवघड का वाटावे ? ते सर्व ठिकाणी उपयोगी असून सर्वांना नकोसे का वाटावे ? नवीन नवीन क्षेत्राकडे त्याची घोडदौड चालू आहे म्हणे ! ती कशी काय ? गणिताचा विस्तार तरी किती आहे ? या प्रत्येक प्रश्नांचा उत्तरासाठी प्रत्येक असेच काव्यमय विवेचन करावे लागेल. एवढेच मात्र निश्चित की गणिताचे अंतरंग समजाऊन घेण्यात काव्य समजाऊन घेण्याचा आनंद आहे, आणि मग ,

**A mathematician who is not something of a poet will never be a complete mathematician**

हा Weierstrass च्या म्हणण्याची सार्थता पटल्यावाचून राहात नाही.

## मंगला जाधव

राधाकाकू : काय ही महागाई.
भीमाकाकू : हो न, पण यंदा पीक फार आलंय.
राधाकाकू : कसलं पीक ?
भीमाकाकू : डासांचं.

तो : प्रिये, तुझे हे सजीव कुंतल, मम देई सानंद.
ती : इश्श, हे केस माझे नाहीत. हा टोप आहे टोप.

## The seven most expressive words

Shamkant Sutar

( 1 ) The most reverend is ' mother '
( 2 ) The most beautiful is ' love '
( 3 The most tragic is ' death '
( 4 ) The warmest word is ' Friendship '
( 5 ) The coldest is ' No '
( 6 ) The most bitter is ' Alone '
( 7 ) The saddest word is ' Forgotten '



सुरेशचंद्र पाध्ये

# नवनीतिकथा

अंग्रॉस विअर्सचे चुटके वाचून वाजविलेले काही फटाके

## १. बंद आणि पुढारी

सूर्याचे ऑफीस सुटले होते आणि कावळ्यांची शाळा भरली होती. पण आज शाळेत एकही विद्यार्थी नव्हता. सारे पटांगणात जमले होते. त्या वटवृक्ष शाळेत काही शिक्षक-कावळे बसले होते.

त्यांतल्या एका शिक्षकाने पिंक टाकली आणि म्हटले, "काहीही होऊ दे, चोच तुटू दे, नाहीतर पंख फाटू देत; या पोरट्यांना मुळीच शरण जायचे नाही." एवढ्यात त्यांचे हेडमास्तर मानेवरचे चंदेरी ठरणे सावरीत म्हणाले, "अहो, ते ठीक आहे, पण शाळा बंद पडेल ना! मी सांगतो असं करा. आपल्या खजिन्यामधले चार उंदीर त्यांच्या पुढाऱ्यांना खाऊ द्या. सारं आपोआप शांत होईल.'

त्यांचे बोलणे पुरे होते न होते तोच विद्यार्थ्यांतून एकच आरोळी उठली :

"आमच्या सर्वच्या सर्व मागण्या मान्य करा; नाहीतर खुर्च्या खाली करा...हमसे जो टकराएगा, मिट्टीमें मिल जाएगा...गृहपाठ देणे बंद करा..परीक्षा पद्धती रद्द करा. आठवड्यातून एकतरी पिक्चर दाखवलाच पाहिजे...बंद! बंद...!

एकच गलका करून ते विद्यार्थी कावळे आपला मोर्चा घेऊन शाळेकडे सरकू लागले. शाळेकडे मोर्चा येतोय असे पाहताच हेडमास्तरांनी एक प्यून पुढे पाठवला व मोर्चाच्या म्होरक्याला बोलावून घेतले.

त्या पुढाऱ्याने मग कावळ्यांना तेथेच थांबायला सांगितले आणि तो उच्च स्तरावरील बोलणी करण्याठी निघून गेला.

त्याला तावडतोब चार उंदीर खाऊ घालून दरमहा एक उंदीर त्याच्याकडे पोहचता करण्याची व्यवस्था हेडमास्तरांनी केली.

स्वाभाविकच संप मिटला.

तात्पर्य :-शासकाने पुढाऱ्यांना वेळोवेळी जे हवे असते (वैयक्तिकरित्या) ते देत राहावे म्हणजे शासन सुरळीत चालते.

## २. नीर-क्षीर-विवेक

एकदा एक कावळा व बगळा यांच्यात 'श्रेष्ठ कोण ?' यावरून वाद निर्माण झाला. शेवटी दोघांनीही कोर्टाकडे धाव घेतली. नीर-क्षीर-विवेक राजहंसमहाराज न्यायाधिशाचे काम पाहणार होते.

प्रथम बगळ्याने आपली कैफियत मांडली.

"मी नेहमी देवाचे ध्यान धरून बसतो. मी काया-वाचे-मने अतिशय स्वच्छ असून, केवळ देवाशा म्हणून पोट भरण्यासाठी मासे खातो. ते देखील एका पायावर, एका पायावर डोळे मिटून उभा राहतो आणि प्रसन्न झालेल्या देवाने पुढ्यात मासा टाकला की तेवढाच खातो. पुन्हा आपला ध्यानस्थ !

हा कावळा ! हा मात्र अतिशय द्वाड असून भयंकर खादाड आहे. काया-वाचे-मने काळाच आहे. जिथे-काही घाण असेल, जिथे काही अशुभ असेल तिथे हा असाव-चाच ! तरी या सर्व गोष्टींचा विचार करून न्यायाधीश-महाराजांनी उजवा कौल द्यावा ही विनंती."

बगळ्यानंतर कावळ्याने आपली कैफियत मांडली.

"महाराज, मी बगळ्याप्रमाणे ध्यानाचे ढोंग कधीच करीत नाही. हा बगळा महाहलकट आहे. हा ध्यानाचे ढोंग रचून माशांना फसवतो व ते टप्प्यात आले की हा त्यांना गट्ट करतो. त्यांचे प्राण हरण करण्याचा याला काय वरे अधिकार आहे ? याने आपणपुढे देवाचे नाव काढले असले तरी ते देखील एक ढोंगच आहे.

मी अतिशय मनमोकळा आहे. मी कधीच ध्यान बीन करत नाही. पण नासके-कुजके-दुर्गंधीकारक-अशुभ असे जे काही असेल ते मी स्वतः खातो आणि नष्ट करतो. त्यामुळेच मी असा काळा झालोय. तर माझी इच्छा हीच असते की या जगात सारं काही मंगल असावं. म्हणून मी अमंगल असेल ते संपवतो; कोणाकडे पाहुणे येणार असतील तर मी अगोदर त्याची वर्दी देतो. त्यामुळे घरातल्या कर्त्याला पैसे जमवायला संधी मिळते किंवा त्याला कटविण्याची उपाययोजना करता येते. त्याचप्रमाणे तृत मृतांच्या पिंडाला शिवून मी त्यांना शांती मिळवून देतो.

आपण नीरक्षीरविवेकी आहातच; तर आपण योग्य तोच निर्णय द्याल अशी खात्री आहे."

न्यायाधीशमहाराज उठले व त्यांनी दोघांना दुसरे दिवशी दूध घेऊन येण्यास फर्माविले. दुसरे दिवशी दोघेही एक-एक लिटर दूध घेऊन आले. राजहंस दोघांच्याही भांड्यातले दूध प्याले. दोन्ही भांड्यात पाव लिटर पाणी शिल्लक राहिले. ते पाहून राजहंसाने निर्णय दिला—

"दोघेही लबाड आहात."

तात्पर्य : आपला खटला नीरक्षीरविवेकी न्यायाधिशा-समोर न नेता 'आपल्या' न्यायाधिशाकडे न्यावा.

## ३ हॉटेलिंग.

एकदा एक कोंबडा आणि एक पोपट गप्पा मारत बसले होते. कोंबडा पोपटाला सांगत होता, "पोप्या, सध्या आपली एकदम चंगळ आहे. आपल्यावर १०-१२ कोंबड्या लाईन मारतात." मग पोपटानेही त्याला सुनावले, "माझ्याचीही १०-१२ मैना कानगोष्टी करतात."

त्यानंतर दोघांनीही आपण त्यांच्यासाठी कसे पैसे खर्च करतो, त्या आपल्यावर कश्या खूश आहेत वगैरे गोष्टींचे रसभरीत वर्णन केले.

मग दोघांनाही एकदम काहीतरी खाण्याचा मूड आला व दोघेही एकदम म्हणाले, "चल यार आज हा आनंद काहीतरी गोड खाऊन साजरा करू." दोघेही मग एका हॉटेलात गेले व गुलाबजाम, रसगुल्ले, बर्फी, पेढे इत्यादी खाद्यपदार्थांचा त्यांनी सडकून समाचार घेतला.

वेटरने पुढ्यात बील आणून ठेवले. बिलाचा आकडा पाहून दोघेही एकमेकाकडे पाहू लागले. पोपटाला वाटत होते कोंबडा बील देईल व कोंबड्याला वाटत होते पोपट बील देईल. प्रत्यक्षात दोघांचेही खिसे पूर्णपणे रिकामेच होते. शेवटी खूप विचार-विनिमय करून दोघांनीही पळून जायचे ठरविले.

कोणाचेही लक्ष नाही असे पाहून बील न देताच ते हॉटेल बाहेर पडले. परंतु नेमक्या याच वेळी शेटचे त्यांच्या-कडे लक्ष गेले व त्याने त्या दोघांना पकडून आणण्यासाठी चार वेटर पाठवले. त्यांनी कोंबडा व पोपट यांना पकडून बेदम चोपले आणि मालकापुढे आणून उभे केले. शेटने त्याना चांगलेच खडसावून दिवसभर भांडी स्वच्छ करण्याच्या कामावर भट्टारखान्यात त्यांची रवानगी केली. बिच्चारे प्रेमवीर भट्टारखान्यात भांडी घासायला गेले.

तात्पर्य : दुसऱ्याच्या खिशात पैसे असल्याची खात्री झाल्याशिवाय हॉटेलात जाऊ नये.

४ वंडलबाज

सर्कशीत नव्याने दाखल झालेल्या हत्तीला, एक त्याच्या आधी काही महिने आधी आलेला हत्ती चार चौघांच्या गोष्टी सांगत होता, "अरे, काय एवढं मनाला लावून घेतोस ! काही दिवसांनी तुला देखील माझ्यासारखाच इथेही आनंद वाटू लागेल. पहिल्यांदा मीदेखील स्वतंत्र होतो. सातपुड्यातल्या भयानकारण्यात मी अगदी राजा होतो. भयानकारण्याचा कानाकोपरा मला माहीत आहे. माझी चाहूल लागली की सारे पशु-पक्षी बघता-बघता कोठल्या कोठे पसार होत असत. अनेक सिंहांना देखील मी हां हां म्हणता लोळवलं आहे."

अशा प्रकारे आपल्या शौर्याच्या बऱ्याच कथा त्याने सांगितल्यावर नवागत हत्तीने त्याला विचारले, "काय रे भयानकारण्यात कमलकांत सरोवर कोठेसे आहे ?"

जुना हत्ती चटकन उद्गारला, "सरोवर अरण्याच्या मध्यावर !"

ते ऐकून नवागत हत्ती मोठ्याने हसत म्हणाला, "वेड्या तुला मुळी भयानकारण्याची काहीच माहिती नाहीये, कारण त्या अरण्यात मुळी कमलकांत नावाचे सरोवरच नाहीये; मला या सर्कसवाल्यांनी त्याच अरण्यात पकडले."

जुन्या हत्तीचा चेहरा-मोहरा अगदी फोटो काढण्याच्या लायकीचा झाला.

तात्पर्य : वंडल मारताना, ऐकगाराला त्या संबंधीची काहीही माहिती नसल्याची प्रथम खात्री करून घ्यावी.

## Female : A Chemical Analysis

संग्राहक : शामकांत सुतार

**Occurance :** Found wherever man exists. Seldom in free state with exception in combined state.

**Physical Properties :** All colours, shapes, sizes, and ages, Usually in distinguished condition. Face covered with a film of composite material. Boohoo's at nothing and may freeze at any moment. However, melt when properly treated. Very bitter if not well used.

**Chemical Properties :** Very active, possesses a great affinity (attraction) for gold, silver and precious stones, or any valuable thing; Viotlent reaction when left alone. Undissolved by liquids, but activity greatly stimulated when treated with spirity solution (liquors). Sometimes yields to pressure (to surrender). Ages very very rapidly usually getting into permanently entlarged state. Fresh veriety has very magnetic attraction.

**Caution :** Highiy explosive when handled by an unexperienced hand.

# काचकून

प्रदीप सिद्धये

सकाळचं कोवळं ऊन खिडकीतून डोकवायला लागलं आणि सदाने नाईलाजानंच तोंडावरचं पांघरूण बाजूला केलं. एक झक आळोखा देतच तो उठला. त्याचा रूम पार्टनर मधू अजून लोळतच होता. सदाला मात्र आळस करून चालणार नव्हतं. आज ऑफिसात त्याच्या साहेबाचा निरोपसमारंभ होता व त्याने त्याची वर्णीसुद्धा दिली होती.

त्याच्या साहेबाला आज बरची जागा मिळाली होती आणि त्यामुळेच आता उद्यापासून कोण नवीन साहेब येणार यात त्याची शेजारच्या टेबलावरच्या टेंबेबरोबर पैज लागली होती! विचाराच्या तंद्रीतच सदाने शर्ट अडकविला आणि तो घराबाहेर पडला. तो कोपऱ्यावरून वळणार इतक्यात त्याच्या वर्गात कॉलेजमध्ये असताना हुशार असणारी मंदा तांबे येताना दिसली. तिने एकदम त्याला ओळखलेच नाही. तो थोडासा बावरला! पण आपलीही ओळखच नाही असे भासवून तो सरळ पुढे गेला.

बस स्टॉपवर बराच क्यू होता. पण आजचा दिवस तरी त्याला काळजी नव्हती! शेवटच्या दिवशी तरी साहेब बोलणार नाही याबद्दल त्याला खात्री होती. त्यामुळे जरा बेफिकीरपणेच तो उभा होता. त्याच्या दुर्दैवाने का सुदैवाने दोन बसेस न थांबता निघून गेल्या. त्यांना मनातल्या मनात शिव्या देत असतानाच पाठीमागून एकदम, "Excuse me! आपण मि. जोशीच ना?" असा गोड प्रश्न कानावर पडला. त्याच्या पाठीमागेच मंदा उभी होती.

"आता सध्या कुठे सर्व्हिस?" मंदाने दुसरा प्रश्न टाकला. "खरं म्हणजे! मीच तुम्हांला ते विचारायचं!" सदाने प्रतिसवाल केला.

"तुमचा स्वभाव काही बदलला नाही हं!" असे म्हणत मंदा खळाळून हसली. तिच्या शुभ्र दंतपंक्ती मोगऱ्याच्या कळ्यांसारख्या त्याला वाटल्या. इतक्यात मागून लोकांचा शऽक शऽक असा ओरडा सुरू झाला. तो एकदम भानावर आला! बस चक्क स्टॉपवर उभी होती व त्याच्यामुळे मागच्या लोकांना जाता येत नव्हते. त्याने पटकन् क्यू सोडला व तो मंदाच्या दिशेकडे वळला.

"अहो! चांगला नंबर गेला ना तुमचा!"

"आमचा कधी नंबर लागला आहे का!" सदाने उगीचच विनोद केला.

"बरं! मग आता येता का टॅक्सीतून!" मंदानेविचारले.

मंदाच्या प्रश्नाला त्याला उत्तरच सुचले नाही. इतक्यात जरा हुकमी आवाजातच मंदाने एका टॅक्सीला थांबविले व सदाकडे बघत त्याला बसायला सांगितले.

टॅक्सी एक झोकदार वळण घेऊन रस्त्याला लागली.

"हं! तर सध्या तुम्ही काय करता!" सदाने प्रश्न विचारला.

"सध्या! काहीच नाही! एक नोकरी आहे तेवढीच!" मंदाने उत्तर दिले.

"तुम्ही मुली एवढे शिकताच का! शेवटी लाटायच्या पोळ्याच ना! उगीच मुलांना अडचळा करता!" आता सदाच्या बोलण्याला जोर यायला लागला. तो किती वेळ बोलत होता कुणास ठाऊक! पण तो जरासा थांबला तेव्हा त्याची टॅक्सी त्याच्या ऑफिसच्या दारात थांबली! तो जरासा आश्चर्यचकित झाला. मंदाला कसे कळले आपले ऑफिस! तो झटकन् टॅक्सीतून बाहेर पडला व त्याने मंदाचे आभार मानून निरोप घेतला.

आश्चर्य करीतच तो चालला असताना समोरून ऑफिसचा शिपाई येताना दिसला!

"साहेब! जोरदार प्रयत्न दिसतो प्रमोशनचा! अहो या वाईच आपल्या साहेब होणार आहेत." सदाच्या डोळ्यांपुढे एकदम काजवेच चमकले. पण तो शिपाई काहीतरी मूर्खासारखा बोलतोय असे त्याला वाटले. पण अधिक खात्रीसाठी तो हेडक्लार्ककडे जायला निघाला.

"लिमयेसाहेब...!" तो सुरवात करणार इतक्यात "मग काय जोशी! तुम्ही नवीन साहेबावर आघाडी मारलेली आहे आं!" आता मात्र त्याची खात्रीच पटली.

सदाच्या डोळ्यांपुढे अंधारी आली! आपण टॅक्सीमध्ये तिला काय काय बोललो हे आठवताक्षणी तो मटकन् खुर्चीतच बसला, हेडक्लार्क लिमये मात्र त्याच्याकडे आ वासून बघतच राहिले!

□

## शेतकरी आणि त्याची मुले

एक शेतकरी शेवटच्या घटका मोजीत असता त्याची मुले त्याच्या मरणाची वाट पाहात जवळच थांबली होती. नांगरणी-पेरणी न करता ह्या कारट्यांनी आपले मोठे शेत पाडून ठेविले होते. मरताना बाप एवढेच म्हणाला, 'बाबांनो, शेतात मी सोळकर सोन्याचा हंडा पुरून ठेविलाय, तो सापडेपर्यंत खणा.'

झाले ! मुले शेतच खणत राहिली आणि बापाचे प्रेत तसेच पडून राहिले !!

लेखक : पुणेकर

## अँब्रॉस बियर्सचे चावरे चुटके

अँब्रॉस बियर्स ही अमेरिकेत एक विक्षिप्त परंतु बुद्धिमान अशी व्यक्ती होऊन गेली. त्याचा बापही असाच विक्षिप्त होता आणि त्याच्या नऊ मुलांपैकी अँब्रॉस हे शेंडेफळ. शेंडेफळ हे मोठे हुशार असते म्हणतात. अँब्रॉस तसा होता, परंतु बापाचा विक्षिप्तपणाही त्याच्यात पुरेपूर मुरला होता ! आईबापावद्दल व कुटुंबावद्दल त्याच्या मनात घृणा होती. त्याचाच परिणाम त्याच्या माणूसघाणेपणात झाला असावा.

माणसातील स्वार्थ, ढोंग, हावरेपणा यांमुळे त्याला मिळणारी शिक्षा योग्य आहे, या कल्पनेने त्याला आनंद होत असे आणि उपरोधपूर्ण अशा दाहक लिखाणाने तो बुद्धिवादाचे आसुरी फटकारे मारीत असे. त्याचे सारेच लेखन विलक्षण आहे. त्यातील सौम्य व साधे चुटके वानगीदाखल देत आहे. लघुकथेच्या क्षेत्रात त्याच्या 'भयकथा' व 'भूतकथा' मुळे तो प्रसिद्ध आहे. वास्तवजीवनाचा उबग असल्यामुळे तो या कथांकडे वळला असावा. बिअस १९१३ साली अचानक नाहीसा झाला. त्याचे काय झाले ते कळले नाही. आज तो हयात असता तर १३० वर्षांचा असता.

# चुटके का फटके !

## आदर्श देशभक्त

एका मोठ्या देशभक्ताने राजाची मुद्दाम भेट घेऊन सांगितले की,

"महाराज, मी अशा धातूचा शोध लावला आहे की ज्यावर बंदुकीच्या किंवा तोफेच्या मोठ्यांचा कसलाही परिणाम होत नाही. हा शोध मिळविण्यासाठी शत्रू पराकाष्ठा करीत आहे. परंतु मी एक प्रखर देशभक्त असल्याने केवळ दहा लाख रुपयांस आपणास हा शोध देण्यास तयार आहे.

राजाने कागदपत्र पाहिल्यावर दहा लाख रुपयांचा चेक देऊन हा शोध घेण्याची प्रधानास आज्ञा केली. नंतर लगेच दुसऱ्या खिशातून आणखी काही कागदपत्र काढून देशभक्त म्हणाला.

"आता अशा धातूचा भेद कसा करावयाचा याचाही शोध मी लावला आहे. निष्ठेपायी फक्त दहा लाख रुपयांस मी तो आपणांस देईन."

राजाने याही शोधाचे हक्क विकत घेण्याची आज्ञा केली.

तेवढ्यात तिसऱ्या खिशातून त्याने आणखी काही कागदपत्र बाहेर काढले.

"हा आता आणखी एका भयंकर क्षेपणास्त्राचा शोध. मी देशभक्त ..."

"अरे कोण आहे रे तिकडे" त्याला मध्येच थांबवून राजा ओरडला,

"याला उलटा करून याचे सारे खिसे तपासा"

पहारेकऱ्यांनी त्याला उलटा करून त्याचे खिसे तपासले.

'किती खिसे आहेत ?' राजाने विचारले.

'त्रेचाळीस'

'पण एका खिशात थोडी तंबाखू आहे.' देशभक्त मध्येच म्हणाला.

'मग त्याला तसाच उलटा ठेवून चांगला गदागदा हलवा. मग त्याच्या खिशात ४ कोटी २० लाख रुपयांचा चेक ठेवा आणि राष्ट्रीयतेच्या भयंकर गुन्ह्यापायी त्याला भर रस्त्यात फाशी द्या." राजा म्हणाला.

## दोन राजे

बोरगावच्या राजाशी संघर्ष निर्माण झाल्यामुळे माडगावचा राजा भयंकर संतापला आणि त्या संतापाच्या भरात त्याने बोरगावकरास पत्र लिहिले की, "या बाबतीत पुढे काही बोलणी होण्यापूर्वी तुमच्या वकिलाला आमच्या राजधानीतून त्वरित परत बोलवा. नाहीतर परिणाम ठीक होणार नाही." या अशक्य कोटीतल्या मागणीने पिसाळलेल्या बोरगावकरांनी लिहिले की, "मी माझ्या वकिलाला कोणत्याही परिस्थितीत परत बोलाविणार नाही परंतु आपली धमकी आपण तात्काळ मागे घेतली नाही तर मी त्याला तावडतोब काढून घेईन." या धमकीने माडगावचा राजा इतका घाबरला की, बायबलमधील तिसरी धर्माज्ञा मोडून तो स्वतःच्याच पायावर कोसळला.

## वीज आणि कारकून

ऑफिसला बाईने पळणाऱ्या कारकूनाच्या मागून पळता पळता वीज म्हणाली, "बाबारे, कशाला जीवाच्या आकांताने धावतोस ? मी तुला बघता बघता मागे टाकीन"

"टाकशील खरी, पण बाई, मला रोज खूप अंतर पळावे लागते हे तुझ्या लक्षात आहे ना ?"

## शाळा सुधार समिती

शहरातील एका प्रसिद्ध शिक्षणसंस्थेतील पदाधिकारी स्त्रीशिक्षकांचीच नेमणूक करतात म्हणून ओरड झाली. पुढच्या निवडणुकीत सभासदांनी पदाधिकारी म्हणून साऱ्या स्त्रियांनाच निवडून दिले. एकदोन वर्षांतच शाळेत नावालाही शिक्षिका राहिली नाही.

## पुढाऱ्याची सावली

एक पुढारी दुपारच्या वेळी उन्हातून चालला असता त्याचे आपल्या सावलीकडे लक्ष गेले, तेव्हा त्याची सावली त्याला सोडून ढांगा टाकीत दूर जात असलेली पाहून तो ओरडला,

"ए बदमाष, मागे फिर !"

"मी जर बदमाष असते तर तुला कशाला सोडले असते बाबा ?"

असे म्हणून सावली जोरात पळू लागली.

## इसापने सांगितलेल्या खऱ्या गोष्टी

### को ल्हा आणि द्रा क्षे

द्राक्षाच्या बागेत शिरलेल्या कोल्ह्याला उड्या मारूनही केवळ एका इंचाचे अंतर राहिल्यामुळे द्राक्षे काही तोंडी लागेनात. आंबट असली तरी ती खाण्याच्या इच्छेनेच तो आला होता. त्यामुळे शेवटी ही द्राक्षे मिळणे हे आपल्या शक्तीबाहेरचे काम आहे, हे त्याने गंभीरपणाने जाहीर केले.

### प्र शा सा प द्‌ ग्ध चो र

लहानपणी आईने चोरी करावयास शिकवलेल्या मुलगा पुढे मोठा सरकारी अधिकारी झाला, आणि पैसे खाण्याचा एक प्रचंड गुन्हा ल्यविण्यासाठी त्याने एकाचा खून केल्याने त्याला फाशीची शिक्षा झाली. फाशीस्थानाकडे नेत असता तो आईला म्हणाला, 'आई, लहानपणी तू चोरी करावयास शिकविले नसतेस तर ही परिस्थिती आली नसती!'

'बाबारे, गुन्हा केल्यावर मुद्देमालासह सापडण्याचा कानमंत्र मी तुला कधी दिला होता, सांग बरे!"

### स सा आणि का स व

एकदा कोण अधिक जोराने धावतं यासंबंधी ससा आणि कासव यांमध्ये पैज लागली. एका कोल्ह्याला पंच होण्यास सांगण्यात आले. ससा वेगाने पळत गेला आणि कासव मात्र रमतगमत चालू लागले. अर्धा रस्ता चालून गेल्यावर रस्त्याच्या कडेला ससा झोपलेला पाहून कासव साऱ्या शक्तीनिशी घामाघूम होऊन चालत गेले आणि ओरडले,

'मी जिंकलो, मी जिंकलो'

'अरे वेड्या' कोल्हा म्हणाला, 'ससा येथे केव्हाच येऊन गेला आणि तुझी खूप वाट पाहून तुला प्रोत्साहन द्यावे म्हणून अर्धा रस्त्यापर्यंत परत गेला.'

### कु आ आणि त्या चे प्र ति बिं ब

एकापुलावरून चालत्या कुत्र्यास खाली पाण्यात त्याचेच प्रतिबिंब दिसले. पाहून तो ओरडला,

'अरे कुत्र्या, कसा अगदी मारक्या म्हशीसारखा माझ्याकडे पाहातोस!' आणि दुसऱ्याच क्षणी संतापाने त्याने पाण्यात उडी मारली आणि पाण्यातल्या प्रतिबिंबावर झडप घातली आणि खाटकाच्या प्रोराने पाण्याच्या प्रवाहात पडलेला मांसाचा तुकडा नेमका त्याच्या तोंडात आला.

## कोश : नेहमी अनुभवास येणारा

**अभिनंदन :** मत्सराचे सांस्कृतिक प्रदर्शन.

**आनंद :** शेजारी अडचणीत आलेला पाहून होणारी मनाची स्थिती.

**उपदेश :** नव्या पैशापेक्षाही कमी किमतीचे चलनी नाणे.

**क्षमा :** भावी गुन्ह्याची पायभरणी.

**सौंदर्य :** प्रेमिकाला भुलविण्याची व नवऱ्याच्या हृदयाचे ठोके बंद पाडणारी स्त्रीची शक्ती.

**भिकारी:** जनतेच्या मदतीवर निर्वाह असणारा प्राणी.

**बेलाडोना :** म्हणजे इटालियन भाषेत 'सुंदर स्त्री' आणि इंग्रजीमध्ये 'भयंकर विष'. भाषा निराळ्या पण अर्थ एकच.

**नवरा :** त्याला जेवणाचे तर पैसे द्यावे लागतात पण ताटवाट्यांचेही भाडे द्यावे लागते.

**सर्कस :** जिथे हत्ती, घोडे, व्याघ्रसिंहादिकांना माणसांचे विदूषकी चाळे रोज फुकट पाहण्याची सोय असते!

**वाणिज्य :** असा एक नित्य चालणारा व्यवहार की जिथे अ बकडचा कच्चा मालकीचा माल लुटतो आणि भरपाई म्हणून ब ड जवळचा इचा पैसा उपटतो.

**काँग्रेस :** आपणच केलेले कायदे हक्काने मोडणारी संघटना.

**सांत्वन :** तुझ्यापेक्षा लायक व्यक्ती तुझ्यापेक्षा अधिक दुर्दैवी आहे याची जाणीव करून देण्याचा मानवी प्रकार.

**भिक्षा :** संकटकाळी पायाने विचार करणारा.

**दुःख :** मित्राच्या वदतीने किंवा वैभवाने ठफाळून येणारी व्याधी.

**नाटककार :** दुसऱ्या भाषांतील क्वचित वाचली जाणारी नाटके स्वतःच्या नावावर लिहिणारा.

**विवाह :** समाजाची अशी एक अवस्था की जिथे मालक-मालकीण आणि गडी-स्वैपाकीण अशा सर्वांची बेरीज फक्त दोनच होते.

**सनातनी :** हजारो वर्षांच्या धर्मसमजुतींचे जू निष्ठेने मानेवर बाळगणारा बैल.

**नम्रता :** आत्यंतिक ढोंगाचे भयंकर प्रदर्शन.

**वर्ष :** मानवाच्या ३६५ निराशांचा काळ.

**स्वार्थी :** दुसऱ्यांच्या स्वार्थाची यत्किंचितही जाणीव नसलेली व्यक्ती.

# वृत्तपत्रसृष्टीतील द्रोणाचार्य

कुमारी मंगला जाधव

**कै. नानासाहेब परुळेकर** म्हणजे जिद्दी, ध्येयनिष्ठ अशा महाराष्ट्रातील कर्तृत्ववान पुरुषांचा मौल्यिक दुवा. त्यांनी महाराष्ट्रातल्या दैनिक वृत्तपत्रांच्या क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती केली. त्यांनी 'सकाळ'ला खऱ्याखुऱ्या अर्थाने 'जनतापत्र' बनविले आणि मराठी संस्कृतीच्या चौफेर अशा दैनंदिन जीवनाचा जणू आरसा बनविला.

पहाटेच रेडिओ लावला आणि इंग्रजी बातम्या लागल्या. त्या बातम्यांमध्ये डॉ. नानासाहेब परुळेकर गेल्याची बातमी ऐकताच डोके सुन्न झाले. डोळ्यातून अश्रू आले आणि मला आठवला तो तीन चार वर्षांपूर्वीचा प्रसंग.

माझ्या आयुष्यात एक अपूर्व योग आला होता आणि आयुष्याची वाटचाल त्या प्रसंगाची गोड स्मृती बरोबर घेऊनच मी करीत आहे. महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध, अष्टपैलू व्यक्तीच्या दर्शनाचा योग अपूर्वच नव्हे काय ? वडलांच्या बरोबर मी नानासाहेबांना भेटायला गेले होते. जाण्याअगोदरच माझी उत्सुकता अगदी शिगेस पोहोचली होती. मी शाळकरी, लहान मुलगी एवढी मोठी व्यक्ती माझ्याशी बोलेल का ? काय बरं बोलतील ? वृत्तपत्रसृष्टीतील हे द्रोणाचार्य कसे बरे असतील ! असे नाना प्रश्न माझ्या मनात येत होते.

आम्ही त्यांच्या घरी गेलो. माझ्या वडलांचे आणि नानासाहेबांचे बोलणे झाले. वडलांनी, ही माझी मुलगी म्हणून ओळख करून दिली. मी त्यांना खाली वाकून नमस्कार केला. या नमस्कारामुळेच की काय, त्यांना आजच्या तरुण पिढीची आठवण झाली आणि मग बराच वेळ ते भावी पिढीबद्दल बोलत होते. मी मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. त्या वेळेचा—त्या भूतकाळाचा अजूनही मला हेवा वाटतो. खरंच येईल का ती वेळ परत !

नानासाहेबांना तरुण पिढीबद्दल आस्था होती. आजची मुले कशी विघडत चालली आहेत. यांना सावरणार कोण आणि केव्हा ? याबद्दल त्यांना विलक्षण तळमळ होती. या पिढीवर व्हावे तसे संस्कार होत नाहीत आणि त्याचा परिणाम देशाच्या प्रगतीवर होतो, आज दुर्दैवाने शाळातून संस्कारांकडे लक्ष दिले जात नाही. प्रथम पासूनच विद्यार्थ्यांची आवडनिवड त्याचा कल दर्शविते. हल्लीच्या पालकांचे मुलांकडे लक्ष नसते. पोटापाण्याच्या उद्योगात पालकांना वेळही मिळत नाही. त्याची परिणती मुलांना वाईट संगती लागण्यात किंवा व्यसनात पाहावयास मिळते. परंतु संस्कार किती मोलाची चीज आहे. तिची जपवणूक कशा प्रकारे करावयास हवी याची कोणाला कल्पना असत नाही. संस्कारामुळे माणसाचा दृष्टिकोण माणुसकीचा बनतो. याकरिता संस्काराची जोपासना केली पाहिजे, हेही त्यांनी बोलून दाखविले. धार्मिक ग्रंथाचा सखोल अभ्यास व्हायला पाहिजे ही जाणीवही त्यांनी व्यक्त केली.

एवढ्यातच फोन आला आणि आमचे बोलणे थांबले. तरीही जाता जाता पाठीवरून प्रेमाचा, मायेचा हात फिरवून ते म्हणाले " खूप शिका, किर्ती मिळवा पण संस्कार सोडू नका. "

आज आमचे नानासाहेब आमच्यात नाहीत. फार दूरदूर गेले आहेत. परत कधीही न येण्याकरिता. पण आमच्या नानासाहेबांनी जो आशीर्वाद दिला तो नक्कीच मला आयुष्यभर पुरेल. अजूनही त्यांचे शब्द कानात घुमतात.

# भाऊबंदकी ऐतिहासिक नाटकांचा आदर्श

के. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या जन्मशताब्दि-निमित्त तृतीय वर्ष मराठी 'विशेष'च्या विद्यार्थिनींनी 'भाऊबंदकी' नाटकावर केलेल्या चर्चेचे हे एक संकलन.

## एक ऐतिहासिक रूपक

कुमारी सुनीला पाठक

इतिहासाचा उपयोग राष्ट्रीय वृत्तीचा परिपोष करण्यासाठी होतो, ह्या मताचा पुरस्कार विष्णूशास्त्री चिपळूणकरांनी केला. या राष्ट्रीय वृत्तीमुळेच मराठीत ऐतिहासिक नाटकांचे एक युगच सुरू झाले. केवळ मनोरंजन हा या नाटकांचा हेतू नव्हता. तर त्यापासून वाचक अगर प्रेक्षक यांच्या मनातील स्वाभिमान, स्वदेशप्रेम जागृत होतील अशी त्यांची योजना होती. शेक्सपीयरची 'ऐतिहासिके' याच राष्ट्रीय भावनेतून निर्माण झाली. शेक्सपीयरच्या या वैशिष्ट्याचा प्रभाव मराठीत खाडिलकरांवर झाला. खाडिलकरांची बहुतेक नाटके राजकीय स्थित्यंतरांच्या स्वप्नाचीच आहेत असे दिसते. त्यांचे 'भाऊबंदकी' याला अपवाद नाही. ऐतिहासिक कथानक घेऊन त्यातून त्यांनी तत्कालीन वर्तमानाचे संसूचन केले आहे.

'भाऊबंदकी' लिहिताना त्यांनी भूतकालीन इतिहासाबरोबरच वर्तमानकालीन जहाल-मवाळ पक्षातील विरोधाचे, देशस्थ-कोकणस्थ वादाचे चित्रण यथार्थपणे प्रतिबिंबित केले आहे. याची सुरुवात नाटकाच्या पहिल्या अंकापासूनच होते. नारायणराव-राघोबादादांच्या पेशवाईतील भाऊबंदकीची परिणती अखेर नारायणरावाच्या खुनात होते. खुद्द शनिवार-वाड्यात चुलत्याकडून पुतण्या मारला जातो! मराठ्यांत आतापर्यंत कधीही दिसून न आलेली ही एक प्रकारची मोगलाईच! परकीय सत्तेविरुद्ध दंड थोपटून उभे राहणे हा मराठ्यांचा बाणा पण आता स्वकीयांचा काटा काढण्यातच मंडळी सज्ज झाली आहेत. खाडिलकरांच्या वेळचे राजकारणाचे चित्रही अशाच प्रकारचे होते. इंग्रजांविरुद्ध एकजुटीने लढण्यापेक्षा जहाल-मवाळांची आपापसांतच लढालढी चालली होती व इंग्रज सुरक्षित होता. स्वार्थांधतेमुळे इंग्रजांचा उदो उदो करण्यातच काही लोक स्वतःला धन्य मानीत. सत्तेची हांजी हांजी करणाऱ्या अशा पक्षाची व जो सत्तेच्या शिळ्या तुकड्यांची चघळण करून स्वकियांवर जोरजोराने भुंकत होता त्याची खाडिलकरांना उपकथानकातील चमकशास्त्री, नमकशास्त्री इ. पात्रांच्या द्वारे टिंगल केली आहे.

## क्रीडानैपुण्य

१. चंदू गोडबोले, २. मुकुंद केळकर, ३. मुकुंद कडुसकर, ४. श्रीरंग इनामदार, ५. कु. मंगल चापेकर, ६. मोहन आयना, ७. महादेव नरवडे, ८. कु. लता जाचक, ९. कु. संजीवनी साने.

( तपशील मॉडर्न वार्ता विभाग क्रीडा पृ. ११६-१७ पाहा. )



भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांनी भरविलेल्या
प्रदर्शनातील एक चित्र

आंतर महाविद्यालयीन विद्यार्थी प्रतिनिधी मनोहर कलापुरे अनिकेत
विद्यार्थिगृहाच्या उभारणीसाठी समारंभपूर्वक कुदळ मारताना.

कॅडेट संजय कदम
भारताच्या गणराज्यदिन संचलनात सहभागी

## व्हॉलीबॉल संघ

खुर्चीवर बसलेले : १. कलापुरे, २. प्रा. पाथरे, ३. उपप्राचार्य गाडगीळ, ४. प्राचार्य लिमये, ५. प्रा. गंभीर, ६. श्री. किरण लागू, ७. लाळे

उभी रांग : १. खर्डे, २. झेंडे, ३. वाघ, ४. खटावकर, ५. पटेल, ६. इनामदार. मागे शिपाई कदम.

## बॉलबॅडमिंटन संघ

बसलेले डावीकडून : १. कलापुरे I.C.S.R., २. प्रा. कुलकर्णी, ३. उपप्राचार्य गाडगीळ, ४. प्राचार्य लिमये, ५. प्रा. गंभीर, ६. श्री. किरण लागू, ७. सुमंत रानडे

उभे डावीकडून : १. सिसोदीया, २. देसाई, ३. मुथा, ४. मोरे, ५. बुकशेटे, ६. मिटकर, ७. पाटील. मागे शिपाई कदम

## नियोजन चर्चामंडळ व वाणिज्य मंडळ



खुर्चीवर बसलेले : १. प्रा. कुलकर्णी, २. प्रा. पाथरे, ३. उपप्राचार्य गाडगीळ, ४. प्राचार्य लिमये, ५. प्रा. महाजन, ६. प्रा. गोसावी

उभे : १. पवार, २. वरिदे, ३. कु. हरिभट, ४. कु. पारखी, ५. गुंड, ६. प्रसादे. शेवटी शिपाई कदम

## राष्ट्रीय छात्रसेना



खुर्चीवर १. ल/o शिंदे, २. प्राचार्य, ३. उपप्राचार्य, ४. प्रा. पद्माकर आपटे.

खाडिलकरांच्या प्रतिभेचा ऐन उमेदीचा काळ म्हणजे १९०६–२० या काळात त्यांचे राजकीय गुरू लो. टिळक होते. लोकमान्यांची तत्त्वनिष्ठा, त्यांची निर्भय, अध्यात्मप्रवण वृत्ती, त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून सतत होणारा वीरवृत्तीचा साक्षात्कार यांचा खाडिलकरांच्या मनावर खोलवर ठसा उमटला होता. त्यांच्या नाटकातील अनेक जिवंत व्यक्तिरेखांमध्ये टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाचे रंग मिसळून गेल्याचा भास होतो. खाडिलकर हे पुरुषार्थाचे उपासक होते व लो. टिळकांमध्ये त्यांना या पुरुषार्थाचा साक्षात्कार होत होता. त्यामुळे टिळक हे त्यांचे आराध्य दैवत बनले आणि त्यांनी ज्या पुरुषार्थाची आजन्म उपासना केली त्याच पुरुषार्थाची चित्रे आपल्या नाट्यलेखनातून रेखाटली. त्यांचा रामशास्त्री, त्यांचा राम, भीकृष्ण, त्यांचा हरिश्चंद्र इ. त्यांचे अनेक मानसपुत्र ह्या पुरुषार्थाचे आपल्या व्यक्तिमत्त्वामधून एकसारखे दर्शन घडवतात. राघोबाला देहान्त प्रायश्चित्त सांगणारा त्यांचा रामशास्त्री प्रेक्षकांना लो. टिळकांसारखाच भासला, 'भाऊबंदकी'च्या चवथ्या अंकात त्यांचा रामशास्त्री निर्भीड पणाने म्हणतो—

"बाईसाहेब आता वाड्यात येण्यापूर्वी मी श्रीमंतांचा नोकर होतो, पण वाड्यात आलो आहे तो नोकरी सोडून दिली हे कळवण्यासाठीच...राघोबा, पेशव्यांच्या गादीचा नोकर नसलेला हा रामशास्त्री तुला देहांत प्रायश्चित्त सांगतो आहे....खुनी पेशवा गादीवर असेतोपर्यंत पुण्याचे हदीत पाणी प्यावयाचे नाही, ह्या प्रतिज्ञेने मुलेमाणसे माहुलीस पाठवून मी घराच्या बाहेर आता पडलो आहे."

अन्यायाने चिडून प्रत्यक्ष राघोबादादास–भावी पेशव्यासही शिक्षा–ती सुद्धा देहान्ताची सांगण्यास न कचरणारा हा रामशास्त्री म्हणजे इंग्रजीसत्तेविरुद्ध आवाज उठवणाऱ्या टिळकांचेच प्रतिबिंब म्हणावे लागेल. रामशास्त्री नंतर सर्व ब्रह्मवृंदाला आणि पर्यायाने सर्व जनतेला या अन्यायाविरुद्ध आवाहन करतात. आनंदीबाईच्या कुटील डावपेचाने क्षणभर डोळा मिटलेल्या जनतेला–ब्रह्मवृंदाला आणि दरबारी लोकांना ते जागृत करतात. रामशास्त्रीवरच साऱ्यांची मिस्त पडते. खाडिलकरांच्या वेळी हीच परिस्थिती होती. राजकीय सत्तेने भयभीत वातावरण असताना टिळकांसारखा नेताच काहीतरी कार्य करू शकेल अशी जनतेची खात्री होती. टिळकांची हीच प्रतिमा रामशास्त्र्यांमध्ये दिसून येते. वैभवाचा मार्ग सोडून टिळकांनी राजकारणाचा खडतर मार्ग स्वीकारला. परतंत्र भारतीय जनतेला इंग्रजांच्या तावडीतून सोडवणे, भारतीयांना न्याय मिळून देणे हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. खाडिलकरांचा रामशास्त्री सुद्धा अशाच एका ध्येयाने प्रेरित झालेला आहे. आणि विधायक कार्य करणाऱ्या वीरवृत्तीला कोणतीही अमानुष्य शक्ती नमवू शकत नाही, त्याला कली–कालाची बाधा होत नाही; वैभवही त्याला त्याच्या मार्गापासून पदच्युत करू शकत नाही आणि म्हणूनच रामशास्त्री, त्यांना लाच देऊ पाहाणाऱ्या राघोबादादाला अजिबात जुमानत नाहीत. उलट स्वतःचे मानाचे पद–मानाची नोकरी सोडून पुन्हा पुन्हा त्याला बजावतात, 'देहान्त प्रायश्चित्त! बस देहान्त प्रायश्चित्त! दुसरा काहीच उपाय नाही.'

खाडिलकर जरी इतिहास-पुराणे यांच्या माध्यमातून वर्तमानाकडे झेप घेत असले तरी, कोणतेही रूपक सर्वांगाने सजवावे, आणि त्यामुळे कृत्रिमतेचा दोष पदरी घ्यावा, असे त्यांच्या बाबतीत सहसा घडत नाही. 'भाऊबंदकी'त मुख्य तत्कालीन वातावरणावर खाडिलकरांना लक्ष केंद्रित करावयाचे होते, त्यामुळे टिळकांसारख्या एखाददुसऱ्या व्यक्तीची सूचना रामशास्त्र्याच्या व्यक्तिचित्रातून जरी मिळाली, तर इतर व्यक्तिचित्रणांच्या बाबतीत खाडिलकरांचे लक्ष मुख्यतः नाट्याकडे आणि त्यानंतर इतिहासाकडे आहे. नाटकाच्या प्रस्तावनेत 'प्रसिद्ध इतिहाससंशोधक वासुदेव शास्त्री खरे यांनी प्रसिद्ध केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांचा व लेखकांचा आधार' घेतला असल्याचे खाडिलकरांनी नमूद केले आहे. आणि खाडिलकरांच्या या कागदपत्राचे सूक्ष्म अवलोकन केल्याची खात्री त्यांच्या ऐतिहासिक व्यक्तींच्या चित्रणातून पटते. ऐतिहासिक दृष्टिकोणातून पाहिले तर, राघोबाच्या व्यक्तिमत्त्वाचे मर्मच खाडिलकरांना गवसल्याचे लक्षात येते. पश्चात्तापदग्ध सखारामबापूचे व या नाटकात फारसे काम नसलेल्या नाना फडणीसाचे चित्रही अगदी इतिहासाला धरून आहे. प्रश्न आहे तो आनंदीबाईचा. अगदी अलीकडे प्रसिद्ध झालेल्या 'ओंकार' या भीमराव कुलकर्ण्यांच्या कादंबरीतून आनंदीबाईचे निर्दोषत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु त्यांनीच आपल्या 'ऐतिहासिक मराठी नाटके' या पुस्तकात 'नारायण रावांच्या वधावरील आपूर्वीच्या अनेक नाटकांतून आनंदीबाईचे चित्र ठोकळेबाज व भडक आहे. परंतु गृहकलह आणि घरातील मानापमानाच्या प्रभावाने विद्ध झालेली आनंदी-

बाई जिवंत करण्यात खाडिलकरांनाच काय ते यश आल्याचे निर्देशिले आहे. आनंदीबाईने ध चा मा केला की नाही, हा प्रश्न अद्यापही पूर्णपणे सुटला नाही, असे क्षणभर मानले तर आनंदीबाईचे खाडिलकरांनी रंगविलेले चित्र अतिशय वेधक व परिणामकारी असेच म्हटले आहे.

सगळ्यांत शेवटी लक्षात घ्यावयाची गोष्ट ही की काल्पनिक पात्रांच्या साहाय्याने खाडिलकरांनी पेशवेकालीन गृहकलहाचे, माऊबंदकीचे जे चित्र रेखाटले आहे, इतके ऐतिहासिक, इतके बोलके चित्र मराठी वाङ्मयात शोधूनही सापडत नाही.

नाट्यदृष्ट्या शबलित झालेला शेवटचा प्रवेश खाडिलकरांना महत्त्वाचा वाटतो आणि त्यावरूनच ऐतिहासिक रूपक म्हणूनच हे नाटक खाडिलकर रंगवू इच्छितात आणि त्या पासून ते पराङ्मुख होऊ इच्छित नाहीत हे लक्षात येते.

## आ नं दी बा ई

कुमारी आशा जोशदेव

खाडिलकरांचे माऊबंदकी हे एक ऐतिहासिक नाटक आहे. माऊबंदकीचा विषयही ऐतिहासिकच आहे. पेशव्यांमध्ये माऊबंदकी निर्माण होऊन त्याचे पर्यवसन नारायणरावाच्या वधात होते, असे याचे कथानक आहे आणि माऊबंदकीला जी अफाट लोकप्रियता लाभली त्याचे रहस्य त्यांनी माऊबंदकीत केलेल्या व्यक्तिचित्रणात आहे. प्रामुख्याने आनंदीबाई-रघुनाथरावाची पत्नी, राघोबादादा, रामशास्त्री यांची व्यक्तिचित्रणे खाडिलकरांनी अतिशय कौशल्याने रंगविली आहेत.

यापैकी आनंदीबाई प्रामुख्याने माऊबंदकीला कारणीभूत होते. आनंदी ही रघुनाथरावाची पत्नी, दिसायला अतिशय सुंदर, नाजुक पण अतिशय निष्ठुर, कारस्थानी, कठोर अंतःकरण असलेली एक मुत्सद्दी स्त्री असे तिचे चित्र खाडिलकर रंगवितात.

नारायण रघुनाथरावापेक्षा लहान असूनही राज्यकारभाराची सर्व सूत्रे त्याच्या हाती असतात, त्याची पत्नी गंगाबाई ही पेशवीण म्हणून आणि तिच्या मुलाला पुढे पेशवेपद मिळणार याचे मोठे वैभव आनंदीस वाटत असते. ते 'कालची गंगाटी' या उद्गारातून व्यक्त होते. तिने केलेला अपमान आनंदीस सहन होत नाही. या केवळ भावनिक स्त्रीसुलभ विद्वेषातून नारायणाचा वध करणारी अत्यंत कठोर आनंदीबाई उद्भवते.

नारायणाचा खून करायचा या एकच एका ईर्ष्येने ती पेटून उठते. त्यासाठी रघुनाथरावाने लिहिलेल्या हुकुमातील ध चा मा करते. तुळोजीला गोड बोलून आपल्याकडे वळवून घेते. गारदी बेलभंडाऱ्याला जागतात हे माहीत असल्याने ध चा मा केलेला हुकूम ती त्यांच्या हातात देते. त्यावेळी गारदी जे मागतील ते द्यायला तयार होते. येथे आनंदीची व्यक्तिरेखा विलक्षण चैतन्यपूर्णतेने रंगविली गेली आहे. तिच्यापुढे इतर मुत्सद्दी फिके पडतात. ती सगळ्या कारभाऱ्यांना आश्वासने देते की रघुनाथराव पेशवा झाल्यावर त्यांना मोठ्या मानाच्या जागा देण्यात येतील. क्षणोक्षणी ती रंग बदलते, बोलण्याची पद्धत बदलते. तिच्या व्यक्तिमत्त्वातील राजकीय डावपेच लक्षात येतात. माणसांना पेटवायचे कसे आणि फुलवायचे कसे हे तिला पुरते ठाऊक आहे. तुळोजीच्या नेमक्या वर्मावर बोट ठेऊन ती त्याला वश करून घेते. त्याच्या भावनेला खतपाणी घालते. ज्यामुळे त्याच्या निष्ठा, सहानुभूती तिच्याकडे येते. पहिल्यापासूनच अतिशय धोरणी, कावेबाज आनंदी सतत लक्षात येते. आल्या-आल्याच ती सर्वांची चाचपणी करते, मुत्सद्द्यांशी मानभावीपणाने बोलते, सर्वांवर कुरघोडी करून सर्वांपेक्षा उंच होते.

रघुनाथरावाकडच्या मुत्सद्द्यांचा पक्का तिच्यापुढे फिका, दुबळा पडतो. ते तिच्या हुकुमाप्रमाणे वागायला तयार होतात. 'माझी तपश्चर्या लहान नाही. तुम्ही मात्र मोक्ष हटीस पाडला म्हणजे हगमग नका' असा टोमणा ती त्यांना मारते. आपले विचार प्रत्यक्ष न सांगता त्यांना नुसते सुचवते. अर्थात नारायणाला मारायचे हा तिचा निर्धार पक्का आहे. पण त्याआधी सगळ्यांची मने खंबीर करते. यात सर्वांत मोठी अडचण तिचा पती, रघुनाथरावाची आहे पण आपल्या मोहक सौंदर्याचा प्रभाव पाडून ती त्यालाही हतबल, असहाय करून टाकते. येथे रघुनाथराव दुबळा, बायकी वाटतो तर आनंदी पुरुषी बाण्याने वागते. आपल्या हावभावांनी, मोहक कटाक्षांनी, स्पर्शाने ती रघुनाथरावाच्या विरोधाला दाबून टाकते. 'हुकूम गारद्यांना द्या नाहीतर माझा प्राण तरी घ्या, तो हुकूमच माझा प्राण आहे' असे पर्याय त्याच्यापुढे ठेऊन ती

त्याला असहाय बनवते. त्याच्या पराक्रमाला, वीरतेला ती फुलवते, महत्त्वाकांक्षेला गोंजारते, पेशवेपद तुम्हाला मिळावे यासाठीच ही सर्व धडपड आहे असे सांगून त्याचे मन तयार करते. तिची अनेक रूपे येथे लक्षात येतात. एक प्रणयिनी, पतीचा पराक्रम फुलवणारी गृहिणी, राजकारणी कारस्थानी स्त्री अशी अनेक रूपे नजरेस येतात.

नारायणाचा वध केल्यानंतरही ती किंचितही डळमळत नाही. तिच्या अंतःकरणात कसलीही नैतिकतेची, पापपुण्याची चाड नाही. ती अत्यंत थंड, कठोर आहे. कुठेही, केव्हाही तिला पश्चात्ताप होत नाही. नारायणाच्या अंतःकरण पिळवटून टाकणाऱ्या आक्रोशानेही तिच्या स्त्रीसुलभ अंतःकरणाला पाझर फुटत नाही. उलट स्वतः जाऊन त्याचे तुकडे झालेले पाहून येते. त्याच्या रक्ताचा टिळा स्वतःच्या कपाळावर लावते. दुबळ्या रघुनाथरावाला क्षणोक्षणी सावरते. नाटकीपणा, वहाणे, सोंगे ढोंगे यात ती तरबेज आहे. खून झाल्यावर स्वतःच गारद्यांकडून नारायण चुकून मारला गेला म्हणून रडायला सुरुवात करते. क्षणोक्षणी पावित्रे बदलताना दिसते. अनेक बारीक-सारीक स्त्रीसुलभ तपशीलातून आनंदी सजीव होते. आनंदी नारायणाच्या वधाने आपल्या महत्त्वाकांक्षा साध्य करू पाहाते आणि सारी सत्ता हाती घेते, नेता बनते. रघुनाथरावाला स्वतःच्या हाताने पेशवाईची वस्त्रे चढविते. तिने आपल्या पतीला पुरते ओळखलेले आहे. स्वतःच्या सौंदर्याने, ठामपणाने ती सतत त्याला सावरते, भुलवते, फुलवते आणि स्वतःच्या इच्छेनुसार तालावर नाचविते.

सखारामबापू नारायणरावाच्या खुनानंतर तिची निर्भर्त्सना करतो त्यावेळी खोट्या नाटकीपणाने रडते, पण शेवटी त्याचा सल्ला मानते. चुकून मारला गेला असे एकीकडे सांगताना दुसरीकडे तुळोजी, खरकसिंह, सुमेरसिंगासारख्या गारद्यांना उच्च पदावर चढविते, ही मोठी चूक तिच्या हातून घडते. रामशास्त्र्यांसारख्या निःस्पृह, नैतिक सामर्थ्यापुढे मात्र ती अडखळते, हरते. त्यांच्या नैतिकतेच्या तेजापुढे ती बोलू शकत नाही. झालेली चूक देवधर्म, अधिष्ठान, दानधर्म इ. करून भरून काढू पाहाते. रामशास्त्री प्रायश्चित्ताच्या गोष्टी बोलतो तेव्हा प्रथम सरळ नकार देते. खून आम्ही केलाच नाही तर प्रायश्चित्त का घेऊ, असा सवाल करते. चमकशास्त्री, नमकशास्त्री, गारद्यांची तोंडे ती बंद करू शकते पण रामशास्त्रीसारख्या न्यायाच्या, नीतीच्या मूर्तिमंत पुतळ्यापुढे तीची कुटिलता दबल्यासारखी वाटते. प्रथम पुरावा नसतो म्हणून रामशास्त्री शांत असतो पण पुरावा मिळाल्यावर रामशास्त्री त्यांच्या तोंडावर प्रायश्चित्त सांगतो. तेव्हा तुम्ही आमचे नोकर आहात असे सांगते व शेवटी त्याचाच काटा काढू पाहाते. रामशास्त्रीपुढे तिचा तडफडाट होतो. रघुनाथराव प्रायश्चित्त घ्यायला तयार होतो पण आनंदी नाही. उलट कुटिलनीतीचा उपयोग करून लोकमत आपल्या बाजूस वळवून घेण्यासाठी लाच देऊन ब्राह्मणांना वळवू पाहते. आपल्या मर्जीतल्या सरदारांना सतत खूष ठेवण्याचा प्रयत्न करते. साम, दाम, दंड, भेद सर्व प्रकारांचा उपयोग करून पाहाते. रामशास्त्रीला धमकावयास पाहाते पण त्याच्यापुढे तिचे काहीच चालत नाही. नीतिमत्तेची कसलीच चाड तिला नाही, नसते. शेवटी महादजी आणतो त्या करारावर ही करायला ती रघुनाथरावाला विरोध करते. इंग्रजांची मदत घेऊन पण बारभाईंना शरण जायची तिची बिलकुल तयारी नसते. ती परोपरीने विनवून पाहाते पण येथे तिचा पराभव होतो. रघुनाथराव तिचे काहीही न ऐकता सही करतो तेव्हा तिचा तळतळाट होतो. रामशास्त्रीला जन्मोजन्मीचा वैरी मानते आणि शेवटी असहाय्य होते. येथे तिची कीव वाटते. ती हरते आणि शेवटी फाजील महत्त्वाकांक्षा, अहंकारापोटी अधःपाताच्या, अपमानाच्या गर्तेत जाऊन पडते. तेव्हा झालेला अपमान भरून काढायच्या, सूडाच्या भावनेने पोटातल्या गर्भाला उद्देशून तू आपल्या आईच्या अपमानाचा सूड घे असे सांगते. तिचे जळणारे अंतःकरण विलक्षण द्वेषाने भरलेले दिसते. मनातील गरळ ती ओकते गर्भाजवळ, आणि अशी कारस्थानी, मुत्सद्दी, पाताळयंत्री स्त्री शेवटी हतबल, असहाय होते. खुनासारख्या भयंकर कृत्यावरल भवितव्य तिला चांगलीच शिक्षा करते. हा अपमान तिच्यासारख्या मानी स्त्रीला फार मोठा होता. कितीही झाले तरी शेवटी ती स्त्रीच आहे, शेवटी हे विष तिला पचविता येत नाही. अशी ही हीनदीन, असहाय्य स्त्री, आनंदीबाई खडिलकर उभी करण्यात यशस्वी होतात.

येथे शेक्सपीअरच्या मॅकबेथ नाटकातील लेडी मॅकबेथ व भाऊबंदकीतील आनंदीबाई यांच्यातील मूलभूत फरक लक्षात येतो. मॅकबेथमध्ये लेडी मॅकबेथ मॅकबेथला खून करायला प्रोत्साहन देते पण तो पचविण्याचे धैर्य तिच्यात नसते. तिचे स्त्रीसुलभ मन तिला खात राहाते. आपण केलेल्या गुन्ह्यावरल मनात खंत वाटत राहाते. या अपराधीत्वाच्या

भावनेतूनच तिला वेड लागते. पण येथे आनंदीबाई लेडी मॅकबेथच्या अगदी विरुद्ध आहे. नारायणरावांच्या खुनाबद्दल कसलीही खंत तिला नाही, केलेल्या कृत्याबद्दल कुठेही पश्चात्ताप होत नाही. हा खून ती मोठ्या सहजतेने, थंडपणाने पचविते. खुनाचा साधा ओरखडासुद्धा तिच्या मनावर उठत नाही. तिचे मन अत्यंत स्थिर राहाते. तिचे मन द्वंद्वात सापडत नाही. उलट येथे दुर्बल, असहाय मात्र रघुनाथराव झालेला दिसतो. तिच्या व रघुनाथरावाच्या मनाची वीण अगदी निराळी आहे. येथे मॅकबेथची भूमिका आनंदी करते तर लेडी मॅकबेथची रघुनाथराव करतो. खाडिलकर केवळ शेक्सपीअरची नक्कल करत नाहीत.

## राघोबा ऊर्फ रघुनाथराव

कुमारी मंगल मधवे

मराठी ललित वाङ्मयात ऐतिहासिक दृष्टीने अचल दर्जाचे व्यक्तिचित्रण कोणते, असे जर कोणी विचारले तर 'भाऊबंदकी'तील रघुनाथरावाचे' असे उत्तर द्यावे लागेल. चंचल, लीलंपट, पापभीरू आणि महत्त्वाकांक्षेच्या रघुनाथरावाचे सारे रंग खाडिलकरांनी एखाद्या कसलेल्या चित्रकाराच्या कौशल्याने, निरनिराळ्या प्रसंगचित्रांच्या साहाय्याने रेखाटले आहेत. रघुनाथराव रंगभूमीवर येतो तो त्याच्या कैदेतून सुटका करण्याच्या त्याच्या सहकाऱ्याच्या कारस्थानाच्या कैफातच आणि आत्या आत्मा त्याचा स्वाभिमान डिवचण्याच्या प्रयत्नातून च चा मा करण्याच्या कल्पनेने आनंदी त्याला चांगलाच धक्का देते. 'बापू नेहमी म्हणतात ते काही खोटे नाही, इकडे सगळी तरवारबहादुरी, कलम कसे ते ठाऊक नाही.' हा आनंदीबाईने काढलेला चिमटा त्याला फारसा बोचत नाही. आनंदीच्या महत्त्वाकांक्षेने तो एकीकडे सुखावतो तर दुसरीकडे भयभीत होतो, कारण तो मनाने पापभीरू आहे. नारायणाच्या खुनाच्या पायाशी विलगून असणारी दुष्ट पिशाच्चे आपल्या रक्तात मिसळून आपल्या अपत्याचे रूप घेतील, ही त्याला भीती वाटते व त्या भीतीच्या भरात तो तिची निर्भर्त्सना करतो. पण क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी तो तिच्या लाघवी बोलण्याने व नेत्रकटाक्षाने घायाळ होतो व तिच्या हातचे बाहुले बनतो. त्याचे लीलांपत्य हेच सर्वनाशाचे कारण होते. तसा तो अतिशय मानडा व भावनाशील आहे. नारायणरावाने 'काका मला वाचवा' म्हणून हंबरडा फोडल्यावर तो जितक्या लवकर विरघळतो, तितक्याच अवधीत तो आनंदीच्या खोट्या धमकावणीने तिचा हुकूम तिच्या हवाली करतो. नारायणाच्या खुनाच्या दृश्यानेही तो गर्भगळित होतो व आनंदीने दरवाजा बंद करून घेतल्यावर केवळ क्षणभरातच तो स्वतःला सावरतो. नारायणाच्या वधानंतर जसा मूढ होतो, तसाच कारभाऱ्यांच्या व आनंदीबाईंच्या भरीस घालण्याने पेशवा झाल्याच्या आनंदात स्वतःला हरवून बसतो. खरोखर त्याच्या चंचलतेला सीमा नाही.

एकंदरीत त्याला राजकारणातील एकेपंजे फारसे कळत नाहीत, परंतु राज्योपभोगाची लालसा मात्र अनावर! एकांतात पेशवेपदाची वस्त्रे अंगावर चढविण्यातला त्याचा राज्यलोभाचा हावरेपणा चांगलाच लक्षात राहतो. परंतु पापभीरुत्वामुळे त्याला काहीही उपभोगता येत नाही. आनंदीसारखी कणखर स्त्री त्याच्या मागे नसती तर त्याने केव्हाच खुनाबद्दल प्रायश्चित्त घेतले असते याची खात्री पटते!

त्याची सारी अकल सारा डोलारा केवळ आनंदीवरच उभा असतो. तो तिच्या तालावर नाचतो. पापपुण्याच्या कल्पनेने तो विद्ध असता तिचा केवळ एक स्पर्श त्याला बेभान करण्यास पुरेसा होतो. चार चौघांच्या समोर त्याची मूळ प्रकृती वारंवार उफाळून येते परंतु आनंदी त्याला आवर घालते. प्रायश्चित्तासंबंधाने, निजामावरच्या चढाईसंबंधाने, धर्मकार्यसंबंधाने किंवा पुण्याच्या ब्राह्मणांचा बंदोबस्त करण्यासंबंधाने तो जे काही बोलतो ते आनंदीने कळ फिरविल्याप्रमाणे हे लक्षात येते. पापभीरुत्वामुळे मात्र शेवटी रामशास्त्र्याला शासन करण्याच्या बाबतीत तो आनंदीचे काही चालू देत नाही.

त्याला राज्योपभोग हवा आहे, परंतु त्याला मनात खरीखुरी भीती आहे पुण्याच्या लोकलोभाची! तो राघोभरारी असला तरी स्वकियांशी द्रोह करून राजकीय कटकटी करीत बसण्यात त्याला गम्य नाही. त्यामुळे शेवटी तो आनंदीची बैतागून निर्भर्त्सना करतो आणि तहनाम्यावर सही करतो. तेव्हाच खऱ्या अर्थाने तिच्या पकडीतून सुटतो.

हे सारे त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी सुसंगतच आहे.

# 'भाऊबंदकी'तील विनोद

कुमारी सिंधु भागवत

विनोद हा खाडिलकरांच्या नाटकातला कच्चा दुवा आहे, तो चतुर्थ रस आहे असे म्हणण्यात येते. मनमोकळे हसावे असा विशुद्ध विनोद त्यांच्या नाटकांत क्वचितच सापडतो. तो तसा प्रसंगनिष्ठ नाही, आणि शब्दनिष्ठही नाही, तर तो विडंबनप्रेरित आहे. मुख्य कथानकाचा ताण कमी व्हावा हा त्याचा एक हेतू आहे. छायाप्रकाशाच्या तत्त्वाचा अवलंब करून रुचिवैचित्र्य निर्माण करणे ही भूमिका म्हणून सांगता येईल. उदात्त पात्रांच्या सावलीत वावरणारी क्षुद्रपात्रे निर्माण करून ते मुख्यतः विनोद साधतात. तो प्रामुख्याने उपहासावर आधारलेला असून खाडिलकर त्यातून क्षुद्रतेबद्दलचा अत्यंत तिरस्कार व्यक्त करतात.

'भाऊबंदकी'त चमकशास्त्री, नमकशास्त्री ही पात्रे विनोदनिर्मितीसाठी असून त्यांनी त्याचा विनोदी उपकथानक-निर्मितीसाठी बराच उपयोग करून घेतलेला आहे. कज्जेदलाल ब्राह्मण, व्यवहारदृष्ट्या चतुर चमकशास्त्री आणि व्यवहारदृष्ट्या कमी परंतु धर्मविधीत तयार असा नमकशास्त्री आहे. एक देशस्थ दुसरा कोकणस्थ. देशस्थाची बायको कोकणस्थ तर कोकणस्थाची बायको देशस्थ. पैसे उकप्ळ्यासाठी दोघेही एकजुटीने वागतात पण त्यांच्या बायका दुर्गा व म्हाळसा भाऊबंदकीने वागतात. रंगभूमीवर दोघीजणी येतात तेव्हा एकमेकींच्या नवऱ्यांची उणी-दुणी काढतात. या बायांच्या भांडकुदळीने भाऊबंदकीत विनोदाची अक्षरशः धमाल उडविली आहे. एका परीने आनंदीबाईच्या स्वार्थी राजकारणाला बळी पडलेल्या क्षुद्र व्यक्तींची एक भुतावळच खाडिलकरांनी भाऊबंदकीच्या उपकथानकात उभी केली आहे. या उपकथानकाचे चित्र अतिशय उपहासात्मक, असे आहे. मूळ कथानकाला ते जसे चौफेर-पूरक ठरले आहे, तसेच ते मोठे रंजक आहे. परंतु त्याहीपेक्षा त्याने भाऊबंदकीच्या घातावरणाची परिणामकारकता शतपटीने वाढविलेली आहे.

येथे सामान्य माणसांच्या कुटुंबापर्यंत जाऊन पोहचलेली भाऊबंदकी दाखविण्याकरिता चमकशास्त्री, नमकशास्त्री, म्हाळसा आणि दुर्गा या पात्रांची योजना केलेली आहे. तेजस्वी आणि निःस्पृह अशा रामशास्त्र्याप्रमाणे नमकशास्त्री आणि चमकशास्त्री ही समाजात नेहमीच वावरतात. 'भाऊबंदकी' तील रामशास्त्र्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा रंग खाडिलकर कोठेही फिक्कट विनोदाने विघडू देत नाहीत. मात्र शास्त्र्यांच्या (चमक-नमक) स्वार्थी, कावेबाज आणि लाळघोट्या प्रवृत्तीचे मात्र अतिशय भडक चित्र रेखाटतात. क्षुद्र वृत्तीच्या बोलघेवड्या आणि भेसक विद्वानांनी वैयक्तिक स्वार्थासाठी थोरामोठ्यांची निंदा करावी आणि त्यांच्या वैयक्तिक चारित्र्याचा पंचनामा करावा हा नेहमीचाच प्रकार. 'पाणक्या होता पाणक्या' हे उद्गार या प्रसंगी हटकून आठवतात. नाटकातील विनोदी पात्रांच्या उद्गारांची रोजच्या जीवनात आठवण व्हावी हे विनोदाचे यशच समजता येईल. एकट्या रामशास्त्र्याला पाच लक्ष रुपये न देता, त्या रकमेचे लहान लहान घास करून ते अनेकांना वाटावे हे नमकशास्त्री व चमकशास्त्री यांच्या स्वार्थी समाजवादाचे स्वरूप भेदक आहे.

मला एका माझाने भागणार नाही, शंभर मासे मला आणि नमकशास्त्र्याला हवेत या ठिकाणी मासा ह्या शब्दावर खाडिलकर कोटी करतात. मात्र ही कोटी अपवादात्मक म्हणावी लागेल. खाडिलकर सहसा कोट्या करीत नाहीत.

खाडिलकरांनी 'भाऊबंदकी'त विनोदासाठी उपकथानक योजिले असले तरी त्याचा पहिल्या अंकात शिरकाव होऊ दिला नाही. पहिल्या अंकातील घटनांचा आणि पात्रांचा विचार केला असता 'भाऊबंदकी'तील विनोदी पात्रांची त्या अंकात रंगभूमीवर येऊन एका कोपऱ्यात उभे राहाण्याची सुद्धा पात्रता नाही. हे खाडिलकरांना माहीत होते. देवासमोर ठेवलेल्या मोहरांसाठी त्या बायका एकमेकीशी कशा भांडायला लागतात. भिकंभटाची ओढाताण, नवऱ्याची उणीदुणी, त्यांतून बायका कोणाची वर्मे कशी काढतील याचा नेम नाही. हे सारे चित्रण मोठे गतिमान व नाट्यपूर्ण आहे. ते भडक असले तरी मन वेधून घेते.

शेवटच्या अंकात पळा-रे-पळा गारदी आले म्हणून लोकांना बनविणारा परंतु गारदी समोर आल्यावर गर्भगळीत होणारा वेरक्या भिकंभट तीन रु. मिळाल्यावर आपले भाग्य कीती मोठे म्हणून हरखून जातो. दरिद्री माणसाची कल्पनाशक्ती आणि महत्त्वाकांक्षा किती कोती असते ह्याचे विदारक चित्रण या प्रसंगाद्वारे खाडिलकरांनी केले आहे.

मुख्यातील तोऱ्यात असणाऱ्या आनंदीबाईचे दिवस फिरतात. रामशास्त्र्यांच्या तेजस्वी बाण्यापुढे ती हतबल होते. अशा वेळी तिने जो तळतळाट व्यक्त केला आहे, तो मोठा मार्मिक असला तरी त्याने तिच्याबद्दल सहानुभूती निर्माण न होता उलट विनोदच निर्माण होतो. निजामावर स्वारीस निघण्यापूर्वी, 'हे पुण्यातले लोक मोठे विक्षिप्त; नसल्या गोष्टींची उठाठेव त्यांना नेहमी करायला पाहिजे' हे तिचे उद्गार तर हटकून ओठावर हसू निर्माण करतात. शेवटच्या अंकात रामशास्त्र्याला ती शिव्याशाप देते तो प्रसंग किंवा पोटातल्या बाजीरावाला उद्देशून बोलते तो प्रसंग हे एरवी अंतःकरण पिळवटून टाकणारे आहेत. परंतु तिच्या दुष्टपणामुळे तिच्या या उद्गारासरशी विनोद निर्माण होऊन प्रेक्षक हसत राहतात. भली खोडकी मोडली गुलामाची असे उद्गार त्यांच्या अंतःकरणात घुमत राहतात.

# 'माऊबंदकी'तील संघर्ष

कुमारी छाया जोशी

खाडिलकर हे उपजतच नाटककार. लहानपणापासून नाटक या विषयाची आवड. देशाबद्दल नितांत श्रद्धा, उत्कट निष्ठा आणि वाङ्मय प्रेम होते. टिळकांप्रमाणे वहाल लेखन करणारे होते. स्वातंत्र्याची भावना आणि सरकारची दडपशाहीची प्रवृत्ती यांचा संघर्ष पारतंत्र्याच्या काळात चालू होता. टिळकांवर राजद्रोहाचा आरोप झाला. टिळक तुरुंगात गेले. स्वातंत्र्यहा शब्द काढणे कठीण झाले. अत्यंत दडपशाहीचे सुरू झाले.

माऊबंदकी या नाटकात पेशव्यांच्यात माऊबंदकी निर्माण होते आणि त्यात नारायणरावाचा वध होणे यात खरे नाट्य नसून एकजुटीने, लोकशक्तीनें दुष्ट, आक्रमक शक्तीचा पाडाव कसा होतो, हे दाखविण्यात खरे नाट्य आहे. नारायणरावाच्या खुनाचा विषय हा अत्यंत महत्त्वाचा आणि नाटकाला उपयुक्त असा आहे. या नाटकाच्या रूपाने तत्कालिन महाराष्ट्राच्या राजकारणाचे चित्र रेखाटायचे आहे. म्हणून या नाटकाची रचना वेगळी आहे. स्वतःच्या कर्तृत्वाने देशाचे भवितव्य बदलता येते, अन्यायाविरुद्ध प्रतिकार करणारी शक्ती जनता असते, ही शक्ती जनतेच्या संघटनेत असते. उदात्त अशा नैतिक मूल्याचे सामर्थ्य विलक्षण असते हे खाडिलकरांना सांगायचे होते, हा भाव मनात ठसवायचा होता. या नाटकाच्या रूपाने इतिहासाचा वर्तमानाशी संबंध जोडायचा होता म्हणून हे नाटक लिहिले.

नाटकाच्या पहिल्या अंकापासूनच संघर्षाचे दर्शन घडायला सुरुवात होते. पहिल्या अंकात नारायणाचा खून करण्याच्या बातचीत रघुनाथराव आणि आनंदी यांच्यात संघर्ष झालेला दिसतो. नारायणाला मारण्याचा रघुनाथरावाच्या सरदारांमधे कट चालेलेला आहे. आनंदीबाई 'ध' चा 'मा' करायला तयार झाली आहे, परंतु रघुनाथराव तयार नाही. आपल्या पुतण्याचा खून करावा ही कल्पनाःत्याला सहन होणारी नाही. नारायणराव 'काका मला वाचवा' असे ओरडतो आहे. आनंदीबाई मात्र आपल्या परीने रघुनाथरावाला सांगते आहे. पण जेव्हा ती 'ध' चा 'मा' केलेला हुकूम हातात देते तेव्हा तो खून या कल्पनेनेच दचकतो. त्याचे मन तयार नाही पण आनंदी म्हणते की 'मी केलेला हुकूम जर गारद्यांना आपण यावेळी देणार नसला तर ही कट्यार घेऊन प्रथम माझा प्राण घ्या आणि नंतर नारायणाचा प्राण वाचवा.' हा अटीतटीचा संघर्ष आहे आणि यात शेवटी आनंदीबाईचाच विजय होतो. त्यामुळे नाट्यदृष्ट्या पहिला अंक अत्यंत महत्त्वाचा आहे.

दुसऱ्या अंकापासून कारभारी– सखारामबापू, नाना फडणीस यांच्यात कट चालू आहे. यातून संघर्षाला पार्श्वभूमी लाभते, या संघर्षाचा खरा नायक रामशास्त्री आहे आणि तो या अंकाच्या शेवटी येतो. रामशास्त्री प्रायश्चित्ताची मागणी बोलतो. येथे आनंदीबाई आणि रामशास्त्री यांचा वराच वादविवाद झालेला दिसतो. रामशास्त्री ज्यावेळी प्रायश्चित्त घ्यावे असे म्हणतो तेव्हा आनंदी त्याच्याकडून पुराव्याची अपेक्षा करते. 'ही माऊबंदकी आम्ही निर्माण केली नाही, आम्ही माऊबंदकी करावी अशी परिस्थिती पेशव्यांनी निर्माण केली' ही तिची भूमिका रामशास्त्र्याजवळ काहीसुद्धा पुरावा नसताना तो हा आरोप करतो. रघुनाथरावाचे कारभारी आणि आनंदी या सर्वांच्या विरुद्ध एकटा

संघर्षाला तोंड देतो. जो पर्यंत रामशास्त्र्यांच्या हातात पुरावा येत नाही तो पर्यंत आनंदी त्याला निरुत्तर करू पाहाते. तुमची फुस गारद्यांना असल्याशिवाय गारदी असे करणार नाहीत असे म्हटल्यावर आनंदीबाई सगळा दोष गारद्यांवर टाकू पहाते. ती रामशास्त्र्याच्या प्रत्येक बोलण्याला प्रत्युत्तर देत आहे. रामशास्त्री प्रायश्चित्ताची भाषा बोलताच आनंदीबाई त्याला तुम्ही आमचे नोकर आहात असे ती बजावतेच पण त्याला घाबरवण्याकरता तळघरात टाकण्याची भाषा वापरते. आनंदीबाई आणि रामशास्त्री यांच्यातला हा संघर्ष खरा पराकोटीचा आहे.

आनंदीबाई हे पाशवीशक्तीचे प्रतीक आहे तर रामशास्त्री हे नैतिकतेचे सामर्थ्य आहे. तो अत्यंत निःस्पृह आहे. आनंदीला आपल्या नैतिकतेची कसलीही चाड नाही. ती एक मुर्दाड स्त्री आहे. नारायणरावाचा खून आपण फक्त शकू असा तिला दांडगा विश्वास आहे पण या खुनाचा पुरावा रामशास्त्र्यांच्या हाती आल्यावर मात्र ती असहाय झाली आहे. ते तिला पचविणे जमले नाही. बाजवल्य, जागृत महाराष्ट्राने हा खून तिला पचू दिला नाही. त्यामुळे रामशास्त्री आणि पुणे यावद्‌चन्द्र तिचा तळतळाट म्हणजे शुद्ध कोडगेपणा आहे.

जिये हा संघर्ष संपतो तिये खऱ्या अर्थाने नाटकही संपते. परंतु खाडिलकरांना पारतंत्र्याच्या काळातील भारतीय जनतेला स्वातंत्र्याचा संदेश द्यावयाचा असल्याने ते मुद्दाम शेवटचा संघर्षविहीत प्रवेश लिहितात. पारतंत्र्याच्या काळात या प्रवेशात प्रेक्षक धुंद होत पण स्वातंत्र्याच्या काळात हा प्रवेश अगदी सामान्य वाटतो.

## भाऊबंदकीतील वातावरण

कुमारी सुरेखा आफळे

'भाऊबंदकी' हे ऐतिहासिक नाटक आहे व दोनशे वर्षांपूर्वीचे पेशवेकालीन वातावरण त्यात उभे करण्यात आले आहे. भूतकाळ जिवंत करण्यासाठी अलीकडचे साहित्यिक भूतकालीन भाषेची वर्तमानकालीन भाषेशी सांगड घालण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे वातावरणनिर्मितीला मोठी मदत होते. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की, खाडिलकर या नाटकात असा कोणताच प्रयत्न करीत नाहीत. तरीही ऐतिहासिक वातावरणाची ते परिणामकारकतेने निर्मिती करतात. खाडिलकरांच्या अव्वल दर्जाच्या नाट्यप्रतिभेने हा एक चमत्कारच करून दाखविला आहे.

पहिल्या अंकातील दरबारी मुत्सद्यांची खलबते, त्यातून येणारे पेशवाईकालीन राजकारणांचे संदर्भ यांमुळे बघता बघता ऐतिहासिक वातावरणाचा प्रादुर्भाव होतो आणि त्यानंतर घडणारा नारायणरावाचा खून इतका नाट्यपूर्ण आहे की, पाहणाऱ्याचे स्थलकालाचे भान क्षणभर हरपल्यासारखे होते. त्यानंतर विनोदासाठी योजिलेले उपकथानक आपले भरपूर रंजन करून जाते, तरीही त्याचा प्रमुख हेतू तत्कालीन राजकारणाचे मर्म विशद करणे हाच आहे. या उपकथानकातून ब्राह्मणांची धर्मकर्मे, त्यांची सोंगेढोंगे, ब्राह्मणी बायकांचा बोलण्यातला ठसका व मध्यमवर्गीय कावेबाजपणा सारखा लक्षात येत राहतो. विशेषतः भाऊबंदकीने 'पिकला' झालेला समाज आणि देशस्थ-कोकणस्थ वादाच्या पार्श्वभूमीने पेशवेकालाला मोठा अर्थ प्राप्त झाला आहे.

मराठेशाहीमध्ये लोकशाहीची मूल्ये समाजमनात मुरलेली होती अशी खाडिलकरांची दृष्टी आहे आणि ही दृष्टी खाडिलकरांचा राजकारणी पिंड दाखवते. इतिहासाचे मर्म नेमके समजणाऱ्या व्यक्तींमध्ये खाडिलकरांची म्हणूनच गणना होते. या समाजशक्तीचे, लोकशाहीचे पाठबळ घेऊन 'रामशास्त्री' उठतो, असे खाडिलकर दाखवतात. हांजीहांजीखोर असा एक क्षुद्रमनस्कांचा वर्ग आणि अन्यायाची चाड असणारा तत्कालीन लोकसमाज यांचा संघर्ष या वातावरणातून खाडिलकर जिवंत करतात.

लोकशाहीचा कणा आनंदीबाई वाकवू शकत नाही हे शेवटी दिसून येते.

# वक्ता दशसहस्रेषु

ज्ञानदेव एरंडे

वक्ता हा जन्मावा लागत नाही, तर तो अनुभवाने, अभ्यासाने बनतो असे काहीजण सांगतात. पण असे वक्ते फारच थोडे. शूर पुरुष शंभरांत एक निघतो, ज्ञानी पंडित हजारात एक असतो. वक्ता मात्र दहा हजारांत एक निपजतो. दाता कधीमधीच आढळतो. एकट्या दात्याला सोडल्यास जगातील अनेक महापुरुषांत वक्त्याचा क्रमांक आपल्या प्राचीन विद्वानांनी सर्वांत वर लावला आहे. वक्ता म्हणजे तरी काय ? तर वक्ता म्हणजे स्वतः संपादन केलेल्या ज्ञानाचा दाता ! ज्ञान संपादन करून ते श्रोत्यांपुढे एका विशिष्ट ढोल्दार भाषेत मांडणे हे काही केवळ बोलण्यासारखे सोपं नाही. कोणत्या मार्गाने गेले म्हणजे भाषण रंगू शकते हे वक्त्याला माहीत असले पाहिजे. क्रिकेटपटू कर्नल नायडू खेळावयाला आल्यावरोवर पहिल्याच चेंडूला सीमेवाहेर उडवीत आणि टाळ्यांचा कडकडाट घेत. त्याचप्रमाणे वक्त्याचे वक्तृत्व हे एकेका शब्दात तोफेच्या गोळ्याची दाहकता असलेले, एकएका वाक्याला खड्गाच्या पात्याची धार असलेले असेच असावे लागते. आपल्या वक्तृत्वाने लोकांच्या मनाची आणि बुद्धीची पकड घेऊन त्यांना कार्यरत करण्यात वक्ता यशस्वी ठरला पाहिजे. त्यासाठी प्रखर तपश्चर्या मांडावी लागते.

अब्राहम लिंकन, लो. टिळक, स्वा. सावरकर, साहित्यसम्राट केळकर, म. गांधी, शिवरामपंत परांजपे यांची वक्ते म्हणून ख्याती आहे. कुरुभूमिवर मोहात सापडलेल्या अर्जुनाला तत्त्वज्ञान पटवून धर्मयुद्धास प्रवृत्त करणारे योगीराज भगवान श्रीकृष्ण; स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे या मंत्राने भारतात असंतोषाचा अग्नि प्रज्वलित करणारे लो. टिळक, ज्यावेळी रक्त, अश्रू, घाम आणि परिश्रम या पलीकडे मी तुम्हाला काहीच देऊ शकत नाही असे इंग्लंडच्या जनतेस स्पष्टपणे सांगून त्यांना दीर्घ युद्धासाठी प्रवृत्त करणारा विन्स्टन चर्चिल; दोन जन्मठेपींचा विळा छातीवर वाळगून 'इतका काळ तुमचे राज्य भारतावर टिकेल तरी का ?' असे इंग्रजांना दरडावणारे स्वातंत्र्य वीर सावरकर; अमेरिकेत यादवी युद्ध चालू असताना, 'लोकशाही म्हणजे, लोकांनी लोकांसाठी चालविलेली ही शासनपद्धती या भूतलावर नष्ट होणार नाही' अशी गर्जना करून फुटीर शक्तिविरुद्ध लढायला लोकांना उद्युक्त करणारा अब्राहम लिंकन; ब्रिटिशांनी भारतातून चालते व्हा असे स्वातंत्र्याच्या आशेने प्रेरित होऊन सांगणारे म. गांधी हे सर्व थोर पुरुष अत्यंत प्रभावशाली वक्ते होते.

वक्ते म्हणूनही सावरकरांची योग्यता अनन्यसाधारण होती. त्यांच्या वक्तृत्वाने मोहित होऊन दोन-दोन लाखांची सभा तटस्थ होऊन राही. देशप्रेमाच्या भावनेने व प्रचारी झंझावाताने त्यांचे वक्तृत्व नेहमीच फुललेले असे. त्यांना अधित्वावरोवर हा माणूस क्रांतियुद्धाचा पुरस्कर्ता आणि सूत्रधार असेल असे वाटण्याचा संभव नव्हता. त्यांच्यातील झुंझारवृत्तीचा प्रत्यय येतो तो त्यांचे विचार समजल्यावर, त्यांची वाणी ऐकल्यावर. हिंदू समाजाच्या अंतरंगाची क्रांती, हिंदूंचा मेकडपणा त्यांना नष्ट करावयाचा होता ! त्यांच्या न्याय्य हक्कांची जाणीव त्यांना करून द्यायची होती ! त्यांच्यात आत्मविश्वास आणि सामर्थ्य निर्माण करायचे होते ! आणि यासाठी सावरकरांच्या हाती एकच तळपती तलवार होती, ती म्हणजे त्यांची वाणी ! वक्तृत्वाच्या जोरावर विरोधकांच्या मनात त्यांनी जो थरकाप उडविला तो ध्यानात घेऊन त्यांचे वक्तृत्व ऐकले की त्यांच्या कृश मूर्तीकडे पाहून बळिराजाला अवघ्या तीन पावलात पाताळात दडपणाऱ्या वामनावताराची आटवण झाल्याचाचून राहत नाही ! सावरकरांचे प्रत्येक व्याख्यान काव्याचा आणि कलाकुसरीचा साजशृंगार अंगावर चढवूनच उभे राहते. त्यांच्या प्रत्येक व्याख्यानाला प्रारंभ, मध्य, कळस असून सर्वच व्याख्यानाची मनोज्ञ आकृती बनलेली आढळते. उन्मत खळखळाट हाच सावरकरांच्या वक्तृत्वाचा मुख्य धर्म आहे.

केळकरांचे व्याख्यान म्हणजे सुंदर-सुंदर विलोभनीय अलंकारांनी भरलेल्या सराफी दुकानासारखे असे. टिळकांचे व्याख्यान ऐकताना, जहाल मतांनी समाजाला खवळून सोडणाऱ्या सागरांचा भास होत असे. सावरकरांचे व्याख्यान म्हणजे दोन्ही तीरावरील कित्येक मैलांचा प्रदेश जलमय

करून सोडणारे, तांडव करीत, खळखळत, वेगाने पुढे जाणारे पुराचे लाल पाणीच. तात्यासाहेब केळकरांनी लिहिले आहे, "सावरकरांच्या रथाच्या निशाणावर 'या आणि पाहा!' ही अक्षरे नसून 'येतो,—आणि दाखवतोच!' अशी अक्षरे असावयाची!"

शौर्य, धैर्य, ज्ञान, ध्येयाविषयी हृदयात कमालीची तळमळ, दृढ विश्वास व डौलदार शैली हे गुण प्रभावशाली वक्त्यांस असणे आवश्यक आहेतच. त्यावरोबर भाषणासाठी अभ्यास आणि तयारीची आवश्यकता असते. यांचे उत्तम उदाहरण म्हणजे अब्राहम लिंकन. अमेरिकेत नव्हे, तर आंग्ल जगातील श्रेष्ठ वक्त्यांत अब्राहम लिंकनची गणना होते. एका निरक्षर शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या लिंकनला आपल्या उदरनिर्वाहासाठी शेतावरील कामे, सुतारकिगिरी, लाकुड-तोडणी व किराणा दुकानात नोकरी अशी कितीतरी हलकी कामे करावी लागली. परंतु ज्ञानसंपादनाची तीव्र लालसा असल्याने 'तोच स्वतःचा शिक्षक बनला' असे 'लिंकन ॲज ए मॅन ऑफ लेटर्स' या पुस्तकात रॉबिन्सने म्हटले आहे. तोच लिंकन पुढे एक महान वक्ता झाला. एका निवडणूक प्रचारभाषणात लिंकनने सांगितले की 'स्वतःच्या विरुद्ध दुभंगलेली ही संसद उभी राहू शकत नाही. अर्धे स्वतंत्र पण अर्धवट गुलाम असलेले हे शासन स्थायी होऊ शकणार नाही.' या निवडणूक भाषणाच्या पूर्व तयारीचे वर्णन डेल कार्नेजीने आपल्या 'पब्लिक स्पीकिंग' पुस्तकात केले आहे.

लिंकनची वक्तृत्वशैली संपूर्ण तेजाने दिप्तिमान झाली ती त्याने गेटिस्बर्गला दिलेल्या दोन मिनिटांच्या छोट्याशा भाषणात. हे भाषण म्हणजे त्याच्या भाषाप्रभुत्वाचा नमुना आहे. हे भाषण तितके स्फुरणशील तितकीच किंबहुना त्या भाषणाच्या तयारीची गोष्ट रोचक आहे. गेटिस्बर्ग युद्ध-भूमीचा काही भाग त्या रणांगणावर पतन पावलेल्या वीरांना समर्पित करण्याचा समारंभ साजरा करण्याचे ठरल्यानंतर समर्पण समितीने प्रमुख वक्ता म्हणून एडवर्ड एव्हरेटला पाचारण केले. हा पण पट्टीचा वक्ता होता. या भाषणासाठी लिंकनने खूपच तयारी केली होती. प्रमुख वक्ता एव्हरेटने दोन तास आपले भाषण वाचून काढल्यानंतर लिंकनने आपले भाषण सुरू केले.

'सत्यांयशी वर्षांपूर्वी आपल्या पूर्वजांनी या भूमीवर एका नव्या राष्ट्राला जन्म दिला. स्वातंत्र्य, समता आणि विश्वबंधुत्व ही या नवजात राष्ट्राची जीवनतत्त्वे आहेत. आज चाललेल्या यादवी युद्धात स्वातंत्र्य आणि समतेवर आधारित राष्ट्राच्या टिकाऊपणाची कसोटी लागत आहे. त्या निर्णायक युद्धाच्या एका महान् रणक्षेत्रावर आपण जमलो आहोत. या धारातीर्थावर पतन पावलेल्या वीरांना त्यांच्या चिरविश्रांतीसाठी या रणकुण्डाचा काही भाग अर्पण केला जात आहे, हे सर्वस्वी योग्यच आहे. पण व्यापक दृष्टीने पहाता त्या वीरांना काही समर्पण करण्याची, या भूमीस पावन करण्याची आपली मुळीच पात्रता नाही. आपल्या पात्रतेहून कितीतरी जास्त प्रमाणात, येथे लढलेल्या योद्धयांच्या बलिदानाने हे रणक्षेत्र आधिच पवित्र झाले आहे. आज येथे बोललेल्या शब्दांचा जगात कधीच विसर पडेल पण येथे लढलेल्या विरांची कृती जगाच्या स्मरणात चिरकाल राहील. त्या वीरांनी ज्या तत्त्वाकरिता आपल्या प्राणाची आहुती देऊन, ज्या कार्याची पायमणी केली, त्या कार्याच्या पूर्ततेकरिता स्वतःस वाहून घेणे हे आपले कर्तव्य आहे. त्या मृत वीरांकडून प्रेरणा घेऊन आपण निश्चय करू या की हे बलिदान आम्ही व्यर्थ होऊ देणार नाही; परमेश्वराच्या छत्रछायेत या राष्ट्राचे स्वातंत्र्य नवीन रूप घेऊन जन्मास येईल. आणि भूतलावरून 'लोकांचे' लोकांसाठी, लोकांनी चालविलेले हे शासन' कधीच नष्ट होणार नाही.'

लिंकन अवघी दोन मिनिटे बोलला. परंतु एडवर्ड एव्हरेस्टचे दोन तासांचे भाषण कधीच विस्मृतीत गडप झाले. पण लिंकनचे हे दोन मिनिटांचे भाषण इंग्लंडच्या ऑक्सफोर्ड विद्यापीठाने काचाच्या चौकटीत साचेबंद करून ते भाषण अजरामर करून टाकले. हे भाषण इंग्रजी भाषेतील सर्वश्रेष्ठ भाषण ठरले गेले. म्हणून जर खरा वक्ता होण्यासाठी अब्राहम लिंकनचा आदर्श समोर ठेवला पाहिजे या भाषणाविषयी लिंकनच्या मृत्यूनंतर चार्लस् समनरने म्हटले की 'गेटिस्बर्गच्या युद्धात एक लक्ष सत्तर हजार सैनिक लढले आणि सात हजार मारले गेले पण या युद्धाची आठवण लिंकनच्या भाषणामुळेच जिवन्त राहील.' त्याची ही भविष्यवाणी काळाच्या ओघात खरी ठरली. ती देदिप्यमान सूर्यप्रकाशाप्रमाणे कायमची हजारो जनतेची हृदये प्रवृत्त करीत आहे.

□

# मोहन राकेश

## हिंदी नाटक के सूत्रधार नयी कहानी और उपन्यास के उद्‌गाता

— शंकर शेलार

'मोहन राकेश' का नाम लेते ही मुझे 'विज्ञापन-युग निबंधकी याद आती है। जिसे मैंने एस्. एस्. सी. तथा पदवीपूर्व में पढा था। बडा ही दिलचस्प निबंध है। वह मुझे बहुत पसंद आया था। बादमें मुझे यह भी मालूम हुआ कि राकेशजीने कहानी और उपन्यास भी लिखे है। और उनकी आर्द्रा नामक कहानी मेरे पढनेमें आयी। इस कहानी में लेखकने माँ की तुलना आर्द्रा नक्षत्रकी बरसात के साथ की है। एक फर्क यह है कि यह माँरूपी आर्द्रा वहींपर बरसती है जहाँ जल की जरूरत हो! इस माँके दो पुत्र हैं—एक बड़ा वकील है और दुसरा आवारा। माँ आवारा पुत्रके पास रहना ही पसंद करती है; वकील पुत्रका वैभव उसे आकर्षित नहीं करता। मां के स्वभावके एक सूक्ष्मतम और सुंदरतम भाव-स्तरको लेखकने यहाँ बड़ी कलात्मकताके साथ चित्रित किया है! इस कहानीको पढ़ने के बाद उनकी और भी कुछ कहानियाँ पढनेकी मेरी इच्छा हुई। इसी बीच राकेशजीका 'आधे अधूरे' नाटक मराठी में अनुवादित होकर रंगमंचपर आ गया। इससे तो मेरा कुतूहल और ही बढ गया। क्योंकि मैं जानता था कि हिंदीमें रंगमंच और नाटक उतनी प्रगतावस्थामें नहीं है जितना कि वह मराठी में है। फिर भी मराठी के रंगमंचपर हिंदीका नाटक अनुवादित रूपमें पेश हो रहा था। यह एक अद्‌भुत बात थी। राकेशजीने नाटकके क्षेत्रमें अपनी मोहर चस्पाँ कर दी थी। उन्होंने अपने समस्त पूर्ववर्ती नाटककारोंको मात कर दिया था। .....और आनेवाले दिनोंमें वे एक से एक श्रेष्ट नाटक हिंदी को देंगे और हिंदीके रंगमंच तथा नाट्यक्षेत्रको सशक्त और विकसित कर देंगे ऐसी आशा सबके मनमें उदित हो गयी थी।

लेकिन —

विधाताका विधान कुछ और ही था। केवल ४८ वर्ष की अवस्था में ही राकेशजी भगवान्‌को प्यारे हो गये। ८ जनवरी १९२५ को वे इस दुनियामें आये और ३ दिसंबर १९७२ को उन्होंने यहाँसे विदा ली। उनकी मृत्युने हिंदीके ही नहीं बल्कि भारतके रंगमंचपर एक वज्राघात ही कर दिया है।

वस्तुतः राकेशजी उपन्यास, नाटक, और कहानी—तीनों क्षेत्रोंमें अपनी छाप छोड गये हैं। अंधेरे बंद कमरे, नीली रोशनीकी बाँहें न आनेवाल कल आदि उनके ख्याति-प्राप्त उपन्यास हैं। इसी प्रकार फौलादका आकाश, जानवर और जानवर, परिचय और अन्य कहानियाँ आदि उनके कई कहानीसंग्रह लोकप्रिय हो चुके हैं। हिंदीमें छठे दशक (१९६०) के आरंभमें नयी कहानीका जो आंदोलन चलाया गया था उसके वे एक आधारस्तंभ थे। और ७ वें दशक (१९७०) में नाटकके क्षेत्रमें जो नया आंदोलन आरंभ हुआ उसके वे सूत्रधार सिद्ध हुए। आषाढ़ का एक दिन, लहरोंका राजहंस, दूध और दाम, आधे अधूरे आदि आजके प्रसिद्ध नाटक हैं। ('पैर तले की जमीन' नामक नाटक वे लिख रहे थे, लेकिन वह नाटक 'आधा और अधूरा' ही रह गया।) 'आषाढका एक दिन' को संगीत नाटक अकादमीका पुरस्कार मिला है और 'आधे अधूरे' को समस्त जनताने ही पुरस्कृत कर दिया है।

साधारणतः राकेशजीकी रचनाओंके विषय स्वाधीनता प्राप्तिके बाद हुए शहरी जीवनके संकेंद्रण और उसके परिणामोंपर आधारित है। इस संकेंद्रण के फलस्वरूप होनेवाली मध्य और निम्नवित्त वर्गके जीवनकी आपाधापी, अधूरी महत्त्वाकांक्षाएँ और उन महत्त्वाकांक्षाओंकी दयनीय असफलता आदिका प्रभावपूर्ण चित्रण उनके साहित्यमें मिलता है। 'मिस पाल' ऐसी ही कहानी है। 'आधे अधूरे' में क्षणक्षणसे टूटनेवाले एक मध्यवर्गीय परिवारके भग्न तथा आधे-अधूरे जीवनका यथार्थवादी चित्रण है।

मोहन राकेशका वास्तविक नाम मदन मोहन गुगलानी था। उनके पिता आर्यसमाजी थे और संस्कृतके बडे पंडित

थे। किंतु पिताकी असमयकी मृत्युके कारण मोहनजी पर ही घर का बोझ पड़ गया और अपनी शारीरावस्थासे लेकर बराबर उनको गरीबी और अपमानकी ठोकरें खाते रहना पड़ा। इसी संघर्ष कालमें उन्होंने हिंदी तथा संस्कृतमें एम. ए. कर लिया और बंबई तथा जालंधरमें प्राध्यापकका काम किया। उसके बाद एक साल (६२-६३) 'सारिका' पत्रिकाका संपादन उन्होंने किया और तत्पश्चात् उन्होंने अपना सारा समय साहित्य सृजनको ही दे दिया।

अपने जीवनकालमें उन्हें अनेक सम्मान भी प्राप्त हुए। फिल्म सेन्सार बोर्ड के अध्यक्ष, फिल्म फायनान्स कॉर्पोरेशन के सदस्य तथा नेहरू फेलोशिप पानेवाले शोधकर्ताके नाते वे सम्मानित हुए थे। रंगमंच और रंगशिल्पपर वे विशेष अध्ययन कर रहे थे और इसी कार्यके लिए नेहरू विश्वविद्यालयने उन्हें फेलोशिप दिया था। 'उसकी रोटी' और 'आधे अधूरे' पर फिल्में भी बनी हैं। 'उसकी रोटी' पर बनी फिल्मको आंतरराष्ट्रीय पुरस्कार भी प्राप्त हुआ है।

यह सबकुछ हुआ है। लेकिन जो बहुत कुछ होनेवाला था वह अब नहीं हो सकेगा, और इसी विचारसे मन व्यथित हो उठता है!!

भारतरत्न डॉ. राजगोपालाचारी यांच्या दुःखद निधनानिमित्त भरलेल्या सभेत दि २६ डिसेंबर रोजी संमत केलेला प्रस्ताव

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील एक धुरंधर सेनानी, पहिल्या श्रेणीचे मुत्सद्दी राजकारणी, राष्ट्रीयतेचे ज्वलंत उद्गाते, भारताचे पहिले गव्हर्नर जनरल, निर्भय नेते व बडते आणि पहिल्या दर्जाचे प्रशासक व विद्वान भारतरत्न चक्रवर्ती राजगोपालाचारी यांचे वयाच्या ९४ वर्षी काल रोजी सायंकाळी मद्रास येथे दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न येणारी अशी फार मोठी हानी झाली आहे.

चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या निधनाने भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील श्रेष्ठ नेत्यांचे पर्वच अक्षरशः संपुष्टात येत आहे; आणि सर्वंकष हयातभर विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, जातिभेदनिर्मूलन यांच्यासाठी शेवटच्या श्वासोच्छ्वासापर्यन्त भारताच्या अभ्युदयाची चिंता वाहणारा लोकनेता हरपला आहे. उच्च ब्राह्मणकुळात जन्म घेऊनही अस्पृश्यतेचा कलंक पुसून काढण्यासाठी अनेक दिव्यातून गेलेल्या व जातीभेदनिर्मूलनासाठी प्रत्यक्ष कृतिशीलतेचे उभे सत्र चालविलेल्या या श्रेष्ठ लोकनेत्याच्या निधनाने आम्हा सर्वांना अत्यंत दुःख झाले आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास निश्चित शांती देईलच, कारण ईश्वरास प्रिय असलेले मानवाचे कार्य त्यांच्या इतके सातत्याने करणाऱ्या फार थोड्या व्यक्ती या पृथ्वीतलावर जन्मल्या असतील.

आम्हा सर्वांचे त्यांच्या आत्म्यास कृतज्ञ प्रणाम व नम्र आदरांजली.

# कविता



## वाट

चल गुंफू आता फेर
तुझ्या गोड शब्दांची ती गीते.
आता मन माझे झाले
तुझ्याविण रिते, रिते !.....
तुझे पाहतो मी रूप
आभाळाच्या आरशात
नको लाऊ मला आता
पाहायला तुझी वाट !
झाली गुलाबी पहाट
संध्य सरिता वाहते
चंद्र कलला क्षितिजे
डाव आलाच संपत !...
काहीतरी वाटे उणे उणे
मूर्ती समोर दिसेना
नको लपुनिया बसू
ओघळती येये आसू !...
माझ्या दारीचा प्राजक्त
आज आता बहरेल
शिंपेल सडा सुगंधी
जेव्हा तू येशील, तू येशील !

—मुरलीधर एरंडे

## मनाचे श्लोक (पण आमच्या)

वर्गातल्या मुलींपैकी
चिकन्या झाल्या मॅरीड.
राहिल्या त्यांतील बहुतेक आहेत पिन्यामीड
एक मात्र आहे कीडमीड
पण तियेही चालत नाही आमची कुणाची भीड
एक आहे रानफुगा
पण देईल वाटतं दगा

—आर. एम्. पाटील

## म ट क्या

मी भटकत होतो, मी भटकत आहे,
मी केवळ भटकणार आहे.
माझ्याबरोबर खिदळते जग
खाते आहे हेलकावे
जगाबरोबर मी भटकत होतो, भटकत आहे,
मी केवळ भटकणार आहे.
पाहावे तिकडे सागरच सागर
वर निळ्या आकाशी तळपता सूर्य
भटकतो आहे दिवसाकडून रात्रीकडे
रात्रीतही मी भटकत होतो, अजूनही मी भटकत आहे,
मी केवळ भटकणार आहे.
एक बगळा माशाकडे झेपावतो आहे
मासा त्याला हुलकावतो आहे
माशामागे बगळा भटकतो आहे
बगळ्यामागे मी भटकत होतो, मी भटकतच आहे,
मी केवळ भटकणार आहे.
एक देवमासा येणार आहे
नैराश्याची ही नाव गिळणार आहे
शेवटी तोही बिचारा भटकणार आहे.
आणि मीही भटकणार आहे,
त्यासाठी मी आताही भटकतच आहे,
मी केवळ भटकणार आहे.

—सुरेशचंद्र पाध्ये

## अ न्य का ही भा से !

पहिल्या भेटीत
नदीच्या किनारी
दिसताच, काया
भारावून गेली !
हसऱ्या गुलाबी
ओठांवर लाली
तुझ्या यौवनाला
बघुनिया भ्याली !
नजरेचा बाण
मज लागि पिसे
छेदताच अंतरास
अन्य काही भासे

—जे. व्ही. सुरवसे

## शु क्र चां द णी चा तो ल

शुक्रचांदणीचा तोल
नभोमंडलात
राहिलेला नाही; झाला
कल्लोळ क्षणात.
कोणी तिला सावराया
धावला वेगात
त्याच क्षणी प्रचंडसा
झाला उल्कापात !

—आनंद ओगले

## रा क्ष स

समोर पेटलाय वणवा...
जीवघेणा.
मजा वाटतेय रंग न्याहाळण्यात...
आगीचे.
मरत असतील श्वापदे
आगीत भाजून;
मरू देत...
करू मग रुचकर मेजवानी.
जवळ असतील वृक्ष मोठे,
जळू देत...आग लागून;
काढू मग कोळश्याची बखार.
पण—
जंगलाचा मालक मरणार नाही.
अन्
सांगेल हक्क बखारीवर
तो मरायला हवा!

—सुरेशचंद्र पाध्ये

## अं ग ण

स्मशानाची अवकळा
अंगणाला आली
संजीवनी इतक्यात
तयाला लाभली
डोलणाऱ्या माजकाने
ओंजळ भरून
फुले फेकताच गेले
अंगण बहरून!

—आनंद ओगले

## अ ग म्य

शब्दात विश्व विरून जातं
अन् विश्वांत शब्द.
अर्थ इतरांना अगम्य असतो
नव्हे त्यात त्यांना गम्यच नसतं!
त्यागात मोह विरून जातो
मोहांत त्याग विसरून जातो
त्याग मात्र इतरांना अगम्य असतो!
प्रेमात कर्तव्य चुकून जाते
इतरांना कर्तव्याशी काय होय?
या कर्तव्याकर्तव्याच्या चर्चेत
मी मात्र स्वतःला हरवून बसतो
आणि होतो अगम्यागम्य!

र. का. आंडकर

## र स्ता मा त्र शो ध तो आ हे

ओठातील सिगारेटमधून
निघणारी ही धूम्रवेल
काय साकार करते आहे
हेच मी न्याहाळतो आहे.
भविष्याकडे पहात असता
भूतकाळाकडे पाठ फिरवा
वर्तमानाशिवाय आम्ही मात्र
सर्व काळच विसरतो आहे
रस्ता चालतो आहे.
पण कोठून आलो ध्यानात नाही
कुठे जायचे
यासाठी रस्ता मात्र शोधतो आहे!

—विक्रमादित्य शिंदे

## रहाट गाडगं.....

रहाट गाडगं फिरतंय
खाल्न वर वरून खाली
एकच मार्ग एकच दिशा
थोडी सुद्धा नाही आशा
पण, मार्ग बदलताच
ते चक्र तुटणार आहे
मोडणार आहे फुटणार आहे
कार्य त्याचं थांबणार आहे
पुन्हा कधी न फिरण्यासाठी
जीवनरहाट असाच आहे
घाण्याला जुंपलेला जसा बैल
त्याच बद्ध चाकोरीतून
रिंगणा भोवती फिरणारा
आणि तसाच फिरत राहाणारा
जरा काही वेगळे करण्याची
कोणतीच नाही ताकद
आदी पासून अंतापर्यन्त
हे चक्र असंच फिरतंय
फिरत राहाणार !

—अंजू वाडेकर





## खरंच !

तू भेटलीस
ठीक झालं !
पण भेटल्यावर एकदम
फुलासारखं हसायचं नव्हतंस !
तू बोललीस
नवं जुनं
बरं वाटलं !
पण विसरलीस काय सारं
असलं काही विचारायचं नव्हतंस !
जाते जरा म्हटलंस तेव्हा
दुखावलो जरा
पण इतकं दूर गेल्यावर
मागं वळून बघायचं नव्हतंस !
...खरंच !!

—विकास शहा

## आलेला दिवस

आलेला दिवस निघून जातो
स्मृतींचा ढग बरसून जातो
आशेचो पाऊलवाट भिजवून जातो
यशाची हिरवळ बहरवून जातो
हर्षाची फुले फुलवून जातो.

—शोभा सावंत

## अजाण मी

बोलावेसे वाटते
शब्द परि फुटेना
ठरवुन गेलो मनात
काय ते आठवेना
गोंधळलो मी पुरता
भान मला उरेना
का घडते हे असे
कोडे मज उकलेना
कुणी म्हणे ही प्रीति
मज मात्र कळेना
अजाण मी या रीती
रीत मला समजेना

—नंदकुमार साने

## कारकून

सरकारी ऑफिसातील
मोडक्या तोडक्या खुर्चीवरुन
कागदाच्या ढिगाआडून
दिसत असतो कारकून
दिनवाणा चेहरा
विन:इस्त्रीचा वेष
जाड भिंगाचा चष्मा
डोक्यावर पांढरे केस.
सकाळी दहा ते रात्री आठ
पगार फक्त दोनशे साठ
चार मुले नि बायको एकच
कशी मारावी यांची गाठ
वीजबत्ती अन् कोळसेवाला
शंभर जातात मारवाड्याला
शाळा कॉलेजच्या फिया जाउन
राहतो मात्र दूधवाला
मजा नाही गंमत नाही
असते फक्त भणभण
सांगा आता तुम्हीच तरी
करणार कसे तो नियोजन !

—शरद ना. पोंक्षे

## शारीरिक शिक्षण संघनायक व कुलप्रमुख

बसलेले डावीकडून : १. साळवी, २. उपप्राचार्य गाडगीळ, ३. प्राचार्य लिमये, ४. श्री. किरण लागू, ५. कु. जोशी
उभे १ ली रांग : १. कु. करंदीकर, २. कु. नाईक, ३. भालेराव
उभे २ री रांग : १. धिटे, २. शिंगणे, ३. सावरकर, ४. गुजर, ५. अच्चट. मागे शिपाई कदम

## क्रीडाविभाग व्यवस्थापन समिती

खुर्चीवर : १. कु. लता जाचक, २. प्रा. पद्माकर आपटे, ३. प्रा. शिंदे, ४. प्रा. नातू, ५. प्रा. पाथरे, ६. उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, ७. प्राचार्य लिमये, ८. प्रा. गंभीर, ९. श्री. लागू, १०. प्रा. शुक्ल, ११. प्रा. कुलकर्णी, १२. मनोहर कलापुरे.
उभे : १. मटकर, २. कोकीळ, ३. जाधव, ४. नाईक, ५. कु. जोशी, ६. करडे, ७. आयना, ८. सिसोदिया.

## छात्रसेना

L. To R. : १. कु. सीमा वाव्हळ ( Best Girl Cadet ), २. u/o पाटील, ३. u/o शिंदे, ४. उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, ५. प्राचार्य लिमये, ६. प्रा. पद्माकर आपटे, ७. u/o साठे, ८. u/o वैसास, ९. परदेशी

## साहित्य मंडळ



बसलेले : डॉ. नांदेडकर, प्रा. रायकर, उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, प्राचार्य लिमये, डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. सौ. बनारसे, प्रा. महाजन. उभे १ : प्रा. आपटे, प्रा. मनोहर कुलकर्णी, प्रा. पाथरे, प्रा. देशपांडे, प्रा. संगोराम, प्रा. धायगुडे, प्रा. पुंडे, प्रा. नातू. उभे २ : विद्यार्थी : गुंड, कु. हरिभट, कु. बोपर्डीकर, कु. विंझे, शेलार

बसलेले : मुकुंद कडुसकर, २. प्रा. द. दि. पुंडे, ३. उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, ४. प्राचार्य लिमये, ५. प्रा. रायकर, ६. प्रदीप सिद्धये, ७. संकपाळ. उभ्या ( विद्यार्थिनी ) : १. कु. कुलकर्णी, २. कु. जोशी, ३. कु. श्रुति जोशी, ४. कु. विंझे, ५. कु. जाधव, ६. कु. सावंत. उभे १ : १. सोळंकी, २. जांभळी, ३. कुलकर्णी, ४. दाणी, ५. पांखे, ६. पाध्ये, ७. शहा, ८. कोल्हटकर. उभे २ : १. ब्रह्मे, २. राजीव कुलकर्णी, ३. शेवडे, ४. बोराडे, ५. घैसास. सर्वांत मागे शिपाई : श्री. गुंजाळ, श्री. उतेकर, श्री. कदम.

## विद्यार्थि-संघटना

बसलेले : १. प्रा. संगोराम, २. प्रा. देशपांडे, ३. उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, ४. प्राचार्य लिमये, ५. प्रा. रायकर, ६. प्रा. ( डॉ. सौ. ) वनारसे, ७. प्रा. पुंडे, ८. प्रा. बर्वे. उभे : आडके, २. सहस्रबुद्धे, ३. पाध्ये, ४. कडुसकर. मागे : शिपाई श्री. कदम.

## विज्ञान मंडळ



खुर्चीवर बसलेले : १. प्रा. कुलकर्णी, २. प्रा. मुजुमदार, ३. उपप्राचार्य डॉ. गाडगीळ, ४. प्राचार्य लिमये, ५. डॉ. पांडे, ६. प्रा. वर्वे, ७. प्रा. काटदरे

उभे : १. भागवत, २. चव्हाण, ३. कुलकर्णी, ४. कनोजीया, ५. पाटील. मागे शिपाई कदम

## राष्ट्रीय सेवा योजना

खुर्चीवर १. कु. घोडके, २. संगोराम, ३. कोल्हटकर, ४. प्रा. पद्माकर आपटे, ५. प्रा. गंभीर, ६. उपप्राचार्य, ७. प्राचार्य, ८. प्रा. कुलकर्णी, ९. प्रा. गोसावी, १०. प्रा. गोखले, ११. पावशे, १२. शिंदे.

सौ. हे मा ले ले

मी कॉलेजातून अगदी दमून आलेली ! त्यातून ऊन पडलं तरीही थंडी होतीच. समोर गरमागरम जेवण वाढलेलं. आता केव्हा जेवते आणि विनघास्त पहुडते असं झालेलं ! आणि...नेमक्या अशा क्षणी आमच्या बंधुराजांना कर्मदशा आठवली. तो ट्रांझिस्टर आणि त्याचा तो कान, दोघेही थकेचनात ! ट्रांझिस्टरवरचं ते इंग्रजी आणि आरडाओरडा यात ऐकण्यासारखं काय असतं कुणास ठाऊक !

भाऊ काही ट्रांझिस्टर ठेवेना आणि आई टेबलवर त्याला तो आणू देईना ! दोघांची थोडावेळ जुगलबंदी आणि अखेर खडाखडी झाल्यावर ट्रांझिस्टर बारीSSक लावायची परवानगी मिळाली. तोपर्यंत मी पहिला भात संपवला.

" ताई, अग इथं वाडेकरच्या तोंडचं पाणी पळालंय आणि तुला जेवण सुचतंय कसं ? लुईस आऊटच होत नाही आणि तू आपली भरती आहेस ! "

" हे बघ मन्या..."

" ताई मला मन्या म्हणू नकोस. सरळ मनीष म्हण."

" बरं का मनीषराव. तुमच्या त्या कॉमेंट्रीतलं मला काSSही कळत नाही. त्यामुळे मला इंटरेस्ट नाही. "

मन्याच्या चेहऱ्यावरच्या रेषा बदलायला लागल्या ! चला, ताईनं पहिल्यांदाच कबूल केलं की तिला कळत नाही त्यामुळे मन्या खूष. " ताई मी तुला क्रिकेट शिकवू ? म्हणजे तुला इंटरेस्ट वाटेल. अगंSS एकदा कळायला लागलं आणि इंटरेस्ट वाढला ना की..."

" की दोघांचं क्रिकेट सुरू नि मी मात्र आऊट ! पुढे पाहून जेव मन्या. शिकरण घालू ? " आईच्या उद्गारांवर मन्यानं एक दर्दभरा कटाक्ष तिच्याकडे टाकला. आई पुन्हा आम्हांला विचारायला आली नाही; आणि त्याक्षणापासून My Cricketing yearsना सुरुवात झाली.

मी माझी पहिलीच मूलभूत शंका मन्याला विचारली.

" मन्या, काय रे ? किती गोल केले की आपण जिंकतो ? " मन्याचा घास घशातच अडकला.

" ताई, म्हणजे तुला अगदीच काSS ही..." त्याचा कंठ पुढे अगदी भरून आला.

" ताई, अग क्रिकेटमधे रन्स काढतात रन्स ! गोल नाहीत. " डोळे मोठे मोठे करून गोल नाहीत रन्स हेच वाक्य तो इतक्या वेळा म्हटला की मला हसू आवरेना.

" हसू नकोस ग ! अग SS, आज आपली टीम विश्वविजयी ठरण्याची स्वप्नं पाहत असताना तुझं हे एवढं प्रचंड अज्ञान ? " त्यातलं गाभीर्य मला कळलंच नाही. मी मस्त जेवले. पण ताईला क्रिकेट कसं काय शिकवावं या विचारानं मन्याची झोपच उडाली.

" ताई, अवघ्या गल्लीत माझ्यासारखा कॅचेस टिपणारा कुण्णी कुण्णी नाही, असं परवाच सतीशची बहीण म्हणाली आणि अशा क्रिकेटपटूच्या बहिणीला काहीच माहीत नसणं म्हणजे गावसकरला क्रिकेट येत नाही म्हणण्यासारखं आहे, किंवा वाडेकरची कॅप्टनशिप काढून टाका म्हणण्या..."

आपल्या उपमंमधली विसंगती त्यालाच कळल्यामुळे तो गप्पच बसला.

त्या दिवसापासून आमचं घर म्हणजे ब्रेबॉन स्टेडियमच बनलं. मन्यानं बॅट म्हणजे काय, स्टंप्स कोणते इथपासून सर्व काही सांगितलं ! फक्त चेंडू आणून " याला बॉल म्हणतात," इतकंच सांगायचं शिल्लक ठेवलं.

" मन्या, मला बॅट माहीत आहे. प्रायमरीत आम्ही चेंडूफळीचं चित्र काढलं आहे. "

" ताई, ताई, अग फळी काय म्हणतेस ! " मन्या विव्हळला. त्याला असह्य वेदना झाल्या.

मग आमचं क्रिकेट-शिक्षण घरात, दारात, अंथरुणात स्वयंपाकघरात, सगळीकडे सुरू झालं. मला शिकवताना तर मन्या चौरट झपाटला. लव्हली शॉट ! न्यूSSट्रिफुल ड्राइव, लेग कट, स्वेअर कट् ! गली स्लिप या शिवाय त्याच्या तोंडून शब्द फुटेना. जेवताना तो मला कशा बोलिंगला कसं फील्डिंग पाहिजे हे भाजी, पोळी, वाटी, चमचा यांच्या जागा बदलून बदलूनशिकवायला लागल्यावर मात्र आईनं खरोखर लाटणं उगारलं. मी म्हटलं, " लव्हली शॉट ! "

मन्या खुष ! माझी पाठ थोपटून म्हणाला, " बरोबर आहे. आत्ता आईनं ज्या अँगलमधे हात फिरवला न तशी बॅट वळली आणि त्या साइडला कोणी फिल्डींग करत नसला की सरळ बाऊंड्री !"

झोपताना गादी म्हणजे पीच बनायचं. मन्या गादीवर मनसोक्त धुडगूस घालून घ्यायचा. क्रिकेटचा इतिहास (!) सांगताना तर तो इतका एक्साइट व्हायचा की माझी खात्री पटायची की मागच्या जन्मीचा सी. के. नायडू तो हाच ! पण त्याला लगेचच भाव द्यायला मी म्हटलं, " मन्या, मागच्या जन्मीचा ब्रॅडमन तूच ! "

पण मन्याचा चेहराच बदलला. " ताई, अग त्याला का मारतेस ! तो जिवंत आहे. "

" पण मन्या तूच म्हणतोस ना की तोच सर्वोत्कृष्ट फलंदाज म्हणून ! " विशेषण मेल्यावर चिकटवतात असं मला नेहमीच वाटतं. मन्या यावर काहीच बोलला नाही.

एकंदर जनरल माहिती दिल्यावर तो बोलिंगकडे वळला. स्पिन, गुगली, फास्ट, नो बॉल ! या सगळ्या प्रकारांत माझी विकेट कधीच पडली होती. प्रसन्ना, बेदी, चंद्रशेखर ही त्याची दैवतं. बक अप प्रसन्ना, बक अप चंद्रा ! म्हणत म्हणत तो इतका एकरूप व्हायचा की स्वतःलाच प्रसन्ना-चंद्रा मानायला लागायचा ! गावसकरनं शॉट हाणला की गवास्कर होऊन जायचा, ( गवास्कर हा स्टायलिश उच्चार त्यानंच मला शिकवला. )

अंग घुसळून घुसळून हॉलमधेच मला साभिनय बोलिंग शिकवायचा. तो सांगत असताना शोकेसवर, टीपॉयवर आदळेल की काय अशी भीती मला सतत वाटायची. सोलकर जमीनीवर पडून कसा सूर मारून कॅच घेतो हे सांगताना तो सोफावरच आदळला.

कॉमेंट्री चालू असताना तर मन्याची डब्बल जोरात वटवट चालायची. क्लीन बोल्ड, रन आऊट, L. B. W. वगैरे समजवायाचा. ऐकताना क्षणाक्षणाला बदलणारे त्याचे भाव पाहून मला हसू आवरणं अशक्य व्हायचं नि तो चिडायचा. बाऊंड्री असेल तर बबल असेल ती वस्तू मिरकवायचा, कॅच असेल तर बबल असेल ते धरायचा ! सिक्सर मारली की दणादण नाचायचा ! कॉमेंटरच्या शब्दानुसार त्याचे अंगविक्षेप झटाझट बदलायचे !

अशा तऱ्हेने आठ दिवस घरातल्या वस्तूंची आणि माझ्या सहनशक्तीची नासधूस करत तो मला क्रिकेट शिकवत राहिला. थिअरी मोठमोठ्यानं चालूच असायची. प्रॅक्टीसपण हमेशा चालूच ! आठ दिवसांनी मन्या म्हणाला, " ताई, आता मी तुला बरंच सांगितलय ! आता झालेल्या चुकांवरचे प्रश्न !..." मन्यानं घसा खाकरून, केस उडवून स्टाइल मारली.

प्रश्न १—M. C. C. चा फुलफॉर्म सांगा ! '

उत्तर—" M. C. C. म्हणजे आता इथं आले आहेत ना तेच ! "

" ताई, मी फुलफॉर्म विचारला. "

" तो कशाला हवाय ! मला माहीत नाही. "

" मला पण नाही. प्रश्न २—मॅच जिंकायची तर काय काय करावं लागतं ! "

आता खरी परीक्षा आहे अशा थाटात कुमार मनीष उभे राहिले.

" पहिलं म्हणजे टॉस जिंकला पाहिजे आणि दुसरं म्हणजे दिवस चांगला पायजे ! "...यावर मन्याची विकेट ! त्याचा चेहरा पाहून मी म्हटलं, " मन्या, आऊट जाणाऱ्या बॉलमधे बॅट घातली की असा कॅच उडतो ! "

मन्याला त्यातली खोच तर कळली नाहीच पण त्या दिवसापासून क्रिकेटमधे मीच मन्याचा गुरू आहे !

कै. वि. ल. भावे यांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथात रामदास आणि तुकाराम यांची तुलना करण्याच्या निमित्ताने तुकाराम महाराजांची बदनामी करण्यात आलेली आहे, म्हणून सदर ग्रंथ विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातून काढून टाकावा अशी पुणे विद्यापीठाला विनंती करणारा ठराव वारकरी महामंडळाने केला तो जुलै १९७२ मध्ये. पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळात त्यावर सर्वंकष चर्चा होऊन ही तुलना बी. ए. च्या अभ्यासक्रमातून काढून टाकावी, असा एकमताने अभ्यासमंडळाने ठराव केला.

शिवाजी विद्यापीठाने 'महाराष्ट्र-सारस्वत' हा समग्र ग्रंथच आपल्या अभ्यासक्रमातून यापूर्वीच वगळला आहे; तर नागपूर विद्यापीठाने सुमारे दीड तपापूर्वीच विचाराधीन ग्रंथातील रामदास-तुकाराम तुलना अभ्यासक्रमातून काढून टाकली होती. वाङ्मयेतिहासाचा एक अत्युत्कृष्ट नमुना असलेल्या या अव्वल वाङ्मयेतिहास-ग्रंथाबद्दल वारकरी महामंडळासारख्या धार्मिक संस्थेची प्रतिक्रिया लक्षात घेऊन पुणे विद्यापीठाने त्याबाबत घेतलेल्या भूमिकेबद्दल वृत्तपत्रे, नियतकालिके यांतून उलटसुलट चर्चा सुरू झाली.

या बाबतीत विद्वानांचा किंवा रसिकांचा दृष्टिकोण जाणण्यापूर्वी ज्यांना हा ग्रंथ अभ्यासायचा आहे त्या विद्यार्थ्यांची मते अजमावणे उद्‌बोधक ठरेल, या दृष्टिकोणातून द्वितीय वर्ष साहित्य या वर्गातील तीन विद्यार्थिनींच्या प्रतिक्रिया खाली दिलेल्या आहेत.

# महाराष्ट्र सारस्वत
## एक रंगलेला वाद

## झाले ते योग्यच झाले !

कु. मंगला जाधव

कै. वि. ल. भावे यांच्या 'महाराष्ट्र-सारस्वत' या ग्रंथातील 'तुकाराम आणि रामदास' यांची तुलना वाचून माझ्यांनी ही आडनिडी तुलना करण्याचा अनावश्यक प्रयत्न का केला हे कळत नाही. त्यांच्या ग्रंथाच्या यशाची बाजू जमेस धरता ही तुलना, 'महाराष्ट्र-सारस्वत' रूपी दुधाच्या पात्रात मिठाच्या खड्याप्रमाणे वाटते. अर्थात अशी तुलना लिहून भावे यांना त्यांच्या ग्रंथाची पाने तर वाढवायची नव्हती ना ! असाही प्रश्न मनात उभा राहतो.

कार्य एक, तळमळ, कळकळ एक असे असताना तुकाराम-रामदास यांची वैयक्तिक तुलना करण्याचे प्रयोजनच काय ? स्वतः भाव्यांनी पृष्ठ क्र. ४०३ येथे कबूल केले आहे की रामदास आणि तुकाराम यांचे धोरण एकच आहे. मग ही अतिशयोक्तिपूर्ण, अप्रस्तुत तुलना कशाकरिता ? प्रस्तुत तुलना ही मुळातच चुकीच्या पायावर उभी आहे. दोन श्रेष्ठ व्यक्तींची तुलना चारित्र्याच्या निकषावर कधीही करू नये. संशोधनाच्या दृष्टीने तरी अशी तुलना करता येते का, हे विचारात घेतले पाहिजे.

तुकाराम संसारात असूनही संसारापासून अलिप्त होते. तर रामदासांनी बोहल्यावर वधूचा त्याग करून पलायन केले. रामदासांची प्रवृत्ती भ्याड होती, असे कोणीही स्त्री म्हणेल की नाही ? तुकारामांना व्यवहारज्ञानाची घमेंड नव्हती याचे कारण ते लौकिक व्यवहाराबद्दल उदासीन होते. 'निराशेचा गाव दिधला आम्हांशी' असे म्हणणाऱ्या तुकारामांशी 'मराठा तितुका मेळवावा' किंवा 'प्रपंच करावा नेटका' असे म्हणणाऱ्या समर्थांशी तुलनाच कशाला ?

रामदासांची वृत्ती धार्मिक होती. त्यांना धर्म रक्षावयाचा होता. तुकाराम आध्यात्मिक होते आणि त्यांना वैष्णव किंवा दयाशील माणूस घडवावयाचा होता.

वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असताना भाव्यांनी अशी तुलना का करावी ? जेव्हा वस्तुस्थितीची जाणीव असूनही माणूस वस्तुनिष्ठ विधाने करीत नाही, तेव्हा त्याच्या साहित्याबद्दल इतरांना संशय येतो आणि हा संशय साहजिकच आहे.

[ भाव्यांच्या तुकाराम–रामदास तुलनेबद्दल फार मोठा संशय आहेच. ] ग्रंथरचनेनिमित्त उभा महाराष्ट्र फिरणाऱ्या या गृहस्थास तुकाराम–रामदासांबद्दल कोणतीही वस्तुनिष्ठ भूमिका घेता येऊ नये याचे सखेद आश्चर्य वाटते.

मग ही तुलना कशाकरिता केली हा प्रश्न शिल्लक राहतोच. भाव्यांचा ही तुलना करण्यापाठीमागचा हेतू काय होता ? जातीयवादी होता का ? असे वाटत नाही असे म्हणण्यात येते. तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा विचार करता समाजात असलेली जातीजातींमधील तेढ आणि त्याचे काही विध्वंसक प्रकार पाहिल्यास, पायापुरते पाहणाऱ्या आणि गोळावेरीज करून लिहिणाऱ्या लेखकांप्रमाणे भाव्यांनी वस्तुस्थितीचा विचार न करता केलेली तुलना ही जातीयवादी दृष्टिकोणातूनच केली आहे असे का मानू नये !

अर्थात त्यांच्या ग्रंथाच्या यशात ही तुलना मागेही पडेल आणि पडते कारण आजच्या आधुनिक आणि जिज्ञासू विद्यार्थ्याला ही तुलना वाचून कोठे जातीयवाद वाढीस लागेल असे वाटत नाही. भाव्यांच्या बुद्धिवादी दृष्टिकोणामुळे भावे असे लिहितात असे मानले तर ! मग त्यांनी एकाची निंदा व दुसऱ्याचा गौरव का करावा !

म्हणून ही तुलना अभ्यासक्रमातून काढून टाकली, हे योग्यच झाले !

## विद्यार्थ्यांचे बौद्धिक नुकसान !

कु. ज्यो व्ला वि हे

'महाराष्ट्र–सारस्वत' या ग्रंथात कै. वि. ल. भावे यांनी रामदास व तुकाराम यांची जी तुलना केली आहे. तिच्यावर वारकरी–महामंडळाने आक्षेप घेतला आहे. त्यामुळे ही तुलना पुणे विद्यापीठाने बी. ए. च्या अभ्यासक्रमातून काढून टाकली आहे. मी म्हणते, का ! कशासाठी !

संशोधनाअंती ही तुलना अप्रस्तुत ठरते असे भीमराव कुलकर्णी यांनी लिहिले आहे. ते सारे संशोधन त्यांनी एकदा आमच्या माहितीसाठी पुढे मांडावे असे आमचे त्यांना सांगणे आहे. भाव्यांनी तर या तुलनेनंतर लगेच 'पुढे वरचा भाग खरवडला तर आतील गाभा सर्वांचा एकच दिसेल... सगळ्यांचे मन एकच आहे आणि या सर्वांचे बोलणे, सांगणे आणि लिहिणे एकच धोरणाचे आहे.. त्या सर्वांनी एकच साध्य डोळ्यापुढे ठेविले आहे.' असे लिहिले आहे. म्हणजे त्यांनाही दोषांचे महत्त्व मान्य आहे. तुलना करायचीच असल्यास त्यांच्या वाक्यांची करावी; व्यक्तींची करू नये; एवढे फारतर म्हणा ! काढून का टाका !

ही तुलना जातीयवादी विचाराने करण्यात आली आहे असे म्हणण्यात येते. प्रस्तुत ग्रंथ जेव्हा लिहिला गेला त्यावेळेस म्हणजे सुमारे ५० वर्षांपूर्वी सत्यशोधक समाजाची चळवळ, ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद यांचा जोर होता. त्यामुळे कदाचित् तो हेतू असण्याची शक्यता असेल. पण तसे असते, तर त्याचवेळी त्यावर टीका झाली असती. पण तशी टीका झाल्याचे फारसे आढळत नाही. प्रत्यक्ष ग्रंथ वाचतानाही ही तुलना जातीय आहे असे वाटत नाही. त्यामुळे आज इतक्या वर्षांनंतर तीच तुलना जातीय असल्याचा साक्षात्कार काहींना व्हावा याचे आश्चर्य वाटते.

विद्यापीठाने बाकीचे पुस्तक अभ्यासास ठेवून फक्त ही तुलना गाळली आहे. त्यातूनही बी.ए. च्या अभ्यासक्रमातून गाळली आहे; पण जर ही तुलना आक्षेपार्ह वाटत असेल, तर तिचे खंडण करणारी इतर पुस्तके विद्यापीठाने संदर्भ-ग्रंथांच्या यादीत नमूद करावीत, परंतु ही तुलना मात्र गाळू नये, असे वाटते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे बौद्धिक नुकसान होते.

'पृथ्वी भोवती सूर्य फिरते' हे ॲरिस्टॉटलचे प्राचीन धर्ममत पुढे गॅलिलिओ, कोपर्निकस आदि शास्त्रज्ञांनी चुकीचे आहे हे सिद्ध करून दिले. पण तरीही प्राचीन सिद्धांत शास्त्रशाखेतून वगळले गेले नसून, ते चुकीचे कसे याचे विवेचन करण्यात येते. ॲरिस्टॉटलच्या सिद्धांताचे महत्त्व त्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या नेमकेपणात आहे. तेच भाव्यांच्या बाबतीतही म्हणता येईल. म्हणून तुलना न गाळता ती चुकीची आहे, एवढेच प्रतिपादन करण्यात यावे.

## हेतूलाच सुरूंग लागेल !

कु. सुलभा कोपर्डीकर

दहा हजार संख्येच्या वारकरी संप्रदायाच्या अधिकारी महामण्डळाने ठराव करून आपली मागणी पूर्ण करून घेतली. विद्यापीठाने ती इतक्या झटपट केलीही. हा संत तुकाराम आणि संत रामदास यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आहे की वारकऱ्यांच्या भावना दुखवायच्या नाहीत असा आग्रह आहे काही कळत नाही.

ह्या वाक्तीत वाद घालण्याइतकी माझी पात्रता नाही. कारण वाद ज्या विषयाबाबत आहे ["तुकाराम रामदास तुलना"] ते दोन्ही संत आणि खुद्द ग्रंथकर्ते वि. ल. भावे. ह्यांच्या आमच्यात महद् पोकळी आहे. पण इतकी वर्षे सुखनैव अभ्यासात असलेल्या ग्रंथाबाबत एवढी खळबळ माजली त्याचे कारण काय हे जाणून घ्यायची उत्सुकता मोठीच आहे.

तुकाराम आणि रामदास हे दोघेही भक्तिमार्गाचे पुरस्कर्ते. एकाने विठ्ठलाची भक्ती सांगितली तर दुसऱ्याने रामाची. एतावता ही तुलना वि. ल. भाव्यांच्या महाराष्ट्रस्मृतीला, महाराष्ट्रधर्माला आणि महाराष्ट्राला लांछनास्पद आहे.

दोघांच्या कार्याचा केंद्रस्थ गाथा एक, कळकळ एक, ( इति वि. ल. भावे महाराष्ट्रसारस्वत पृ. क्र. ४०अंतिम ) ध्येय एकच असताना ही वाङ्मयेतर तुलनाच कशासाठी ! ह्या मुद्यावर आल्यानंतर त्या तुलनेतील अविवेकी विधानांचा ऊहापोह करण्याची गरज नाही हे स्पष्टच आहे.

ही तुलना नको हे जितके निर्विवाद तितकेच ती का नको ? तुलनेला आधार म्हणून काही मिळते का ? हे शोधणे महत्त्वाचे आहे. हा विचार विद्यार्थ्यांनी करायचा नसून विद्वानांनी करायचा आहे.

तुलना नको ह्या संदर्भात एक गोष्ट सांगाविशी वाटते, ती म्हणजे शाळाच्या पुस्तकातून शास्त्रीय शोधांचा इतिहास दिला जातो. अशा ग्रंथांचा अभ्यास करताना तुलना चूक आहे, ती का आहे ! कशी ! हा मागही विद्यार्थ्यांच्या अभ्यासात असावा लागतो. म्हणजेच पूर्वसूरींची चुकांची मते, विधाने विचारात घेऊन मगच सिद्ध मतांकडे वळायचे असते. याही दृष्टिकोणातून कै. वि. ल. भावे यांनी रामदास आणि तुकाराम यांची केलेली तुलना कशी विपर्यस्त आहे हे सांगून त्या दोन महापुरुषांची आदर्श तुलना विद्यार्थ्यांपुढे ठेवणे आवश्यक आहे असे मला वाटते.

भाव्यांनी ही तुलना करण्याचे प्रयोजन काय ! तुलना लिहिताना दृष्टीकोण जातीयवादी होता का ! की ग्रंथरचनेच्या निमित्ताने केलेले हे कोत्या मनाचे प्रात्यक्षिक आहे ! भाव्यांसारख्या संशोधक वृत्तीच्या, स्पष्टवक्त्याला उभ्या महाराष्ट्रात भाकडकथांखेरीज तुलनात्मक दृष्टया कोणतीच वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध झाली नाही काय ! या सर्व गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे.

मात्र कै. भावे यांनी केलेली तुकाराम-रामदास तुलना अयोग्य आहे हे मान्य करूनही मला असे म्हणायचे आहे की ज्यावेळी अभ्यासक्रमाच्या संदर्भग्रंथसूचीत 'महाराष्ट्र सारस्वत' या ग्रंथापुढील 'तुकाराम-रामदास तुलना वगळून' इ. सूचना पाहून सर्व विद्यार्थी तो भाग कुतूहलाने का होईना पण लक्षपूर्वक वाचतील आणि त्यामुळे विचाराधीन तुलना विद्यार्थ्यांच्या अवलोकनात येऊ नये ह्या वारकरी महामंडळाच्या हेतूलाच सुरुंग लागण्याची शक्यता आहे.

( पृ. ६६ वरून )

यापूर्वीच महाराष्ट्रात दोन लाख विहीरी खणून होणे जरूर होते. अर्थात हे काम केवळ सरकारचे नाही. जनतेनेच ते लक्षात घेणे आवश्यक होते.

यावर उपाययोजना म्हणून ठिकठिकाणी सहकारी संस्थांनी ट्रॅक्टर, बोअरींग मशीन्स इ. यंत्रसामग्री विकत घ्यावी, व शक्य तितक्या लवकर पाणीपुरवठ्याच्या योजना अंमलात आणाव्यात असे त्यांचे मत दिसले. हे मात्र आम्हांस पटले.

'खेडेगावात बँकींग कितपत यशस्वी होईल !' आम्ही विचारले. तर ते म्हणाले, या व्यवसायिक (Commercial) बँकांना खेडेगावांत काम करणे हे काहीसे अडचणीचेच झाले आहे. खेडेगावांतील शाखांत अनुत्पादक कर्जे मागणारेच जास्त. लोकशिक्षणाची उणीव ही तर व्यावसायिक बँकांच्या यशाच्या मार्गातील एक धोंडच आहे, त्यामुळे ठेवीदार व कर्जे मागणारे दोन्ही कमीच. खेड्यांतून केवळ सहकारी बँका यशस्वी होऊन चालणार नाही. व्यावसायिक बँका प्रभावी व यशस्वी ठरल्या पाहिजेत. लगेच आम्ही प्रश्न टाकला,

तुम्ही खेडेगावांत भराभर शाखा काढता त्या कशा...! डॉ. पटवर्धनांनी आम्हांला मध्येच अडवून सांगितले की राष्ट्रीयीकृत बँकांनी शाखाविस्ताराचा आराखडा अत्यंत विचारपूर्वकच आखला आहे. खेडेगावांतील शाखांमुळे जरी अल्पकाळ तोटा सहन करावा लागला तरी मला असा विश्वास वाटतो की येत्या ५/६ वर्षांतच लोकशिक्षणाच्या मार्गाने व्यावसायिक दृष्टयाही या शाखा यशस्वी होऊ शकतील."

मुलाखती कशासाठी घ्यावयाच्या ? तर आपल्या ज्ञानीवा समृद्ध करण्यासाठी ! हा हेतू तर या मुलाखतींनी साधला आहेच, परंतु त्याहीपेक्षा आजच्या शिक्षणविषयक दृष्टीकोणावरही या मुलाखतींनी चांगला प्रकाश टाकला आहे. आजच्या विद्यार्थ्याला शिक्षण हे केवळ नोकरीसाठी हवे आहे ! शिक्षणाचा उपयोग स्वतंत्र व्यवसाय जिद्दीने, आत्मविश्वासाने, अधिक कर्तबगारीने करावयास प्रवृत्त करणे, असा जर होऊ लागला तर आपल्या समाजाचे सारे चित्रच बदलून जाईल.

# मिनू मुलाखती

## प्रदीप सिद्धये, मुकुंद कडुसकर व जयंत कुलकर्णी

मुलाखतीचे म्हणून एक शास्त्र आहे.त्याप्रमाणे मुलाखती आकर्षकरित्या सादर करणे ही एक कला आहे. हे शास्त्र व ही कला आम्ही किती आत्मसात केल्या आहेत कोणास ठाऊक ? पण आम्ही तिघांनी मिळून जिद्दीने व आत्मविश्वासाने काही मुलाखती घ्यायच्या ठरविल्या. प्रथमतः मुलाखती कोणाच्या घ्यायच्या हा प्रश्न पडला. अनेक व्यक्ती डोळ्यांसमोर आल्या.प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती सर्वच जण घेतात. पण सामान्यातून थोडक्या अवघीमध्ये असामान्य कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यावसायिकांची मुलाखत ही नक्कीच श्रेष्ठ ठरेल.

हे विचार आणि आमच्या सायकलींची चाके बाजीराव पथावरून जात असतानाच कोपऱ्यावरील 'चितळे बंधु' यांच्या भव्य व आकर्षक दुकानाने आमचे लक्ष वेधले. भर वस्तीतील मध्यवर्ती स्थान पटकाविण्यासाठी चितळे बंधूंना नक्कीच काहीतरी कष्ट करावे लागले असतील. या भव्य वास्तूपाठीमागे त्यांचे सर्वांचे सारखेच हात सारखेचलागले असतील, या विचारात आम्ही गर्दीतून रस्ता काढीत मालकांच्या काऊंटरजवळ गेलो—गोऱ्यापान चेहेऱ्याच्या हसतमुख रघुनाथरावांनी आमचे स्वागत केले व काय पाहिजे असा नेहमीचाच सवाल केला. एवढ्या प्रचंड व्यापात, गडबडीत माणूस आपले हास्य टिकवतो म्हणजे कमाल आहे ! प्रथमतः चाचरतच त्यांना आम्ही मुलाखतीची कल्पना सांगितली. कोणताही विचार न करता त्यांनी ताबडतोब होकार दिला. दुसऱ्या दिवशी अगोदर वेळ ठरवून आम्ही त्यांच्या दुकानात पोहोचलो.

दुकानाच्या पाठीमागच्या बाजूला जरा निवांत ठिकाणी एका कोचावर मुलाखतीसाठी सरसावून बसलो. पण आश्चर्य म्हणजे त्यांच्या आणि आमच्या गप्पा एवढ्या रंगल्या की त्या संपूच नयेत असे वाटत होते. हातातील पेन शांतच होते ! रघुनाथराव चितळ्यांच्या प्रत्येक वाक्यावाक्यात आत्मविश्वास प्रगट होत होता. अनेक नाजूक व 'विचारू नये' अशा प्रश्नांना देखील अत्यंत मनमोकळेपणाने त्यांनी दिलेली उत्तरे म्हणजेच त्यांच्या यशस्वी व्यवसायाचे खरे गमक आहे.

कोपऱ्यातील कोचावर बसल्या बसल्या आमची नजर सर्वत्र दुकानावर फिरत होती. मागच्या बाजूस असलेले भव्य कोल्ड स्टोअरेज, २५-३० विक्रेत्यांचा, ताफा, मेवा-मिठायांनी भरलेले काऊंटर्स आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचे श्री. रघुनाथराव चितळे व त्यांचे चिरंजीव—बघून मनात आले की ह्या सर्व धंद्याची सुरुवात झाली तरी कशी—

# पदवीधरांना नोकरीच हवी!

सुरवातीस आमची अशी कल्पना होती की चितळे बंधू म्हणजे कोणी दोन बंधू असावेत, परंतु प्रत्यक्षात विचारता मुळात वाडवडिलापासून चालू असलेला दुग्ध व्यवसाय श्री. रघुनाथराव व त्यांचे सहा बंधू यांच्या कर्तृत्वानेच सध्या वाढीस लागला आहे. आमच्या डोळ्यांसमोर त्यांचे १० वर्षांपूर्वीचे कुंटे चौकातील दुकान होते. मर्यादित उत्पादन व विक्री यामुळे चितळे बंधूंचे नाव त्यामुळे फारसे लोकांना माहीत नसावे. परंतु सेवासदन बिल्डिंगच्या भव्य वास्तूत येऊन व नुकत्याच केलेल्या नूतनीकरणामुळे मिठाई व दुग्ध व्यवसायात चितळे बंधु यांचे नाव जनमानसात सुविख्यात झाले आहे. या आश्चर्यकारक बदलामुळे आजची त्यांची परिस्थिती व पूर्वीची परिस्थिती यात धंद्याच्या दृष्टीने कोणता बदल झाला आहे असा आम्ही त्यांना प्रश्न केला. "बदल ! हो ! खूपच फरक पडला आहे. मुख्य :म्हणजे पूर्वी म्हशींच्या औषधपाण्याची फारशी माहिती नव्हती. एकदा रोग आला म्हणजे आमचे नुकसानच ! १९३५ मध्ये तर आम्ही बुडालोच होतो. रोग व मंदी यांच्या जबर तडाख्यातून सावरायला आम्हाला खूपच झगडावे लागले. परंतु आता म्हशींच्या औषधपाण्याची व आधुनिक व्यवसायाला लागणारी सर्व माहिती यामुळेच १९३५ ची परिस्थिती आता येणार नाही याबद्दल आम्हांला विश्वास वाटतो."

प्रत्येक धंद्यात व्यवस्थापन हे अत्यंत महत्त्वाचे अंग असते. चितळे बंधूंच्या व्यवसायासारख्या अत्यंत कष्टाच्या व्यवसायाला तर व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे. या हेतूने आम्ही श्री. चितळ्यांना विचारले असता श्री. चितळे हसूनच उद्‌गारले "पुस्तकी ज्ञान व प्रत्यक्ष अनुभव यांत नेहमीच फरक असतो नाही का ? आमच्या धंद्याचे व्यवस्थापन आमच्या कुटुंबातील सर्वांनीच केलेले आहे. सध्या वडील व दोन भाऊ भिलवडीचे प्रत्यक्ष दुग्ध उत्पादनाचे काम बघतात व मी इतर भावांच्या व मुलांच्या साहाय्याने इथली व्यवस्था बघतो." आता धंदा म्हटला की स्पर्धा आलीच व त्याचबरोबरच चढउतार देखील आले. दुधासारख्या नाशवंत मालाचा व्यवसाय म्हणजे तारेवरची कसरतच. अशा परिस्थितीत श्री. चितळे यांना 'प्रॅक्टीकल प्रॉब्लेम" नक्कीच येत असावेत. असे प्रश्न ते कसे सोडवितात याबद्दल विचारता श्री. चितळे म्हणाले, आमच्या व्यवसायात 'कॉस्टींग' फार महत्त्वाचे असते. उन्हाळ्यात होणारी तूट आम्हांला हिवाळ्यात भरून काढावी लागतेच. त्यातून सर्व माल नाशवंत ! त्यामुळे उत्पादनही अत्यंत काळजीपूर्वक करावे लागते. दर ठरविण्याच्या बाबतीत सर्व वर्षभराचे उत्पादन व विक्री याचा विचार करावा लागतो. शुद्ध माल बाजारात कमीत कमी नफा घेऊन विकणे यातच आमच्या धंद्याचे गुपित आहे. आज बाजारात शुद्ध मलईचा चक्का आमच्या शिवाय कोणाकडेही मिळू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. हिवाळ्यात फायदा होईल या आशेवर आम्ही कधीच तोट्यात माल विकीत नाही तर मागे मिळविलेल्या फायद्यातूनच तोटा सहन करतो व त्यामुळे आर्थिक घडी कायम राहाते. आता दराबद्दल बोलायचे झाल्यास पुण्याचे गिऱ्हाईक विशिष्ट प्रवृत्तीचे आहे. अती चिकित्सक ! त्यामुळे भाव खालच्या पातळीवर स्थिरावलेले आहेत. त्यामानाने मुंबईस भाव हे नेहमीच वरचढ असतात. परंतु असे असून देखील बाजारात दर्जालाही महत्त्व आहेच. म्हणूनच शुद्ध मालासाठी लोक थोडा जास्त भाव देण्यासही पुणेकर तयार असतात. यामुळे सुरुवातीपासून नेहमीच दर्जेदार व शुद्ध माल विकून आम्ही विक्रीचे बस्तान बसवले व स्पर्धेतही टिकून राहिलो. मालाची योग्य जाहिरात आम्ही करतो. कारण जाहिरात हा तर प्रत्येक व्यवसायाचा अंगभूत भागच आहे.

या व्यवसायात सुशिक्षित व पदवीधर लोकांचा तुटवडा भासतो याबद्दल श्री. चितळे यांना मनापासून खंत वाटते. आजच्या तरुणांना खाजगी व कष्टाच्या नोकरीत स्वारस्य वाटेनासे झाले आहे याबद्दल श्री. चितळे यांनी, विशेषतः कॉलेज तरुणांबाबत, नापसंती दर्शविली.

आम्हीही कॉलेजातील तरुणच होतो की, आमच्याबद्दल एका सुविख्यात यशस्वी व्यवसायिकाने काढलेले हे उद्‌गार खचितच आमचे विचारचक्र सुरू करण्यास कारणीभूत ठरले. आमचा तरुण एकाबाजूला बेकारीबद्दल आरडाओरड करीत असता दुसऱ्या बाजूस अशा तऱ्हेने का वागतो याचे आम्हांला आश्चर्य वाटले. अत्यंत कष्टाच्या धंद्यात देखील श्री. चितळे यांनी मिळविलेले हे यश तरुणांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल, असा विचार करतच आम्ही श्री. चितळे यांचा निरोप घेतला.

# विश्वासाने धंदा वाढविला!

पुण्याचे लोक जिद्दी व आरंभशूर म्हणून प्रसिद्ध आहेत! पण तरीही त्याला अपवाद आहेतच! काही लोकांनी शून्यातून मोठा पसारा उभारून चिकाटीने मोठा उद्योगधंदा उभारलेला दिसतो आहे. आधीच व्यापारात व उद्योग-धंद्यात मराठी लोक अभावाने आढळतात तेव्हा युनायटेड होजिअरीसारख्या सुविख्यात होजिअरीचे उत्पादक मराठी असल्याचे समजताच आम्ही त्यांची मुलाखत घेण्यास कोणतीही पूर्वसूचना न देता गेलो. पण तरी अत्यंत गड-बडीत असताना देखील त्यांनी आम्हांस सारे सहकार्य दिले व मोठ्या विश्वासाने व कौतुकाने आमच्याशी चर्चा केली.

श्री. देवधर, श्री. अळतेकर व श्री. कुलकर्णी या तीन उत्साही, समवयस्कर व सहाध्यायी तरुणांनी केवळ ५००० रु. च्या भांडवलावर या प्रचंड उद्योगास सुरुवात केली व अवघ्या चार-पाच वर्षांत धंदा नावारूपास आणला. पानशेत प्रलयाने शनिवारपेठेतील मुख्य कारखान्याचे अपरिमित नुकसान झाले. पण जिद्दी व ध्येयवादी देवधर-प्रभृतींनी दुप्पट जोराने पुन्हा धंदा पूर्वस्थितीस आणला. पर्वती औद्योगिक वसाहतीत जागा मिळवली. दोन्हींकडे कारखान्याचा व्याप वाढवून आज महिन्यास १ ते १॥ लाख रुपयांची विक्री होते आहे. आज रोजचे उत्पादन ३०० डझन बनियन्स आहेत (भारतातील सर्वांत मोठ्या 'डॉन मिल्स'मध्ये हे उत्पादन ६०० डझन आहे). मध्यपूर्वेत सध्या कारखान्याने निर्यात करण्यास सुरुवात केली आहे.

श्री. देवधर आमच्या समोरच मधून मधून येणाऱ्या कामगारांना सूचना देत होते, अडचणी सोडवीत होते व त्याच वेळी आमच्या प्रश्नांना उत्तरे देत होते. अशा वाता-वरणात सुरुवातीपासून त्यांनी धंदा कसा वाढविला यावद्दल सांगण्याची आम्ही श्री. देवधर यांना विनंती केली.

देवधर म्हणाले, आम्ही सुरवातीपासूनच मित्र होतो. पुढे १९५६ मध्ये भागीदारीत धंदा सुरू केला. सुरुवातीला बाजारात आम्हाला कोणीच ओळखत नव्हते. त्यामुळे कमी किंमतीला चांगल्या दर्जाचा माल विकल्याशिवाय दुसरा पर्याय नाही हे आमच्या लक्षात आले यावर आम्ही तोडगा काढला—घाऊक व्यापाऱ्यांना माल विकून व त्यांना जबर कमिशन देण्यापेक्षा आम्ही प्रत्यक्ष विक्रेत्यांशीच संपर्क साधला. बाटाच्या दुकानात ज्याप्रमाणे ठराविक छापील किंमतीस माल विकतात त्याप्रमाणे बाजारातील किंमतीवर आमचे नियंत्रण असण्याच्या दृष्टीने एका गावात एकच विक्रेत्यास माल विकण्याचे धोरण आम्ही ठरविले. याप्रमाणे वितरक नेमल्यामुळे थोड्याच दिवसांत आमचा माल स्वस्त व तरीही दर्जेदार असल्याची ख्याती झाली व विक्रीचे बस्तान बसले.

प्रश्न—पण घाऊक व्यापाऱ्याला बगलून किरकोळ व्यापाऱ्याला माल विकण्याच्या तुमच्या पद्धतीमुळे, तुम्हांला भांडवल फार मोठ्या प्रमाणावर अडकवून ठेवावे लागले नाही का?

श्री. देवधर—होय! अशा रीतीने माल विकल्यामुळे आम्हाला किंमत कमी ठेवून स्पर्धेच्या जगात यशस्वी रितीने तोंड देता आले. या पद्धतीमुळे भांडवलाची गुंतवणूक होते, पण तरीसुद्धा होलसेल व्यापाऱ्याच्या कमिशनपेक्षा बँकेचे व्याज कमी पडते! आणि मुख्य गोष्ट म्हणजे सर्वसामान्य गिऱ्हाइकास माल स्वस्त पुरविता येतो. सुरुवातीला थोडी भांडवलाची अडचण पडली पण आम्ही सुरुवातीपासून एकच बँक ठेवली असल्यामुळे बँकेचा विश्वास आम्ही संपादिला व भांडवलाची चिंता चुटकीसरशी दूर झाली.

प्रश्न—आपण उत्पादन किंमत कमी करण्यासाठी काही पावले उचलली असतीलच?

श्री. देवधर—उत्पादन किंमत कमी करण्याचा प्रमुख मार्ग म्हणजे कच्चा माल कमी किंमतीत मिळविणे. यासाठी आम्ही कोईमतूर व इतर भागातील प्रमुख सूतउत्पादकांशीच संपर्क साधला व माल मोठ्या प्रमाणात आणवू लागलो.

प्रश्न—पण मोठ्या प्रमाणात आर्डर म्हणजे भांडवलाचा प्रश्न परत आलाच?

श्री. देवधर—अर्थातच! पण यामुळे चांगला माल कमी किंमतीस मिळतो व आलेल्या मालाच्या तारणावर बँकेकडून कर्जही लगेच मिळते, त्यामुळे भांडवलाचा प्रश्न सुटण्यास मदत होते.

प्रश्न : आपण विक्री वाढ करत असतानाच निर्यात-वाढीच्या दृष्टीने काही प्रयत्न केलेत ?

श्री. देवधर : होय. इकडे अंतर्गत विक्री वाढत असतानाच निर्यातीसाठी प्रयत्न केले. खुद्द ब्रिटनमधून आम्हांला ऑर्डर्स येतात. परंतु बहुधा परकीय ऑर्डर्स फार मोठ्या पुरवठ्याच्या असतात व त्या पुरविण्याची आमची मर्यादा नसते. यामुळे ऑर्डर्स भरपूर पण त्या किती प्रमाणात पुरवायच्या हे आपणच ठरवायचे. घरचे मार्केट सोडून किंवा बिघडवून बाहेर माल पुरविणे आम्हांस योग्य वाटत नाही व त्यामुळे सध्यातरी आस्ते आस्ते निर्यात वाढत आहे. याशिवाय निर्यात व्यापार हा अनिश्चित व्यापार असतो.

प्रश्न : आता थोडे कामगारवर्गाकडे वळूया ! कामगारांच्या प्रश्नावर काही 'कटकटी' निर्माण होतात का ?

श्री. देवधर : आजपर्यंत तरी आम्हांला कामगारांनी काही त्रास दिला नाही. मात्र आम्ही कामगारांचे काम, अनुभव इत्यादी पाहून आपणहूनच पगारवाढ देतो. त्याचप्रमाणे इ. एस. आय. ( कामगार आरोग्य विमा योजना ) प्रॉव्हिडंट फंड, बोनस वगैरेमुळे आम्ही कामगारांना समाधानी ठेवू शकतो. याशिवाय दोन वेळेला मोफत चहा पुरविण्याची व्यवस्था आम्ही केलेली आहे. सहानुभूतीची वागणूक व प्रत्यक्ष संपर्क यामुळे कामगारवर्गाशी बरेच चांगले संबंध ठेवता येतात असा माझा अनुभव आहे.

प्रश्न : सुरुवातीस आपण कोणत्या तऱ्हेचे कामगार घेतलेत ? सध्या आपण कोणते कामगार निवडता ?

श्री. देवधर : सुरवातीस आमच्याकडे थोडे कामगार असल्यामुळे कुशल-अकुशल कामगारांचा प्रश्नच उद्भवला नाही. हल्लीसुद्धा अकुशल कामगारांना प्रशिक्षणाने आम्ही कुशल बनवितो. अर्थात आमच्याकडील काम अर्धकुशल असल्यामुळे कोणीही हे काम शिकू शकते. तुम्ही आता कारखाना बघितलातच, आमच्याकडे बऱ्याच मध्यमवर्गीय स्त्रियाही काम करतात. स्त्रिया या शिवणकामात अधिक efficient असतात व त्याचा Cheap labour या सदरात समावेश असल्यामुळे उत्पादनखर्च कमी होण्यास मदत होते.

प्रश्न : आपले भागिदारांबरोबरचे संबंध कसे आहेत ?

श्री. देवधर : आम्ही सर्व भागीदार समजूतदार असल्यामुळे मतभेद असे कधी होतच नाहीत व सर्वजणच धंद्याच्याच वाढीचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून असल्यामुळे एकमेकांबद्दल नेहमीच विश्वास वाटतो.

प्रश्न : भागीदारीचा धंदा म्हणजे शुद्ध वेडेपणा आहे असा जो गैरसमज आहे तो...

श्री. देवधर : भागीदारीच्या धंद्यास सर्व भागीदार समजूतदार असले म्हणजे काही अडचण येईल असे मला वाटत नाही. Mutual Understanding हे अत्यंत महत्त्वाचे. यासाठी मला वाटते सर्व भागीदार हे सुशिक्षित असावेत. तसेच सर्वांनीच सचोटीने व केवळ धंदा पुढे ठेवून वागणे आवश्यक असते. मला न विचारताच भागिदाराने काही गोष्ट केली तरीही ती धंद्याच्या फायद्यासाठीच आहे असा विश्वास निर्माण झाला पाहिजे.

प्रश्न : आता शेवटचाच प्रश्न विचारतो ! आपल्या या भरभराटीची गुरुकिल्ली काय ?

श्री. देवधरांनी हसतच सांगितले—गुड लक ! सुदैव ! यापलीकडे मी काय सांगणार. माझा दैवावर पूर्ण विश्वास आहे व त्यानेच मला सदैव साथ केली आहे.

मुलाखत संपली. त्यांना धन्यवाद देऊन आम्ही बाहेर पडलो. केवळ पाच हजार रुपयांच्या अल्प भांडवलावर सुरू केलेला हा उद्योग आता किती वाढला आहे ! यात दैवाबरोबर कष्टाचीही सांगड आहे !

# दुष्काळ आणि राष्ट्रीय बँकांची भूमिका

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर हल्ली प्रत्येक सामाजिक-आर्थिक अडचणीच्यावेळी 'राष्ट्रीयीकृत बँका' यांसाठी काय करीत आहेत, असा प्रश्न बहुतेकजणांकडून विचारला जातो. तसेच राष्ट्रीयीकरणानंतर आज तीन वर्षांत बँकांनी कोणत्या दिशेने वाटचाल केली आहे. सध्या ज्या राष्ट्रीयीकृत बँका असतात त्या मराभर शाखा काढत आहेत, त्यामागचे अर्थकरण प्रत्यक्ष एखाद्या राष्ट्रीयीकृत बँकेच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यास प्रत्यक्ष भेटूनच मिळावे यासाठी आम्ही डॉ. एम्. व्ही. ऊर्फ वसंतराव पटवर्धन, बँक ऑफ महाराष्ट्रचे जॉईंट असिस्टंट कस्टोडियन यांना जाऊन भेटलो.

त्यांच्याशी झालेल्या चर्चेत आम्हांस बरीच उद्बोधक माहिती मिळाली. प्रथमतः राष्ट्रीयीकृत बँकांनी दुष्काळ ग्रस्तांसंबंधी काय कार्य केले आहे याबद्दल आम्ही डॉ. पटवर्धन यांना प्रश्न केला. डॉ. पटवर्धनांनी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले की बँकांचे दुष्काळाबाबतचे कार्य व सरकारचे दुष्काळाबाबतचे कार्य हे खूपच भिन्नस्वरूपाचे आहे. तसेच बँकांनी दिलेले पैसे व सरकारने दिलेले पैसे यांत आपण भेद केला पाहिजे. बँका या ठेवीदारांचे पैसे घेऊन ते लोकांस कर्जाऊ देत असतात म्हणजेच या सर्व आर्थिक उलाढालींतून आपल्या भागधारकांसाठी नफा मिळविण्याचा प्रयत्न करीत असतात. काही झाले तरी बँक कर्ज म्हणूनच रक्कम देणार. फारतर कर्जाची मुदत व व्याजाचा दर याबाबत बँक सवलती देऊ शकेल. पण उद्या जर कोणी वृद्ध बैल जगविण्यासाठी अथवा भाकड गाय मरू नये म्हणून पैसे मागितले तर मात्र बँक अशासाठी पैसे देऊ शकणार नाही. परंतु जर विहीर खणण्यासाठी अथवा ट्रॅक्टर घेण्यासाठी कोणी पैसे मागितले तर ते आम्ही नक्की देऊ. यात सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे बँकांचा पैसा कर्जाऊ असतो, तो परत येणे महत्त्वाचे आहे. अन्यथा बँकच बुडेल. आज दुष्काळाला मदत म्हणजे आम्ही ९ लाख रुपयांचे कर्ज विद्यार्थ्यांना अत्यंत कमी व्याजाने दिले आहे. फक्त शे. ६% व्याज आम्ही घेतो. याचा अर्थ आम्ही जे पैसे १०% किंवा १२% व्याजी दिले असते त्यातील ६% व्याजावर आम्ही पाणी सोडले आहे. हीच आमची दुष्काळग्रस्तांना मदत. आही फारतर कमी व्याज घेऊ शकू. विनव्याजीसुद्धा देऊ. परंतु आमच्या मदतीला नकीच काही मर्यादा राहाणार. आम्ही ठेवीदारांकडून पैसे घेऊन तेच दुष्काळग्रस्तांना देणार.

साहजिकच आम्ही प्रश्न विचारला "आपण म्हणता त्याप्रमाणे आपल्या बँकेच्या मर्यादा कोणत्या ! आपण कशा तऱ्हेने या आपत्तीत मदत करावयाचे ठरविले आहे !"

डॉ. पटवर्धन म्हणाले, "मी सुरवातीलाच सांगितल्याप्रमाणे आमची मदत मर्यादित असेल. परवाच माणेकशांनी सांगितले आहे की "सैन्य आपत्तीत जरूर मदत देईल, परंतु हरघडी सैन्याकडूनच सर्व कामे करू घेऊ म्हणाल तर जमायचे नाही. ती एक राखीव शक्तीच राहिली पाहिजे." तसेच आमचे आहे. नैसर्गिक आर्थिक आपत्ती नेहमीच येत राहाणार. यासाठी प्रत्येक वेळी बँकेकडून मोठ्या प्रमाणात मदतीची अपेक्षा करणे बरोबर होणार नाही. आम्ही दर वेळी मदत नकीच करू. कारण अखेरीस राष्ट्रीयकरण झालेली बँक म्हणजे तुमचीच बँक असते. परंतु आमचे एक पथ्य पाळणे आवश्यक आहे. आम्ही फक्त उत्पादक कामांनाच कर्जाऊ रक्कम देतो. उदा. विहीरी खणणे, नाला बंडींग, छोटी धरणे, कालवे, लिफ्ट इरिगेशन अशा सर्व योजनांना आम्ही सवलतीने कर्ज देऊ. दुसऱ्या शब्दांत सांगायचेच तर बँक फक्त तारणावरच कर्ज देऊ शकेल."

आता आमच्या मनात असा प्रश्न उद्भवला की आता जी परिस्थिती उद्भवली आहे ती कशामुळे ! याला आधीच उपाययोजना करता येणे अशक्य होते का !

यावर डॉ. पटवर्धनांचे असे मत दिसले की, आपल्याकडे ट्रेनिंग कशाशी खातात हे आता कुठे समजू लागले आहे.

पृष्ठ ६१ वर पाहा

# विद्यार्थि-विद्यार्थिनींची सर्वांगीण पाहणी



१९७०-७१ पासून ही पाहणी करण्यात येत आहे. त्याचे हे तिसरे वर्ष आहे. या वर्षी म्हणजे १९७२-७३ मध्ये महाविद्यालयाचे जे विद्यार्थी साहित्य विज्ञान व वाणिज्य शाखेच्या द्वितीय वर्षात शिकत आहेत त्यांची पाहणी करण्यात आली.

ही पाहणी खालील मंडळाद्वारे झाली—

अध्यक्ष – प्राचार्य मो. भा. लिमये

कार्याध्यक्ष – प्रा. प. स. चिटपुटकर

सदस्य – प्रा. श्री. दा. संगोराम, प्रा. अ. लु. पाथरे

या पाहणी मध्ये विचारल्या गेलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांना जी उत्तरे विद्यार्थ्यांकडून मिळाली त्यांच्या आधारे काही निष्कर्षवजा माहिती हाती आली.

(१) साहित्य विभागात एस. एस. सी. मध्ये प्रथम श्रेणी मिळालेल्या विद्यार्थिनींचे प्रमाण मुलांपेक्षा जास्त होते. मात्र पी. डी. व एफ. वाय. मध्ये ही श्रेणी घसरलेली दिसते. द्वितीय श्रेणीमध्ये मुलींपेक्षा मुलांच्या बाबतीत सातत्याचा गुण दिसून येतो. पी. डी. मध्ये दोघांचे प्रमाण साशे होते. परंतु एफ्. वाय्. मध्ये द्वितीय श्रेणीच्या मुलांची संख्या मुलींपेक्षा जास्त आहे.

विज्ञान शाखेत मुलांच्या बाबतीत एस्. एस्. सी. ते 'प्रथम वर्षा' पर्यंत प्रथम व द्वितीय श्रेणीचे प्रमाण टिकून राहिलेले दिसते. पदवीपूर्व वर्षापर्यंत द्वितीय श्रेणीत कुणीही नव्हते. प्रथम वर्षात अगदी अल्प प्रमाणात द्वितीय श्रेणी मिळवणारे विद्यार्थी दिसतात.

वाणिज्य-शाखेत विद्यार्थी-विद्यार्थिनींचे प्रथम श्रेणीचे प्रमाण टिकून राहिलेले नाही. पण द्वितीय श्रेणीचे प्रमाण तीनही वर्षात टिकून राहिले आहे. एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ही स्थिरता मुला-मुलींत सारखीच टिकून राहिलेली दिसते.

शानशाखेच्या निवडीबाबत असे आढळले की वाणिज्य व विज्ञानशाखेकडील बहुतेक सर्व विद्यार्थ्यांना आपली निवड बरोबर आहे असे वाटते. मात्र साहित्य शाखेकडील १५% विद्यार्थ्यांना आपली निवड चुकली आहे असे आता वाटत आहे.

एस्. एस्. सी. मधील यशानुसार मुलामुलींनी पदवीपूर्वच्या वर्षांकाठी यशावद्दलची आपली अपेक्षा बरीच उंच ठेवली होती. परंतु प्रथम वर्षाच्या अवस्थेपर्यंत आल्यानंतर त्यांना आपल्या अपेक्षेप्रमाणे यश मिळालेले दिसत नाही. या फरकामागे अभ्यासक्रमाचा विस्तार व जागा-पुस्तके इत्यादींची गैरसोय ही प्रमुख कारणे असल्याचे दिसून आले.

आपले यश अधिक उज्ज्वल करण्यासाठी विद्यार्थी अन्य कोणते पूरक उपाय योजतात यासंबंधी पाहता तीनही शाखांत सर्वसाधारणपणे प्रश्नपत्रिका सोडविणे व स्वतःची टिपणे तयार करणे यांवर अधिक भर दिसला. त्याखालोखाल विद्यार्थी ग्रंथालयाचा उपयोगही करून घेतात असे आढळून आले.

१९७३-७४ साहित्य-पदवी-वर्षासाठी साहित्य शाखेकडील ५०% विद्यार्थि-विद्यार्थिनींनी अर्थशास्त्र हा विषय निवडला असून त्याखालोखाल राज्यशास्त्र व मराठी आणि त्याच्याही खाली मानसशास्त्र व इंग्रजीचा क्रमांक लागतो. मात्र या निवडीचे कारण 'आवड' हेच आहे असे दिसून आले. भविष्यकाळाच्या दृष्टीने निवड झाली आहे असे दिसत नाही.

# नोबेल पारितोषिक विजेते

हेन्रीच बोएल

१९७२ चे **वाङ्मयाचे** नोबेल पारितोषिक हेन्रीच बोएल या जर्मन साहित्यिकास मिळाले. त्याच्या असाधारण व्यक्तिचित्रणकौशल्याने जर्मन वाङ्मयास नवचैतन्य प्राप्त झाले म्हणून सात लाख तीन हजार रुपयांचे हे पारितोषिक त्यास देण्यात आले आहे. १९२९ मध्ये थॉमस मॅन या जर्मन साहित्यिकास पारितोषिक मिळाले होते. त्यानंतर इतक्या वर्षांच्या कालावधीनंतर बोएल यास हा सन्मान लाभत आहे. बोएल हा आजच्या पूर्व व पश्चिम जर्मनीतला सर्वांत यशस्वी लेखक समजला जातो. त्याच्या पुस्तकांची जगातल्या प्रमुख अशा १७ भाषांत भाषांतरे झाली आहेत. यापूर्वी त्यास त्याच्या अनेक कृतींबद्दल पारितोषिके मिळाली आहेत. त्याच्या कृती ह्या जशा उच्च कलात्मक दर्जासाठी प्रसिद्ध आहेत, तसेच, एक अव्वल दर्जाचा सामाजिक जाणीवेचा लेखक म्हणूनही त्याला आज फार महत्त्व आहे.

डॉ. क्रिश्चन बी. एन्फीन्सन  डॉ. विल्यम एच्. स्टाइन  डॉ. स्टॅन्फोर्ड मूर

१९७२ सालचे "**रसायनशास्त्र**" ह्या विषयाचे नोबेल पारितोषिक ह्या तीन अमेरीकन् शास्त्रज्ञांमध्ये त्यांनी केलेल्या "एन्झाईम्स"च्या रचनेच्या—विशेषतः पेशींमुळे होणाऱ्या प्रक्रियांना साहाय्य करणाऱ्या "रिबोन्युक्लिज"च्या—अचूक विश्लेषणाबद्दल विभागून, अर्धे डॉ. एन्फीन्सन यांस व राहिलेले अर्धे डॉ. मूर व डॉ. स्टाइन यांजमध्ये विभागून देण्यात आले आहे.

डॉ. जॉन बारडीन  डॉ. लिआन कूपर  डॉ. जॉन श्रायफर

१९७२ सालचे पदार्थविज्ञानाचे नोबेल पारितोषिक तीन अमेरिकन वैज्ञानिकांना विभागून देण्यात आले आहे. 'अतिवाहकता' ( Superconductivity ) यासंबंधीच्या सिद्धांताची मांडणी करण्याबद्दल हे पारितोषिक त्यांना मिळाले आहे. काही धातूंचे तापमान निरपेक्ष शून्याच्या जवळपास आले असता त्यांचा विद्युतरोध ( electrical resistance ) अचानक नाहीसा होतो. या घटनेला अतिवाहकता असे म्हणतात. इलिनॉइस विद्यापीठातील ६४ वर्षे वयाचे डॉ. जॉन बारडीन, ब्राउन विद्यापीठातील ४२ वर्षे वयाचे डॉ. लिऑन कूपर व पेन्सिल्व्हानिया विद्यापीठातील ४१ वर्षे वयाचे डॉ. जॉन श्रायफर हे तीन पारितोषिक विजेते होत. एकाच क्षेत्रामध्ये केलेल्या संशोधनाबद्दल दुसऱ्यांदा पारितोषिक मिळविणारे डॉ. जॉन बारडीन हे एकमेव वैज्ञानिक आहेत. १९५६ साली ट्रान्झिस्टरच्या शोधाबद्दल देण्यात आलेल्या पदार्थविज्ञानाच्या नोबेल पारितोषिकाचे डॉ. बारडीन हे एक मानकरी होते.

वैद्यकशास्त्रातील पारितोषिक डॉ. रॉडने पोर्टर या ब्रिटिश व डॉ. जेराल्ड एडेलमान या अमेरिकन शास्त्रज्ञांमध्ये विभागण्यात आले. दोघांनीही स्वतंत्र रीतीने शरीराच्या रोगप्रतिकारक शक्तींचा अभ्यास करुन मौलिक सिद्धांत प्रस्थापित केले आहेत. कर्क-रोगासारख्या दुर्धर रोगांवर या नव्या संशोधनामुळे परिणामकारक उपाययोजना यापुढे करता येतील व तो रोग आता फार मोठा असाध्य स्वरूपाचा राहणार नाही.

डॉ. एडेलमान हे ४३ वर्षांचे असून न्यूयार्क येथील रॉकफेलर विद्यापीठात जीवशास्त्रज्ञ आहेत.

डॉ. जेरल्ड एडेलमान




# आम्ही NCC कँपला जातो

## जीव माझा जडला

पंढरीनाथ निंबाळकर

खरोखर भूतकाळातील आठवणी ह्या चित्तथरारक आणि मनोरंजक असतात. त्या आठवणींची ऊब मोठी आल्हाददायक असते !

मला अद्यापसुद्धा तो दिवस स्पष्ट आठवतो. तीं रविवारची रम्य सकाळ होती. बरेच दिवस आम्ही कँपबद्दल ऐकत होतो. त्यामुळे बऱ्याच निरनिराळ्या कल्पना मनात ठाण मांडून बसल्या होत्या. त्यासाठी आम्ही आठ दिवसांची जंगी तयारी केली होती. इतकी की, आमच्या लग्नाच्या वेळीसुद्धा इतकी करावी लागेल असे आम्हांस वाटत नाही. आम्ही कँपमध्ये काय घडणार याबद्दल फार उत्सुक होतो ! आमची गाडी सासवडमार्गे लहानमोठ्या वळणांना व चढउतारांना पार करत भरधाव वेगात थोड्याच वेळात सासवड गावापासून एक फर्लांग दूर थोड्याशा उंचीवर येऊन पोचली व आम्ही जेव्हा त्या एकाकी माळरानावर पाय ठेवला त्याक्षणी माझ्या सर्व एन. सी. सी. कँपबद्दलच्या कल्पना घुळीस मिळाल्या आणि चुकल्या चुकल्या सारखे वाटू लागले. कँप म्हणजे पुण्यामध्ये असणाऱ्या लष्कर भागाप्रमाणे रम्य परिसर असावा असा माझा अंदाज होता. पण प्रत्यक्षात वेगळाच अनुभव आला. त्या एकाकी माळरानावर रांगेत तंबू उभारण्यात आले होते. कँडेट-तंबू, ऑफिसर्स तंबू, ऑफिस, दवाखाना, मेस, हेडक्वार्टर्स इत्यादी, ह्या सर्वांची मांडणी त्या माळरानावर एखाद्या ऑफिशीयल पद्धतीने केलेली होती. आमची वानरसेना त्या तंबूमध्ये घुसली व त्या सर्व तंबूंच्या पुढे डेकोरेशन करून थोड्याच काळात त्या उदास माळरानाचे सुंदर बागेत रूपांतर केले.

एकंदरीत दिनक्रमावरून एन. सी. सी. कँप म्हणजे प्रत्यक्ष लष्करी जीवन जगण्याची सुवर्णसंधी होय अशी माझी भूमिका झाली. आमचा दिनक्रम हा जितका आकर्षक तितकाच दगदगीचा होता. सक्त कवाईत, दिवसभर बांधल्या सारखे शिस्तीचे कार्यक्रम आणि लष्करी शिक्षणाच्या नव्या जाणिवा यांचे एक नवेच दर्शन येथे आम्हाला घडले. आम्हांला लढाईबद्दल खूप माहिती मिळत होती आणि त्याबरोबरच लढाईबद्दल असणाऱ्या खुळ्या कल्पना पाठमोऱ्या होत होत्या. आम्ही भारताचे भविष्यकाळातील नवजवान ह्या नात्याने सर्व गोष्टी आत्मसात करत होतो. जेव्हा दिवसभराच्या श्रमाने थकून जात असू त्यावेळी आम्ही काही विनोदी मित्र कॉलेजमधील आमच्या मित्र-मैत्रिणींच्या नकला करून थकलेल्या जीवांना हास्याचे सुखद क्षण देत असत. कधी कधी आम्हांला गार्दची ड्युटी करावी लागत असे. तेव्हा आम्हाला खूप मौज वाटे. आम्ही हातामध्ये रायफल घेऊन तोऱ्यात कँपाउंडच्याभोवती फिरत असू. अशा प्रकारे इतर गोष्टींबरोबरच आम्हाला 'वॉचमन'च्या कामाचासुद्धा अनुभव मिळत होता.

आमच्या कँपमधील दुसरा अवर्णनीय प्रसंग म्हणजे पुरंदरचा हल्ला. तो प्रसंग आठवला की सर्व सृष्टीसौंदर्य डोळ्यासमोर उभे राहते आणि नेहमी सारस बागेत दिसणारे सृष्टीसौंदर्य त्यापुढे फिके वाटू लागते. सुरेख अशी संध्याकाळ होती. सूर्यनारायण दिवसभराच्या कामाने थकल्यामुळे विसाव्यासाठी क्षितिजाकडे भरधाव वेगात चालला होता. सोनेरी किरणांमध्ये पृथ्वीदेवता न्हाऊन निघाल्यासारखी दिसत होती. गुरे डोंगराच्या उतरणीवरून उतरत होती. अशाप्रकारच्या सृष्टिसौंदर्याचा आस्वाद घेत आमची वानरसेना करत भरधाव वेगात पुरंदरकडे आगेकूच करत होती.

गोड्याच वेळात मोठ्या पराक्याने दगडधोंडे व काटेरी झुडपे चुकवत आम्ही जेव्हा गड चढून आलो होतो तेव्हा मात्र आमच्यामधील काही जवानांचे चेहरे पाहण्यासारखे झाले होते. आता अंधार वाढत चालला होता. त्या भयाण अंधारातून थंडीने कुडकुडत शेवटी आम्ही एका एन. सी. सी.च्या ऑफिसमध्ये आश्रय घेतला. दुसऱ्या दिवशी आम्ही लौकरच फायरिंग संपवून आमच्या छावण्याकडे परतलो!

कॅंपची पुनः पुनः आठवण करून देणारा असा उल्लेखनीय व चित्तथरारक प्रसंग म्हणजे आमचे ते डेमॉन्स्ट्रेशन. ते डेमॉन्स्ट्रेशन म्हणजे लढाईची छोटीशी कल्पनाच देणारे प्रात्यक्षिक होते. कॅंप परतण्याचा तो दिवस होता. आकाशामध्ये काळ्याकुट्ट ढगांची गर्दी दिसत होती. त्यांतील काही चुकलेले भुरकट ढग भोवतालच्या निळ्या डोंगरांना चिकटल्यासारखे दिसत होते. अशा ह्या झाकाळलेल्या सायंकाळी आमचे डेमॉस्ट्रेशन सुरू करण्यात आले होते. आमचे हे डेमॉस्ट्रेशन पाहण्यासाठी गावातील आबालवृद्ध जमले होते. डेमॉस्ट्रेशनमध्ये आनंदाने बेहोष झालेले जवान खोट्या गोळ्यांवर आवेशाने ताव मारून डोंगराच्या कड्याकपारीतून आवाज घुमवत होते. धुराचा पडदा सुद्धा करण्यात आला होता. फायरिंगचे चित्तथरारक आवाज आणि धुरांचे लोट यामुळे योड्याच वेळात वातावरणात भीषणता निर्माण झाली. आम्हाला मात्र खऱ्याखुऱ्या लढाईचा साक्षात्कार होत होता.

## अगदी धन्य धन्य वाटले!

**डी. एच. एरंडे**

विद्यार्थी जीवनात चारित्र्याचा विकास करावयाचा असेल, अंगी जर शिस्त बनावयाची असेल, विद्यार्थी जीवनाच्या उत्तुंग शिखराचा कळस गाठावयाचा असेल आणि मानाने जीवन जगावयाचे असेल तर ते एन्. सी. सी. द्वारे साध्य होऊ शकते. एन्. सी. सी. मुळे विद्यार्थीमन हे निर्भिड काटक, दणकट बनते व जीवनातील एका उत्तुंग शिखरावर आरूढ होऊन ते मानाने डोलत असते. ह्याच आकांक्षेपोटी मी एन्. सी. सी. त दाखल झालो होतो!

आमचा कॅंप १२ दिवसांचा होता. तेथे आम्हांला लष्करी युनिटमध्ये राहावे लागले. एकदा आत शिरले की बाहेर पडता येत नाही. आमच्या युनिटचे लोक हे पंजाबी, गुजराती, उत्तरप्रदेशातील होते. त्यांची मातृभाषा हिंदी. त्यांनी आम्हांला युद्धाचा सर्व इतिहास सांगितला. सकाळी ६ ते ७ पी. टी. नंतर ८ ते १२ कवायती यांमुळे पोट पाठीला जाऊन मिळे. ते पूर्वस्थितीला आणण्यासाठी १ ते २ वाजेपर्यंत जेवणाचा कार्यक्रम चाले. सांगावयाचे म्हणजे आम्ही घरी जितके जेवण घेत होतो त्याच्या दुप्पट तिप्पट जेवण आम्ही तिथे घेत होतो. त्यावेळी आमची भूक राक्षसी बनली होती. जेवणाचा कार्यक्रम उरकल्यावर ३ ला थोडी विश्रांती घेतो न घेतो इतक्यात शिटी वाजे व संध्याकाळी ६ पर्यंत आम्ही निरनिराळे खेळ खेळत असू. याखेरीज पिकेटिंग, लाइनडयूटी वगैरे अनेक गोष्टी कराव्या लागत!

याशिवाय आम्हाला पुष्कळ सुखसोयीही होत्या. आम्हांला तेथे चित्रपट दाखविण्यात आला. फायरिंगसाठी पुरंदरवर जावे लागले. पुरंदरवर आमचे ३०३ चे फायरिंग झाले. शिवाजी महाराजांसाठी स्वतःच्या प्राणाची आहुती देणाऱ्या मुरारबाजीचा पुतळा आम्ही साभिमान पाहिला. त्याच्या दर्शनाने आमच्या शूर पूर्वजांची आठवण आम्हांला झाल्याखेरीज राहिली नाही. शेवटचे दिवशी शिवशाहीर ब. मो. पुरंदरे यांचे भाषण झाले. मुरारजीच्या पराक्रमाचे त्यांचे वर्णन मी केवळ कानांनी ऐकत नव्हतो तर मनाने जणू शिवकाळात गेलो होतो! मला साऱ्या अनुभवाने अगदी धन्यधन्य वाटले!

## दिवाळीचे फटाके गोड लागेनात!

**स ती श चं द्र कु ल क र्णी**

जीवनात एकदा तरी काशीयात्रेला जाऊन पदरी पुण्य बांधावे हा पौराणिक रिवाज. त्या रिवाजाप्रमाणे अनेक जणांनी काशी-रामेश्वर मात्रा करून पदरी पुण्य बांधले. परंतु मला वाटते ह्या ऐवजी जीवनात एकदा तरी 'N.C.C. च्या कॅंपला जाऊन यावे व N. C. C. कॅम्पचा अनुभव घ्यावा, असा उपदेश सर्व तरुणांना केल्यास जास्त श्रेयस्कर

ठरेल. अर्थात पूर्वी काशीला पायी जाऊन परतण्यात जे 'थ्रिल' होते त्यापेक्षा किती तरी जास्त 'थ्रिल्स' N. C. C. च्या कॅम्पचा अनुभव घेण्यात आहे असे मला वाटते. N.C.C.च्या द्वितीय वर्षात पदार्पण करूनही N.C.C. चे खऱ्या अर्थाने पाणी न चाखलेल्या अस्मादिकांनी N. C. C. च्या कॅम्पला जाण्याचा निर्धार केला. 'नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्ने' ह्या म्हणीप्रमाणे बऱ्याच अडचणी उपस्थित झाल्या. तरी देखील सर्व अडचणींवर मात करून आमची तयारी बव्यत झाली. निदान ह्या प्रसंगाने तरी वर्षारंभी मिळालेल्या N. C. C. च्या पोषाखाला पाणी लागले! कंपनीचे बरेच जण येणार नाहीत असा माझा तर्क होता. परंतु माझ्या तर्कावर पाणी फिरविण्या करीताच की काय, कॅम्पला आपल्या कंपनीतील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित राहिले. शत्रुघ्न सिन्हा, राजेश खन्नाच्या काळात N. C. C. बद्दलचे प्रेम इतके कसे झटू चालले आहे असे वाटल्यावाचून राहिले नाही.

अर्थात राजेश खन्नाच्या काही नातलगांनी झाडावरून पाडलेल्या चिंचा, पेरू खाण्यात; मळ्यातून मोहून आणलेला ऊस खाण्यात; तर काहींनी गप्पागोष्टीत, तर काहीजण निद्रादेवीची आराधना करण्यात वेळ घालविला तर त्यात नवल कसले? ही मंडळी अर्थात फार थोडी. दिवसभरच्या दगदगीने नाष्ट्याला जे काही मिळे ते पोटाच्या कोपऱ्यात कुठंतरी बाऊन बसे. त्यामुळे एकदा खाऊन थाळी धुऊन, पुन्हा 'प्रथमच आलो' ह्या अविर्भावात अनेक जणांनी तो 'प्रसाद' अनेक वेळा खाल्ला व पचवलाही. दुपारचे जेवण व रात्रीचे जेवण ह्याही बाबतीत हाच प्रकार!

कॅम्पमधील स्पर्धांच्या बाबतीत म्हणाल तर सर्व स्पर्धांत आपण हिरीरीने भाग घेतला. परंतु 'आपल्याला बक्षीस मिळणार नाही' हे गृहीत धरूनच काही कॅडेटस प्रयत्न करीत असल्याने परिणाम अपेक्षितच घडला. लाईन ड्रेसींग व ड्रिल ह्या मुख्य स्पर्धात तर 'बोऱ्याच' उडाला. बॅनेट फायटींगच्या स्पर्धेत आपण चांगली तयारी दाखवली असली तरीदेखील आपणास बक्षीस मिळू शकले नाही. ह्यात बक्षिलेबाजीचा भाग नसला तर दुर्दैवाचाच भाग समजावयास हरकत नाही. Best कॅडेटच्या स्पर्धेसाठी मी व दुसरा कॅडेट उतरलो होतो. परंतु आमच्यापेक्षा मोठे, तीनचार वर्षांचा अनुभव असलेले व N.C.C. मध्ये लोणच्याप्रमाणे मुरलेले मुरब्बी आम्हाला Best Cadetचे बक्षीस कसे बरे मिळवून देतील. ह्या वर्षी नसले तरी पुढल्या वर्षी कॅम्पला आपली कंपनी निदान २ ते ३ बक्षिसे मिळवून आणील यात वादच नाही.

कॅम्प सुरू होताच काही जणांना घरची ओढ लागणे स्वाभाविक आहे. विशेषतः तेथील जेवण, नेमून दिलेला दररोजचा कार्यक्रम ह्यामुळे माहेरवाशीणीसारखी अवस्था होते.

एकच अविस्मरणीय अनुभव सांगतो. आमची २४ तासांची पुरंदरयोजना. शनिवारी दुपारी ३ वाजता निघून रविवारी सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या मोहिमेत फारच मजा आली. पुढून होणाऱ्या हल्ल्याला तोंड देत, शत्रूला पकडण्याच्या प्रतियोजना करत आम्ही जोशात पुरंदरकडे कूच करीत होतो. ह्यात सीमेवरील शिक्षण देण्याच्या उद्देशाशिवाय सर्वांना पुरंदरकडे बळद कूच करावयास लावणे हाही N. C. C. अधिकाऱ्यांचा हेतु होता. उत्साहाने भरलेल्या आमच्या कंपनीने शत्रूला घेरून पकडले व त्याचबरोबर पुरंदर किल्ला सर्वप्रथम सर केला हे येथे नमूद करणे मला अभिमानास्पद वाटते. दुसऱ्या दिवशी तेथे झालेले ३०३ गोळीचे फायरिंग जन्मभर लक्षात राहील! त्या गोळीचा होणारा आवाज व तो पुरंदरच्या दऱ्याखोऱ्यांत घुमून उत्पन्न होणारा प्रतिध्वनी अजूनही कानावर रेंगाळत आहे. समारोपाप्रसंगी श्री. ब. मो. पुरंदरे ह्यांच्या रसाळ, गोड, मोहक, चित्तवेधक आणि तितक्याच चित्तथरारक भाषणाने मन पुलकित झाले.

कॅम्पमध्ये बाकी काही नाही झाले तरी एकमेकांच्या ओळखीपाळखी वाढल्या. कणखरपणा, मिळूनमिसळून राहाण्याची तसेच सामावून घेण्याची वृत्ती व सहकार्याची वृत्ती ह्यात वृद्धी झाली. आपल्याच कंपनीचा एक तंबू पडला असता सर्वांनी तो उभारण्यास मदत केली ह्यावरून आपणाला माझ्या म्हणण्याची प्रचीती येईल. अनेक वड्यांनी कॅम्पला भेट दिली. तसेच कंपनी कमांडिंग ऑफिसर्सनी सांगितलेल्या १९४२ च्या लढ्यातील आठवणी मनोरंजक वाटल्या. तसेच 'कॅम्पफायरची' मजा काय वर्णावी. असा तऱ्हेने अनेक बरेवाईट अनुभव घेऊन आम्ही परतलो. एका बाजूला एकमेकांच्या ताटातुटीचे दुःख होते तर दुसऱ्या बाजूला घरी जाण्याचा आनंद होता. कारण दुसऱ्या दिवशीच दिवाळी होती कॅम्पमधल्या गोळीबाराच्या थ्रिलमुळे फटाक्यांत काही अर्थ वाटेना! त्यामुळे आम्ही फटाके वाजविले नाहीत. तेवढीच एक बचत! □

# कवी विनायक

राष्ट्रीयतेचे महन्मंगल स्तोत्र

१८८५ ते १९२० हा कालखंड सर्वच क्षेत्रांत क्रांती घडविणारा कालखंड म्हणून इतिहासात नोंदविला गेला आहे. राजकारण, समाजकारण आणि साहित्य यांतील विचारधारांमधील पारंपारिकता आणि अनुयायित्व नष्ट झाले होते. चेतनाहीन, थंड गोळा असलेला महाराष्ट्र हळू हळू जागृत होत होता. परवशतेची केवळ खंतच नव्हे तर



# Nobel Prize : Chemistry-1972

M. K. Kanojia

Nobel awards in Chemistry in 1972 went to three American Scientists,- Christian B. Anfinsen of the National Institute of Health' Stanford Moore and William H. Stain of Rockfeller University. They were the first to research the chemistry and structure of an Enzyme.

Moore and Stein, their names have been closely linked over the years. They worked together and contributed a series of discoveries, beginning with the development of technique for Aminoacid Analysis. This made easy for subsequent determinations of protein sequences. They have also worked on ' ion exchange chromatography ! Their most significant contribution in the early stages was their automatic amino acid analyser.

In 1960 Moore and Stein used their analyser to determine the amino acid sequence of Ribonuclease an enzyme that splits Ribonucleic Acid ( R.N.A. ) into its subunits ' Ribonuclease ' was ' Insulin. ' They found out the side chains of ' Ribonuclease '. This chain has 124 residues in the total seqence, till then only 41 amino acid chain of the relatively simple protein, Insulin had been determined.

Since 1940 they performed the primary structure of " bovine ribonuclease ". They determined the mode of action of the enzymes, which are long chains of amino acid joined together, remain inactive till they have particular folded shape. On changing in shape they show the property of highly specific and sensitive. The problem was to determine how and why the protein folded itself into the correct shape.

Answer to this problem came from the third prize-winner Anfinsen. He first demonstrated the three dimentional structure of a protein determine by its sequences. In proteins with di-sulphide bonds, the refolding process occur by changing the relative position of many possible pairings. These pairings are occurred untill and unless its corresponding native structure is reached. In case of incorrect pairing mild oxidation conditions helps in the rearrangement of native di-sulphide.

Anfinsen and his co-workers then found the protein part that catalysis the di-suphide exchange and thereby increase the rate of appearance of the active structure of these enzymes. He also studied the synthesis of ' ovalbumin ' in oviduct tissue. He found that the molecules could be, non-covalently gathered and this led to a series of elegant experiment on factors that determine the folding.



# Nobel Prize : Medicine/Physiology

Vivek Marathe

Of the great men of science, who have devoted their lives to the vital studies in various fields of scope for the benefit of human race, Dr. Porter and Dr. Edelman stand foremost. As a reciprocation of their invaluable services towards the well being of mankind, they were awarded the Nobel Prize for Medicine/Physiology for the year 1972.

Of these, Dr. Porter born on 8th Oct. 1917 and educated in Liverpool and Cambridge Universities, worked at the National Instiute for Medical Research at Mill-Hill for over 15 years. Later, he worked as pfizer professor of Immunology at st. Mary's Hopital Medical School. It was here, that he conducted major part of his research. He was named in 1967, the Whitley Professor of Biochemistry at oxford University.

Dr. Edelman born on 1st July 1929, in New-York, received his medical degree of Pennsylvania University in 1954 and Ph. D. from the Rockfeller Institute in 1960. He has served the General Hospital of Massachusets, the Rockfeller Institute where he was ultimately appointed as the Profersor of Biochemistry in 1966. Dr. Edelman is the recepient of Spencer Morris award ( Pennsy lvania Uni. ) and the Elililly Award ( American Chemical Society ) He has carried out intensive research in protein Chemistry, biophysics, ahtibodies and the fluorescence spectroscopy.

Both these Professors– aimed their research at discovering the chemical nature and synthesis of antibodies. Antibodies are a group of blood proteins that play an important role in the Body's defence mechanism against infection and against the development of several diseases Since 1906, many attempts were made so as to know the structure and nature of the antibodies. It was suggested by Pauling, also a Nobel Prize winner, that the interaction between the Antigen [ foreignt molecule ] and the Antibody is possible, as they are complimentary or ' fitted ' together. In 1930, the ' The lock and the key theory ' was put forth; on the same lines.

Since, his days in University, Dr. Porter had set upon the research on Antibodies. In 1950, he showed that Antibodies, in fact were very much similar to the serum proteins and that they could be split up, partially, yet not losing their Antigen combining capacity. Subject of his studies was the Rabbit antibodies.

At the same time, Dr. Edelman, too, was

working on the same subject, but tackled slightly different sources. With Poulik he worked, to arrive at the result that an antibody could be split into components, after the disulphide bonds are broken. The fragments, he obtained were of different sizes, and varied from those obtained by Porter.

Later, Porter repeated the Edelman Experimetn but under such conditions, that enabled to recover the polypeptide chains, insoluble yet active. These were named as A and B chains or as Heavy & light chains. The former contains 446 amino acids and each Light chain comprises 214 amino acids. The Heavy and Light chains come together to form a symmetrical T-shaped molecule of the anti-body. The shape is kept by a number of disulphide bridges. Each of these bridges, contains 60 amino acid residues. One end of each heavy and light chain peptide is a variable Region Remainder of each heavy and light chain in the molecule is a constant Region. It is worth mentioning that body produces diverse types of Antibodies in response to variety of Antigenic challenges. The variable regions of the antibody are presumed to handle the task of Antigenic recognition.



## Virus Versus Virus

N. C. Dudhale

With the passing of years, the known enemies of man have shrunk in size from gigantic monsters of pre-historic times to idisease causing worms, fungi bacteria and finally to viruses. These viruses are so small that they cannot be seen under the highest power of a light microscope. They can be visualised only by electron microscope. The number of these disease bearing viruses ranges to about three hundred. Worse still they often mutate so extensively that no vaccine can protect an individual against all their variants. A virus can remain inert for decades without losing its virulence. It multiplies only when it comes in contact with another host cell. This parasite has central core of genetic matter RNA or DNA. Once it enters the body, the virus is safe from chemicals for a chemical that could kill it would also kill the cell in which it is harboured. It gives it complete impunity to begin its destructive activity. These viruses which enter the host cell multiply rampantly and invade the entire system.

The word virus is of Greek origin and means sap or secretion. Although viral diseases like rabies, poliomyelitis, smallpox and mumps have been described in the

ancient writings. It was only in the beginning of this century that their viral cause was established. By the end of last century, however thanks to microbiologists Louis Pasteur, Robert Koch and others many diseases of man and animals were shown to be caused by bacteria. But the techniques they employed were not uniformly successful. In many infectious diseases the causative agent could neither be seen microscopically nor cultivated in any of the laboratory media. In 1880 Louis Pasteur had a similar experience while working on rabies. But he put the failure to a causative agent which was probably similar in nature to a bacterium but much smaller and hence not visible under ordinary microscopes. These tiny infectious agents were called viruses. The science of viruses has grown rapidly but no effective cure has been found so far for viral diseases.

When two viruses ( different ) are present in single host system, one of them sometimes modifies the cells or tissues of host in such a way that it does not allow second virus to multiply harmful effects. This phenomenon is called as the interference, among viruses. Related as well as unrelated viruses are known to interfere, the dosage and timing are important, There is anolher evidence to show two viruses which are harmful to interfere with each other–to our advantage. More interesting is the instance of a dangerous virus rendered harmless when injected by different routes. When herplex simplex virus ( the cruse of singles in man ) is injected subcutaneously ( under skin ) into rabbits, it produces a severe brain infection with death resulting in the second week. When an intracerebral route is employed, the rabbits die in three to four days, when intracerebral inoculation follows the subcutaneous route by about seven days animals are protected. The two lethal doses thus nullify each other.

The work of greatest significance on interference was achieved by Dr. A Isaacs and Dr. J. Lindenmann of National Institute for Medical Research in England in 1957. They took chorioallantoic member of chick eggs and made fragments of it. They exposed these fragments suspended in a medium to the Enfluenza virus inactivated by heat or ultra-violet rays. It was found that the infected cells of membranes are released into medium and soluble substance which can be transferred to uninfected allantoic cells, This rendered the cells resistant to the fully infectious Enfluenza virus. Isaacs gave the name Interferon to the interfering substance. Recent experiments indicate that interferon acts on the host cell rather than on the infecting virus. A virus does not kill a hermful virus but instigates the host cells against it. The interfering virus enters into the host cell's metabolic activity and inhibits some step in viral synthesis for harmful virus. Interferon is a term for non-viral cellular proteins that inhibits mutliplication of animal viruses.

One of the problem is that striking variation among different viruses in their susceptibility to interferon. The small viruses are most sensitive the intermediates are fairly sensitive while largor are most resistant to interferon. At present we do not know as

to what governs this difference in sensitiuity. The main difficulties in the clinical use of interferon for viral maladies are to produce large amount of active material in human or monkey cells to be sure that it is not toxic to man and to find a convenient site for injection. Some investigators believe that resistance to some viral disease may actually be due to natural production of interferon. in the body itself at a later stage of infection The commonest example is the recovery of individuals from common cold in absence of the specific immunity.

Viruses have caused more human illness than any other agent though man has immunised or adjusted himself to many once fatal viruses. Among the most prevalent diseases caused by viruses are

(1) Acute respiratory infections. The most common ribonviruses cause symptoms of common cold and so far there is no effective vaccine against them.

(2) Measles—An RNA virus causes this disease. Though measles believed to be harmless it can lead to secondary illness like encephalitis, middle ear infection and pneumonia.

(3) German measles—This disease is dangerous to foetus. The unborn babies of stricken mothers have 50% chance of servival and often contracts heart disease, Cataract.

(4) Encephalitis—The mosquito borne virus causing inflammation of brain is transported by bats, rodents, snakes and birds.

(5) Intestinal infections—These viruses often infect the digestive tract but cause damage to other parts, They are extremely dangerous when reach nervous system.

(6) Rabies—At one time it was believed that only dogs are transferers of this disease but bats, fox, many other animals also carry this disease. There is an imperative need for a new vaccine to combat rabies for the two vaccines now use in against this virus have undesirable side effects.

(7) Yellow Fever—The arbovirus that causes this disease damages the kidney and ltiver with the result that kidneys do no pass urine and liver no longer processes blood wastes, The victim also suffers from yellow jaundice.

These are few diseases carried by virus.

Many investigators believe that this interferon is more important than antibodies in fighting viral diseases althouge antibodies play a major role in prevention.

The ultimate weapon against virus may be other viruses. Perhaps a virus could be raised which when transmitted to a victim of virus disease would rob the harmful virus of the enzymes needed for its reproduction—this rendering its harmless virus versus virus would indeed be a thrilling tussle for the good of humanity,

## आवाहन

मुख्य इमारत आणि प्रयोगशाळेच्या रूपाने मॉडर्न महाविद्यालयाच्या उभारणीचा पहिला टप्पा पुरा झाला आहे. यासाठी संस्थेने आतापर्यंत सोळा लाख रुपये खर्च केले आहेत. आता विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनालय, विद्यार्थी-केंद्रे, विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृहे यांच्या उभारणीचा दुसरा टप्पा संस्थेने ताबडतोब हाती घेणे आवश्यक आहे. मुलींच्या प्रशाळेसाठी स्वतंत्र अशा सभागृहाची गरज आहे. किंबहुना संस्थेच्या सर्व शैक्षणिक विभागांना उपयोगी पडेल असे. स्वतंत्र व प्रशस्त सभागृह उभे करणे अतिशय जरुरीचे आहे. प्रशालांसाठी प्रयोगशाळा हव्यातच. या सर्वांसाठी कमीतकमी दहा ते पंधरा लाख रुपयांची गरज आहे.

संस्थेला सध्या बारा लाख रुपयांपेक्षाही अधिक रक्कम देणे आहे. यापैकी पाच लाख रुपये बँकेकडून घेतलेले आहेत व साडेसात लाख रुपये संस्थेच्या हितचिंतकांकडून, विद्यार्थ्यांच्या पालकांकडून मुदतठेवीच्या रूपाने घेतलेले आहेत.

संस्थेच्या साऱ्या हितचिंतकांनी देणग्यांच्या रूपाने संस्थेला हातभार लावून संस्थेच्या वर्धिष्णू उभारणीला मदत करावी अशी विनंती आहे.

वि. भ्रं. ताटके
कार्यवाह
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी


With Best Compliments from :

**Prashant Textorium**

FOR

TEREEN • TERYCOAT • TERYWOOL

SUITING AND SHIRTING

卐

24, Saraswati Vilas Building,
Laxmi Road, POONA 30

You must cultivate Banking Habit For your future life Learn
The Banking Habit with

# BANK OF MAHARASHTRA

● HEAD OFFICE ●

**1177, BUDHWAR PETH, POONA-2**

Your Bank with the personal touch
at your service for years to come.

**C. V. JOAG,**
CUSTODIAN

*With Best Compliments from :*

★

# Wanson ( India ) Private Limited

**CHINCHWAD, POONA-19**

Phone : 58095-Poona
23-Shreepur
(Via. Akluj
Dist. Sholapur)

Grams : Shree : Poona &
Shreepur

# THE
# BRIHAN MAHARASHTRA SUGAR SYNDICATE LTD.

● Regd. & Head Office ●

**980, Sadashiv Peth, Laxmi Road, POONA-30**

★

Factory : Shreepur, Via. Akluj, Dist. Sholapur.

● Manufacturers of ●

## PURE CRYSTAL SUGAR, RECTIFIED & DENATURED SPIRIT AND QUALITY LIQUORS

**This factory has been successfully run on the Capital invested by the middle-class people of Maharashtra and is truly the pride of the Common Class.**

**J. C. AGASHE**
**D. C. AGASHE**
**Joint Managing Directors.**

*With Best Compliments from :*

# NOBLE GARMENTS

482/83 Budhawar. Poona 2

●●●●● Specialist in Babasuit, Manila & Shirts ●●●●●

*With Best Compliments from :*

# GAJANAN HOSIERY

Near Tulshibaug, Poona 2

customer's happiness is our profit !

**Stockist of High class Readymade Cloths and Banians & Underwears.**

**SCHOOL UNIFORMS, BRESSIERES etc.**

**Pro. A. B. SHALGAR**

महाविद्यालयीन पुस्तके व गाइडस्साठी

## न्यू पूना बुक डेपो

अप्पा बळवंत चौक, पुणे-३०



# 'मॉडर्न'-वार्ता

## प्राध्यापकांचे कार्य

**प्राचार्य मो. भा. लिमये**

१. आकाशवाणी पुणे केन्द्रावरून प्रक्षेपित झालेल्या 'स्वातंत्र्यपूर्ण आणि स्वातंत्र्योत्तर काळातील विद्यार्थी' या परिसंवादात भाग घेतला.

२. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या पूर्व प्राथमिक बालदिन समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविले.

३. महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, चिंचवड, पुणे येथे प्रशिक्षणार्थी उमेदवारास व्यवसाय संघटन व व्यवस्थापन या विषयांवर निमंत्रित प्राध्यापक म्हणून ४ व्याख्याने दिली.

४. जमशेदपूर व रांची येथील औद्योगिक प्रकल्पांतील कार्यकर्त्यांशी अल्पचर्चेत कार्यासंबंधी चर्चा व मार्गदर्शन.

५. वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शक व उपयुक्त अशा (कॉमर्स करियर) या मासिकाच्या प्रथम अंकाचे उद्घाटन गरवारे कॉमर्स कॉलेज पुणे येथे केले.

६. पुणे विद्यापीठ व कॉलेज ऑफ् मिलिटरी इंजिनियरिंग खडकी येथे पदव्युत्तर स्तरावर M. B A. Part I साठी निमंत्रित प्राध्यापक म्हणून व्याख्याने घेतली.

७. निमंत्रित प्राध्यापक म्हणून पुण्यात व पुण्याबाहेरील एका महाविद्यालयात M. Com. च्या वर्गासाठी Corporation Finance व Business management या विषयावर व्याख्याने दिली.

८. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा प्रतिनिधी म्हणून महाराष्ट्रराज्य N. C. C. सल्लागार समितीवर नियुक्ती व सहभाग.

९. नाशिक येथील भि. य. क्ष. वाणिज्य महाविद्यालयातील वसतिगृह विद्यार्थी संघटनेच्या वार्षिक दिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून भाषण.

१०. मॉडर्न महाविद्यालयातील माजी विद्यार्थी संघाची स्थापना व त्या संघाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती.

**प्रा. प. स. चिरपुटकर :**

१. पदवी-पूर्व वाणिज्य वर्गासाठी लिहिलेले 'व्यावसायिक गणित' हे पुस्तक पुणे विद्यापीठाने पाठ्यपुस्तक म्हणून मान्य केले.

२. प्रथम-वर्ष शास्त्र वर्गासाठी खालील ५ पुस्तके लिहिली (इतर दोन प्राध्यापकांसह)
   (i) Analytical Geometry
   (ii) Vector Algebra
   (iii) Matrix Algebra
   (iv) Differential Calculus
   (v) Integral Calculus.

**प्रा. मुकुंद महाजन**

१. व्यावसायिक अर्थशास्त्र, भाग २ : पाठ्यपुस्तक (एस्. वाय्. बी. कॉम् साठी, प्रा. पंडित यांच्यासह)

२. रोजगारनिर्मिती हे नियोजनाचे उद्दिष्ट हवे. 'केसरी' २ जुलै, १९७२

३. कमाल जमीन धारणा : विचार आणि आचार —'साधना' २१ ऑक्टोबर, १९७२

४. कमाल जमीन धारणेचा फेरविचार 'फिनिक्स' दिवाळी १९७२

५. दुष्काळी परिस्थितीतील अर्थकारण केसरी–मराठा कृषि–विशेषांक २६ जानेवारी १९७३

६. अर्थशास्त्राचा अभ्यास : का आणि कसा : भाषण आकाशवाणी, पुणे : ७ जुलै १९७२

या शिवाय सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबरच्या 'अमृत' मध्ये उर्दू काव्याविषयीचे लेख आणि हंस, मोहिनी, जिप्सी इ० मासिकांतून व दिवाळी अंकांतून अनेक ललित लेख व विनोदी कथा १९७२–७३ मध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत.

**प्रा. अशोक पायरे**

१. एफ्. वाय्. बी. कॉम साठी व्यावसायिक अर्थशास्त्र, भाग १ हे पाठ्यपुस्तक लिहिले.

**प्रा. श्री. दा. संगोराम**

१. पुणे विद्यापीठ हिंदी विभागाकरिता व्याकरणाचा अभ्यासक्रम नियोजित करण्याकरिता योजिलेल्या उपसमितीवर नेमणूक.

२. 'प्रेमचंद जयंती' निमित्त स. प. महाविद्यालय, पुणे येथे अध्यक्षीय भाषण.

३. मोटलीबाई ट्रेनिंग कॉलेज, पुणे येथे 'संत कबीर' या विषयावर व्याख्यान.

४. आदर्श विद्यालय, पुणे येथे 'हिंदी दिवसा'निमित्त अध्यक्षीय भाषण.

५. 'हसत खेळत हिंदी' पुणे आकाशवाणी केंद्रावर शिक्षण पाठ.

६. 'रोटरॅक्ट' पुणे तर्फे 'शिक्षक व्यवसाय' या विषयावर दहावीच्या विद्यार्थी मेळाव्यात भाषण.

७. ऑब्झर्वेटरी, पुणे येथील प्रथम व द्वितीय श्रेणी सेवकांकरिता 'हिंदी व्याकरण' या विषयावर व्याख्यान.

८. 'हिंदी कवितेतील राष्ट्रीयत्व' या विषयावर 'एकता-दिवाळी अंक' यात लेख.

**प्रा. दत्तात्रय दिनकर पुंडे**

१. 'अत्रे वाङ्मय व्याख्यान माला'मध्ये दोन व्याख्याने. विषय 'आचार्य अत्रे यांची शोकात्म नाटके.'

२. महाराष्ट्र साहित्य परिषदेत, कवी विनायक यांच्या जन्मशताब्दी समारंभात 'विनायकांची कथाकाव्ये' यावर व्याख्यान.

३. राष्ट्र सेवा दल पत्रिकेच्या 'युवकांचे मनोगत' ह्या डिसेंबर १९७२ च्या खास विशेषांकासाठी आचार्य दादा अधिकारी यांची मुलाखत.

४. 'स्वाध्याय व्याख्यानमालेत बालकवींच्या कवितेवर व्याख्यान.

## नव्या प्राध्यापकांचे स्वागत

चालू साली (१९७२–७३) खालील नवीन प्राध्यापक, प्रयोगशिक्षक व इतर सेवक ह्यांची नियुक्ती करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| १. प्रा. एम्. आर. भावे | प्राध्यापक | अकौंटन्सी |
| २. प्रा. सु. ग. दातार | ,, | वाणिज्य |
| ३. प्रा. न. कृ. गोडबोले | ,, | ,, |
| ४. प्रा. प्र. द. पारखी | ,, | कोस्ट अकौंटिंग |
| ५. प्रा. पंढरपूर नारायण | उपप्राध्यापक | मर्केंटाईल लॉ |
| ६. प्रा. व. गो. जोशी | व्याख्याता | इंग्रजी |
| ७. प्रा. अ. पु. फडके | व्याख्याता | गणित |
| ८. श्री. वि. वि. उलुरकर | प्रयोगशिक्षक | भौतिकी |
| ९. कु. ज. क. कुलकर्णी | ,, | जीवशास्त्र |
| १०. श्री. ज. कृ. रानडे | ,, | भौतिकीशास्त्र |
| ११. श्री. रा. ना. देशपांडे | ,, | रसायनशास्त्र |
| १२. श्री. श. के. पोतदार | ,, | रसायनशास्त्र |
| १३. श्री. किरण लागू | शारीरिक शिक्षण विभागप्रमुख | |

## शुभेच्छा

१९७२–७३ साली जून १९७२ पासून खालील प्राध्यापक, व्याख्याते, सेवक महाविद्यालय सोडून गेले. त्यांना आम्ही भावी आयुष्यात सुयश चिंतितो.

| अनु. | प्राध्यापकाचे नाव | | विषय |
|---|---|---|---|
| १. | प्रा. रा. गि. मिजार | उपप्राध्यापक | वाणिज्य |
| २. | प्रा. वा. ग. खाजगीवाले | ,, | मर्केंटाईल लॉ |
| ३. | प्रा. एस्. डी. मेदडकर | व्याख्याता | ॲडव्हान्स अकौंटिंग व ऑडिटिंग |
| ४. | प्रा. सौ. कल्पना बांद्रेकर | व्याख्याता | इंग्रजी |
| ५. | श्री. उ. पां. आपटे | पाठशिक्षक | गणित |
| ६. | प्रा. ए. ए. देशपांडे | व्याख्याता | अकौंटन्सी |
| ७. | श्री. अ. के. सिधये | | शारीरिक शिक्षण विभागप्रमुख |

## प्राध्यापक अभ्यास मंडळ

या वर्षी खालीलप्रमाणे मंडळाच्या बैठकी व चर्चा झाल्या :

| अ. क्र. | बैठक | विषय | प्रमुख वक्ता | अध्यक्ष |
|---|---|---|---|---|
| १ | बुधवार १९ जुलै'७२ | गणिताची विविध अंगे | प्रा. प. स. चिरपुटकर | प्राचार्य एम्. एन् भट, प्रमुख गणित विभाग, आबासाहेब गरवारे महाविद्यालय, पुणे |
| २ | बुधवार २३ ऑगस्ट'७२ | अळिंब–[ फंजाय ] मित्र की शत्रू ? | डॉ. प्रा. अ. के. पांडे | प्रा. एम्. एन्. कामत महाराष्ट्र शास्त्र संशोधन संस्था पुणे |
| ३ | बुधवार २७ सप्टें.'७२ | १९ व्या शतकातील भारताच्या आर्थिक इतिहासाचा एक आढावा | प्रा. म. आ. कुलकर्णी | डॉ. अ. रा. कुलकर्णी प्रमुख, इतिहास विभाग, पुणे विद्यापीठ |
| ४ | सोमवार १६ ऑक्टो.'७२ | विद्यार्थी जगतातील असंतोष | खुली चर्चा | प्रा. न. गो. सुरू |
| ५ | बुधवार १३ डिसें.'७२ | मृत्युंजय युगकवी निराला | आ. श्री. दा. संगोराम | डॉ. आनंद प्रकाश दीक्षित प्रमुख, हिंदी विभाग, पुणे विद्यापीठ. |
| ६ | बुधवार ७ फेब्रुवारी'७३ | आयकर | न. कृ. गोडबोले | श्री. डी. जी. प्रधान आयकर आयुक्त, पुणे |

याशिवाय (१) सापेक्षतावाद व (२) व सत्रान्त खुली चर्चा हे कार्यक्रम संकल्पित आहेत.

वरील कार्यक्रमातील टिपण्यांचे सारभूत अंश संकलन करून पुढे देत आहे.

# गणिताची विविधांगे

प्रा. प. स. चिरपुटकर

पदार्थ-विज्ञान, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र वगैरेसारख्या विविध ज्ञानशाखांत गणिताचे महत्त्व अधिकाधिक प्रमाणात मान्य होऊ लागले आहे. गणित हे ५-७ वगैरेसारख्या संख्या, त्रिकोण वर्तुळ या सारख्या आकृत्या, गती, मापन, तुलना, रचना वगैरे संबंधीचे शास्त्र आहे. या वेगवेगळ्या प्रश्नांच्या स्वरूपावरून गणिताचे प्रामुख्याने दोन भाग पडतात. (१) प्रयुक्त गणित (Applied Mathematics) (२) शुद्ध गणित (Pure Mathematics)

प्रयुक्त गणितात अवकाश-गतिशास्त्र, द्रवातील दाब, ताऱ्यांच्या गती अशा प्रश्नांचा समावेश होतो.

शुद्ध गणितात 'सुसंगत रचना' मिळण्यावर भर आहे. या शास्त्रेचे स्वरूप व त्यामधील प्रमेये सिद्ध करण्याची पद्धती युक्लीडने 'Elements' या ग्रंथात वापरलेल्या पद्धतीप्रमाणे आहे. या ग्रंथात सुरुवातीला बिंदू, रेषा वगैरेंच्या व्याख्या व काही स्वयंसिद्धत्व व गृहीतसत्य (axioms and postulates) दिलेली आहेत. यांच्या आधारे भूमितीतील प्रमेये सिद्ध केलेली आहेत. अलीकडच्या काळात, axioms म्हणजे स्वयंसिद्धत्व मानण्याऐवजी ती गृहीतके (assumptions) मानली जातात. बिंदु, रेषा वगैरे सारख्या पदांच्या व्याख्या देण्याऐवजी ती अव्याख्येय आहेत असे मानणे अधिक सोयीचे झाले आहे. काही अव्याख्येय पदे व काही गृहीतके यांच्या आधारे तर्कसुसंगत प्रमेये मिळवणे असे शुद्ध गणिताचे स्वरूप आहे. शुद्ध गणितातील प्रमेये ही : 'p मध्ये q अभिप्रेत आहे.' (p implies q) अशा स्वरूपाची असतात.

p बदलल्यास q बदलेल. याचाच अर्थ असा की गणितातील प्रमेये ही त्रिकालाबाधित सत्य राहिलेली नसून ती सशर्त असतात. हा एक गणितात मूलभूत फरक झालेला आहे. यामुळे गणित या विषयाचा आसच (axis) पूर्णसत्यापासून (Absolute truth) सुसंगताकडे (Consistency) बदलला गेला.

# अळिंब (फंजाय) - मित्र की शत्रू !

डॉ. अ. के. पांढे

बहुतेक वनस्पती ह्या हिरव्या असतात, त्यांना मूळ, खोड, पान इ. अवयव असतात. परंतु अळिंब ह्या अशा वनस्पती आहेत की ज्यांना वरील अवयव नसतात, त्यांना फुले येत नाहीत, त्यांच्यात हरितद्रव्य (क्लोरोफिल) नसल्यामुळे ते रंगहिन असतात.

अळिंब आकाराने सूक्ष्म असून त्यांची शरीररचना अगदी साधी असते. ते एकपेशीय किंवा अनेकपेशीय असतात. त्यांच्यात हरितद्रव्य नसल्यामुळे ते स्वतःचे अन्न तयार करू शकत नाहीत. ते आपले अन्न कुजणाऱ्या सेंद्रिय पदार्थांपासून (शवोपजीवी) किंवा दुसऱ्या जिवंत वनस्पती किंवा प्राण्यातील अन्नरस शोषण करून (परोपजीवी) स्वतःची उपजीविका करतात. त्यांचे पुनरुत्पादन साध्या पद्धतीने घडून येते.

अळिंब हे आकाराने लहान व साधे असले तरी त्याच्या निरनिराळ्या क्रियामुळे मानवी जीवनात त्यांचे महत्त्व फार मोठे आहे.

अळिंबांच्या काही क्रिया उपयुक्त असतात उदा. प्राणी व वनस्पती यांच्या मृत शरीरावर क्रिया करून आपल्या सभोवतालची घाण नाहीशी करतात. त्यांच्या ह्या क्रियेमुळे जमीन सुपीक बनते. तसेच अळिंबाचा अनेक उद्योगधंद्यात उपयोग होतो. त्यांच्या प्रक्रियेमुळे मद्य, व्हिटॅमिन्स, औषधे, अँटिबायोटिक्स, सेंद्रिय आम्ले इ. मिळतात. तसेच त्यांचा अन्न म्हणूनही उपयोग करता येतो, किंवा ब्रेड, चीझ तयार करताना होतो.

काही अळिंब मात्र अत्यंत उपद्रवी असतात. त्यांच्यामुळे महत्त्वाच्या वनस्पतीमध्ये, प्राण्यांमध्ये रोग होतात. काही अळिंब विषारी असतात. पुष्कळसे अळिंब अन्नावर, फळे, माज्या किंवा इतर तयार पदार्थांवर वाढून ते नासवितात. काही अळिंबांमुळे इमारती लाकूड किंवा लाकडी वस्तूंवर वाढून त्यांचे भयंकर नुकसान करतात.

# १९ व्या शतकातील भारताच्या आर्थिक इतिहासाचा एक आढावा

प्रा. मनोहर कुलकर्णी

अलीकडील काळात "गतकालीन राजकारण" ह्या भागावर इतिहासाच्या अभ्यासामध्ये कमी भर दिला जात आहे. मानवाचा सर्वंकष असा इतिहास लिहिण्यासाठी, त्याच्या जीवनातील इतरही क्षेत्रांवर विशेष भर दिला जात आहे. मानवी जीवनाच्या आर्थिक बाबींचा इतिहास सांगण्याची प्रथा १८ व्या शतकापासून इतर देशांमधून विशेष लोकप्रिय झाली आहे.

भारताचा आर्थिक इतिहास लिहिण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. हे क्षेत्र आजकाल भारतातच नव्हे तर इतरही परदेशी विद्यापीठांमधून विशेष लोकप्रिय होत आहे. भारताच्या आर्थिक स्थितीबाबत आर्थिक इतिहासकारांच्यामध्ये तीव्र स्वरूपाचे मतभेद आहेत. त्यामध्ये "साम्राज्यवादी" आणि "राष्ट्रवादी" असे दोन परस्पर विरोधी प्रवाह दिसतात. लॉर्ड कर्झन आणि दादाभाई नौरोजी ह्यांच्यामध्ये १९ व्या शतकात जो भारतीयांच्या आर्थिक स्थितीबद्दल वाद झाला. तशाच स्वरूपाचा वाद चार वर्षांपूर्वी झाला. त्या वादाचा थोडक्यात वृत्तांत येथे पाहू.

मॉरिस डी. मॉरिस ह्या लेखकांनी भारताच्या १९ व्या शतकातील आर्थिक इतिहासाचा एक नवा अन्वयार्थ देण्याचा प्रयत्न केला. त्यांचे म्हणणे सारांशरूपाने असे की, १८ व्या शतकात भारताचा आर्थिक विकास होऊ शकला नाही कारण शांतता आणि सुव्यवस्था यांचा अभाव, वारंवार उद्भवणारी युद्धे; वाहतुकीच्या आणि दळणवळणाच्या अडचणी. म्हणजे ब्रिटिशांना १९ व्या शतकाच्या सुरुवातीला जी अर्थव्यवस्था मिळाली ती अपरिपक्व व अविकसित अशा स्वरूपाची होती.

ब्रिटिशांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यावर शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केली. रेल्वे रस्ते ह्यांसारख्या वाहतुकीच्या व टेलीफोन वगैरे सारख्या दळणवळणाच्या सोई उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळून एक प्रकारचा वेग प्राप्त झाला. मागील शतकातील आर्थिक विकासाचा वेग पुढेही तसाच चालू राहील. अर्थात मॉरिस हे मान्य करतात की हा वेग फारसा समाधानकारक नव्हता.

मॉरिस ह्यांच्या ह्या नव्या अन्वयार्थाचे खंडन अनेक मार्गांनी करता येण्यासारखे आहे. त्यांच्या अन्वयार्थाला समर्पक उत्तर देण्याचा प्रयत्न तपन रे चौधरी, बिपीनचंद्र इ. आर्थिक इतिहासकारांनी केला आहे. १९ व्या शतकात भारताची अर्थव्यवस्था "खुरटलेल्या" स्वरूपाची होती. जर कोठे आर्थिक विकास झाल्याची चिन्हे असतीलच तर ती अयोग्य स्वरूपाची होती उदा. शेतीचे व्यापारीकरण.

ह्या वादाच्या संदर्भात भारतीय आर्थिक इतिहासाभ्यासाच्या अडचणी लक्षात घेण्याजोग्या आहेत. पुरेशी आकडेवारी उपलब्ध नाही. जेथे आहे ती अपुरी व अविश्वासार्ह स्वरूपाची आहे. जसे जसे मागे जावे तसतसे ही अडचण गंभीर स्वरूपाची होते. तसेच संदर्भग्रंथांची सूची ही अद्ययावत स्वरूपात उपलब्ध नाही. गोखले संस्थेमार्फत अशा प्रकारची सूची बनविण्याचे काम चालू आहे. त्यांनी अभ्यासकांची फार मोठी सोय होणार आहे. भारतासारख्या अविकसित अर्थव्यवस्थेच्या विकासाचे मोजमाप करण्यासाठी आधुनिक संकल्पना व तंत्र कितपत योग्य आहे ह्याचाही विचार करण्यासारखा आहे.

## विद्यार्थी जगतामधील असंतोष (खुली चर्चा)

प्राध्यापक अभ्यासमंडळाच्या चौथ्या बैठकीचा खुल्या चर्चा सत्राचा विषय विद्यार्थी जगतामधील असंतोष हा होता. प्रा. एन्. जी. सुरू यांनी चर्चेचे संचालन केले. प्रो. ए. सोसायटीचे सचीव श्री. वि. त्र्यं. ताटके हे खास निमंत्रित होते.

विद्यार्थी असंतोषाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करून सांगताना महाविद्यालयाचे प्राचार्य लिमये यांनी विविध प्रांतांमधील विद्यार्थी असंतोषाचा निर्देश केला आणि त्यांच्या कारणाचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये होत असलेली वाढ लक्षात घेता ह्या प्रश्नाचे गांभीर्य वाढत

आहे असे प्रतिपादन केले.

डॉ. प्रा. सौ. वनारसे ह्यांनी वरील प्रश्नामागील मानसशास्त्रीय दृष्टिकोणाची चर्चा केली आणि विद्यार्थी असंतोष हा मोठ्या सामाजिक विसंवादाचाच एक भाग आहे असे सांगितले. ध्येयपूर्तीच्या आड येणाऱ्या सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळ्यांमुळे निर्माण होणारे वैफल्य हे असंतोषाचे कारण असून शिक्षणाचे निश्चित ध्येय आणि शिक्षण व सामाजिक जीवनांमधील सुसंवाद ह्यामुळे विद्यार्थी असंतोष कमी होईल असे मत व्यक्त केले.

प्रा. संगोराम ह्यांनी प्रचलित शिक्षणपद्धतीमधील दोषांवर भर दिला. शिक्षण कृतिप्रधान असावे. [ Learning by doing.—J. Dewey ] आणि पालकवर्गाशी वाढते संबंध, मर्यादित विद्यार्थिसंख्या, शिक्षणात विद्यार्थ्यांचा सहभाग, इ. मार्गांनी विद्यार्थी असंतोषाची तीव्रता कमी होईल असा आग्रह धरला.

प्रा. महाजन यांनी विद्यार्थी असंतोषाच्या सामाजिक आर्थिक आणि राजकीय कारणांची मीमांसा केली. शिक्षणसंस्थांमधून राजकारण दूर करणे आणि युवाशक्तीला विधायक कार्यामध्ये गुंतवणे ह्या मार्गांनी विद्यार्थी असंतोष निवेल असे सांगितले.

प्राध्यापकांनी चर्चेत मोठ्या प्रमाणावर भाग घेतला. चर्चेचा समारोप करताना प्राचार्य सुरू यांनी विद्यार्थी असंतोष हा सनातन प्रश्न असून प्राध्यापकांच्या आचारसंहितेचा आवर्जून उल्लेख केला.

## मृत्युंजय युगकवी 'निराला'

**प्रा. श्री. दा. संगोराम**

आधुनिक हिंदी कवितेमध्ये सुप्रसिद्ध कवी सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' यांना (१८९५–१९६२) फारच महत्त्वाचे स्थान आहे. त्यांना हिंदीतील केशवसुत म्हणता येईल. हिंदीमध्ये खऱ्या अर्थाने आधुनिक कवितेची सुरुवात 'निराला' यांच्या जुहीकी कली (१९१६) या कवितेबरोबरच झाली. यापूर्वीच्या कवितेत राष्ट्रवाद, समाजसुधारणा इत्यादी नवीन विचार प्रकट झाले होते, पण त्यांच्या विशुद्ध काव्यात्मक शैलीत आविष्कार झाला नव्हता.

निराला हे आपल्या समकालीन कवींपेक्षाही सरस ठरतात. पंत, प्रसाद, महादेवी यांच्या काव्यातही आशय व आविष्कार या दोनही बाबतीत आधुनिकता दिसते. परंतु सौंदर्यवाद, व्यक्तिनिष्ठता, गूढगुंजन, वास्तववाद इ. सर्व वैशिष्ट्ये एकाच कवीमध्ये प्रकर्षाने व्यक्त झालेली पाहावयाची असतील तर निरालांचेच नाव घ्यावे लागेल. या बाबतीत ते आपल्या समकालीन कवींच्या पेक्षाही सरस आहेत.

निरालांचे कवित्व त्यांच्या नावाप्रमाणेच आगळे होते. उंचापुरा धिप्पाड पहिलवानी देह, तेजस्वी मेदक डोळे यामुळे त्यांची चटकन छाप पडत असे. त्यांना आयुष्यभर गरिबीशी झगडावे लागले, पण त्यांनी कधीही कलेशी प्रतारणा केली नाही. त्यांच्या काव्यात भावानुकूल छंद, संगीतात्मकता, शब्दांचा अचूक प्रयोग व रसानुकूल भाषा हे गुण प्रकर्षाने आढळतात. त्यांनी काव्यामध्ये नवनवीन प्रयोग केले व त्यातही ते यशस्वी झाले. तुलसीदास, रामकी शक्तिपूजा, सरोज–स्मृति या त्यांच्या प्रदीर्घ कविता व अन्य अनेक भावकविता हिंदी काव्याला ललामभूत झाल्या आहेत.

परंतु दुर्दैवाची गोष्ट अशी की निरालांना त्यांच्या हयातीत रसिकांकडून व त्याहीपेक्षा समर्थ टीकाकारांकडून जितक्या प्रमाणात प्रशंसा मिळावयास पाहिजे होती, तितक्या प्रमाणात मुळीच मिळाली नाही. आणि आजही हा कवी काहीसा उपेक्षितच आहे. या कवीला त्याचा खराखुरा सन्मान मिळणे हिंदी साहित्यविकासाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे.

## विद्यापीठ अनुदान मंडळाचे अनुदान

विद्यापीठ अनुदान मंडळाकडून यंदाचे वर्षी महाविद्यालयाच्या खालील योजनांसाठी त्यापुढे नमूद केलेली रक्कम अनुदान म्हणून मिळाली.

(१) पाठ्यपुस्तकांसाठी रु. ८०००·००

(२) पुस्तके व जर्नलसाठी रु. ३,३७५.००
(३) स्टुडंटस्-वेलफेअर प्रोग्रॅम रु. ४०००.००

नॉन रेसिडेंट स्टूडंटस् सेंटर–अनिकेत विद्यार्थी गृह विद्यापीठ अनुदान मंडळाच्या मदतीने सदर इमारतीचे बांधकाम चालू झाले आहे. ते पूर्ण झाल्यावर त्यामध्ये विद्यार्थ्यांसाठी एक कॉमनरूम, विद्यार्थिनींसाठी एक कॉमन रूम व सर्वांसाठी एक चांगले कँटिन ह्याची सोय उपलब्ध होईल.

### प्रा. नांदेडकर यांना पीएच. डी.

आपल्या महाविद्यालयातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक प्रा. व. गो. नांदेडकर यांना 'जिल्हा परिषदा : स्थानिक स्वराज्य आणि विकाससंस्था : एक मूल्यांकन' या विषयावर सादर केलेल्या प्रबंधास पुणे विद्यापीठाची पीएच्. डी. मिळाली. अभिनंदन.

### प्रा. पद्माकर आपटे, एन. सी. सी. अधिकारी

महाविद्यालयातील भूगोल विषयाचे व्याख्याते प्रा. पद्माकर आपटे यांनी एन. सी. सी. अधिकाऱ्यांचा तीन महिन्यांचा कोर्स कामटी येथे यशस्वी रीतीने पूर्ण करून एन. सी. सी. कमिशन मिळवले.

### प्रा. मनोहर कुलकर्णी : रा. से. यो. अधिकारी

महाविद्यालयातील इतिहास व अर्थशास्त्र विषयाचे व्याख्याते प्रा. मनोहर कुलकर्णी यांची राष्ट्रीय सेवा योजना पथकाचे प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. त्यांनी अहमदनगर येथे पंधरा दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण केले.

## वार्षिक स्नेहसंमेलन

यंदाचे वर्षी महाराष्ट्र राज्यात सर्वत्र निर्माण झालेली अवर्षणग्रस्त परिस्थिती लक्षात घेऊन महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन साधेपणाने साजरे करून त्यामधून होणाऱ्या बचतीची रक्कम दुष्काळ निवारणाला सक्रिय मदत म्हणून महापौरांच्या निधीस अर्पण करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आला. त्यानुसार यंदाचे स्नेहसंमेलन दि. २० ते २२ जानेवारी १९७३ या दिनी साजरे झाले. तृतीय वार्षिक पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम दि. २१ जानेवारी १९७३ रोजी समारंभाचे मुख्य पाहुणे महापौर निळूभाऊ लिमये यांच्या उपस्थितीत पुणे विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली, सौ. इंदुताई महाजनी यांच्या शुभहस्ते साजरा करण्यात आला.

याप्रसंगी स्नेहसंमेलनातील अल्पोपहाराचा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या संमतीने रद्द करून वाचविलेली रक्कम, महाविद्यालयातील प्राध्यापक व इतर कर्मचारी वर्ग यांनी स्वेच्छेने दिलेली एक दिवसाच्या पगाराची रक्कम व तसेच महाविद्यालयातील सर्वस्वी पाध्ये, सहस्रबुद्धे आणि दरेकर या विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न करून मिळवलेली रक्कम अशी एकूण रु. २००१ ची थैली मा. महापौरांना मा. अध्यक्षांचे शुभहस्ते अर्पण करण्यात आली. त्याप्रमाणे काही विद्यार्थ्यांनी त्यांना मिळालेल्या बक्षिसांची स्वेच्छेने महाविद्यालयाच्या विद्यार्थि–साहाय्यक निधीसाठी देऊ केलेली रु. ३२०/–ची रक्कम व स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित केलेल्या फनफेअरच्या फायद्याची रक्कम रु. ३३२/– अशी: एकूण रु. ६५२/– ची थैली मा. अध्यक्षांच्या हस्ते प्राचार्य लिमये यांना विद्यार्थी साहायक निधीसाठी सादर करण्यात आली. गतवर्षीप्रमाणेच याही वर्षी एकूण परिस्थिती लक्षात घेऊन बक्षिसे अल्पबचतींच्या रोख्यांच्या स्वरूपात देण्यात आली.

संमेलनानिमित्त विविध खेळांच्या सांघिक व वैयक्तिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये विद्यार्थि-विद्यार्थिनींनी हिरीरीने व खिलाडूवृत्तीने भाग घेऊन त्या यशस्वी रीतीने पार पाडल्या. तसेच विद्यार्थ्यांनी विविध मनोरंजनाचा कार्यक्रम सादर केला. तसेच संमेलनप्रसंगी आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनामध्ये रंगावली, छायाचित्र व पेंटिंग इ. स्पर्धा घेण्यात आल्या. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळात घडून आलेल्या सांस्कृतिक, औद्योगिक, सामा-

जिक व आर्थिक स्वित्यंतराचा आढावा हे यंदाच्या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य होते.

संमेलन यशस्वी करण्यासाठी, विद्यार्थी प्रतिनिधी, स्वयंसेवक आणि प्राध्यापक यांनी फार मेहनत घेतली. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार

श्री. मनोहर कलापुरे
(ICSR Gents)
कु. लता जाचक
ICSR (Ladies)

प्रा. स. य. गंभीर
कार्याध्यक्ष
प्रा. पद्माकर आपटे
उपकार्याध्यक्ष

## वाङ्मय–मंडळ

सर्व भाषांची वेगवेगळी वाङ्मय–मंडळे असण्याऐवजी एकच वाङ्मय-मंडळ असावे अशी कल्पना यावर्षी पुढे आली, आणि लगेच अंमलातही आली. मराठी, हिंदी आणि मराठी या भाषांसाठी मिळून एकच वाङ्मय-मंडळ स्थापन करण्यात आले: या मंडळाचे अध्यक्ष डॉ. भीमराव कुलकर्णी हे होते व भाषा विषयांचे सर्व प्राध्यापक व कु. आशा ओझर्डे, कु. मंगला जाधव, अभ्यंकर, कु. विंझे, श्री. जाधव, व शेलार हे या मंडळाचे सभासद होते.

दि. २४ ऑगस्ट १९७२ रोजी कै. न. चिं. केळकर जन्मशताब्दी हा मुहूर्त साधून मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटक म्हणून फर्ग्युसन महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख डॉ. वि. रा. करंदीकर यांना पाचारण केले होते. त्यांनी मंडळाचे उद्घाटन केले त्याच बरोबर 'कै. न. चिं. केळकरांचे व्यक्तिमत्व' या विषयावर सुंदर व्याख्यानही दिले.

सप्टेंबरमध्ये हिंदी विद्यार्थीसाठी दोन कार्यक्रम आयोजित केले गेले. डॉ. कृ. गं. दिवाकर यांनी 'कविभूषण' यावर व्याख्यान दिले आणि तदनंतर डॉ. प्र. रा. भुपटकर यांनी 'हिंदी साहित्य मुझे क्यों प्रिय है?' यात्रावत आपले विचार मांडले.

दि. १८ डिसेंबर १९७२ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या वाङ्मयाचे सव्यसाची समीक्षक डॉ. प्र. ल. गावडे यांनी "कै. वि. दा. सावरकरांची विचारधारा" या विषयावर आपले विचार मांडले.

खाडिलकर जन्मशताब्दीनिमित्त दि. ४ जानेवारी १९७३ रोजी मराठी 'विशेष'च्या विद्यार्थिनींनी 'भाऊबंदकी' नाटकावर टिपणे लिहून चर्चा केली.

दि. ९ जानेवारी १९७३ रोजी एस्. वाय. बी. ए. (मराठी) च्या वर्गात एक चर्चा घडवून आणली. पुणे विद्यापीठाने 'महाराष्ट्र-सारस्वत' या वाङ्मयेतिहासविषयक ग्रंथातील रामदास-तुकारामाची तुलना हा भाग वारकरी महामंडळाच्या विनंतीस अनुसरून काढून टाकला आहे. याचे प्रतिसाद वृत्तपत्रांत उठत आहेत. या विषयाला अनुसरून ही चर्चा झाली. यावेळी डॉ. भीमराव कुलकर्णी, प्रा. द. दि. पुंडे, प्रा. गोसावी आणि प्रा. फडके हे प्राध्यापक उपस्थित होते. चर्चेचे संचलन प्रा. पुंडे यांनी केले आणि चर्चेचा समारोप डॉ. कुलकर्णी यांनी केला. विद्यार्थ्यांबरोबर चर्चेत प्रा. गोसावी आणि प्रा. फडके यांनीही भाग घेतला ही उल्लेखनीय गोष्ट होय. चर्चा यामुळे यशस्वी झाली.

जानेवारी १९७३ मध्येच हिंदी भाषाप्रेमींसाठी डॉ. अंबाप्रसाद सुमन (अलिगढ विद्यापीठ) यांचे 'कवी बिहारी' वर व्याख्यान झाले.

मंगळवार दि. ३० जानेवारी रोजी कवि विनायकांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली. अध्यक्ष प्रा. संगोराम हे होते व प्रा. वि. भा. देशपांडे यांचे या प्रसंगी भाषण झाले.

कु. विंझे व कु. जाधव
कार्यवाह

# विद्यार्थि-संघटना

विद्यार्थी संघटनेच्या वतीने नाट्य, संगीत, नृत्य, वाद-विवाद, हस्तलिखित आणि विद्यार्थी वाचनालय इत्यादी विभागांमध्ये काही महत्त्वपूर्ण उपक्रम पार पाडण्यात आले. त्याचा थोडक्यात अहवाल.

**(१) नाट्यविभाग :** महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी होणाऱ्या 'पुरुषोत्तम करंडक' एकांकिका स्पर्धेत यावर्षी कॉलेजने दोन एकांकिका सादर केल्या. पहिली एकांकिका रत्नाकर मतकरीलिखित 'ड्रीम-सेल्र्स इंटरनॅशनल.' या एकांकिचे दिग्दर्शन प्रा. वि. भा. देशपांडे यांनी केले. या एकांकिकेत अभिनयनैपुण्याबद्दल कुमारी हेमलता अभ्यंकर हिला प्रशस्तिपत्रक मिळाले. दुसरी एकांकिका विजय तेंडुलकर लिखित 'रात्र'. ही एकांकिका उदय लागू या विद्यार्थ्याने दिग्दर्शित केली होती ही गोष्ट विशेष उल्लेखनीय आहे.

पुणे विद्यापीठातर्फे, दिनांक ३० सप्टेंबर व १ ऑक्टोबर १९७२ या दिवशी संगमनेर येथे नाट्यशिक्षण शिबिर घेण्यात आले होते. यावेळी कुमाली हेमलता अभ्यंकर आणि श्री. मोहन भंडारी या विद्यार्थ्यांना कॉलेजतर्फे पाठ-विले होते. त्यांच्याबरोबर मार्गदर्शक म्हणून प्रा. महाजन गेले होते. ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात चाळीस-गाव येथे झालेल्या शिबिरातही. याच विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

**(२) विद्यार्थी वाचनालय :** या विभागासाठी ललित व वैचारिक स्वरूपाची सुमारे शंभर हिंदी, मराठी, व इंग्रजी पुस्तके यंदा घेण्यात आली आहेत. हा उपक्रम दिवसेंदिवस अधिकाधिक वाचकप्रिय होत आहे, हे वाचकांच्या वाढत्या संख्येवरून दिसते.

**(३) भॉम :** (हस्तलिखित नियतकालिक) गेल्या वर्षीपासून सुरू केलेल्या या उपक्रमाने आता स्वतःचे असे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. पहिल्या सत्रात एकूण पाच अंक निघाले. त्यापैकी १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन विशेषांक आणि २० सप्टेंबरचा विनोद विशेषांक उल्लेखनीय आहेत. दुसऱ्या सत्रात केवळ विद्यार्थिनींनीच संपादित केलेला महिला विशेषांक हाही यावर्षीचा एक उल्लेखनीय उपक्रम आहे. पुण्यातील काही महाविद्यालयांनी संयुक्त हस्तलिखिताचा 'एपिमॉनिएस्टी' हा अभिनव स्वरूपाचा अंक काढला होता. त्यामध्ये आपल्या महाविद्यालयाने सक्रिय भाग घेतला. या दोन्ही उपक्रमाचे कौतुक पुण्यातील वर्तमानपत्रांनी केलेले आहे. या विभागाचे प्रमुख प्रा. द. दि. पुंडे, विद्यार्थी संपादक प्रदीप सिद्धये, मुकुंद कडुसकर, राजीव कुलकर्णी, दीपक संकपाळ, जयंत दाणी, मंगला जाधव यांना या उपक्रमाच्या यशाचे श्रेय आहे.

**(४) वादविवाद मंडळ :** वादविवाद मंडळातर्फे १ ऑगस्ट १९७२ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी निमित्त पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व. मं. शिरसीकर यांचे "आधुनिक राष्ट्रवादाच्या समस्या" या विषयावर भाषण झाले.

आपल्या महाविद्यालयातर्फे कथाकथन आणि वादविवाद स्पर्धांसाठी पुढील ठिकाणी संघ पाठवण्यात आले :

१. **अहमदनगर** येमराज सारडा महाविद्यालय, सुधीर सहस्रबुद्धे यास प्रशस्तिपत्रक व दहा रुपयांचे पारितोषिक मिळाले. २. रोट्रॅक्टतर्फे झालेल्या वादस्पर्धा : ३. श्रीरामपूर येथील वादस्पर्धातही आपण भाग घेतला होता.

दिनांक २५ डिसेंबर १९७२ या दिवशी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागाचे प्रपाठक श्री. रा. म. बापट यांच्या अध्यक्षतेखाली यूनो दिवस साजरा करण्यात आला. यावेळी राज्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी यूनोविषयी निबंध सादर केले.

**(५) कलामंडळ :** विद्यार्थ्यांमध्ये संगीताची, विशेषतः शास्त्रीय संगीताची आवड उत्पन्न व्हावी यासाठी नामांकित गायक वादकांना कलामंडळाने बोलाविले होते. यामध्ये खाँसाहेब महंमद हुसेनखाँ यांच्या सारंगीवादनाचा कार्यक्रम झाला. तबला साथ रमेश सामंत यांची होती. विद्यार्थ्यांनी विविध कलादर्शनाचे दोन कार्यक्रम सादर केले.

यंदाचे वर्ष भारतीय स्वातंत्र्याचे रजत महोत्सवी वर्ष असल्याने संघटनेने नेहमीच्या कार्याव्यतिरिक्त काही खास कार्यक्रम सादर केले.

(१) दिनांक १९ ऑगस्ट १९७२ रोजी भारतीय लोकनृत्ये व समूहगीते यांचा खास कार्यक्रम सादर करण्यात आला.

(२) वादविवाद मंडळातर्फे एक खास निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत एकूण ३२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

विषय : (१) स्वातंत्र्य मिळाले, पण समता कोठे आहे ?
(२) तंत्रविज्ञानयुगातील भारतापुढील आव्हाने.

तसेच मॉमच्या कलाकारांनी १५ ऑगस्ट रोजी भारताचा एक भव्य नकाशा व आपल्या घटनेची (Preamble) अतिशय कलात्मकरीत्या काढले होते.

प्रा. सी. रा. रायकर
कार्याध्यक्ष

## नियोजन चर्चा मंडळ व वाणिज्य मंडळ

१९७२-७३ साठी नियोजन चर्चामंडळ व वाणिज्य मंडळाची व्यवस्थापन समिती ३ ऑगस्ट १९७३ ला घोषित झाली. व्यवस्थापन समितीत पुढील व्यक्तींचा अंतर्भाव होता.

प्राचार्य मो. भा. लिमये (अध्यक्ष)
प्रा. मुकुंद महाजन (कार्याध्यक्ष)

**प्राध्यापक सदस्य :**

प्रा. ए. एल्. पाथरे, प्रा. एम्. ए. कुलकर्णी, प्रा. एस्. जी. दातार, प्रा. ए. जी. गोसावी

**विद्यार्थी प्रतिनिधी :**

श्री. एस्. वाय्. प्रासादे टी. वाय्. बी. कॉम्.,
श्री. ए. एम्. वरिदे एस्. वाय्. बी. कॉम्.,
श्री. टी. डी. गुंड टी. वाय्. बी. ए.,
श्री. डी. बी. पवार एस्. वाय्. बी. ए.,
कु. सविता पारखी टी. वाय्. बी. वाय्. बी. ए.,
कु. हेमा हरिभट एस्. वाय्. बी. ए.,

एस्. वाय्. बी. कॉम्., एस्. वाय्. (अर्थशास्त्र), टी. वाय्. बी. कॉम्. व टी. वाय्. बी. ए. (अर्थशास्त्र) या वर्गांचे सर्व विद्यार्थी या मंडळाचे सदस्य होते.

**व्याख्यानमाला :**

अभ्यासक्रमाशी संलग्न विषयांच्या अधिक अभ्यासास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करावे व तज्ज्ञांच्या ज्ञानाचा त्यांना लाभ व्हावा या दृष्टीने या वर्षात मंडळाने चालविलेल्या व्याख्यानमालेत पुढील व्याख्याने झाली.

| | तारीख | व्याख्याने | विषय |
|---|---|---|---|
| (१) | १२-८-७२ | श्री. पी. डी. पारखी, चीफ कॉस्ट अकौंटंट, वॅन्सन इंडिया लि. पुणे. | 'इंपॉर्टन्स ऑफ कॉस्टिंग इन् मॉडर्न इंडस्ट्रीज्' |
| (२) | २२-८-७२ | डॉ. प्र. चिं. शेजवलकर, डायरेक्टर एम्. बी. ए. प्रोग्रॅम, पुणे विद्यापीठ | 'आर्थिक नियोजनात मनुष्यबळाचे व्यवस्थापन' |
| (३) | ६-९-७२ | श्री. ए. आर. शर्मा, ब्रँच मॅनेजर, एल्. आय्. सी: पुणे विभाग | 'इन्शुअरन्स एजन्सी ॲज ए करीयर' |
| (४) | १८-९-७२ | डॉ. स. श्री. मुतालिक-देसाई, अर्थशास्त्र-विभाग प्रमुख, नौरोसजी वाडिया कॉलेज, पुणे | 'प्रॉब्लेम्स ऑफ पब्लिक एंटरप्राइझेस्' |
| (५) | २८-१२-७२ | प्रा. पी. एल्. ऊर्फ बाळ गाडगीळ, अर्थशास्त्र विभागप्रमुख, चिंतामणराव पटवर्धन कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली. | 'प्रिस्क्रिप्शन्स फॉर इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' |
| (६) | १५-१-७३ | डॉ. वसंतराव पटवर्धन जॉ. जन. मॅनेजर, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे. | 'बँकिंग करिअर टु डे' |
| (७) | २७-१-७३ | प्रा. रा. म. गोखले प्राध्यापक, एम्. पी, कॉलेज, पुणे | 'समाजवादी समाजरचना' |

**पुस्तकपेढी :**

१२ ऑगस्ट १९७२ पासून मंडळाच्या पुस्तकपेढीचे काम सुरू झाले. कॉलेजच्या ग्रंथालयातून मिळणाऱ्या पुस्तकाव्यतिरिक्त या पुस्तक पेढीतून दर पंधरवड्याला एक पुस्तक दिले जाई. या वर्षी ५५० रुपयांच्या पुस्तकांची भर घालण्यात आली. पुस्तकांची एकूण संख्या १२२ होती. व १४४३ रु. किंमत होती.

**निबंधस्पर्धा :**

भारतीय स्वातंत्र्याच्या रौप्यमहोत्सवानिमित्त मंडळाने ता. १०–९–७२ ला एक निबंधस्पर्धा जाहीर केली. या स्पर्धेत पंचवीस रुपयांचे पहिले व पंधरा रुपयांचे दुसरे बक्षीस ठेवण्यात आले होते. ही बक्षिसे अनुक्रमे कु. प्रतिभा कान्हेरे (एस्. वाय्. बी. कॉम्) व श्री. एस्. एस्. वाघ (एस. वाय्. बी. कॉम) यांनी मिळविली, तर के. सी. जैन (पी. डी. सी.) व कु. जयश्री करंदीकर (पी. डी. सी.) यांना खास उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

**लघुपट :**

१८ सप्टेंबर, १९७२ रोजी एक फिल्म-शो आयोजित करण्यात आला होता. यामध्ये भारताची औद्योगिक प्रगती, विद्यार्थी जगातील असंतोष, एन्. सी. सी., क्रीडाक्षेत्र इ० सहा लघुपट दाखवण्यात आले.

**औद्योगिक भेटी :**

१९ सप्टेंबर, १९७२ ला ४३ विद्यार्थ्यांनी बजाज टेम्पो कारखान्यास भेट दिली. एक्स्पोर्ट ऑफिसर श्री. देशपांडे व कंट्रोलर ऑफिसर श्री. मेनन यांनी सर्व विभाग दाखवले. कॉस्टिंग व अकौंटिंगची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात येऊरच्या साखरकारखान्यास विद्यार्थ्यांनी भेट दिली.

**प्रदर्शन :**

स्नेहसंमेलनाला जोडून मंडळाने 'भारताचा बदलता तोंडवळा' हे गेल्या पंचवीस वर्षांतील आर्थिक, औद्योगिक सांस्कृतिक इ० क्षेत्रांतील प्रगतीचा व देशासमोर असलेल्या समस्यांचा आढावा घेणारे एक मोठे प्रदर्शन भरविले होते. अनेक संस्थांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थी कलाकारांनी तयार केलेली सुमारे १२५ पोस्टर्स या प्रदर्शनात मांडण्यात आली होती. व्यवस्थापन समितीवरील विद्यार्थी प्रतिनिधींच्या व्यतिरिक्त सर्वश्री मुकुंद कडुसकर, दीपक संकपाळ, जयंत दाणी, विजय वुकरोटे, जयंत कुलकर्णी, प्रमोद जोशी, शरद पोंक्षे, एस्. एस्. ब्रह्मे, सुहास वैसास, सुरेश पाध्ये, सुधीर सहस्रबुद्धे, चंद्रकांत पावशे, कु. श्रुति जोशी, कु. मीना कुळमकर, कु. सुनीता धर्माधिकारी, विद्याधर भट, आनंद संगोराम व रमेश गोखले. इ० कलाकार विद्यार्थ्यांनी अत्यंत परिश्रमाने हे प्रदर्शन यशस्वी केले.

**अभ्यासगट :**

महाविद्यालयातील निवडक जिज्ञासू विद्यार्थ्यांसाठी प्रा. गोसावी यांनी एक अभ्यासगट चालविला. कॉलेजातल्याच प्राध्यापकांनी एखाद्या विषयाचा उपोद्घात करायचा व नंतर त्या विषयावर चर्चा करायची असा या अभ्यासगटाचा कार्यक्रम असे. यामध्ये पुढीलप्रमाणे चर्चा झाल्या.

१. प्रा. धायगुडे : वाणिज्यशाखेच्या विद्यार्थ्यांना इंग्रजीचे महत्त्व
२. प्रा. रायकर : जुळी मुंबई
३. प्रा. संगोराम : संगीताचा आनंद कसा लुटावा ?
४. प्रा. गोसावी : संयुक्तक्षेत्र : एक नवी संकल्पना
५. डॉ. भीमराव कुलकर्णी : आजची शिक्षण पद्धती
६. प्राचार्य लिमये : पोषाख पद्धती

एफ् वाय्. बीकॉम्. व एस् वाय्. बीकॉम्. चे १५–२० विद्यार्थी या अभ्यासगटाचा लाभ घेतात.

**इतर कार्ये :**

स्पर्धा परीक्षांसाठी उमेदवार तयार करण्याच्या योजनेप्रमाणे लॉ कॉलेजच्या आवारातील प्रिं. वारपुरे ट्रेनिंग इन्स्टिट्यूटकडे १० विद्यार्थी पाठविण्यात आले. त्यात श्री. एस्. एस्. वाघ यांची निवड झाली व दोघांची नावे प्रतीक्षा यादीवर घेण्यात आली.

१६–१२–१९७२ ला 'फोरम ऑफ फ्री एंटरप्राइझ' तर्फे घेण्यात आलेल्या ७ व्या शेठ वालचंद हिराचंद वक्तृत्व स्पर्धेचे व्यवस्थापन मंडळातर्फे करण्यात आले होते.

१४, १५ व १६ डिसेंबरला पुणे जिल्हा सहकारी

बोर्डाने घेतलेल्या युवक शिबिरासाठी ६ विद्यार्थी पाठविण्यात आले होते. शिबिरातील चर्चा विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरल्या.

याप्रमाणे १९७२–७३ या शैक्षणिक वर्षात नियोजन चर्चा मंडळ व वाणिज्य मंडळाने सतत कार्यरत राहून विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने अनेक उपक्रम चालविले व कार्यक्रम पार पाडले. मंडळाच्या यशाचे श्रेय प्राचार्य लिमये यांचे उत्तेजन आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यांना आहे. प्राचार्यांच्या प्रेरणेबद्दल व प्राध्यापक मित्रांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

मुकुंद महाजन
कार्याध्यक्ष
नियोजन चर्चा मंडळ व वाणिज्य मंडळ

## क्रीडा-विभाग वार्षिक अहवाल १९७२-७३

यंदाचे वर्षी पुढील विद्यार्थ्यांची विविध क्रीडा विभागाचे चिटणीस म्हणून निवड झाली.

आंतर महाविद्यालयीन क्रीडा-प्रतिनिधी विद्यार्थी : श्री. मनोहर कळापुरे

आंतर महावीद्यालयीन क्रीडा-प्रतिनिधी विद्यार्थिनी : कु. लता जाचक

फुटबॉल : श्री. रणजित मटकर

पोहणे : विजय कोकीळ

मायनॉर गेम्स : श्री. चंपक सिसोदीया

मैदानी स्पर्धा : श्री. मोहन आयना

देशी खेळ : श्री. अर्जुन जाधव

व्हॉलीबॉल व बास्केटबॉल : श्री. उदय करडे

कुस्ती आणि जुदो : श्री. दत्तात्रय नाईक

विद्यार्थिनी प्रतिनिधी : सुषमा जोशी

या वर्षी आमच्या महाविद्यालयाने आंतर महाविद्यालयीन सामन्यांत एकूण २५ विविध स्पर्धांमध्ये हिरीरीने भाग घेतला या वर्षी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना आपल्या क्रीडा कौशल्याच्या सर्वांगीण विकासासाठी सांघिक व वैयक्तिक स्पर्धांत भाग घेण्याची संधी देण्याचे आमच्या क्रीडा विभागाचे धोरण होते. त्यानुसार एकूण ५० विद्यार्थिनींनी ८ स्पर्धांत व ११६ विद्यार्थ्यांनी १७ स्पर्धांत भाग घेतला.

आमच्या बॉलबॅडमिंटन मुलांच्या संघाने आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत उपविजेतेपद मिळविले, तसेच पुणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनने भरविलेल्या स्पर्धांत आमच्या व्हॉलीबॉल संघाने अजिंक्यपद मिळविले.

टेबल टेनिस, बास्केट बॉल, कबड्डी, फुटबॉल, सॉफ्टबॉल इ. संघांनी आपले सांघिक कौशल्य पणास लावून उपांत्य सामन्यापर्यंत मजल मारली. विद्यार्थिनींच्या विभागात आमच्या महाविद्यालयातील मुलींनी कबड्डी, व बास्केट बॉल यांच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धांत प्रथमच भाग घेतला.

आंतर महाविद्यालयीन वजन उचलणे व शरीरसौष्ठव स्पर्धेत आमचा विद्यार्थी श्री. चंदू गोडबोले यांनी द्वितीय क्रमांक पटकविला. तसेच नंदू मराठे 'श्री' स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळविला.

श्री. महादेव नरवडे यांनी क्रॉसकंट्री स्पर्धेत प्रथम येऊन नवा उच्चांक प्रस्थापित केला, आणि १०,०० मीटर पळण्याच्या शर्यतीत द्वितीय क्रमांक मिळविला. श्री. डबीर हे १०० मीटर पोहण्याच्या स्पर्धेत पुणे विद्यापीठात तिसरे ठरले.

आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी भाग घेऊन वैयक्तिक व सांघिक दर्जा उंचविण्यास सुरुवात केली आहे.

आमच्या महाविद्यालयातील कु. मंगला चापेकर हिने आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांत लांब उडीमध्ये गतवर्षाच्या उच्चांकाची बरोबरी करून प्रथम क्रमांक मिळविला. तसेच १०० मीटर अडथळा शर्यतीत प्रथम व उंच उडीत तृतीय क्रमांक मिळविला. कु. लता जाचक हिने १०० मीटर धावणे व उंच उडीत द्वितीय क्रमांक मिळविला. कु. लता जाचक ही महाराष्ट्र राज्य क्रीडा शिष्यवृत्तीस पात्र ठरली आहे.

पुणे विद्यापीठाच्या विभागीय पुरुषांच्या संघात आमच्या पुढील विद्यार्थ्यांची निवड झाली.

व्हॉलीबॉल : श्री. लाळे व श्री. खटावकर
टेबल टेनिस : श्री. सेवेकरी
पोहणे : श्री. डबीर
शरीरसौष्ठव व वेट लीफ्टींग श्री. चंदू गोडबोले
फुटबॉल : श्री. रणजित मटकर
बॉस्केटबॉल : अभय प्रधान
खोखो : श्री. श्रीरंग इनामदार
मैदानी स्पर्धा : श्री. नरवडे

पुणे विद्यापीठाच्या विभागीय स्पर्धांसाठी महिलांच्या संघात आमच्या पुढील विद्यार्थीनींची निवड झाली.

बास्केट बॉल : कु. लता जाचक व कु. शैलजा तेलंग
बॉल बॅडमिंटन : कु. भारती शहा व कु. संजीवनी साने
मैदानी स्पर्धा : कु. मंगल चापेकर व कु. लता जाचक

अंतर विद्यापीठ सामन्यांसाठी पुणे विद्यापीठाच्या संघात पुढील खेळाडूंची निवड झाली.

बास्केट बॉल : मुलांचा संघ श्री. अभय प्रधान
बास्केट बॉल : मुलींचा संघ : कु. शैलजा तेलंग
खो खो : मुलांचा संघ : श्री. श्रीरंग इनामदार
मैदानी स्पर्धा : कु. मंगल चापेकर
बॉल बॅडमिंटन : कु. भारती शहा व कु. संजीवनी साने

वारामती येथे नुकत्याच संपलेल्या राष्ट्रीय खो खो स्पर्धेत अजिंक्यपद मिळविणाऱ्या महाराष्ट्राच्या संघात श्रीरंग इनामदार याची निवड झाली होती. त्याचप्रमाणे श्री. मोहन आयना याची पुणे विद्यापीठातर्फे गिर्यारोहणासाठी निवड झाली व त्याने १९,४०० फूट उंच चढून जाण्याचा यशस्वीरीत्या विक्रम केला, तसेच आमच्या महाविद्यालया तीस कु. भारती शहा व कु. सुरेखा वाळवेकर यांची अनुक्रमे बॉलबॅडमिंटन व हॅंडबॉल याच्या राष्ट्रीय क्रीडा-स्पर्धांसाठी महाराष्ट्राच्या संघांमध्ये निवड झाली होती.

यूथ होस्टेल ऑफ इंडिया या संस्थेने आयोजित केलेल्या पहिल्या राष्ट्रीय सायकल सफरीमध्ये भाग घेऊन महिन्याभरात सायकलीवरून दोन हजार मैलांची भारतभ्रमण सफर पुरी करून श्री. मुकुंद केळकर व मुकुंद कडुसकर यांनी संस्थेकडून प्रशस्तिपत्रक मिळविले.

वरील सर्व खेळाडूंनी जे यश संपादन केले आहे त्या बद्दल क्रीडा विभागातर्फे हार्दिक अभिनंदन.

अंतर महाविद्यालयीन स्पर्धांच्या तयारीसाठी आम्हांस श्री. ज्ञानेश्वर बहिरट श्री. दिलीप लोहकरे, श्री. विजयचंद्र भागवत, श्री. शिवशंकर, श्री. नारायण पिल्ले व श्री. कोल्हटकर यांचे बहुमोल साहाय्य लाभले. आम्हांला त्यांच्या मदतीचा लाभ नेहमी होत राहील अशी आशा आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार!

आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या विविध सहकार्याचा उल्लेख केल्याशिवाय हा अहवाल पूर्ण होणार नाही. प्रा. पद्माकर आपटे यांनी पुणे विभागाच्या जिम्नास्टीक्स् व मल्लखांब, निवड समितीवर चेअरमन म्हणून काम केले. तसेच नगर येथे झालेल्या अंतर विभागीय जिम्नास्टीक्स् व मल्लखांब स्पर्धांसाठी पुंणे संघाचे व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. त्याचप्रमाते शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख श्री. किरण लागू यांची बास्केट बॉल निवड समीतीवर नेमणूक झाली होती. आंतर विभागीय सामन्यांसाठी त्यांनी बास्केट बॉल संघाचे व्यवस्थापक म्हणून काम केले. प्रा. पाथरे यांची पुणे विभागाच्या व्हॉलीबॉल संघाच्या निवड समीतीवर नेमणूक झाली होती. तसेच त्यांनी अंतर विद्यापीटीय व्हॉलीबॉल स्पर्धांसाठी पुणे विद्यापीठ संघांचे व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

अंतर महाविद्यालयीन स्पर्धांशिवाय महाविद्यालयात विद्याशाखांतर्गत सामने या वर्षी द्वितीय सत्रात घेण्यात आले. एकूण २५० विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले. या सामन्यांमध्ये दिसून आलेली चुरस व खेळाडूवृत्ती यासाठी सर्व स्पर्धक कौतुकास पात्र आहेत.

आमचे प्राचार्य व क्रीडा विभागाचे सदस्य प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांनी वेळोवेळी दिलेल्या सहकार्याबद्दल क्रीडा विभागातर्फे आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

श्री. मनोहर कलापुरे
विद्यार्थी प्रतिनिधी

कु. लता जाचक
विद्यार्थिनी प्रतिनिधी

प्रा. स. ग. गंभीर
कार्याध्यक्ष

# शारीरिक शिक्षण विभाग

'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' या महाकवी कालीदासाच्या वचनाप्रमाणे आमच्या महाविद्यालयाने प्रथमपासूनच विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासाकडे सर्वांगीण लक्ष दिले आहे.

१९७२ ते १९७३ या शैक्षणिक वर्षात, ३ जुलै १९७२ रोजी. शारीरिक शिक्षणाच्या तासांना सुरुवात झाली, परंतु त्या पूर्वीच्या काळात २० जून ते ३० जून ह्या १० दिवसांच्या कालखंडात शारीरिक शिक्षणाच्या संघनायकासाठी प्रशिक्षणाचा वर्ग चालवून त्यातूनच विद्यार्थी व विद्यार्थिनी संघनायकांची निवड करण्यात आली ती पुढीलप्रमाणे :

(१) ए. ए. शेलडेकर प्रथम वर्ष कला
(२) व्ही. आर. साळवी प्रथम वर्ष शास्त्र
(३) एस. के. अवचट प्रथम वर्ष शास्त्र
(४) कु. सुमन बोशी पदवीपूर्व कला
(५) कु. गीता नाईक पदवीपूर्व वाणिज्य

अशा प्रकारे शिस्तबद्ध योजनेतून शारीरिक शिक्षकांच्या तासांना सुरुवात झाल्यावर सुरुवातीस विद्यार्थ्यांची संख्या फारच कमी प्रमाणात होती. परंतु ऑगस्टपासून ती सरासरी २६० पर्यंत गेली.

विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासावरोबर सांघिक भावना, राष्ट्रीय एकात्मता व वैयक्तिक नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रथमच कुलपद्धतीचा वापर करण्यात आला. त्या प्रमाणे विद्यार्थ्यांचे चार व विद्यार्थिनींचे दोन अशी ६ कुलांत विभागणी केली.

कुलांना पराक्रमी ऐतिहासिक पुरुषांची व स्त्रियांची नावे दिली व कुल प्रमुख निवडले ते पुढीलप्रमाणे :

(१) शिवाजी कुल एस्. एन्. सावरकर
(२) प्रताप कुल एस्. डी. शिगणे
(३) सुभाष कुल एन्. एन्. गुजर
(४) अशोक कुल व्ही. डी. थिटे
(५) राणी पद्मिनी कुल कु. यशोधरा भालेराव
(६) राणी लक्ष्मी कुल कु. जयंश्री करंदीकर

व्हॉली बॉल, बास्केट बॉल, कबड्डी, फुटबॉल, या खेळांच्या आंतर कुल साखळी पद्धतीने स्पर्धा घेण्यात आल्या. त्यात सर्व विद्यार्थ्यांनी हिरीरीने भाग घेतला.

महाविद्यालयाचे पहिले व दुसरे सत्र मिळून एकूण ६० तास झाले. बहुसंख्य विद्यार्थी या तासांना उपस्थित होते.

या वर्षी शारीरिक शिक्षण विभागातर्फे श्री. विनयचंद्र भागवत यांचे २० सप्टेंबर रोजी 'Soft Boll' या खेळाविषयी माहिती देणारे व्याख्यान झाले.

दि. १० डिसेंबर १९७२ रोजी लोणावळा येथील 'कैवल्य धाम' या संस्थेस भेट दिली. संस्थेचे प्रमुख श्री. घरोटी यांनी संस्थेचा परिचय करून दिला व 'योगशास्त्र' ह्या विषयावर उद्बोधक माहिती सांगितली.

ह्या वर्षी विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणास आवश्यक असा गणवेश महाविद्यालयाच्या सहकारी भांडारातून स्वस्त दरात देण्याची व्यवस्था केली होती.

दिनांक ३ जानेवारी १९७३ रोजी 'शारीरिक शिक्षण दिन' साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी लाठी, मनोरे, जिमन्यास्टिक्स् व जोडीप्रकार, विद्यार्थिनींनी लेझीमीचे विविध प्रकार दाखवून प्राचार्यांची शाबासकी मिळविली. त्याचवरोबर नियमित येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रशस्ति-पत्रके देण्यात आली. आंतरकुल स्पर्धांमध्ये प्रताप कुलाने आजिक्यपद मिळवून ह्या वर्षी फिरती ढाल मिळविली.

आमचे प्राचार्य व इतर प्राध्यापकवर्ग यांच्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

श्री. अनील शेलडेकर
कु. सुमन जोशी
संघनायक

श्री. किरण लागू
शारीरिक शिक्षण विभागप्रमुख

## छात्रसेना N.C.C.

आपल्या महाविद्यालयातील खालीलप्रमाणे एकूण १५७ विद्यार्थी छात्रसेनेच्या विविध युनिटस्‌मध्ये दाखल झाले होते.

| युनिट | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|
| 1. 3 MAH. Armd sqn | ६ |
| 2. 3 MAH. Air sqn | १९ |
| 3. 3 ( MAH ) Naval unit | ४३ |
| 4. 12 MAH. Bn. | ५० |
| 5. 2 MAH. Girls Unit | ९ |
| 6, 1 MAH. Signal Coy. | ३० |
| एकूण | १५७ |

खालील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले.

1. U/o S. R. Shinde : Best shot in 0·300 Firing and Best cadet 5 c Coy.
2. U/o S. G. Sathe . Best Cadet Signal Coy
3. U/o Patil : Best Cadet Armd Sqn
4. F/lc Ghaisas : Best Cadet Air Sqn
5. Miss Seema Wavhal : Best Cadet 2 MAH Girls Unit.
6. Cadet S. J. Kadam of Naval Unit participated in Republic Day Parade on 26 JAN 73 at New Delhi

पद्माकर खापटे
2/Lt

## राष्ट्रीय सेवा योजना

यंदाच्या वर्षापासून ह्या महाविद्यालयास पंच्याहत्तर विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय सेवा योजना पथक पुणे विद्यापीठाने मंजूर केले. पथकाच्या प्रत्यक्ष कार्यास ७२–७३ च्या दुसऱ्या सत्रापासून सुरुवात झाली. पथकात ६५ विद्यार्थी व १० विद्यार्थिनींनीची निवड करण्यात आली.

महाविद्यालयीन स्तरावर पुढील सल्लागार समिती नियुक्त करण्यात आली.

( १ ) प्राचार्य मो. भा. लिमये, अध्यक्ष ( २ ) उपप्राचार्य डॉ. एल. एच. गाडगीळ, ( ३ ) प्रा. एस. वाय. गंभीर, ( ४ ) प्रा. एस्. जी. दातार, ( ५ ) प्रा. पी. डी. आपटे, ( ६ ) प्रा. म. आ. कुलकर्णी, सदस्य चिटणीस, ( ७ ) श्री. सी. आर. पावशे, ( ८ ) श्री. एस. व्ही. कोल्हटकर, ( ९ ) श्री. व्ही. पी. शिंदे, ( १० ) श्री. ए. एस. संगोराम, ( ११ ) कु. पद्मा घोडके व पाच विद्यार्थी प्रतिनिधी.

राष्ट्रीय सेवा योजनेची माहिती देणारी व विद्यार्थ्यांच्यावर योग्य ते संस्कार करणारी व्याख्यानमाला ३० नोव्हेंबर ते २ डिसेंबर १९७२ पर्यंत आयोजित करण्यात आली. ह्यामध्ये प्रा. एम्. एस्. महाजन ( " विद्यार्थ्यांची समाजसेवा " ), डॉ. सौ. श्यामला वनारसे ( " राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व " ), प्रा. व्ही. आर. शिरगुरकर ( " राष्ट्रीय सेवा योजना : आमचा अनुभव " ) ह्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती.

दि. २ डिसेंबर १९७२ रोजी मा. एन्. एम्. देवस्थळे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पुणे ह्यांच्या शुभहस्ते योजनेच्या प्रत्यक्ष कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या उद्घाटनाच्या भाषणात मा. देवस्थळे यांनी " राष्ट्रीय सेवायोजना आणि जिल्हा परिषद " ह्या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर माहिती सांगितली.

पुण्याजवळील हडपसर ह्या उपनगरापासून जवळच असलेल्या " महमदवाडी " ह्या खेड्यात पुण्यातील स. प. फर्ग्युसन गरवारे ह्या महाविद्यालयाबरोबर आमच्या पथकांनी चालू वर्षी कार्य करण्याचे ठरविले. दि. ३, १७ डिसेंबर १९७२ रोजी एक–एक दिवसाची श्रमशिबिरे आयोजित

करण्यात आली. ह्या वेळी पाझरतलावाच्या बंधाऱ्यावर भर टाकण्यासाठी श्रमदानाचे काम विद्यार्थ्यांनी केले.

महमदवाडी येथेच दि. ३०, ३१ डिसें. ७२ व १ जाने. ७३ ह्या तीन दिवशी 'श्रम-शिबिर' आयोजित करण्यात आले होते. शिबिराच्या मुदतीत पथकातील विद्यार्थ्यांनी गावातील सामुदायिक विहिरीच्या रस्त्याचे बांधकाम श्रमदानाने पूर्ण केले. ह्याचबरोबर पाझर तलावाच्या बंधाऱ्याची उंची वाढविण्यासाठी भर टाकण्याकरिता श्रमदान केले. श्रमदानाच्या कामाबरोबरच पथकातील विद्यार्थ्यांचे चार गट पाडण्यात आले होते व तेथे विद्यार्थ्यांनी गटवार त्यांना दिलेल्या वेगवेगळ्या विषयावर सांगोपांग चर्चा करून त्याचे अहवाल तयार केले. गावकऱ्यांच्या समवेत मनोरंजनाचे व खेळाचे कार्यक्रमही आयोजित करण्यात आले होते. प्रा. द. मा. मिरासदार आणि श्री. व्यंकटेश माडगुळकर ह्यांच्या कथा-कथनाचा कार्यक्रम व डॉ. हेमंत इनामदारांचे "बाबा आमटे ह्यांचे कार्य" ह्या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन श्री. वि. भ्रं. ताटके ह्यांच्या शुभ हस्ते झाले. शिबिराचा समारोप मा. आमदार अण्णासाहेब मगर ह्यांनी केला.

दि. १३ जाने. १९७३ रोजी हडपसर येथील महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या नव्या इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी पथकातील विद्यार्थ्यांनी प्रदर्शन उभे करण्यासाठी मंडळास साहाय्य केले.

ग्रामीण भागातील कार्यक्रमाबरोबरच पथकातील विद्यार्थ्यांनी पहिल्याच वर्षी रिमांड होम येथेही रंग-सफेतीचे व तेथील मुलांना शिकविण्याचे, गोष्टी सांगण्याचे, खेळ शिकविण्याचे कार्यक्रम हाती घेतले होते. "मकर-संक्रांती" दिवशी तेथील मुला-मुलीसमवेत पथकातील विद्यार्थ्यांनी "तिळगुळा" चा कार्यक्रम आयोजित केला होता.

महाविद्यालयाच्या स्नेह-संमेलनाच्या वेळी दि. २१ आणि २२ जाने. १९७३ ह्या दोन दिवशी दुष्काळ-ग्रस्त विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी गंमत-जंमत (फनफेअर) आयोजित केली होती. ह्यामधून रु. ३३२·५५ पैसे जमा करण्यात आले.

मुख्य मंत्र्यांच्या दुष्काळ निधीसाठी पैसा गोळा करण्या-करिता पथकातील विद्यार्थी शहरातील वेगवेगळ्या भागात डबे घेऊन हिंडले व त्यांनी मोठ्या प्रमाणावर निधीसाठी पैसा गोळा केला.

परीक्षा संपल्यानंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत पथकातील १० ते १५ विद्यार्थी ग्रामीण भागातील दुष्काळी कामे करण्यासाठी जाणार आहेत. पथकातील अकरा विद्यार्थी उन्हाळ्याच्या सुट्टीत रिमांड होममधील मुलांना शिकविणे त्यांना गोष्टी सांगणे व खेळ शिकविणे हे कार्य करणार आहेत.

बागकाम आणि रक्तदानाचे कार्य पथकातील विद्यार्थ्यांनी पार पाडले आहे.

पथकाच्या सर्वच कार्यक्रमाच्या वेळी प्राचार्य मो. भा. लिमये ह्यांचे अनुभवी मार्गदर्शन आणि सक्रिय प्रोत्साहन लाभले. प्राध्यापक वर्गही मोठ्या संख्येने पथकाच्या कार्य-क्रमात भाग घेऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत होता.

प्रा. ए. जी. गोसावी आणि प्रा. के. एम्. गोखले ह्यांनी प्रथमपासून पथकावरोवर सर्वच कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला, आणि ते यशस्वीरीत्या पार पाडण्यामध्ये मोलाचे साहाय्य केले.

एस. आर. पावसे
व्ही. पी. शिंदे, एस. व्ही. कोल्हटकर
ए. एस्. संगोराम, पद्मा घोडके — विद्यार्थि-प्रतिनिधी
म. भा. कुलकर्णी, प्रमुख राष्ट्रीय सेवा योजना

## गणित विभाग

दि. १४ मार्च १९७२ रोजी गणित विभागातर्फे 'इ. आठवीपासून सुरू होणारे नवीन गणित' या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या शैक्षणिक वर्षापासून इ. ८ वी च्या अभ्यासक्रमात नवीन गणिताचा अंतर्भाव झाला आहे. हेच विद्यार्थी पुढे महाविद्यालयात येणार, तेव्हा त्यांच्या गणितातील पूर्वज्ञानाचे स्वरूप कसे

राहणार आहे हे जाणून घेण्याचा या परिसंवादाचा हेतू होता. संस्थेचे सेक्रेटरी श्री. वि. त्र्यं. ताटके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात प्रा. चिरपुटकर, श्री. चाफेकर, श्री. रणदिवे, डॉ. गोखले, श्री. वैद्य व श्री. देवधर इ. नामवंत व्यक्तींनी आपले विचार मांडले.

या वर्षी गणित विभागातर्फे पदवीपूर्व वाणिज्य व पदवीपूर्व शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी दोन पुस्तिका तयार करण्यात आल्या आहेत. गणिताचा प्रथमच इंग्रजी माध्यमातून अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षांमध्ये येणाऱ्या प्रश्नांची कल्पना यावी हा या पुस्तिकांचा हेतू आहे. या प्रश्नांशिवाय या पुस्तिकात विविध नमुन्यांच्या विशिष्ट उदाहरणांचाही समावेश करण्यात आला आहे. या पुस्तिकांचा प्रकाशनसमारंभ दि. १२ ऑगस्ट १९७२ रोजी श्री. वि. त्र्यं. ताटके यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रकाशनावरोवरच विद्यापीठ अनुदान मंडळाकडून मिळालेल्या अनुदानातून घेतलेल्या ६ Facit Calculating Machines चे उद्घाटन प्रा. मो. भा. लिमये यांच्या हस्ते करण्यात आले.

दि. २६ डिसेंबर १९७२ रोजी पुणे विद्यापीठातील गणित व संख्याशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. व्ही. एस्. हुजुरबझार यांनी कॉलेजला एक अनौपचारिक भेट दिली. कॉलेजातील विविध विभागांची पाहणी करून कॉलेजने अलीकडील केलेल्या प्रगतीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

प्रा. प. स. चिरपुटकर
प्रमुख गणित व संख्याशास्त्र विभाग.

## विद्यार्थी सहकारी भांडार

यंदा विद्यार्थी सहकारी भांडाराचे काम जूनच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू झाले.

या वर्षी भांडाराची एकूण विक्री रु. १०,००० झाली. या विक्रीवर एकूण फायदा अंदाजे रु. १५,०० झाला.

गेल्या वर्षी झालेल्या फायद्यामधून भांडाराने याहीवर्षी सर्व विद्यार्थ्यांना आयडेंटिटी कार्डसूची कव्हर्स मोफत दिली. हा एक प्रकारे त्यांना त्यांच्या भागभांडवलावर दिलेला डिव्हिडंड होय.

भांडाराचे कार्य वाढविण्यास अजूनही पुष्कळ संधी आहे. परंतु त्यासाठी विद्यार्थी भांडाराची जबाबदारी विद्यार्थ्यांनीच उचलणे आवश्यक आहे. या वर्षी काउंटरवरील विक्री व रजिस्टर्स ठेवणे वगैरे कामात श्री. अ. शं. चंद्रचूड व श्री. दि. शं. खोपकर या महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांची सेवा उपलब्ध झाली. भांडाराच्या यशास तिन्ही शास्त्रविभागांचे प्रमुख, क्रीडाविभागाचे प्रमुख, तसेच उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ यांचे बहुमोल साहाय्य कारणीभूत आहे. शिवाय प्राचार्य मो. भा. लिमये यांचे मार्गदर्शन व सल्ला आम्हांस सतत उपयुक्त व स्फूर्तिदायक ठरला.

विद्यार्थिवर्गाचे अधिक साहाय्य मिळवून पुढील वर्षी आम्ही अधिक प्रगती करण्याची आशा बाळगतो.

प्रा. ज. र. नातू
कार्याध्यक्ष

## ग्रंथालय

१९७१ १९७२ या वर्षाअखेरीस ग्रंथालयात एकूण ६३२८ ग्रंथ होते. त्यापैकी ३७२५ कला, १२८९ शास्त्र आणि १३१४ वाणिज्य शाखेकडील होते. त्यावर एकूण रु. ५४,३७८ खर्च करण्यात आला. यावर्षी वरील ग्रंथांच्या संख्येत एकूण १४०९ ग्रंथांची वाढ झाली. त्यापैकी ७०२ कला, ४२७ शास्त्र आणि २८० वाणिज्य शाखेतील आहेत. यावर एकूण रु. १३६२२ खर्च करण्यात येऊन, आतापर्यंत ग्रंथालयावर एकूण रु. ६८,००० खर्च करण्यात आले आहेत.

ग्रंथालयात सध्या ६४ नियतकालिके घेण्यात येतात.

त्यांपैकी कलाशाखेकडील २८, शास्त्रशाखेकडील ९, वाणिज्य शाखेकडील १३ आणि १४ इतर नियतकालिके आहेत. याशिवाय ६ मराठी, १ हिंदी व ४ इंग्रजी अशी एकूण ११ वृत्तपत्रे घेतली जातात.

या वर्षी विद्यार्थ्यांसाठी काही नियतकालिकांतील महत्त्वाच्या लेखांची सूची तयार करून ते लेख विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी खास उपलब्ध करून देण्यात आले. विद्यार्थ्यांनी या योजनेचा भरपूर उपयोग करून घेतला.

विद्यापीठ अनुदान मंडळाने महाविद्यालयाला पुस्तक पेढी चालू करण्यासाठी रु. १५,००० चे अनुदान मागील वर्षी दिले. या रकमेतून एकूण १,२०९ ग्रंथ खरेदी करण्यात आले व त्याचे संच तयार करून ते ४०० विद्यार्थ्यांना विनामूल्य वर्षभर घरी वापरण्यास देण्यात आले. त्याचप्रमाणे विद्यार्थी साहाय्य निधीतून एकूण ९९ ग्रंथ विकत घेण्यात आले व त्याचे संच २५ विद्यार्थ्यांना विनामूल्य वापरण्यास देण्यात आले.

तृतीय वर्ष वाणिज्य ह्या वर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी "Costing" हा प्रमुख विषय घेतला आहे त्यांच्यासाठी ह्यावर्षी "Costing" विषयाच्या पुस्तकाची Circulating Library सुरू करण्यात आली.

रोज सरासरीने १५२ पुस्तके ह्याप्रमाणे दिनांक ३१ जानेवारी पर्यंत झालेल्या कामकाजाच्या दिवसात एकूण २८, ८७९ ग्रंथ विद्यार्थ्यांना घरी वाचण्यास देण्यात आले. त्याचप्रमाणे रोज सुमारे ९५ ग्रंथ अभ्यासिकेतून विद्यार्थ्यांना वाचण्यास देण्यात आले.

मागील वर्षाप्रमाणे ह्यावर्षीसुद्धा प्रथम व द्वितीय सत्रांत विद्यार्थ्यांच्या अभ्यासासाठी अभ्यासिका सायंकाळी ७ ते रात्री ११ पर्यंत खुली ठेवण्यात आली होती. या संधीचा एकूण ८० विद्यार्थ्यांना फायदा मिळाला.

दरवर्षीप्रमाणे यंदाही काही विद्यार्थ्यांना ग्रंथालयात काम करण्याची संधी देण्यात आली व त्यांना योग्य तो मोबदला देण्यात आला.

ह्यावर्षी ग्रंथालयातील पुस्तकबांधणीचे काम ग्रंथालयातील कर्मचारीवर्गानेच करून बहुमोल साहाय्य केले.

ह्यावर्षी ग्रंथालय समितीत खालील सभासद होते.

(१) डॉ. ल. ह. गाडगीळ (कार्याध्यक्ष), (२) प्रा. चिरपुटकर, (३) प्रा. रायकर, (४) प्रा. महाजन, (५) प्रा. दातार, (६) प्रा. वि. भा. देशपांडे (७) श्री. द. गो. बापट (चिटणीस)

ग्रंथालय-समितीच्या डिसेंबर १९७२ अखेर ७ सभा झाल्या. त्यामध्ये ग्रंथालयात कोणते संदर्भग्रंथ घ्यावेत, प्रत्येक विषयावर किती रकम खर्च करण्यात यावी, वगैरेवर मार्गदर्शन करण्यात आले.

खालील व्यक्ती व संस्था यांनी ग्रंथालयाला बहुमोल ग्रंथ भेट देऊन उपकृत केले आहे.

(१) श्री. व. श्री वैद्य (२) श्री. आर. डी. कुलकर्णी (३) श्री. गोगटे (४) श्री. महाडिक (५) श्री. शं. वि. चंद्रचूड (६) श्री. एस्. एल्. बर्वे (७) डॉ. मिजार (८) डॉ. ल. ह. गाडगीळ (९) प्रा. चिरपुटकर (१०) प्रा. रायकर (११) प्रा. महाजन (१२) प्रा. संगोराम (१३) प्रा. नारायण (१४) प्रा. आपटे (१५) प्रा. मुजुमदार (१६) जयकर ग्रंथालय, पुणे विद्यापीठ (१७) ब्रिटिश कौन्सिल लायब्ररी, पुणे (१८) अनमोल पुस्तकालय (१९) गणित विभाग, मॉडर्न महाविद्यालय (२०) Canadian Embassy (२१) डॉ. ना. र. इनामदार (पुणे विद्यापीठ) (२२) डॉ. भीमराव कुलकर्णी व श्री. राहुलकुमार बजाज.

तसेच खालील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाला पुस्तके भेट दिली आहेत.

(१) श्री. चव्हाण, (२) श्री. गुर्जर, (३) श्री. मेटकर, (४) श्री. चंद्रकांत गोडबोले.

**लोकसभा अहवालाची मौलिक भेट :**

माजी लोकसभा सदस्य सौ. ताराबाई सप्रे यांनी आपले ग्रंथालयाला अत्यंत महत्त्वपूर्ण असे लोकसभेचे अहवाल भेट देऊन उपकृत केले आहे.

द. गो. बापट
(ग्रंथपाल)

## एक अभिनव उपक्रम

या वर्षी मॉडर्न महाविद्यालयात हिंदीच्या व्याकरणासंबंधी विशेष मार्गदर्शन करणारा ऐच्छिक वर्ग वर्षभर चालविण्यात आला. हा विषय परीक्षेला नसतानाही पन्नासहून अधिक विद्यार्थि–विद्यार्थिनींनी नियमितपणे येऊन या वर्गाचा लाभ घेतला. या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य लिमये यांच्या हस्ते झाले व वर्गाचे संयोजन व अध्यापन प्रा. श्री. दा. संगोराम यांनी केले.

## रक्तदान

खालील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी दि. १२ ऑगस्ट १९७२ रोजी रक्तदान केले.

प्रा. पद्माकर आपटे, प्रा. ज. वा. बर्वे, स. स. जोशी, उ. व. मेढेकर प्र. द. बावसकर, चं. ला. सिसोदिया. वि. मो. शहा, सु. ज. कोठारी, ध. मु. जोशी, पां. शा. खुडे, दि. दे. गुप्ता, कु. नीला दिवेकर, सौ. प्रतिभा थिटे, नयनकुमार शेवडे, द. बा. पवार, ह. बा. भोंगळे, र. रा. गुहागरकर, पु. ई. चक्के, र. ना. सावरकर, सं. स. राऊत, का. कि. दंडवते, अ. श्री. संगोराम, सो. द. बाफना, हे. ह. वखारिया, दि. दि. पिंपळे, रा. ज. धुत, प्र. गो. जोशी, शं. दे. पानसरे, श्री. च. बेद्दूर, सी. गं. क्वरे, अ. ह. ठाकूर, श्री. रा. भिंगारकर, सू. मो. पटेल, सु. ग. काकडे, आ. र. शहा, दि. भी. देशपांडे, पु. रा. तिखे, सं. स. वेन्द्रे, र. मा. खटावकर, शि. वि. जोशी आणि सी. एस्. मोडक

## महाविद्यालयीन पारितोषिके

विद्यापीठांच्या परीक्षांतून महाविद्यालयात सर्वोच्च गुण मिळविल्याबद्दल खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली.

सौ. प्रभावती कुटे, कि. ब. शिंदे, पद्मिनी जोगळेकर, हेमलता का. अभ्यंकर, अरुणा पु. करडे, शा. स. वाघ, आशा वि. ओझर्डे, दि. दे. गुप्ता, घ. सो. डाळवाले, नलिनी चं. मछयनमठ

## राज्य सरकारी गुणवत्ता शिष्यवृत्या

ग. दि. बुरांडे, वसुधा श्री. केळकर, गीता कृ. नाईक, आशालता कृ. शिंदे, प्रतिभा भ. कान्हेरे, पद्मिनी बा. जोगळेकर, माणिक ल. जोशी, विजया ए. कुलकर्णी, उ. व. मेढेकर यांना देण्यात आल्या आहेत.

## राष्ट्रीय शिष्यवृत्या

भ. मे. मामनिया, श्री. ना. पुरंदरे, कु. हेमलता का. अभ्यंकर (सौ. हेमा लेले), सु. ए. आव्हाड, शा. स. वाघ, दि. कृ. नाईक, सौ. प्रतिमा थिटे यांना मिळाल्या आहेत.

## प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी सवलत

श्री. प्रमोद बाळकृष्ण लाळे यास मिळाली आहे.

## राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्त्या

अ. व. कुलकर्णी, चं. श्री. पळसकर, शा. द. सुत्रे, अ. के. पोतनीस, प्र. आ. शिंगटे, श. ह. ढेकणे, प्र. ना. भावसार भा. मु. भागुजी, मो. चं. साखळकर कु. पुष्पा कुलकर्णी, कु. अलका दरेकर, सु. चं. क्षीरसागर, च. प्र. अभ्यंकर, ठ. ग. करंदीकर घ. सो. डाळवाले. सु. चं. परदेशी, चं. पु. खुटाळे यांना मिळाल्या आहेत.

## स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी सवलत

कु. प्रतिभा जोशी, रा. वि. संकपाळ, र. खु. पटवा, अ. चु. कटारिया, वि. शं. पाटील, शा. वि. भळा, म. र. कळापुरे, कु. भाग्यश्री इनामदार, पां. ल. भागवत, कु. मंगला मधवे, कु. रेखा कुबेर यांना मिळाली आहे.

## भेट

या महाविद्यालयातील श्री. मि. शा. सावंत व श्री. द. वा. पवार ह्या द्वितीय वर्ष साहित्य शाखेतील विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा एक मोठा फोटो महाविद्यालयास भेट म्हणून दिला. तसेच महाविद्यालयातील एक सेवक श्री. एस्. एम्. विद्वत ह्यांनी सरस्वतीचा एक मोठा सुंदर फोटो महाविद्यालयास भेट म्हणून दिला. वरील देणगीबद्दल हार्दिक आभार.


विद्यार्थ्यांनो,

तुम्हांला हवे ते सारे शैक्षणिक साहित्य आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्था सहकारी भांडारातूनच घ्या.

हे भांडार तुमचे, तुमच्या भाग भांडवलातून निर्माण झालेले व तुमच्यासाठी आहे. भांडारामध्ये मुख्यतः खालील वस्तू मिळतील :

* पाठ्यपुस्तके * सर्व प्रकारच्या वह्या * डिसेक्शन बॉक्सेस * वेट बॉक्सेस * सर्व तऱ्हेची पेन्स * ट्युटोरियल शीट्स * जर्नल्स * फाइल्स * कागद * पी. टी. शूज * बनियन्स * कंपास बॉक्सेस * शाई * इत्यादी इत्यादी *

मॉडर्न महाविद्यालय विद्यार्थी सहकारी भांडार

शिवाजीनगर, पुणे ५

# Swastik SHOES
## are tough and smooth



JOLLY for Children,
in sizes: 9/11, 12/1 & 2/5.
Also available
Gents Leather Shoes
COMPANION
in sizes 5/9.

Swastik SHOES

**SWASTIK RUBBER PRODUCTS LIMITED**
Chinchwad, Poona-19.

Dattaram-SRP-17

# पैसे झाडाला लागत नाहीत हे तर खरंच


पण
बँक ऑफ बरोडातील
बचत खात्यात
ते कसे मोहरतात
ते पहाण्यासारखं आहे

कर पैसे कमवायचे म्हणजे किती कष्ट करावे लागतात याची तुम्हांला जाणीव आहेच. एवढे घाम गाळून मिळविलेले पैसे सुरक्षित ठेवणं... अन् ते वाढते ठेवणं ही-जबाबदारी तुमची आहे. बँक ऑफ बरोडा याबाबतीत तुम्हांला मोलाचे मार्गदर्शन करू शकेल.

बचत खाते : अगदी १ रु. पासून तुम्ही हे खाते उघडू शकता. वाटेल तेवढे पैसे या खात्यात तुम्ही जमा करू शकता. या अनामतीवर अर्थातच तुम्हांला चांगले व्याजही मिळेल. पूर्वसूचनेविना एका वेळी रु. १०,००० पर्यंतची रक्कम तुम्हांला काढता येईल.

मुलांसाठी बचत खाते : १० वर्षांवरील मुलांना हे खाते उघडता नि चालविता येते. १० ते १३ वर्षे वयोमर्यादेमधील मुलांना या खात्यांत रु. ५०,००० एवढी रक्कम ठेवता येते. १४ आणि त्याहून वयोमर्यादा असलेल्या मुलांना कितीही रक्कम या खात्यात शिल्लकी टाकता येते.

बँक डिपॉझिटसुवरील रु. ३००० पर्यंतच्या व्याजाच्या रकमेवर प्राप्तिकर आणि रु. १,५०,०००/- पर्यंतच्या बँक डिपॉझिटसुवर संपत्ति कर द्यावा लागत नाही. आजच बँक ऑफ बरोडात बचत खाते उघडा... अन् पहा आपले पैसे कसे भराभर वाढत जातात ते!

तुमच्या चिरंतन समृद्धीची गंगोत्री

**बँक ऑफ बरोडा**

भारतात सर्वत्र आणि इंग्लंड, पूर्व आफ्रिका
मॉरिशस, फिजी बेटे आणि गियाना
या परदेशांतही ६२५ वर शाखांचे जाळे

Shilpi-BOB-IB-71